# प्रभु वाणी

# GOD SPEAKS

मराठी

# प्रभु वाणी

## (God Speaks)

### सृष्टी निर्मितीचा विषय
### व तिचा उद्देश

– मेहेर बाबा प्रणीत




दुसरी आवृत्ती (मूळ ग्रंथाची)
(सुधारित व विस्तारित)
मराठी अनुवाद

अनुवादक :
– अण्णा खंडाळे
एम.ए.

**प्रकाशिका :**
**सौ. आशालता म. खंडाळे**
**मेहेराबाद**

**सुफिझम रिओरिएंटेड**
**यांच्या लेखी संमतीने**

कॉपीराईट© सर्व हक्क सुरक्षित

**अनंत खंडाळे** M.F.A. (Fine Art)
अंतरंग छपाई–जुळवणी
मो.नं. ९४२०१०६५६५
९४२१८६५८९७

**मूळ ग्रंथावरुन :**

कॉपीराईट ✻ १९५५,१९७३ सुफिझम रिओरिएंटेड इन्कॉर्पोरेटेड कडून सर्वाधिकार सुरक्षितः या पुस्तकाचा कोणताही भाग कॉपीराईट अधिकाऱ्यांच्या पूर्व लिखित परवानगीशिवाय पुनर्मुद्रित करता येणार नाही, पुन्हा प्रकाशनाकरिता राखून ठेवता येणार नाही किंवा कोणत्याच स्वरुपात, कोणत्याच साधनांनी – विद्युत, यांत्रिक, फोटोकॉपी, रेकॉर्डींगव्दारां पुन्हा प्रकाशित करता येणार नाही.

**प्रथम मराठी आवृत्ती**
**प्रती : १०००**

**किंमत ₹ १६०/–**

या प्रकाशनचा हेतू स्पर्धात्मक किंवा कोणत्याही प्रकारच्या नफा मिळविण्याचा नसून केवळ अवतार मेहेरबाबांचे प्रेमप्रसारण करण्याचा आहे.

समर्पण

विश्वाचेप्रती–
माया, जी सत्याला अंतर्भूत करुन राहते.

समर्पण

परमपिता अवतार मेहेरबाबांचे
पदकमलांवर

## गॉड स्पिक्स

### मेहेरबाबा– प्रणीत

### दुसरी आवृत्ती सुधारुन वाढविलेली

* * *

इतक्या सखोलतेचे वाचकांना सांगणारी अन्य कोणतीच कृती आतापर्यंत प्रकाशित झाली नाही की, ज्यामध्ये विश्वाचे व जीवनाचे मूलभूत यंत्र– शिल्प (मूळतत्व) सांगितल्या गेले आहे. गॉड स्पिक्स विश्वाच्या निर्मितीच्या क्षणापासून आत्म्याच्या प्रवासाचे सूक्ष्म व तपशिलवार वर्णन आहे, जो प्रवास सृष्टी निर्मितीच्या क्षणापासून तो चेतनेच्या उत्क्रांती व आत्मानुवर्ती उत्क्रांतीतील कार्यपूर्णतेच्या वेळे पर्यंत आहे, व आत्मा आपल्या उगमस्थानी –परमात्म्याकडे परततो.

प्रत्येक विकास अवस्थेतील मोहोरणे अनेक दृष्टीकोनातून वर्णिले आहे. अध्यात्म पथावरील काही मार्गदर्शक ठिकाणांची वैशिष्ट्ये व धोके सविस्तरपणे विशद केलेली आहेत. गॉड स्पिक्स वाचतांना वाचकाला अमर्याद विस्तृत दृष्टीकोनाची अनुभूती प्राप्त होते. ज्यातून जगातील सर्व धर्मांना, त्यातील शिकवणीला जवळ आणून एका माळेतील मण्यासारखे कसे सूत्रबध्द केले आहे याचे दर्शन घडते.सृष्टीच्या उद्देश वर्णनात प्रत्येक धर्माची समावेशक ज्ञानसंपदा व त्यांच्या शिकवणीतील युगायुगातील प्रेषितांचे विषयी काही मूलभूत गैरसमज अतिशय कुशलतापूर्वक दूर केलेले आहेत. मानवतेचे मूळ व गंतव्याची सुसंगत मूलभूत चौकट प्रकट करणे हाच उद्देश आहे.

जे साहित्य पूर्णत : नवीन आहे किंवा जे पूर्वी अगदीच तुकड्या –तुकडयात प्रस्तुत केले गेले आहे, अशा साहित्याचा दर्शनशास्त्राच्या व धर्माच्या अभ्यासकाला यात विपूल लाभ होतो. आधीच्या काळातील अस्पष्ट संकल्पना मेहेरबाबा अत्यंत असंदिग्धपणे व सुबोधपणे स्पष्ट करतात व त्याची व्याख्या सांगतात . चेतनेच्या उत्क्रांतीच्या संदर्भात ते सांगतात, नेहमी हे लक्षात ठेवणे चांगले की, प्रारंभ हा चेतनेतील आरंभ, उत्क्रांती ही चेतनेतील उत्क्रांती व शेवट जर शेवट असेल तर तो चेतनेचा शेवट समजावा.

या ग्रंथाचा समारोप करताना हे अगदी खात्रीने लक्षात राहाते. की, हा ग्रंथ कशा यंत्र–गतीने पूर्ण झाला असेल याचा यत्किंचितही विचार न करता परमात्म्याचा आवाज या ग्रंथाचे माध्यमातून ऐकला गेलेला आहे.

गॉड स्पिक्स सारखा ग्रंथ ज्यामध्ये सृष्टीचा हेतू व जीवनाचे उद्दिष्ट सामावलेले आहे असा ग्रंथ लिहिण्याची खोली, कुशाग्रता व अंतर्दृष्टी केवळ परमात्म्याचा साक्षात्कार लाभलेल्या व्यक्तीलाच असू शकते. पूर्ण पुरुषांमधील मेहेरबाबा हे एक विरळ

व्यक्तिमत्व आहे की, जे जागतिक गंभीर आपत्काली व नवीन युगाची घडी व्यवस्थित बसविण्यासाठी प्रकट होते. २५ फेब्रुवारी १८९४ पासून ते ३१ जानेवारी १९६९ च्या कालखंडात मानवतेच्य रक्षकाने या धरणीवर पुन्हा पाय ठेवला आहे. मसीहा, ख्रिस्त, अवतार, बुध्द, परमेश्वराचा रसूल मेहेरबाबा या नावाने तो आपल्यात वावरला. हे विधान बुध्दीने सिध्द करता येणे शक्य नाही व असल्याप्रकारचा अधिकार ही प्रस्थापित करता येत नाही. जे मेहेरबाबांकडे त्यांच्या जीवन व शिकवणीच्या प्रभावाने प्रभावित होऊन आकृष्ट झाले आहेत त्यांचा केवळ अंतरात्मा ताणल्यामुळेच त्यांच्या महानतेचे व मौलिकतेचे मूल्यमापन होऊ शकते.

मेहेरबाबांच्या जीवनकाळात त्यांचे वास्तव्य पश्चिम भारतातील पुण्याला किंवा अहमदनगर येथे असे नंतरच्या काळात त्यांचे कायमचे वास्तव्य मेहेराझाद येथे होते. पाश्चिमात्यांच्या दृष्टीने त्यांच्याशी संपर्क साधणे जरी कठीण होते तरी त्यांचा तो वेगळेपणा नव्हता. त्यांचे प्रदीर्घ एकांतवासाचे कालखंड व जगप्रवास आळीपाळीने होत असत. प्रसिध्द व अपरिचित व्यक्तिंशी त्यांचा संपर्क विस्तृत प्रमाणात होता. जनसमुहात त्यांचे प्रभावी व्यक्तिमत्व लोकांना आकर्षित करीत असे. त्यांच्या संपर्कात येणाऱ्या सर्वांना त्यांची विलोभनीयता व संवेदनशीलता सतत व सर्वत्र जाणवत असे. त्यांच्या भक्तांच्या बाबतीत बाबा त्यांच्या अस्तित्वाचा प्रत्येक पैलू बदलून टाकत असत. सहवास व दर्शन कार्यक्रमाचे वेळेस त्यांचे भक्त देखील आपला जीवनक्रम बदलून त्यांच्या सहवासाचा मिळणाऱ्या विरळ्या संधीचा लाभ घेत असत. १९२५ पासून स्वेच्छेन धारण केलेल्या मौनामुळे त्यांच्या विचारांच्या व संदेशांच्या आदान प्रदानात कधी व्यत्यय निर्माण झाला नाही. ते म्हणत असत मी गतकाळात तुम्हाला पुरेसे शब्द दिले आहेत व आता त्याप्रमाणे वागण्याची वेळ आली आहे. १९५४ पर्यंत त्यांनी इंग्रजी वर्णमाला फळीचा उपयोग केला. याच फळीवरुन त्यांनी प्रस्तुत ग्रंथ लिहवून घेतला. १९५४ नंतर बाबा सांगण्यासाठी हावभावांचा उपयोग करीत जे हावभाव त्यांचे शिष्य समजावून सांगत असत.

नवीन धर्माच्या प्रस्थापनेसाठी मेहेरबाबा आले नाहीत, ते म्हणाले धर्म पुष्कळ आहेत. ते आम्हाला जागृत करण्यासाठी आले आहेत . प्रत्यक्षात त्यांनी दिलेल्या शिकवणीप्रमाणे जगणे व इतरांची सेवा करणे हे कार्य इतरांचे धर्म परिवर्तन करण्यापेक्षा व त्यांना आपल्या मताप्रमाणे वागण्यास प्रवृत्त करण्यापेक्षा महान आहे. **सेवेत स्वामित्व** हे बाबांचे जीवनकाळातील ज्वलंत ब्रीदवाक्य राहिले आहे.

मेहेराबाद टेकडीवरील त्यांचे समाधीवर हे वाक्य लिहिलेले आहे.

# मनोगत

# ही तर प्रभूंची इच्छा !

**फोडिले भांडार धन्याचा हा माल, मी तव हमाल भारवाही !**

– तुकाराम

'गॉड स्पिक्स' हा ग्रंथ अवतार मेहेरबाबांनी अमेरिकेत आपल्या मौनवाणीतून लिहवून घेतला.

जीवन एक महान समस्या आहे. म्हणून जीवन समजले पाहिजे. प्रियतम बाबा म्हणतात :

जीवन हा एक महान विनोद आहे
जीवन समजले तर ते केवळ गंमत आहे.
जर जीवन समजले नाही तर ते तापदायक आहे.

मानवाला जीवन समजावे म्हणून मेहेरबाबांनी गॉडस्पिक्स या ग्रंथात हे जीवनज्ञान विस्तृत रुपाने ग्रंथित केले आहे. आपण जर ही जीवनविद्या या ग्रंथाचा अभ्यास करुन आत्मसात केली तर हे जीवन खरोखर एक विनोद आहे हे आपल्याला कळेल. जे जीवन एक जटील समस्या आहे तेच जीवन 'आनंदाचे डोही आनंद तरंग' बनेल. कारण प्रत्येकजण हा एक तरंग आहे. एक थेंब आहे. प्रत्यक्षात तो एक महासागरच (परमात्माच) आहे. परंतु ही प्रत्यक्ष अनुभूती येईपर्यंत हे ज्ञान प्रत्येकाने ग्रहण करावे म्हणून बाबांनी हे ज्ञान या ग्रंथाच्या रुपाने मानवतेला प्रदान केले आहे. या ग्रंथाचे भाषांतर करताना मी जरी हा विषय जास्तीत जास्त सुलभ करण्याचा प्रयत्न केला असला तरी हा विषय मुळातच एक आगळावेगळा  व काहिसा कठीण असल्यामुळे वाचकांना विनंती आहे, की त्यांनी हा ग्रंथ कादंबरी सारखा न वाचता अगदी लक्षपूर्वक मन लावून वाचावा. डॉन स्टिव्हन्स यांनी स्पष्ट केले आहे की, हा विषय काही थोड्या ठिकाणी थोडाफार समजायला जड झाला आहे परंतु तो सुलभ करण्याच्या प्रयत्नात अधिक क्लिष्ट होऊ नये या भीतीने तो भाग तसाच ठेवला आहे.

ड्रेफस नावाच्या एका पाश्चात्य भक्ताला बाबांनी सांगितले ''जोपर्यंत तुझ्या नसेनसेतून गीत गुंजन ऐकल्यासारखे तुला वाटणार नाही तोपर्यंत तू पून्हः पुन्हा 'गॉड स्पिक्स' वाचत राहा. तुला गरज आहे विश्वास आणि श्रद्धेची.

**गॉडस्पिक्सचे वाचन तुला बौध्दिक विश्वास देऊ शकते.**'' माझा संदेश सर्वांना दे. मी तुला मदत करीन. त्यांना सांगणे एवढेच तुझे काम.

सायमन नावाच्या एका पाश्चात्य तरुणाला ड्रग्जच्या प्रभावाखाली असताना गॉडस्पिक्स हा ग्रंथ दिसला व मुखपृष्ठावरील बाबांचे चित्र पाहून तो भावविभोर झाला.

एकमेव परमात्माच सर्व सृष्टीरुपाने कसा नटला आहे, ही गोष्ट प्रियतम बाबांनी तपशीलवार अगदी पायरी पायरीने या ग्रंथात समजावून सांगितली आहे. हे जीवन एकदा समजले म्हणजे ही सर्व सृष्टी 'दैवी स्वप्न' कसे आहे हे समजेल. ''दैवी स्वप्न'' म्हणजे दैवी लिला. आपण त्याच्या दैवी स्वप्नात जगतो आपण जे स्वप्न पाहतो ते परमात्म्याच्या दैवी स्वप्नात स्वप्न आहे. आपण जागे झाल्यावरच आपल्याला कळते की ते स्वप्न होते. स्वप्न पहात असताना स्वप्न हे सत्य असते. अगदी याचप्रमाणे आपण युगानुयुगे या दैवी स्वप्नाचा अनुभव घेतल्यानंतर म्हणजे या जीवनाचा सत्य म्हणून अनुभव घेतल्यानंतर एक दिवस असा उजाडेल की आपण खऱ्या अर्थाने जागृत होऊ म्हणजे आपल्याला 'मी परमात्मा आहे' हा अनुभव प्राप्त होईल व तेव्हाच आपल्याला हे कळेल की युगानुयुगे आपण जे जीवन सत्य म्हणून जगलो ते केवळ एक दैवी, स्वप्न होते. ही आहे 'अहंब्रह्मास्मिची' अवस्था म्हणजे यथार्थ जागृती म्हणून ही सत्य जागृती प्राप्त होई पर्यंत बुद्धिने हा विषय समजून घेऊन जीवन विवेकाने जगले पाहिजे या करिताच बाबांनी 'गॉड स्पिक्स' हा ग्रंथ दिला आहे. बुद्धिने का होईना एकदा जीवनाचा अर्थ कळला म्हणजे जीवनातील समस्यांचे आपण निराकरण करु शकतो व आघात सहन करु शकतो.

जीवन जर सत्य असते तर ते मृत्यूने एका क्षणात हिरावून नेले नसते. ते टिकून राहिले असते म्हणून जीवन हे क्षणभंगूर आहे याचा सतत विचार करा. जर जीवन क्षणभंगूर आहे तर जीवनातील सर्व घटना व आघात असत्य म्हणजे भ्रमवत आहेत. या सर्व भ्रमांचा अनुभव देण्याकरिताच हे जीवन आहे. अनुभव घ्या व पुढे चला. संस्कार घ्या व खर्च करीत चला. अनंत जन्माचे शेवटी संस्काररहित चेतना तुम्हाला तुम्हीच परमात्मा असल्याचा अनुभव प्रदान करील ही आहे यथार्थ जागृती. जी प्राप्त करणे हेच या जीवनाचे लक्ष्य आहे. परंतु मनुष्य

हे लक्ष्य विसरला व जीवनात मधू शोधण्याऐवजी त्या मधात मधमाशी प्रमाणे रुतून बसला. जीवनातील प्रलोभनांना बळी पडला. मधुसंचय करुन जीवन मधूर करता आले पाहिजे. मध चाखता आले तर ध्येय गाठणे कठीण नाही. जीवन गुलकंद बनले पाहिजे.

गॉड स्पिक्स या ग्रंथाचे मराठी भाषांतर करण्याचा विचार बऱ्याच वर्षांपासून मनात एकसारखा घोळत होता परंतु धाडस होत नव्हते तथापि या विषयावर मी बऱ्याच ठिकाणी लिहिले व 'जीवन रहस्य' या मराठी व हिन्दी पुस्तकात सारांशरुपाने व 'The mystery of life and death' या इंग्रजी पुस्तकात विस्तृत प्रमाणात हा विषय मी दिला आहे व या विषयावर काही केन्द्रात भाषणे पण दिली आहेत. असे असले तरी ही बाब आपल्या आवाक्याबाहेरची आहे असे मला वाटत होते.

**अवतार मेहेरबाबांनी प्रत्यक्ष दिलेल्या अधिकृत सूचना** 'लिसन ह्युमॅनिटी' या पुस्तकात आलेल्या आहेत. ते म्हणतात :

''तुम्ही या एका विशेष गोष्टीची नोंद घ्यावी की, जी मला अगत्याची वाटते व जेणे करुन मी खुश होईन, जर तुमच्यापैकी प्रत्येकजण हा **'गॉड स्पिक्स'** ग्रंथ केवळ जवळच बाळगणार नाही तर तो अगदी पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत वाचून आत्मसात करेल, **कारण अशाप्रकारचे मी दिलेले हे शेवटचे पुस्तक आहे** आणि याचप्रमाणे मी अधिक खुश होईन की, जर तुमच्यापैकी ज्यांना हे शक्य आहे त्यांनी जास्तीत जास्त भाषेत हे ज्ञान भाषांतर करुन त्यांच्याकरिता उपलब्ध करुन दिले की ज्यांना इंग्रजी वाचता येत नाही व समजत नाही.''

अशी आंतरिक प्रेरणा बाबांनी दिली असली तरी मूळ विषयाच्या अभिप्रेत अर्थाला गालबोट न लागता समर्पक शब्द योजना करणे, ही शब्दशः भाषांतर करण्याकरिता मोठी अडचण असते. डिक्शनरितील शब्द कधी कधी समर्पक वाटत नाहीत तेव्हा अर्थाला जुळेल अशी स्वतंत्र शब्दयोजना करावी लागते. असे असले तरी छपाईचा विचार न करता अंदाजे ५ वर्षांपुर्वीच मी या ग्रंथाचे भाषांतर सुरु केले व ५०-६० पानांचे मराठी भाषांतर पूर्ण झाल्यावर मला बराच आत्मविश्वास निर्माण झाला की हे भाषांतर होऊ शकते.

सुफिझम रिओरिएंटेड, अमेरिका, यांना परवानगी मागितली असता त्यांनी या ग्रंथातील दोन विशिष्ट प्रकरणांचे मराठी भाषांतर करुन त्यांना तपासण्याकरिता पाठविण्यास सांगितले. मी त्याप्रमाणे भाषांतर करुन ते योग्य व्यक्तिकडून तपासून घेऊन त्यांना पाठविले. परंतु महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी ते भाषांतर नामंजूर केले व परवानगी नाकारली. मी अर्थातच फार निराश झालो. प्रियतम बाबांच्या समाधीवर जाऊन ते सर्व बाबांसमोर ठेवले व प्रार्थना केली की जर मी असमर्थ आहे व आपली इच्छा नाही तर ही गोष्ट मान्य आहे, परंतु बाबा, भारतातील इतर प्रमुख भाषेत हा ग्रंथ उपलब्ध आहे व मराठीत आज लोक मागत आहेत तेव्हा कोणाला तरी हे कार्य मराठीत करण्याची प्रेरणा द्या. अशी प्रार्थना करुन बाबांच्या इच्छेला शरण जाऊन मी निश्चिंत झालो.

**ही तर प्रभूंची इच्छा !**

विशेष म्हणजे दोन दिवसांनी नेहमीप्रमाणे मी सकाळी ५ वाजता उठून समाधीवर जाण्याची तयारी करीत असताना अवकाशातून एक प्रभावी विचार, एखाद्या प्रकाश झोतासारखा अनपेक्षितपणे येऊन माझ्यात शिरला. हा विचार प्रवाह इतका प्रभावी होता की, तो येत असताना त्याची तीव्रता मला प्रकर्षाने जाणवली. तो विचार होता– 'पुन्हा प्रयत्न कर' मी थोडावेळ सुन्न झालो कारण अशाप्रकारचा अनुभव मी आयुष्यात प्रथमच घेत होतो. या विस्मयकारक अनुभूतीच्या प्रभावाखाली मी नेहमीप्रमाणे सकाळी समाधीवर गेलो. सर्व गर्दी ओसरल्यावर आत जाऊन प्रियतम बाबांना प्रार्थना केली : ''बाबा, मी तर ही दोन्ही प्रकरणे बाहेरुन तपासून घेतली होती. आज मला या कार्यात मदत करण्यास कोणीही तयार नाही. आता जर हे अवघड कार्य मलाच करायचे आहे व अशी तुमची मर्जी आहे तर तुम्हीच मला अदृष्यप्रकारे मदत करुन हे कार्य करण्याची शक्ती प्रदान करा. कारण त्याशिवाय हे खास कार्य माझ्यासारख्या अल्पमतीच्या मनुष्याकडून पूर्ण होणे शक्य नाही.''

ही तर प्रियतम बाबांची इच्छा, असा विचार करुन मी या कार्याला पुन्हा प्रारंभकेला व त्यांनी सांगितल्याप्रमाणे दोन्ही प्रकरणांचे पुन्हा निरीक्षणपूर्वक भाषांतर करुन सुफीझमला त्या प्रती पाठविल्या. आनंदाची गोष्ट अशी की परीक्षकाने त्या मंजूर केल्या व सुफीझमने मला हा ग्रंथ मराठीत भाषांतर

करण्याची परवानगी दिली. दोन वर्षात मी उरलेले भाषांतर पूर्ण केले. हे भाषांतर करताना या माझ्या उतारवयातही मी एका आगळ्यावेगळ्या प्रेमाचा, आनंदाचा, उत्साहाचा व प्रभूंच्या अदृष्य मार्गदर्शनाचा अप्रतिम अनुभव घेतला, जी अनुभूती शब्दातीत आहे. तिला शब्दात व्यक्त करणे शक्यच नाही. हे प्रियतम बाबा, माझ्या हृदयातील संवेदनेपेक्षा जास्त शुध्द शब्द माझ्या जवळ नाहीत.

एरचजींनी (लॉर्ड मेहेर खंड १९) सांगितले की, बाबा जेव्हा काही शब्द देतात तेव्हा त्यांना एक आध्यात्मिक उर्जा जोडतात– **ज्याला आध्यात्मिक अणुबॉम्ब असे कहिसे म्हणता येईल. 'गॉड स्पिक्स' चे बाबतीत हे विशेष करुन सत्य आहे.** एखादा जेव्हा ते शब्द वाचतो व त्या वाचनातील त्याला जरी एकही शब्द समजला नाही तरी आध्यात्मिक उर्जेचा एक हिस्सा त्याच्यामध्ये समाविष्ट होईल व ही उर्जा त्या मनुष्याला त्याच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी फार महत्वाची ठरेल.

मेहेराझादला असताना फिलीस या अमेरिकन महिलेला बाबा म्हणाले : ''गॉड स्पिक्स तीन किंवा चार वेळ वाच. तुझे डोळे रड रडऽऽऽ रडतील. तुझे अंतःकरण जळेल आणि जळून खाक होईल. तुला सत्याचा अनुभव येईल.''

फिलीसने नंतर सांगितले ''या शब्दांचा माझ्या चेतनेवर एखाद्या बॉम्बप्रमाणे प्रभाव पडला. माझ्या जीवनातील सर्व किरकोळ गोष्टींचा गोळा झालेला कचरा, ज्याप्रमाणे तुकडे व धूळ होऊन पडावा त्याप्रमाणे छिन्नभिन्न होऊन पडला.''

मला शेवटी ज्ञानेश्वरांनी, ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे सेवन करण्याबाबत जे काव्यात्मक वर्णन केलेले आहे, त्यामधील काही भाग आठवतो.

जैसे शारदीयेचे चंद्रकळे । माजी अमृतकण कोंवळे ।
ते वेंचिती मनें मवाळे । चकोर तलगें ।।
तयापरी श्रोता । अनुभवावी हे कथा ।
अति हळुवारपण चित्ता । आणुनियां ।।
हे शब्देविण संवादिजे । इंद्रियां नेणतां भोगिजे ।
बोला आदि झोंबिजे । प्रमेयाशी ।।
जैसे भ्रमर परागु नेती । परी कमलदळे नेणती ।
तैसी परी आहे सेविती । ग्रंथी इये ।।

भावार्थ : ग्रंथाचे सेवन करताना चित्तवृत्ती कशी असावी, हे सांगण्यासाठी ह्या ओव्या आहेत. ज्याप्रमाणे शरदरुतूतील चंद्राच्या किरणांमधील जे अमृतकण चकोरांची पिल्ले हळूवारपणे मोठ्या मवाळ मनाने वेचून घेतात, त्याप्रमाणे श्रोत्यांनी ही कथा अनुभवावी. कशी ? अती हळूवार पणाने, चित्त एकाग्र करुन. भुंगे फुलातील पराग घेऊन जातात पण कमळाच्या पाकळीला त्याचा पत्ता देखील लागत नाही, त्याप्रमाणे इंद्रियांना माहीत न होता त्यातील प्रमेय शोधावे, हे शब्दाशिवाय संवादावे त्याप्रमाणे हा ग्रंथ वाचण्याची रीत आहे.

हा ज्ञानदेवांनी केलेला उपदेश या 'गॉड स्पिक्स' ग्रंथाचे वाचनाकांना अगदी तंतोतंत लागू पडतो. एकाग्र चित्ताने तल्लीन होऊन हा ग्रंथ वाचला तर त्यांना हे जटील जीवन समजण्यास अत्यंत मदत होईल. हा ग्रंथ वाचत असताना आपल्या आत्म्यावर न कळत काही आगळेवेगळे आध्यात्मिक संस्कार होतील, ज्यांचा तुमच्या जीवनावर मंगलकारी प्रभाव पडेल. जीवन सौंदर्यपूर्ण व वैभवसंपन्न असल्याची तुम्हाला अनुभूती येईल.

'गॉड स्पिक्स' या ग्रंथात दिलेला चेतनेच्या उत्क्रांतीचा विषय जगातील कोणत्याही धार्मिक ग्रंथात आलेला नाही, ही महत्वाची गोष्ट लक्षात ठेवावी.
शेवटी पुन्हा ज्ञानेश्वरांचे शब्दातः

आतां विश्वात्मके देवें । येणें वाग्यज्ञे तोषावे ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ।।

हे भगवंता या ग्रंथाचे मराठी भाषांतर करुन मला जशी साधली तशी मी आपली सेवा करण्याचा प्रयत्न केला. तरी ही सेवा गोड मानून घ्यावी, हीच माझ्या अंतःकरणातील आर्जव. मनोमन विनवणी करुन, ही सेवा मी आपल्या पदकमलांवर या नवजीवना प्रीत्यर्थ अर्पण करतो.

**मेहेराबाद** **– अण्णा खंडाळे**
नवजीवन स्मृति दिवस
दिनांक– १६–१०–२०१८

## जय मेहेर बाबा

# कृतांजली

माझे परमपिता अवतार मेहेर बाबा ज्यांनी मला 'गॉड स्पिक्स' या त्यांच्या अमूल्य ग्रंथाचे मराठी भाषांतर करण्याची प्रेरणा व संधी दिली त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याकरिता माझ्याजवळ शब्द नाहीत. म्हणून हे भगवंता फक्त माझ्या अंतःकरणातील प्रेमाने ओथंबलेल्या सुप्त कृतकृत्य भावनेचा स्वीकार करा ! हीच मनोमन प्रार्थना !

सुफीझम रिओरिअेंटेडचे (अमेरिका) मान्यवर इरा डेट्रिक यांनी गॉडस्पिक्स या इंग्रजी ग्रंथाचे मराठी भाषांतर करुन छापण्याबाबत दिलेल्या परवाणगीबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. त्याचप्रमाणे अवतार मेहेरबाबा (अ.नगर) ट्रस्टचे अध्यक्ष श्रीमान श्रीधरजी केळकर यांच्या प्रोत्साहनाबद्दल, डॉ. माधवराव कंटक, व डॉ. दिगंबर गाडेकर यांनी मेहेरप्रेमाने दिलेल्या सक्रिय सहकार्याबद्दल, तसेच श्री. सुभाष पोकळे व श्री. अविनाश कोपूलवार यांनी मेहेरप्रेमाने दिलेल्या प्रतिसादाबद्दल, मी या सर्वांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करतो.

हस्तलिखित प्रत तयार करण्याकरिता सर्वश्री रामचंद्र गायकवाड, गोपाल चरपे, प्रदिप चौधरी, दीपक वैरागकर व सौ. रश्मी जोशी यांनी मेहेरप्रेमाणे जी सेवा दिली त्याबद्दल ते सर्व मेहेरकृपेस पात्र आहेत यात शंका नाही. त्याचप्रमाणे माझ्या परिवारातील सदस्यांचा मी नामनिर्देश करीत नाही, परंतु सर्व लहान–थोरांनी जी मेहेरप्रेमाने सेवा दिली त्याबद्दल ते सर्व मेहेरप्रभूंच्या आशीर्वादास पात्र आहेत.

या ग्रंथाची मूळ किंमत कमी करुन छपाई खर्चापेक्षा कमी मूल्यात हा ग्रंथ वाचकांना उपलब्ध करुन देण्याकरिता ज्या प्रेमीजनांनी मेहेरप्रेमाने अर्थसहाय्य दिले त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केल्याशिवाय मला रहावत नाही. त्यांची यादी या ग्रंथाचे शेवटी दिलेली आहे.

श्री. सुदर्शन बोगा– शांती प्रिन्टस् यांनी डी.टी.पी.,डिझाईनचे काम सुबक प्रकारे करुन दिल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

शेवटी परमपिता मेहेरप्रभूंच्या चरणी ही सेवा अर्पण करतो.

**मेहेराबाद** — **अण्णा खंडाळे**

दिनांक– १६–१०–२०१८ — मो. 9881333624

# अणुक्रमणिका


| अ.क्र. | नाव | पान नं. |
|---|---|---|
| १) | रेखाचित्रे (अनुक्रमणिका) | ...१६ |
| २) | पुरवणीची (अनुक्रमणिका) | ...१७ |
| ३) | पहिल्या आवृत्तीचे प्राककथन (मूळ ग्रंथाचे) | ...१ |
| ४) | पहिल्या आवृत्तीची प्रस्तावणा (मूळ ग्रंथाची) | ...६ |
| ५) | दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावणा (मूळ ग्रंथाची) | ...२६ |
| ६) | भाग – १ चेतनेच्या अवस्था | ...३७ |
| ७) | भाग – २ मूळ उर्मी व चेतनेच्या उत्क्रांतीचा प्रवास | ...४५ |
| ८) | भाग – ३ विविध साम्राज्यांची स्वभाव वैशिष्ट्ये | ...६९ |
| ९) | भाग – ४ पुनर्जन्म व चेतनेचा संस्काररहित समतोल | ...७३ |
| १०) | भाग – ५ भूमिका | ...८४ |
| ११) | भाग – ६ दिव्य चेतनेच्या अवस्थांचा गोषवारा | ...९९ |
| १२) | भाग – ७ सात घड्यांचा पडदा | ...११२ |
| १३) | भाग – ८ परमात्म्याची परात्पर परब्रह्म अवस्था, प्रथम उर्मी, (मूळ लहर) व चेतनेच्या उत्क्रांतीचे आणि आत्मानुवर्ती उत्क्रांतीचे चक्र | ...१२१ |
| १४) | भाग – ९ परमात्म्याच्या दहा अवस्था | ...२१८ |
| १५) | भाग – १० उपसंहार | ...२५६ |
| १६) | पुरवणी | ...२५८ |
| १७) | समारोप | ...३६० |
| १८) | पारिभाषिक शब्द – स्पष्टीकरणे कोश (Glossary) | ...३६१ |

# रेखाचित्रे अणुक्रमणिका


| अ.क्र. | नाव | पान नं. | |
|---|---|---|---|
| १) | भूमिका व जगते | ...९९ | च्या समोरासमोर |
| २) | मूळ लहर (उर्मी) | ...१२४ | –,,– |
| ३) | यथार्थ जागृती | ...१४४ | –,,– |
| ४) | उत्क्रांती व आत्मानुवर्ती उत्क्रांती | ...१६६ | –,,– |
| ५) | यात्रा | ...१८५ | –,,– |
| ६) | चार यात्रा | ...१९७ | –,,– |
| ७) | परमात्मा सत्य आहे | ...२१४ | –,,– |
| ८) | परमात्म्याच्या दहा अवस्था | ...२१७ | –,,– |
| ८ अ) | सृष्टी–उत्क्रांती, पुनर्जन्म, आत्मानुवर्ती उत्क्रांती व साक्षात्कार अवतार मेहेर बाबांनी विशद केल्याप्रमाणे | ...२५७ | –,,– |
| ९) | दिव्य प्रक्रिया | ...२९६ | –,,– |
| १०) | दिव्य प्रक्रिया | ...२९८ | –,,– |
| ११) | चेतनेच्या भूमिकांचे संदर्भात या ग्रंथात उपयोजिलेले रहस्यवादी, सुफी व वेदांती पारिभाषिक शब्द (शेवटी जोडलेले) | | |

# पुरवणीची अनुक्रमणिका


| अ.क्र. | नाव | पान नं. |
|---|---|---|
| १) | संस्कारयुक्त चेतना | ...२५८ |
| २) | व्यवहार्य गूढवद | ...२६० |
| ३) | पहिली भूमिका | ...२७० |
| ४) | दुसरी भूमिका | ...२७१ |
| ५) | तिसरी भूमिका | ...२७२ |
| ६) | तिसऱ्या व चवथ्या भूमिकांमधील टप्पा | ...२७२ |
| ७) | मनोभुवनाचा साधक | ...२७४ |
| ८) | सहावी भूमिका | ...२७६ |
| ९) | सहाव्या भूमिकेचे गूढज्ञान | ...२७६ |
| १०) | सातवी भूमिका | ...२७७ |
| ११) | विविध प्रकारचे चमत्कार | ...२७८ |
| १२) | गूढ शक्तींचे प्रकार | ...२८६ |
| १३) | ध्यान | ...२८९ |
| १४) | मेहेरबाबा प्रणीत दिव्य प्रक्रिया–विषय | ...२९१ |
| १५) | मेहेरबाबांनी वर्णिलेली पाच भुवने | ...३०१ |
| १६) | दृढविश्वास व ज्ञानाचे प्रकार | ...३०७ |
| १७) | परमात्मा अनंत व सर्वकाही आहे | ...३१० |
| १८) | पाच आध्यात्मिक तथ्ये | ...३११ |
| १९) | खरा जन्म व खरा मृत्यू | ...३१२ |

# अणुक्रमणिका


| अ.क्र. | नाव | पान नं. |
|---|---|---|
| २०) | फना व फना-फिल्लाह | ...३१३ |
| २१) | फना व बका बद्दल सुफी धारणा | ...३१४ |
| २२) | चेतनेची आत्मानुवर्ती उत्क्रांती | ...३१६ |
| २३) | पाच बीजगणीती व्याख्या | ...३१७ |
| २४) | चार प्रकारची मुक्ती | ...३१८ |
| २५) | चार प्रकारच्या मुक्तीचा सारांश | ...३२० |
| २६) | पूर्णतेची लक्षणे | ...३२१ |
| २७) | हाल व मुकाम | ...३२३ |
| २८) | अवताराचे आगमन | ...३२५ |
| २९) | सातव्या भूमिकेचे गूढज्ञान | ...३२६ |
| ३०) | अवतार व सद्गुरु | ...३२७ |
| ३१) | कर्म व अकर्म | ...३२९ |
| ३२) | मेहेरबाबांनी सांगितलेले दिव्य शासक मंडळ | ...३३१ |
| ३३) | अवतार म्हणून परमात्म्याचे अवतरण | ...३३४ |
| ३४) | तौहीद किंवा परमात्म्याशी एकरुप अवस्था | ...३३५ |
| ३५) | माया | ...३४९ |
| ३६) | मेहेरबाबा सांगतात | ...३४९ |
| ३७) | ॲस्ट्रल जगत | ...३५६ |

# पहिल्या आवृत्तीचे प्राक्कथन

काही अशा तत्वांचा समावेश या ग्रंथाच्या लेखनात व संपादनात झालेला आहे की, ज्यांचे स्पष्टीकरण करण्याकरिता अधिक काही लिहिणे आवश्यक आहे.

आपल्या वर्णमालाफळीच्या माध्यमाव्दारे मेहेर बाबांनी या ग्रंथातील संपूर्ण विषय १ ते भाग ८ पर्यंत लिहवून घेतला आहे.

भाग ९ व भाग १०– ''परमात्म्याच्या दहा अवस्था'' व ''समारोप'' हे एरच् बी. जेसावाला यांनी, मेहेरबाबांनी लिहून घ्यावयास सांगितलेल्या टिपणांवरुन विस्तारित करुन लिहिलेले आहे. मेहेर बाबांनी प्रत्यक्ष लिहवून घेतलेल्या मागील विभागांचा हा गोषवारा आहे. संपादकांनी काही तळटीपा जोडल्या आहेत त्यामध्ये मेहेर बाबांच्या आधीच्या प्रकाशित व अप्रकाशित विधानांचा व पौर्वात्य रहस्यवादी कवींच्या स्वैर अनुवादित अवतरणांचा उपयोग केलेला आहे. याशिवाय या ग्रंथाला जोडलेल्या पुष्कळ तळटीपांमध्ये व पुरवणीमध्ये मेहेर बाबांच्या काही शिष्यांनी – ज्यात विशेषकरुन मेहेरवासी अब्दुल गणी, मुन्सिफ या सुफी शिष्याचा अंतर्भाव आहे व ज्यांना बाबांचा सहवास दीर्घकाळ लाभलेला आहे – लिहून घेतलेल्या टीपांचाही समावेश आहे ही सर्व टिपणे स्पष्टीकरणावर आधारित असून त्यांच्याच अनुमतीने घेतलेली आहेत. या ग्रंथात भाग ३ चे शेवटी आलेला 'The Ascending Soul' या फारसी काव्याचा अनुवाद रेनॉल्ड ए. निकोल्सनच्या ''रुमी पोएट ॲन्ड मिस्टिक'' यावरुन घेतला असून ते पुस्तक ''जॉर्ज ॲलन ॲन्ड उनविन लिमिटेड' ने प्रकाशित केले आहे.

भगवत्गीतेच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेतील अवतरण सर एडविन अर्नाल्ड यांच्या 'रुतलेज अन्ड केगन पॉल लिमिटेडने' प्रकाशित केलेल्या 'दि साँग सिलेस्टियल' या मधून घेतले आहे. ही भाषांतरे पुन्हा छापण्यासाठी दिलेल्या परवाणगीबद्दल उल्लेखित प्रकाशकाचे आभार. गॉड स्पिक्सचा संपूर्ण विषय मेहेर बाबांनी दुरुस्त करुन मान्य केला आहे.

आता प्रस्तुत संपादकाचे एकच प्राथमिक काम राहिले व ते म्हणजे काही बाबींवर लक्ष देणे जे कोणत्याही प्रकाशनाला अंतिमरुप देण्यासाठी आवश्यक असते. जर या ग्रंथकर्त्याने विशेष विनंती केली नसती तर त्यांनी कदाचित या मौलिक कृतीच्या संदर्भातील हे अल्पसे कामही स्वीकारले नसते.

सुफिझम रिओरिएन्टेडच्या बरोबर व्यक्तिगत संबंध ठेवणाऱ्या संपादकाच्या बाबतीत, ज्या थोड्या लोकांना हा संबंध माहीत आहे त्यांनी गैर अर्थ काढू नये. मेहेरबाबांचे अभिप्राय सांप्रदायिक उद्देशविरहित व पक्षपात विरहित राहिलेले आहेत. त्यांनी अगदी सरळ विधाने केलेली आहेत की, ते सर्व वादांची (सुफिवाद, वेदान्तवाद, इसाईवाद, झरतृष्टवाद, बुध्दवाद इत्यादी) धार्मिक तसेच राजकिय पक्षांची व त्यांच्या अनेक चांगल्या कार्यांची प्रशंसा करतात परंतु यापैकी कोणाशिही ते संबंध ठेवत नाहीत व ठेवू शकत नाहीत. 'संपूर्ण सत्य' सर्व समावेशक व सर्वांच्या पलिकडे असल्याचे ते मानतात व त्यांचे कार्य या दैवी मार्गाचे अनुसरण करणाऱ्या अनुयायांना त्यांच्या यथार्थ व सत्य भावनेप्रत जागे करणे आहे. ''सर्व जीवनाची एकता ही अखंड व अविभाज्य आहे, सर्व मतमतांतरे असुनही ती अभेद्य व अजेय राहते''

'गॉड स्पिक्स'' या ग्रंथातील बरेच परिच्छेद स्पष्टपणे पुन्हा पुन्हा आलेले आहेत, ही गोष्ट वाचकांच्या लवकर लक्षात येईल. जर या कृतीचा उद्देश प्रचलित संस्कृतीचे वाजवी ज्ञान सिध्दांत स्पष्ट करवयाचा होता तर ही कृती सोप्या तर्कशुध्द क्रमात मांडणे व सिध्दांताची उकल थोडक्यात परिपूर्ण होऊ देणे उचित झाले असते. परंतु गॉड स्पिक्स आध्यात्मिक सत्याच्या अनेक पूर्व धारणांच्या अंशाना निवडून व्यवस्थित व परस्परांना अनुरुप अशारीतीने मांडते. एवढेच नव्हे तर या पूर्ण विषयाला, ऐतिहासिकदृष्या मिळणाऱ्या सामुग्रीच्या अपेक्षेपेक्षा जास्त व त्यामध्ये अनेक नवीन व विस्तृत विचार शैलीचे देखील प्रतिपादन करते.

याला अत्यंत परिणामकारक रीतीने समजण्याकरिता विभिन्न दृष्टीकोनातून वाढत्या कल्पनाविषयक पुनःप्रतिपादना बरोबर वारंवार पाहणे

आवश्यक दिसते. या विविध परिस्थितीत उदाहरणे व उपाख्याने वारंवार सांगितल्या गेली आहेत, उद्देश असा की, प्रत्येक भाग परिपूर्ण व्हावा व वाचकांना तपशिलासाठी मागिल पृष्ठे संदर्भित करण्याचे टाळता यावे व पुढील संदर्भात विवरण गाळता यावे.

याचा एकूण परिणाम रॅव्हेलच्या ''बोलेरो''* किंवा बागफ्युगच्या ''वेल टेंपर्ड क्लॅव्हीकॉर्ड'' च्या निरंतर पुढे येणाऱ्या प्रसंगातील संगीतमय रुपापासून प्राप्त होणाऱ्या प्रभावापेक्षा भिन्न नाही.

प्रारंभी ही बाब जरी गौण प्रतीत होत असली तरी ती कृती संपादित करताना त्रस्त करणारा कोणता प्रश्न असेल तर तो शब्दांची अक्षरे मोठ्या लिपीत लिहिण्याचे सुसंगत धोरण स्थापित करण्याचा विशेषनामे, परमात्मा व त्यांचे अगदी निकटचे गुणधर्म यासाठी राखीव अक्षरे वापरण्याची सामान्यपध्दती विचित्र अडचणीमध्ये आणली जाते तेव्हा अशाप्रकारच्या कृतीचा महत्वाचा निबंध विषय असतो सर्व सृष्टीचे दिव्यत्व. अशा नितीचे अक्षरशः पालन केले असते तर असंख्य मोठ्या लिपीतील अक्षरांचा सुळसुळाट झाला असता. व तो अशाप्रसंगावर जोर देण्याऐवजी वाचकांच्या मार्गावर ती एक बाधा बनली असती.

सूक्ष्मरीतीच्या माध्यमातून मेहेरबाबा वाचकांच्या चेतनेला परमात्म्याच्या अप्रकट रुपाच्या संकल्पनेपासून उत्क्रांतीच्या त्या अवस्थांकडे आकृष्ट करतात, ज्यामध्ये व्यक्तिगत आत्मा परमात्म्यापासून आपली अनिवार्य शाश्वत ऐक्याची अनुभूती प्राप्त करण्यापासून स्पष्टपणे दूर असतो व हा विषय अधिक गूढ बनतो. अक्षरांना मोठ्या लिपीत लिहिण्याची नितांत विवेकपूर्ण नाती अशा प्रगत होणाऱ्या विकासात की ज्याचा अखेर पित्याशी अंतिमतः एकरुप होण्यात होतो, स्पष्टपणे अव्यवहारिक असण्याचे वाटते व त्यामुळे संपादकांनी परमात्मा व त्याचे गुणधर्म या संदर्भातील मोठ्या लिपीतील अक्षरांचा वापर मुख्यत्वेकरुन शब्दार्थाचे महत्व स्पष्ट करण्याकरिता स्वीकारला आहे. यानंतर मुख्यतः जोर देणे व उच्चतर भूमिकांच्या संबंधित स्थितींच्या तुलनेत स्थूलतर

* बोलेरो– हे स्पेनमधील एक नृत्य आहे– संगीतमय सूर पियानोला मिळता जुळता.

भूमिकांच्या (जसे सूक्ष्म भूमिकांच्या शक्तींच्या तुलनेत परमाणू शक्ती) स्थितीतील फरक त्वरित समजण्याकरिता वाचकांना मदत होण्याचे उद्देशाने उच्चशक्तीकरिता मोठ्या  अक्षरांचा उपयोग केला आहे.

अशाच प्रकारच्या प्रश्नांना, विरामचिन्हांचा यांत्रिक उपयोग केल्यामुळे, तोंड द्यावे लागले होते. गुंतागुंतीच्या विषयांचे बाबतीत मेहेरबाबा काळजीपूर्वक स्पष्टीकरण देत व त्यांचे वर्गीकरण करीत. यासंदर्भातील विराम चिन्हांच्या, स्वल्पविराम, अर्धविराम, विसर्ग व नियमांचा काटेकोर वापर असह्य गोंधळ निर्माण करीत असे. म्हणून या ठिकाणी देखील विराम चिन्हांच्या नियमांचा काटोकोर वापर संपादकांनी जाणून–बुजून टाळला. याउलट त्याचा वापर – वाक्यातील विचार जो पर्यंत सहज व्यक्त होतो तोपर्यंत सोयीनुसार केलेला आहे.

विशिष्ट संकल्पना व्यक्त करण्यासाठी मेहेरबाबांनी अनेक प्रसंगी नवीन पारिभाषिक शब्द तयार केले आहेत. ही बाब अधिक योग्य वाटली कारण त्यामुळे बाबांच्या ग्रंथातील नवनिर्मित शब्दांमुळे अभिप्रेत अर्थ समजणे सोपे व खात्रीलायक झाले, ही गोष्ट अधिक उचित वाटली, कारण परंपरागत रुप देण्याचे टाळले गेले. जेथे त्या रचनेला बदलून लहान करुन त्यामधून दुहेरी अर्थ निघण्याची किंवा विचारप्रवाह खंडीत होण्याची शंका निर्माण होते त्याठिकाण क्लिष्ट वाक्यरचना तशिच ठेवण्यात आली.

थोडक्यात संपादकाचे काम साहित्य–कृती रुढीबद्ध व लवकर समजण्याजोगी करण्याचे असते. प्रस्तुत संपादकांना ज्या ज्या ठिकाणी साहित्यकृतीच्या प्रमुख उद्देशात असुसंगतपणा येतो असे वाटले त्या त्या ठिकाणी विशिष्ट हेतुपूर्तीसाठी भाषेचा परंपरागत वापर व साधेपणाची पद्धत आनंदाने त्यागलेली आहे.

वाचकांना सावधान केल्याशिवाय या संरचनात्मक पैलूला असेच सोडून देणे इष्ट होणार नाही की अधिकांश लेखक ज्ञान (knowledge ) व प्रज्ञा (wisdom) या दोन शब्दांना भिन्न मानतात व प्रज्ञेला अधिक मूल्य किंवा

आध्यात्मिक महत्व देतात. मेहेरबाबा या दोन्हीही शब्दात फरक करीत नाहीत व ज्ञान या शब्दाचा वापर 'तथार्थ ज्ञान' अशा अर्थाने करतात.

या ग्रंथावर गहनरुपाने ध्यान केन्द्रित केल्यावर काही वाचकांना सीमित (Finite) व अनंत (Infinite) या विषयांवर मेहेर बाबांचा विस्तृत दृष्टीकोण जाणून घेण्याची इच्छा होऊ शकते. अधिक मौल्यवान साहित्य मेहेरबाबांच्या *डिस्कोर्सेस (Discourses) नामक ग्रंथात पाच भागात उपलब्ध आहे ज्याचे प्रकाशन 'मेहेर पब्लिकेशन अहमदनगर, भारत*, यांनी केले आहे. तसेच ही माहिती डॉ. विल्यम डाँकिन यांच्या 'दि वेफेअरर्स'* या ग्रंथात बाबांनी दिलेल्या प्रस्तावनेत व ग्रंथाच्या प्रथम भागात उपलब्ध आहे.

वॉशिग्टंन डी. सी. – आय व्ही ओ. ड्यूस
जानेवारी २३, १९५५ डॉन इ. स्टिव्हन्स

---

* सुफीझम रिओरिएंटेड, इन्कॉर्पोरेटेड नी ३ भागात या ग्रंथाचे पुन्हा प्रकाशन केले आहे.

* सुफिझम रिओरिएंटेड, इन्कॉर्पोरेटेड नी १९६९ ला परत मुद्रित केले.

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

माझ्या उपस्थितीत परमात्मा कधीच बोलला नाही परंतु माझा दृढ विश्वास आहे की, मी त्याला मानव देहात कार्य करताना पाहिले आहे. त्यांना मी न्युयॉर्कयेथे प्रथम जेव्हा एका शनिवारी दुपारच्या वेळी थोडावेळ कार्य करताना पाहिले तेव्हा या पध्दतीने मी मेहेरबाबांच्या क्रिया व प्रतिक्रियांच्या अविश्वसनीय संवेदनशिलतेचे वर्णन करु शकतो.

सत्याचा शोध घेणाऱ्या एका साधकाची ते एक गोष्ट सांगत होते, ज्याला आपल्या गुरुने स्वीकार करण्यापूर्वी एका अतिशय लहरी व कठोर प्रकारच्या परिक्षा देण्याकरिता बोलावण्यात आले होते. जेव्हा मेहेरबाबांची बोटे वर्णमाला फळीवर – जिचा ते काही सांगण्याकरिता उपयोग करीत असत, फिरत होती व मधून मधून भाव प्रकट करण्याकरिता त्यांचे हात वर उठत असत त्यावेळेस मी त्या गोष्टी पेक्षा कथाकारांच्या कथाकथन करण्याच्या पध्दतीतच जास्त मग्न झालो होतो.

मी एकदा मेहेरबाबांच्या बाजूला परंतु त्यांच्या दृष्टीआड अशा तऱ्हेने बसलेला असतांना मी आपला आंगठा तर्जनीला जोडून परिपूर्ण सूचक युगयुगांच्या प्राचिन पध्दतीनुसार वर्तूळ तयार करुन अगदी सहज मी माझा हात वर केला. मी असे करायला सुरुवात करताच मेहेर बाबांनी पूर्णपणे वळून माझ्याकडे पहात अगदी त्याचप्रमाणे हावभाव करुन हात वर केले. व ते बघून मी हर्षभरित झालो. लोकांना आपल्या बांधवांच्या भावनांना प्रत्यूत्तर देण्याची गोष्ट तर दूरच राहते तर त्यांना त्यांच्या भावनांचे भान सुध्दा नसते. याप्रसंगाने मला आश्चर्यचकित केले ते या संदर्भात की, मी अशा एका व्यक्तिच्या समक्ष बसलो होतो की, ज्याला भावनांची अशी संवेदनशीलता होती.

त्यादिवशी बराच वेळ झाल्यावर मेहेरबाबा आपल्या लिफ्टच्या दिशेने जावयास लागले तोपर्यंत ही घटना मी विसरुन गेलो होतो व पून्हा मी त्यांच्या रस्त्यावर बाजुला लोकांच्या घोळक्यात उभा असताना मी आधीसारखेच हावभाव करुन हात उंच केला वास्तविक मी त्यांना दिसण्याची संभावना नसतानाही व त्यांना माझा हात दिसून शकत नव्हता असे असताना, आश्चर्य असे की त्यांनी माझ्याकडे वळून पाहिले व मला अगदी तयार प्रतिसाद दिला.

यावेळी मला आनंदापेक्षा आश्यर्च अधिक वाटले. आता या अनाकलनीय चमत्काराचे प्रमाण मात्र स्पष्टीकरणा पलिकडे आहे. जसे ते परततांना सभागृहात आले व तेथून लिफ्टच्या दारातून पुढे गेले तसाच मी माझा हात, बोटांनी परिपूर्ण चक्र तयार करीत तिसऱ्यांदा हात उंच केला यावेळेस त्यांनी आपले पूर्ण शरीर वळवून मला हेतुपूर्वक प्रतिसाद दिला.

मला असे वाटत नाही की, सृष्टीचा मूळ उद्देश व सृष्टीची यन्त्ररचना अशा महत्वपूणू विषयावरील लेखाचे लेखकाचा परिचय देणे ही एक तुच्छ घटना आहे. मेहेर बाबा अविश्वसनीय आहेत व विशेष म्हणजे संतोषविणारे आहेत न केवळ दर्शनशास्त्र व विश्वव्यापी यंत्रगती शास्त्राच्या क्षेत्रात संशयातीत प्रतिभाशाली व्यक्ती आहेत परंतु एखाद्याच्या हृदय–कप्प्यात प्रेमाची उब देण्याची त्यांची जी क्षमता आहे ती अन्य कोणत्याच व्यक्तीत कदाचित असू शकत नाही.

आपल्यापैकी प्रत्येकजण शेवटी आंतरिक समाधान व शांतीसाठी कुठल्यातरी प्रेममय व विश्वासार्ह अस्तित्वात निहित असल्याच्या भावनेसाठी अंतस्थलातील गरजांच्या उत्स्फुर्त ज्ञान व प्रचारासाठी शोध घेतो. या सर्वांपेक्षा जास्त आपण आपले होण्याची व स्वयं आपल्यासाठीच पूर्णपणे स्वीकारले जावे याची गरज आहे. मेहेरबाबा सर्व लोकांच्या आत खोल असलेली प्रतिक्रिया बाहेर काढतात. ती मनुष्याचे अत्यंत खोल आत्म्याच्या प्रती त्यांच्या अकल्पित संवेदनशीलतेमुळे शक्य असते.

या व्यतिरिक्त पुष्कळ गोष्टी आहेत की, ज्या अधिक आश्चर्यकारक स्वरुपात आहेत, ज्या गेल्या चाळीस वर्षातील समृध्द ज्ञानापासून ह्या व्यक्तिच्या सभोवताल संकलित झाल्यात व जेव्हा पासून ह्या व्यक्तिने आपली सांप्रत आध्यात्मिक अवस्था प्राप्त केलेली आहे, त्या मी सांगू शकेन. परंतु ह्या सर्व गोष्टी त्यांची समजून घेण्याची पूर्ण क्षमताच नव्हे तर कोणत्या प्रकारे मनुष्याच्या स्वयं आत्मा होण्याच्या क्षमतेला झाकाळून टाकतील, अशा अद्‌भुत दृष्यांचे वर्णन करण्याकरिता किंवा तो समजून सांगण्यासाठी मला सांगू नका. विश्वास ठेवण्यासाठी त्याचा अनुभव करणे आवश्यक आहे.

असे असतानाही मनुष्य अशी अपेक्षा करील, की कल्याणाची भावना

तिचा उगम दूर सारल्यानंतर विरत जाईल. अत्यंत आनंदाचा अनुभव देखील सामान्यतः क्षीण होतो व तो आठवण म्हणून शिल्लक राहतो. ज्याप्रमाणे भयंकर स्वप्नही विरत जाते. तथापि अशा व्यक्तिच्या सहवासातील अविवरणात्मक एक रहस्य तेथे असते, जे समजून सांगात येत नाही. भरगच्च घटनापूर्ण सप्ताहाचे शेवटी घरी जाण्यासाठी विमानात मी जसा बसलो तसे मी प्रत्यक्षातील सामान्य बाबींचे वर्गीकरण करणे सुरु केले. मनातील नेहमीच्या एक दोन चिंता मनात आल्या तेव्हा एका एक अशी जाणीव झाली की, त्या चितांनी त्रस्त करणे बंद केले आहे.

अविवेकपूर्ण निष्कर्षांनी सहज भयभित न होता मी अनेक अडचणी नजरेसमोर आणल्या व पूर्णतः गोंधळून गेलो व मला असे आढळले की, काही प्रसंगाचे बाबतीत पूर्वी ज्या संदर्भात उत्तरे मुळीच मिळू शकली नव्हती – ती उत्तरे मिळालीत व इतर प्रसंगी अस्वास्थ्य जाणवलेच नाही. वस्तुतः मी अपेक्षा केली होती की, घरी परतल्यावर दैनंदिन जीवनात ह्या संचित करणाऱ्या त्रासांची परत नेहमीप्रमाणे सुरुवात होईल. परंतु जसजसे दिवस, आठवडे, महिने व शेवटी वर्षे जावयास लागली तसतसा अनुभव यावयास लागला की, आठवड्याचा एक दिवस जरी या पुरुषाच्या सहवासात घालविला तरी सुध्दा जणू भावनिक शरीरावर शस्त्रक्रिया होऊन विवंचनेची माझी क्षमताच नष्ट केल्या गेली आहे.

आत्मप्रौढीच्या भावनेने किंवा गाजावाजा करण्याच्या उद्देशाने मी या प्रसंगाचे वर्णन करीत नाही. माझ्या स्वतःच्या जीवनात घडलेले दोन प्रसंग मला आठवतात. पुढील पृष्टांमध्ये उत्कृष्ट शब्द चित्राच्या सभोवतालच्या लहान चौकटीत जी चौकट करण्याचे उत्तरदायित्व माझ्यावर टाकलेले होते. – हे दोन प्रसंग जर मी येथे अंतर्भूत करण्याचे टाळले तर ती माझी बेपर्वाई ठरेल. माझी खात्री आहे की, माझ्या जीवनात परमात्म्याला बोलताना जाणीवपूर्वक ऐकल्याचे आठवत नाही. परंतु, त्याला कार्य करताना मात्र पाहिले आहे.

''गॉडस्पिक्स'' या त्यांच्या ग्रंथाला मथळा देण्याच्या निवडीमध्ये मेहेरबाबांनी संक्षेपाने दोन्ही प्रमुख निबंध विषय उल्लेखिलेले आहेत. ज्या विषयांचे विवेचन फक्त या युगातील अगदी उन्नत व्यक्तीच करु शकते. ते विषय

मेहेरबाबांना विस्तारीत करावयाचे आहेत व तो त्यांचाच अधिकार आहे. आपल्या ग्रंथाकरिता असा श्रेष्ठ स्त्रोत सूचित करण्याच्या मेहेरबाबांच्या अधिकाराबाबत वादविवाद करण्यापूर्वी हे चांगले होईल की, विषयाची गुंतागुंत पूर्ण करण्यासाठी अगदी सरळ सोप्या शब्दात हे सांगणे ठिक होईल की, जगातील अत्यंत मोठ्या प्रमाणातील मेहेरबाबांचे शिष्य व अनुयायी बाबांना या युगाचे अवतार मानतात. पाश्चिमात्यांच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास ते बाबांना आपल्या काळातील ख्रिस्त मानतात की, जो मुहम्मद, जिझस, बुध्द, कृष्ण, राम, झोरोस्टर व फार पुरातन काळातील अनेक अवतारांच्या परंपरेचा समान प्रकृतीचा वारसा आहे. ज्याचा परंपरागत महापुरुषाच्या रुपात जन्म झाला होता.

आपल्या संस्कृतीच्या आध्यात्मिक परंपरेत जर मेहेरबाबा अशा सर्वश्रेष्ठ अवस्थेत आहेत तर सृष्टीच्या अतिगूढ रचनेबाबत त्यांच्या निश्चित अधिकाराने व समर्थपणे बोलण्याकरिता त्यांच्या अधिकाराबाबत काही प्रश्नच राहू शकत नाही. परंतु त्यांच्या दैवी उगमस्थानाचा अगदी साधा प्रश्न दिव्य शासक मंडळाच्या (Hierarchy) प्रमुख भूमिकेत – ज्यामध्ये अनेक लोक शंका घेतात व अविश्वास दाखवितात – मेहेरबाबांच्या यथार्थ कार्याचा गंभीर प्रश्न होतो.

आपण दोन परिच्छेदात फार मोठी आव्हान देणारी समस्या नमूद केलेली आहे, परंतु ती अशी समस्या आहे की, प्रस्तावनेत लिखित शब्दांऐवजी प्रत्यक्षात अन्य साधनांनी सोडविली पाहिजे. दिलेली व्यक्ती मसिहा आहे का, या मूलभूत प्रश्नाची केवळ दोन विश्वसनीय उत्तरे आहेत. व्यक्तिगत संपर्क करुनच व्यक्तिगत उत्तर प्राप्त करु शकता. हे लिहिण्याचेवेळी हे आताही शारीरिक संपर्काव्दारा शक्य आहे व पुष्कळांनी या प्रश्नांवर प्रत्यक्ष भडिमार करुन लाभ घेतलेला आहे. पुष्कळांनी त्यांच्या प्रश्नाला होकारार्थी उत्तर मिळविले आहे. अल्प प्रमाणातील मंडळींनी निश्चितपणे या प्रश्नाला नाकारले परंतु अनेक लोकांनी आपल्या प्रश्नाचे शेवटी त्यांना स्वीकारले आहे व अन्य काहींनी एक खोल भ्रांती स्वीकार केली की, ज्यामध्ये सुख व दुःख हे दोन प्रमुख अंग आहेत परंतु ते आताही अंतिम प्रश्नावर अंतिम निष्कर्षाप्रत पोहोचण्यास स्पष्टपणे असमर्थ आहेत.

व्यापक व दीर्घकालीन उत्तर क्रियाशिल शक्तीच्या केवळ मूल्यमापनातच व्हावयास पाहिजे – जे समाज भावी पिढ्यांवर करतो. बोललेले शब्द व विशद केलेल्या संकल्पना समर्थपणे व वास्तविकतेत वर्धमान होताना दिसू लागले तर मनुष्य आपोआपच सिहावलोकनाव्दारां मानल्या जातो की तो आपल्या युगाकरिता दिव्याकृतीचा महान शिल्पकार आहे.

परंतु कितीही आगाऊ वादविवाद किंवा प्रात्यक्षिके समाजाची खात्री पटवून देऊ शकत नाहीत. उद्देशांच्या यशापयशाच्या प्रयत्नांची पर्वा न करता जणू संकल्पना स्वतःच आपले सामर्थ्य वाहून नेतात व त्या मानवजातीची संपत्ती व सांकेतिक शब्द बनून जातात.

तथापि अनेक लोकांच्याकरिता व्यक्तिगत संपर्क साधण्याची संधी राहणार नाही किंवा शारीरिक रुपाने स्वीकार किंवा अस्वीकार करण्याची संधीही राहणार नाही. ज्या अर्थी ह्या घटना आपल्या युगात घडत आहेत त्याअर्थी आपल्यापैकी कोणीच भावी पिढ्यांवर केलेल्या मूल्यमापनाशी मतैक्य करणार नाही. अशा अवस्थेतील लोकांच्याकरिता मोकळ्या मनाने वाचणे, विचार करणे व चितन करणे आवश्यक आहे कारण या ठिकाणी सत्यता व वास्तविकतेचे महान भांडार, ज्याकरिता आपण जीवनभर खोज करतो राहण्याची शक्यता आहे. हे आवश्यक नाही की, स्वीकृतीची व अस्वीकृतीची समस्या निर्माण करावी परंतु या ठिकाणी निर्माण केलेल्या संकल्पना आपल्या मानसिक कढईमध्ये उकळू द्यावात. यथावकाश पूर्णतेची सखोल भावना तद्वत जीवनाची निव्वळ वास्तविकता या ठिकाणी वर्णिलेल्या संकल्पनांचे मंडन किंवा खंडन करतील.

पाचवर्षाच्या अवधित मेहेरबाबा नावाची व्यक्ति अस्तित्वात असल्याची वार्ता ऐकल्याचे क्षणापासून तो न्यूयॉर्कच्या भेटीच्या प्रसंगापर्यंतचा जो काळ लोटला त्या काळात त्यांना अनेक प्रश्न विचारण्यात आले व त्यांच्या संकल्पना न जुमानण्याचे अनेक अवसर प्राप्त झाले व मला मेहेरबाबांच्या कित्येक विवाद्य जीवनविषयांच्या संदर्भात अशा एका स्वाभाविक बिंदूपर्यत परतावे लागले की, ज्याचे वर्णन ''मला प्रामाणिकपणे हे माहीत नाही'' या शब्दात करावे लागत असे. मेहेरबाबांना स्वीकारण्या किंवा नाकारण्याकरिता ही व्यक्ती इतकी सोपी

नाही.

मेहेरबाबांना क्रियाशील पाहण्याच्या आपल्या अनेक सुअवसरासोबत एक आठवड्याचा अवधी मला दृढ विश्वास देण्याकरिता पुरेसा होता की, बाबांना वर्णमाला फळीची अडचण असुनही ते एक सौम्य विनोदी श्रेष्ठतम कथा–कथनकार होते व अशा कथा–कथनकारासारखी व्यक्ती मी कधीच पाहिली नव्हती. मी जीवनात मोठ्या व्यवसायात काम केले होते तरी बाबांसारखे श्रेष्ठ व्यवसायी मन मला जीवनात पहावयास मिळाले नाही. त्यांच्या सारखा तत्वज्ञानीही मला कधी भेटला नाही. जिच्या सहवासात मला अत्यानंद लाभलेला आहे अशी अत्यंत संवेदनशील प्रेममय व्यक्ती मला कधी मिळाली नव्हती.

ह्या सर्व गोष्टी खचितच एक महान गुणसंचय होय. परंतु तुम्ही तत्काळ आक्षेप घेता की, परिमित गुणसंचय जोडल्याने काही अनंत निर्मिले जात नाही. बाबा या युगाचे अवतार आहेत अशा निर्णयाप्रत मी आलो होतो का ?

प्रामाणिकपणे सांगावयेच म्हणजे मला याची थोडीशीही कल्पना नाही व माझ्यामते हा प्रश्न असंगत आहे. मला खात्री आहे की, अवतारपणाचे गुण कोणते यांचा निर्णय लावण्याकरिता माझ्याजवळ कोणतेच साधन राहिले नाही व यानंतर मला असे आठवले की, माझे जे काही श्रेष्ठतेचे पूर्वीचे मापदंड होते व ज्या मापनात मी स्वतःला लायक समजत  होतो ते सर्व बाबांनी मागे टाकले आहेत. माझ्या भौतिक जगातून आग्निबान सुटला की, मग माझ्याजवळ तो तारकामय अंतरिक्षात कोठे आहे, हे ओळखण्यासाठी निश्चित साधन नाही. परंतु  मी असे सांगू शकतो की, मला माझी स्वतःची प्रज्ञा सांगते की अशा प्रकारच्या ग्रहणक्षमता असणाऱ्या व मला आंतरिक संतोष देण्याची विलक्षण क्षमता असणाऱ्या व्यक्तिला ज्या सर्व मेहेरबाबांत मला सापडल्या त्यांना पुन्हा कधीच भेटू शकणार नाही.

मला पूर्वी माझ्या एका संशोधक सहाध्यायाने केलेल्या  विधानाची आठवण होते जे मार्मोन चर्चच्या एका संचालकाने खऱ्या येशुवर काही वर्षांपूर्वी केलेल्या विद्वत्तापूर्ण चर्चा ऐकल्यावर केले होते. तो म्हणाला ''मला अशी एक कल्पना सुचली की, आज जर ख्रिस्त पृथ्वीवर असता तर आपल्यापैकी कोणीच

त्याला ओळखले नसते किंवा मान्य केले नसते.'' आता माझ्याकरिता त्या शब्दांना एक विशेष अर्थ आहे कारण त्या शब्दांच्या वरपांगी दौषिक दृष्टीपेक्षा मला त्यात भरपूर अर्थ भरलेला जाणवतो. आपल्यापैकी बहुतेकांनी त्यांना केवळ आपल्यातील दृढ झालेल्या दुराग्रहामुळेच नाही तर आपल्यापैकी कोणाचाच आंतरिक दृष्टीने मूल्यमापन करण्याचा स्तर विकसित झालेला नाही की, जो अशा व्यक्तीचे यथार्थ मूल्यमापन करु शकेल. त्यांची क्षमता व आध्यात्मिक अवस्था अशा क्षेत्रात भरारी मारते की, जेथे आपण त्यांना अनुसरण्यास असमर्थ आहोत. जरी त्यांना नाकारण्याचा अनिवार्य अशा मोहाला आपण बळी बडलो नाही तरी त्यांना त्यांच्या स्वरुपात ओळखण्याची विफलता आपण मान्य करतो.

एखाद्या व्यक्तीने किती चमत्कार दाखविले या आधारावर आपण एखाद्या मनुष्याच्या आध्यात्मिक सामर्थ्याचे मूल्यमापन करतो. तुम्ही विचाराल की, मेहेरबाबांनी असे कोणते चमत्कार दाखविले की, ज्यांच्या आधारे त्यांच्या आध्यात्मिक सामर्थ्याला तुम्ही पुष्टी देऊ शकाल ? मी अशा पुष्कळ घटना पाहिल्यात की, ज्यामुळे सामान्य घटनांच्या संदर्भात माझ्या स्थिर कल्पनांना आश्चर्यचकित केले आहे. तथापि चमत्कारावर आधारित मूल्यमापन तोकडे ठरेल व ते सत्याला निश्चितच झाकून टाकेल. आध्यात्मिक दृष्टीने अतिपरम श्रेष्ठ अवस्थेला पोहोचलेल्या पृथ्वीतलावरील अवतरणाचे महत्व निसर्गनियमाबाहेर वस्तूतः तो काय करतो यावर निर्भर नसून निसर्गनियमांच्या कक्षेत तो काय करतो यावरच अवलंबून आहे. अशी व्यक्ती विश्वसनीय चमत्कार दाखवून लोकांना आश्चर्यचकित करण्यासाठी स्तुतीपात्र दिखाऊगिरी करणारा मनुष्य म्हणून जन्माला येत नाही. यामुळे थोड्या कालाकरिता मानवतेला आश्चर्यचकित करुन सोडता येईल. परंतु त्यांच्या जीवनाच्या मूलभूत चौकटीवर काही परिणाम घडवून जीवनातील लाभालाभ मागण्यासाठी एखादी कसोटी देण्याचे काम किंवा अशाप्रकारे उन्नत जीवन जगण्याची क्षमता देणे या गोष्टी चमत्काराच्या पलिकडे आहेत.

अशा अलौकिक व्यक्ती आध्यात्मिक जीवनाच्या इतिहासात स्वतःच्या परिपूर्णतेचे ज्वलंत उदाहरण मानवतेसमोर ठेवण्याचे ईश्वरीय काम स्वीकारतात

व सर्व प्रकारच्या बंधनांना व मर्यादांना तोंड देणाऱ्या सामान्य लोकांना अलौकिक जीवन जगून दाखवितात. आपल्या आवाक्याबाहेरच्या शक्तींना आकृष्ट करुन किंवा ज्या बांधवांशी आपण संघर्ष करतो त्यापासून बाध्य न होता असे उदाहरण प्रस्तुत करणे न्याय्य होणार नाही व अशा अस्वाभाविक गोष्टीपासून दूर राहण्याचा प्रत्येकाला अधिकार राहिल.

तथापि कठोर वास्तविकतेच्या या विषम जगात एखादे उदाहरण, जे वास्तविकतेच्या स्थितीशी संगत आहे, प्रस्तुत केले असता अविश्वनीयरीतीने उत्कृष्ट ठरते तेव्हा त्याची अशा व त्यासाठी प्रयत्न करावयास कारण ठरु शकते. अशा व्यक्तीचे हे एक कार्य आहे. प्रभावी प्रबोधनाच्या उत्कृष्ट स्थापित तत्त्वांपैकी एक तत्व आंतरप्रयोग किंवा क्षेत्रिय प्रयोगाव्दारा प्रात्यक्षिके देणे हे होय. परमेश्वराने स्वतःची सत्ये प्रदर्शित करण्यासाठी समान तत्वांचा उपयोग करण्याची ही गोष्ट कोणालाच आश्चर्यचकित करणार नाही.

ह्या फार मोठ्या गोष्टी आहेत, ज्यांना आपण तोंड देतो, त्यांच्या मूल्यमापनांत आपण घाई करता कामा नये.

एखादा या ठिकाणी विचारील की, कशा परिस्थितीत ईशपुरुष प्रकट होतो ? जसा अर्थशास्त्रात ''मागणी पुरवठा'' हा नियम आहे. त्याचप्रमाणे मूलभूत निसर्ग नियमाच्या गरजेनुसार हे घडते. जेव्हा आध्यात्मिक सत्याच्या मान्यतेचा धागा जीर्ण व्हावयास लागतो तेव्हा परमात्म्याचा हा पैलू आवश्यकतेप्रमाणे प्रत्युत्तर देतो व तेव्हा एक महान जागृतीकार मानवतेला जागृत करण्यासाठी जन्माला येतो. परिणामतः आध्यात्मिक प्रबोधन कर्त्याच्या अवतरणाचे साहचर्य हे नेहमी जागतिक संकटकाळाशी निगडित राहिलेले आहे व यानंतर जी क्षेत्रे पुर्वी अगदीच अनुत्पादक राहिलेली आहेत अशा क्षेत्रात मानवी विकासाचे उत्थान झालेले आहे.

हे जाणून घेणे चांगले आहे की, जेव्हा अवतार येतो तेव्हा तो निसर्गनिहित नियम व तंत्राव्दारां आपल्याला आपल्या ''स्व'' च्या सत्याची ओळख करुन देतो. हे समजणे चांगले आहे की, ह्या गोष्टी सुदूरच्या अन्य भौतिक जगताच्या, निस्तेज व द्रि–परिमितीच्या ऐवजी हार्दिक, उत्स्फुर्त व निदान त्रि–परिमितीच्या आहेत. हे जाणून घेणे चांगले आहे की, जेव्हा खरा

आध्यात्मिक गुरु एखादे कार्य किंवा अनुशासन देतो तेव्हा ते प्रभावी असते कारण, ते यंत्रविज्ञानाच्या सखोल अंतर्दृष्टीवर आधारलेले असते व त्या यंत्रविज्ञानामुळे प्रकृती व्यक्तिगत स्वभावाचे परिवर्तन व गरजा निर्माण करते. ''रविवारला प्राप्त केलेले मर्यादित अनुशासन आठवड्याच्या इतर दिवसात हळूहळू हरवून गेले'' अशा स्वरुपाची आध्यात्मिकता न होता ती दररोजच्या कणखर दैनंदिन जीवनाची आव्हानात्मक बाब होते.

मेहेरबाबांच्या स्वभावाच्या अनेक वादग्रस्त पैलूंवर चर्चा केल्याशिवाय त्यांच्या ऐतिहासिक वैशिष्ठ्यांना हात घालणे उचित ठरणार नाही. उदाहरणार्थ, बाबा आपल्या योजना मध्येच बदलवितात व ते म्हणतात की विशिष्ट वेळी त्यांचा काही करण्याचा विचार आहे व नंतर त्या कामाला विलंब लावतात किंवा ते काम कधीच करीत नाहीत. एवढ्या महान व्यक्तिची ही बेजबाबदार व संकुचित दृष्टी नव्हे काय ?

योजनांना अचानक उलट–सुलट करण्याची मेहेरबाबांची पध्दती खरोखरच विषम आहे, परंतु तिचे परिणाम मात्र मौलिक असतात. बाबांच्या जवळ जे लोक पुष्कळ कालपर्यंत राहिले ते प्राप्त परिस्थितीत जुळवून घेण्याचे व प्रसन्न असण्याचे बाबतीत सर्वत्र प्रसिध्द आहेत, परंतु याशिवाय निसःदेह अधिक मूलभूत कारणे आहेत की, ज्यांचा संबंध साधारण मनुष्याच्या स्वतंत्र इच्छेच्या केवळ अनिश्चितपणाशी तव्दत आपल्या जीवनस्तरापेक्षा सद्‌गुरुच्या जीवनस्तरावरील कार्याशी आहे.

मला ही कल्पना करणे भाग पडते की, भौतिक व्यवहाराच्या दुनियेत शिकलेल्या पाठांपासून एक प्रत्यक्षमार्ग आध्यात्मिक विकासाच्या क्षेत्राकडे जातो. हे खरे नाही का की जी व्यक्ती एका निश्चित शारीरिक दिनचर्येत परिपक्व झाली नाही व ती क्रियाशील व जुळवून घेणारी आहे व तिला आंतरविकासातील विविध परिवर्तनाशी सारखे जुळते घेण्याची क्षमता आहे.

वारंवार उपवास करणे अशा मेहेरबाबांच्या कार्यपध्दतीशी जे अपरिचित आहेत त्यांच्या करिता हे अनाकलनीय आहे. अल्प व दीर्घ अवधीकरिता बाबा नेहमीच मधूनमधून उपवास करीत आले आहेत व हा त्यांच्या कार्याचा पैलू सुसंगत व महत्वाचा दिसतो. हा पैलू म्हणजे जणू स्वतःसाठी केलेली एक चांगली

किंवा पवित्र कृती किंवा तपश्चर्येसाठी किंवा आध्यात्मिक लाभासाठी केलेली कृती असा काही वेळा गैरसमज होतो. परंतु ही कृती स्वतःसाठी नसून उलट ती पृथ्वीवरील त्यांच्या कार्यासाठी केलेली कृती होय. जसे भगवद्गीतेत कृष्ण अर्जुनाला म्हणाला होता (भगवद्गीता सर्ग – ३–२२)

न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु 'लोकेषु' किंचन ।
नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ।।

''हे पृथापुत्रा, माझ्याकरिता तिन्ही लोकात कोणतेच कर्तव्य नाही. ना कोणते उच्चपद माझी प्रतीक्षा करीत आहे. कोणताच लाभ मला घ्यायचा नाही तरीही मी येथे क्रियाशील आहे.''

मेहेरबाबांचे जवळ जवळ तीन दशकांचे मौन व निवेदनासाठी योजिलेली वर्णमालेची फळी ह्या गोष्टी सारख्याच गोंधळात टाकणाऱ्या आहेत. अनेक लोक वर्णमाला–फळीच्या वापराला अनुत्पादक व फसवी योजना देखील मानतात.

मेहेरबाबा व तसेच इतरांनी त्यांच्या ह्या प्रदीर्घ मौनावर पुष्कळ चर्चा केलेली आहे. माझी या ठिकाणी त्यांच्या मौनाबाबतच्या विविध प्रभावी कारणात शिरावयाची इच्छा नाही. परंतु ही एक सर्वात विस्मयकारक बाब आहे, याकडे मात्र मी सर्वांचे लक्ष वेधू इच्छितो. अशा प्रकारचा अडथळा असुनही जसा एखाद्याचा हात पाठीमागे बांधलेला असावा– मेहेरबाबांनी अतिशय कठीण अशा ग्रंथ–लेखन कार्याची योजना सूक्ष्मपणे आखलेली आहे. शेकडो लोकांना त्यांनी शिकविले, हजारोंना आशीर्वाद दिलेत, स्वीकृत कार्याचे संचालन केले, सुंदूरच्या मंडळींना उत्साहाचे शब्द दिलेत आणि अगदी सापेक्षरीतीने थोड्या कालावधीत अशा स्वरुपाचा स्मरणीय ग्रंथ लिहवून घेतला.

मेहेरबाबांच्या कार्यपध्दती अनेकवेळा संतापजनक असतात. अशा अनेक गोष्टी आहेत की, ज्या समजण्यापलिकडच्या गोष्टी आहेत व कुठे काही स्पष्टीकरणाची गरज आहे का याचा यत्किंचितही विचार न करता त्या ते करतात व त्यात ते आनंदाने व्यस्त असतात. माझ्या बाबतीत बोलावयाचे झाल्यास मी तर एखाद्याची खूप प्रशंसा करतो की, जो वेळोवेळी समर्थनार्थ स्पष्टीकरण देण्यासाठी थांबत नाही. वस्तुतः असे करण्यामागे निश्चित कारणे अवश्य आहेत.

एकतर सतत खुलासा देण्यासाठी वेळ नसतो व जर काही समृध्द शब्दप्रयोगांचा वापर असेल तर त्या संदर्भातील खुलासा समजण्याची पात्रता आपल्यात बहुधा नसते.

मेहेरबाबांचा जन्म भारतातील पुणे येथे पारशी माता–पित्यांच्या पोटी २५ फेब्रुवारी १८९४ रोजी झाला.

मेरवान शेहरियार असे त्यांचे नामकरण झाले व त्यांच्या कुटुंबाचे नाव इराणी असे होते. १९१४ मध्ये हजरत बाबाजान या सुफी सद्‌गुरुने त्यांच्या भृकुटीमध्यात चुंबन घेऊन त्यांना परमात्म्याचा साक्षात्कार घडविला.* १९१५ मध्ये ज्यांची दुसऱ्या सद्‌गुरुंशी – उपासनी महाराजांशी भेट झाली. १९२१ ला ते स्वतःच पूर्णपुरुष झालेत. १९२५ मध्ये त्यांनी आपल्या मौनाचा प्रारंभ केला व या काळात त्यांनी वार्तालाप करण्यासाठी इंग्रजी मूळाक्षरे लिहिलेल्या एका लहान चौकोनी फळीचा वापर सुरु केला. या फलकावर बोटे फिरवून बाबा अतिजलद तऱ्हेने शब्द तयार करीत. यावेळी त्यांनी शिष्यांचा एक लहान समूह गोळा केला, जो त्यांना मेहेरबाबा म्हणून संबोधित असे. १९३१ साली त्यांनी पाश्चिमात्य जगात प्रवास करुन त्यांच्याशी प्रथम संपर्क साधला, १९३२ मध्ये त्यांचे स्वागत अशा अनेक लोकांनी केले की ज्यांना तुम्ही व मी कदाचित हॉलीवुडच्या महान व्यक्ती समजू. वयाच्या ५८ व्या वर्षी ओक्लाहोमा येथे भयंकर मोटार अपघात झाला. ज्यामध्ये त्यांचा एक पाय व बाहू मोडला. आज वयाच्या ६१ व्या वर्षी मेहेरबाबा एक प्रतिभाशाली, क्रियाशील व सभोवतालच्या जगात काय घडत आहे याची पूर्ण जाणीव असलेले व्यक्तिमत्व आहे.

सी. बी. पर्डम यांच्या 'दि परफेक्ट मास्टर' व अलिकडे जीन ॲन्ड्रियल यांच्या 'दि अवतार' या पुस्तकात देखील बाबांच्या या पूर्वीच्या जीवनातील घटनांचे तपशीलवार वर्णन समर्थपणे आल्यामुळे मी या ठिकाणी जास्त काही त्याबाबत लिहिले नाही. या ठिकाणी चरित्रात्मक रुपरेषा देण्याचा उद्देश केवळ स्थितीज्ञान देण्याचा आहे. ज्यामुळे बाबांच्या जीवनाशी साहचर्य असलेले अनेक

*खरे पहाता अवतार परमात्म्याशी आधीच एकरुप असतो. परंतु भौतिक जगात स्वतःभोवती एक आवरण घेऊन त्याचा जन्म होतो. योग्यवेळी हे आवरण सद्‌गुरुव्दारां दूर सारलेच पाहिजे. हे काम बाबांसाठी हजरत बाबाजन या सद्‌गुरुने केले आहे.

महत्वाचे प्रश्न चर्चेला घेता यावेत व जे प्रश्न मूलतः जटिल आहेत किंबहुना ज्यांचा प्रदीर्घ काळपर्यंत अन्वयार्थ लावणेही अशक्य आहे.

बाबांच्या अनेक कार्यासंबंधीच्या व प्रवासासंबंधीच्या बाबतीत बरेच तर्क केले जातात. परंतु बऱ्याच प्रमाणात ते गूढच आहे. अशा परिस्थितीत नेहमीच्या पद्धतीप्रमाणे ती व्यक्ती अविचारी म्हणावी व तिची कामे भ्रमात्मक म्हणून सोडून द्यावीत. परंतु बाबांच्या बाबतीत असे केले जात नाही, याचे साधे कारण असे की, त्यांचे अनेक प्रयत्न व सूचना, ह्या घटनांकडे पाहण्याची त्यांची जी अंतर्दृष्टी आहे, त्यावर आधारित असून मानवी आकलनाच्या कक्षेच्या अगदी बाहेर आहेत. याचा परिणाम बहुधा काही तासातच अनुभवावयास मिळतो. कधी कधी घटनांचा निर्णय काही आठवडे किंवा महिने किंवा वर्षे देखील दिसत नाही.

ही अंतदृष्टी ज्यांनी प्रासंगिक टीपा–टिप्पणी करण्यात काही क्षण घालविले असतील त्यांना मनःशांतीसाठी व बाबांच्या कोणत्याही अतर्क्य वाटणाऱ्या मागील कार्याच्या संदर्भात पाहिजे असलेले दीर्घकालिन उत्तर प्राप्त करण्यासाठी कारणीभूत होते.

बाबांची कार्ये व सूचना विश्वासार्ह मानावयास पुढे एक कारण आहे. एकही प्रसंग शोधून देखील असा सापडणार नाही की, ज्यामुळे बाबांच्या प्रभावाने संबंधित व्यक्तीला हानी पोहोचलेली आहे. ते एखाद्याची क्षमता वाढविण्यासाठी त्याला वारंवार थकेपर्यंत त्रस्त करतील किंवा निराश करतील परंतु एका मर्यादेची सूक्ष्मरेषा ते कधीच उल्लंघणार नाहीत.

बाबांच्या जीवनातील एक कालखंड असा आहे की ज्यात नाट्य व कारुण्य ओतप्रोत भरलेले आहे व तो आहे सर्व पंथांच्या व जातीच्या मुलांसाठी शाळा स्थापन करण्याचा. १९२७ मध्ये स्थापन झालेल्या शाळेत एकाच वेळी १०२ मुलांच्या संख्येत ४९ हिन्दू, २० मुसलमान, ३२ झोरोष्ट्रियन व १ ख्रिश्चन असे विद्यार्थी होते.

अली हा विद्यार्थ्यात बाबांचा आवडता मुलगा होता. शाळेतील विद्यार्थी उन्मादामुळे आक्रोश करुन रडत असताना त्यांना कधी कधी झटके येत असल्याची माहिती मिळल्यामुळे अलीच्या वडिलांनी त्याला* शाळेतून काढून

*''सॉब्स ॲन्ड थ्रॉब्स'' या रमजू अब्दूल्ला यांच्या पुस्तकात सुंदर वर्णन आले आहे.

टाकले. विद्यार्थी रोज जे ध्यान करीत असत त्या पध्दतीचा काहिसा या झटक्याशी संबंध होता.

अलीच्या वडिलांनी मुलाला शाळेतून काढून तीन वेळा मुंबईला नेले. परंतु मुलगा देखील अत्यंत काळजीपूर्वक देखरेखीतून निसटून तीन वेळा पायी चालून शाळेत परतला, इतकी त्याची बाबांच्या प्रती प्रखर निष्ठा होती. चवथ्यांदा शाळेतून काढण्याच्या प्रसंगानंतर मेहेरबाबांनी सर्व विद्यार्थ्यांना थोड्याकाळाकरिता आपापल्या घरी पाठवून दिले व १९२९ च्या काळात शाळा कायमची बंद केली. या नंतर बाबांचा लगेच मोठ्या प्रमाणावर जगप्रवासाचा कालखंड सुरु झाला. सात वर्षांच्या अल्पकाळात बाबांनी सात वेळा पाश्चिमात्य देशात व दोन वेळा जागतीक प्रवास केला.

या प्रवासामुळे बाबांना काहिशी अनुकूल प्रसिध्दी मिळाली तरी अधिक प्रसिध्दी टिकात्मक किंवा पाचकळ स्वरुपाची होती. वर्तमानपत्रे आपल्याला अनुकूल रहावीत असा बाबांनी कधीच प्रयत्न केला नाही. ते प्रयत्नपूर्वक समर्थन करीत की त्यांचेवर जे शाब्दिक हल्ले करीत असत ते त्यांचेच कार्य करतात व ते कार्य त्यांची प्रशंसा करणाऱ्यांची बरोबरी करण्याप्रमाणेच असते. आजच्या काळात सामाजिकदृष्ट्या स्वतःचे समर्थन ही एक आवश्यक बाब आहे, अशी आज जगाची खात्री झाली आहे. या पार्श्वभूमिवर स्वतःचे समर्थन न करण्याचा किंवा दुसऱ्यांची विधाने उद्घृत करताना इतरांनी केलेल्या चुका दुरुस्त न करण्याचा किंवा साधे गैरसमजही काढून न टाकण्याच्या त्यांच्या वागणुकीतील सुसंगतपणा हा बाबांचा एक दृकचमत्कार म्हणावा लागेल. अशी ही निरंकुश बेपर्वाई म्हणजे व्यावहारिकता ओळखण्यात बाबा अपयशी झालेत असे काही म्हणू शकतील. शेवटी अर्थ हाच की बाबांचे कार्य स्वतःच्या सखोल आंतरिक ज्ञानानुसार होते व ते संतुष्ठ असतात की कोणत्याही प्रकारचे स्पष्टीकरण न देता कार्याची निष्पत्ती होईल. युरोप व अमोरिकेत बाबांचे भव्य स्वागत समारोह आयोजित केले गेले व हॉलिहूडशी बाबांचा परिचय करुन दिल्यावर त्यांना मिळालेल्या भरपूर प्रसिध्दिने त्यांच्या संबंधी असंख्य विधाने केल्या गेलीत की जी पूर्णतः सुसंगतपणे कधीच मांडली जाऊ शकणार नाहीत.

मानवी भावनांशी समृध्द अशा प्रसंगांचा एक खजिनाच पाश्चिमात्य

देशातील प्रवासाने निर्मिलेला आहे. जो एक प्रसंग मला नेहमीच आवडीचा वाटला तो आहे बाबांच्या एका २५ वर्षीय रशियन महिलेच्या भेटीचा. आपल्या कन्येशी स्नेहाचे व सहानुभूतीचे संबंध प्रस्थापित करण्याची क्षमता नसल्यामुळे ती महिला अतिशय अस्वस्थ होती. बाबांनी तिचा हात थोपटला व ते तिला म्हणाले– ''मी तुला मदत करीन.'' बऱ्याच दिवसानंतर एके दिवशी सकाळी जेव्हा ती जागे झाली तेव्हा तिला मुलीबद्दल अतिशय जिव्हाळा व प्रेम वाटू लागले की जी संवेदना यापूर्वी तिला कधीच जाणविली नाही. तिने एकदम आपल्या मुलीची – तिच्याशी भूतकाळातील वागणुकीबद्दल क्षमा मागितली व लगेच मुलीशी पूर्ण विश्वासाने दृढ संबंध प्रस्थापित झाल्याचा तिला अनुभव आला.

दुसरा प्रसंग आहे इटलीमधील एका गोंधळलेल्या परंतु हुशार प्राध्यापकाशी झालेल्या बाबांच्या भेटीचा. या भेटीचे वर्णन 'मानवी भावनांचा जादूचा दिवा' या शब्दा करावे लागेल. या प्राध्यापकाने आपले गूढ तत्वज्ञानाचे भांडार बाबांसमोर उघडे केले. बाबा हे शांतपणे ऐकत होते तरीही त्याने स्वतःच्या जीवनात प्राप्त केलेले ज्ञान सुसंगतपणे जोडता न येण्याच्या विफलतेतून आपले दोन्ही हात झटकून बाबांना प्रार्थना केली की, त्यांनी त्याचे जवळ शांतपणे ध्यानमग्न बसावे.

बाबांनी स्मितहास्य केले व प्राध्यापकाचे हातावर हात ठेवला. खोलीत उपस्थित असलेल्यांनी तेथील आनंददायी अशा प्रस्तुत शांततेवर भाष्य केले की, बाबांनी त्या मनुष्याच्या चेहऱ्यावरील निराशेची छटा हळूहळू नाहिशी केली व काही शांततेचे क्षण लोटल्यावर तो एकदम उद्गारला. ''मला हे आता समजले की 'सत्य हे प्रेम' आहे''

इटलीतील ज्या गुहेत सेंट फ्रॅन्सीस ॲसिसीने – ध्यान धारणा केली होती तेथील बाबांच्या वास्तव्याच्या अनेक चमत्कारीक गोष्टी आहेत. एक चमत्कारिक गोष्ट अशी की, त्यांनी स्वित्झरलंड मधील आल्पस पर्वताच्या शिखरावर आध्यात्मिक शासक मंडळाची एक सभा घेतली होती व त्यावेळेस मुसळधार वादळी पाऊस झाला. त्या पावसाचा थेंबही बाबांना लागला नाही व ढगातून पार होऊन एक प्रकाश शलाका त्यांचे अंगावर पडली. त्यांची वाट पहात असणारे मात्र पर्वताच्या उतरणीवर ओलेचिंब झाले होते.

यानंतर काही वर्षे वेड्यांना हाताळण्यात व त्यानंतर आध्यात्मिक दृष्टीने उन्मत झालेल्या मस्तांच्या सोबत घालविली. बाबांनी १९३६ मध्ये राहुरी येथे तथाकथित 'वेड्यांचा आश्रम' प्रस्थापित केला व त्यांच्या शिष्यांनी बऱ्याच वेड्यांना तेथे आणले. त्यानंतर बाबांनी 'आध्यात्मिकदृष्ट्या उन्मत्त' झालेल्या मस्तांबरोबर बरेच कार्य केले. या मस्तांनी आपल्या दैवी प्रेमाच्या उन्मादामुळे सभोवतालच्या परिस्थितीची चेतना गमावलेली होती.

भारतात सामान्य वेडेपणा व आध्यात्मिक अतिहर्षामुळे ज्यांनी आपली सामान्य चेतना गमावलेली आहे यांच्यामध्ये फरक केल्या जातो. रुढीनुसार दुसऱ्या प्रकारच्या ज्यांना मस्त म्हणून संबोधल्या जाते अशांची लोक सेवा करतात. बाबांचे या क्षेत्रातील कार्य त्या कार्याचे स्मरण करुन देते की, सद्‌गुरु उपासनी महाराजांनी सात वर्षाच्या अवधित बाबांच्याकरिता जे कार्य केले होते उपासनी महाराजांनीच बाबांना सभोवतालच्या स्थूलाची चेतना प्राप्त करुन दिली होती. सुफी स्‌दगुरु बाबाजान यांनी बाबांच्या भृकुटीमध्याचे चुंबन घेतल्यामुळे ही चेतना घालविली जाऊन त्यांना परमात्म–साक्षात्कार घडला होता. या दोन्ही सद्‌गुरुंनी त्यांचा आध्यात्मिक वारसदार म्हणून मेहेरबाबांची निवड केली. हिन्दू व मुसलमान धर्माच्या उच्चतम रुढीचे एकीकरण घडविण्याचे हे एक अव्दितीय कार्य होते.

बाबांच्या राहुरी आश्रमातील मस्तांसोबतच्या कार्याचा पसारा वाढत गेला व पुढील काही वर्षात भारतात सर्वदूर प्रवास करुन अल्पकाळ का होईना उपलब्ध झालेल्या मस्तांशी व साधूंशी संपर्क साधला. या प्रवासाचा इतिहास अत्यंत कष्टप्रद प्रसंगांनी व यात सहभागी झालेल्या सर्वांच्या परिश्रमांनी पूर्ण भरलेला आहे*.

पुन्हा एकदा बाबांनी अशा संपर्कातून काय साधले याची आपण केवळ कल्पनाच करु शकतो. धाडस करुन काही अंदाज करावयाचा असेल तर मी असे गृहित धरेन की, बाबांनी या संदर्भात केलेले  कार्य दुहेरी स्वरुपाचे आहे.

---

*तपशिलासाठी विल्यम डॉन्किन यांचे ''दि वेफेअरर्स'' हे पुस्तक वाचावे – मेहेर पब्लिकेशन, अहमदनगर

आध्यात्मिकदृष्टीने प्रगत झालेले आत्मे निश्चितपणे वैश्विक शक्ती आपल्या नियत्रणाता ठेवतात किंबहुना त्यांच्या जवळ काही प्रकारचे मूलभूत आत्मिक किंवा वैश्विक चैतन्य निश्चितच असते– मग याला कोणी काही का नाव द्यावे समग्र स्वरुपात हे मस्त कहीसे क्रियाशील मधमाशांसारखे काम करतात व भारत मधमाशांचा मधुकोषासारखे काम करतो.

बाबांनी या मधुकोषाचा शाही कुटुंबचालक या नात्याने सर्वांशी संपर्क साधून या शक्तीसंचयातून शक्ती घेऊन प्रत्येक मस्ताला त्याच्या आध्यात्मिक मार्गावर अग्रेसर होण्यासाठी धक्का दिला. १९४६–४८ या काळात त्यांचा मस्त संपर्क शिगेला पोहोचला होता. त्या नंतरच्या कालखंड ज्याला बाबांनी 'नवजीव' असे नाव दिले, १६ ऑक्टोबर १९४९ ला सुरु झाला. अतर्क्यबाबी मधील अत्यंत अतर्क्य असणारी ही बाब अभ्यासकाला समजून घ्यावयाची आहे. नवजीवनाला प्रारंभ करण्यापूर्वी मस्तांसाठी कायम स्वरुपात स्थापिलेल्या आश्रमाची बाबांनी मोडतोड केली – जो आश्रम जवळ असणाऱ्या शिष्यांसाठी किंवा सतत मुलाखतीसाठी येणाऱ्या व अल्पकालासाठी किंवा काही आठवड्यांसाठी महिन्यांसाठी किंवा वर्षांसाठी निवास करणाऱ्या लोकप्रवाहासाठी स्थापन केला होता.

बाबांवर अवलंबून असणाऱ्यांची त्यांनी तरतूद करुन ठेवीली होती. त्यानंतर जो खडतर पायी व संकटमय प्रवास करावायाचा होता त्याकरिता त्यांच्याबरोबर येण्यास तयार असलेल्या शिष्यांना त्यांनी याप्रमाणे जाणीव दिली. नवजीवनात नव्या स्वरुपात सहभागी होणाऱ्या व त्याप्रमाणे अनुसरण करणाऱ्या शिष्यांना, शिस्तपालनाची व त्यागाची कठोर नियमावली बाबांनी तयार केली होती. हे नवजीवन म्हणजे मूर्तिमंत वनवास निराधार व त्यागमय जीवन होते. शेवटी २० जणांची निवड करण्यात आली जे बाबांबरोबर गेले.

या दोन वर्षातील प्रवास व अनुशासन अत्यंत कष्टप्रद होते जे यापूर्वी बाबांच्या शिष्यांना कधीच अनुभवावे लागले नव्हते. या नवजीवनात सहभागी झालेले १९५१ च्या शेवटी बाहेर आल्यावर थकलेले व कृश झालेले दिसत होते. या जीवनातील घटनांचा तपशील व त्याचे महत्व नमुद करावयाचे झाल्यास वेगळा व विस्तृत ग्रंथ लिहावा लागेल. हे सर्व पाहणाऱ्या व्यक्तिला या निर्णयाप्रत

यावेच लागेल की, हा कालखंड काहिसा अनाकलनीय कार्याचा असून तो भावी मानवी व सामाजिक वंशाच्या उन्नतीसाठी एक प्रमुख आराखडा आहे. १६ आक्टोबर १९५० ला महाबळेश्वर येथे बाबांनी असे विधान केले की, ''माझे आधीचे जीवन मला अवतारपणाच्या वेदीवर व दैवी पूर्णत्वावर स्थित करते तर नवजीवन मला परमात्म्याचा नम्रसेवक व त्याच्या प्रेमियांच्या भूमिकेत स्थानापन्न करते. माझ्या नवजीवनात मी साधक, प्रेमी व सखा आहे. हे दोन्हीही पैलू पूर्ण दिव्यत्व व पूर्ण विनम्रता ही परमेश्वराची मर्जी आहे व हे दोन्ही परमात्म्याच्या शाश्वत जीवनाशी सतत जोडलेले आहेत.''

१३ फेब्रुवारी १९५१ पासून अंदाचे १०० दिवस बाबा महाबळेश्वरला एकांतवासात होते. या अखेर त्यांनी म्हटले की १६ ऑक्टोबरला मला माझ्या कार्यासाठी एका वेगळ्या स्थितीत प्रविष्ट व्हावे लागेल. ही दुसरी अवस्था मनोनाश कालखंड या नावाने ओळखली जाते हा कार्यकाल चार महिने राहिला व त्याचा शेवट १६ फेब्रुवारी १९५२ ला झाला.

त्यानंतर बाबांनी जाहीर केले की, ते काही शिष्यांसह लवकरच अमेरिकेला जातील व २१ मार्च ते १० जुलै १९५२ पर्यंत 'जटील स्वतंत्र जीवन' (a complicated free life) व्यतीत करतील – ज्या जीवनात दौर्बल्याचे सामर्थ्यावर प्रभुत्व राहील. १० जुलै ते १५ नोव्हेंबर १९५२ पर्यंत 'पूर्णमुक्त जीवन' (a full free life) व्यतीत करतील. ज्या कालखंडात सामर्थ्याचे दौर्बल्यावर प्रभुत्व राहील व १५ नोव्हेंबर १९५२ चे पुढे ते 'ज्वलंत मुक्त जीवन' (a fiery free life) जगतील, ज्या जीवनात दोन्हीही सामर्थ्य व दौर्बल्य दिव्यत्वाच्या ज्वालेत भस्म होतील.

२० एप्रिल १९५२ रोजी, पूर्व व पश्चिम दोन्हीकडील सहा पुरुष व सहा महिलांसह बाबा न्युयॉर्कला पोहचले व दक्षिण कॅरोलिना संस्थानातील मिर्टल बिच या ठिकाणी सरळ निघून गेले. मिर्टल बिच केन्द्राची मालमत्ता बाबांना अर्पण केलेली होती. काही आठवड्यानंतर बाबांनी बऱ्याच जुन्या व नवीन अनुयायांच्या भेटी घेतल्या व विशेषतः १७ में १९५२ रोजी जेव्हा बाबांना भेटायला अमेरिकेतील सर्व भागातून फार मोठा जनसमूदाय एकत्र झाला होता.

त्यानंतर बाबा कारने आपल्या शिष्यांसह कॅलिफोर्नियासाठी व दुसऱ्या

नियोजित मुलाखतींसाठी रवाना झाले. ओक्लाहोमा पार करताना बाबांच्या कारला धडक बसली व गाडीतील पाचपैकी चार जण गंभीररीतीने जखमी झाले. राजमार्गावर असल्याप्रकारचे जे सहसा हृदयद्रावक अपघात घडतात त्यापैकीच हा एक होता.

ओक्लाहामा संस्थानातील जवळच असलेल्या प्राग या लहान शहरी सुदैवाने डॉ. बर्लसन यांचा एक खाजगी दवाखाना होता. या डॉक्टरने आपल्या अल्प कर्मचाऱ्यांच्या मदतीने सर्वांवर इलाज केले जे रक्ताने भरलेल्या शरीराने व कपड्यांच्या ढिगाऱ्यात मौन सद्गुरु, घायाळ साथिदारांसह तेथे आले होते. या प्रसंगाला सामोरे जाणे डॉ. बर्लसनच्या बाबतीत निश्चितच वैद्यकीय जगातील दुःखे दूर करण्याच्या व आयुर्मर्यादा वाढविण्याच्या संघर्षयुक्त सतत सुरु असलेल्या नाटकातील एक महाकाव्य होते. अपघातग्रस्तांचा गुंता जेव्हा नीट केला गेला तेव्हा असे आढळून आले की, कोणाच्याच जीवाला लगेच धोका नव्हता परंतु मोडलेली हाडे व खरचटलेल्या मासांच्या जखमा मात्र पुष्कळ होत्या बरेच दिवसपर्यंत हाडे बसविणे, जखमा धुणे बांधणे व त्यांना नवजीवन देणे या स्वरुपाची शुषृषा नित्याची झाली होती. बाबांचा मोडल्या गेलेला डावा पाय, बाहू व चेहऱ्यावरील बऱ्याच चेचल्या गेलेल्या जखमा जरी अत्यंत गंभीर म्हणून गणल्या जात नव्हत्या तरी त्यांच्या वेदना मात्र अतिक्लेशदायक होत्या. दोन आठवड्यानंतर ही मंडळी रुग्णवाहिकेमधून दक्षिण कॅरोलिना संस्थानात प्रकृती सुधारण्यासाठी परतली.

एका महान आध्यात्मिक नेत्याने आपल्या स्वतःवर व अनुयायांवर अशा स्वरुपात अपघात कसा होऊ दिला ? त्यांना याची पूर्व कल्पना होती व तो ते टाळू शकले असते. मला आश्चर्य वाटते की, असल्याप्रकारचे प्रश्न कित्येकदा विचारले गेले. प्रत्यक्षात या अपघाताचे भविष्य बाबांनी १९२८ लाच वर्तविले होते. त्याप्रमाणे त्यांची आवश्यकताही वर्तविली होती. त्यांनी अनेक प्रसंगी हेही म्हटले होते की, अमेरिकेत मला माझे रक्त सांडणे आवश्यक राहील. परंतु माझ्यावतीने असे जाहिर करणे की बाबांना हे सर्व माहीत होते, हे मध्यवर्ती विषयाचे संदर्भात अवास्तविक ठरते. युगानुयुगातील महान आध्यात्मिक विभूतींनी असावधानी व उपेक्षा करणाऱ्या संस्कृतीत अपघातापासून स्वतःला

कधी वाचविले नाही. वस्तुतः त्यांच्या वाट्याला आलेली मानवी संकटे त्यांनी कवटाळलेली आहेत व तसे ते जीवन जगलेही आहेत. व ते अशा स्थितीत की, जेव्हा त्यांचे जवळ विश्वात्मक शक्ती सामावलेली होती. त्या शक्तीचा वापर न करता देखील त्यांनी संकटांना तोंड दिलेले आहे. आध्यात्मिक दृष्टीने महान विभूतीचे श्रेष्ठतम कार्य ते नाही की जे भौतिक जगताच्या नियमाबाहेर जाऊन करतात, तर ते नियमांतर्गतच ते कार्य करतात.

१९३७* मध्ये बाबांनी हे सद्गुरुचे कार्य विशद केले होते. ''सद्गुरुला जेव्हा भौतिक जगताचे ओझे आपल्यावर घ्यावे लागते व ते स्वतःत सामावून घ्यावे लागते तेव्हा त्याकार्याची शारीरिक प्रतिक्रिया उमटणारच व त्यामुळे त्यांना साधारण मनुष्याप्रमाणे शारीरिक यातना घ्याव्याच लागतील. ''क्रिया व प्रतिक्रियांच्या नियमांना स्वीकारुन सद्गुरु ते नियम प्रस्थापित करतात व ते निःस्वार्थपणे तसेच स्वेच्छेने त्या नियमांच्या आधीन होतात. परंतु आपल्या स्वतःला या नियमांच्या आधीन केले तरी ते या नियमांच्या पलिकडे देखील असतात व स्वतःला भौतिक प्रतिक्रियांपासून वाचवू शकतात. जर असे केले तर 'क्रिया आणि प्रतिक्रिया' यांचा अर्थ व उद्देश तो काय राहिला ?

'सद्गुरु मानव जातीला'' क्रिया व प्रतिक्रिया'' यांच्या बंधनातून मुक्त करुन मानवलेला मायेच्या बाहेर घेऊन जातात व 'विश्वव्यापी मायेच्या' व्दैत प्रभावाला आपल्या आत जिरवितात.

''सद्गुरु स्वतःच्या सत्य अस्तित्वात व्दैताला शुध्द करण्याकरिता आपल्या आत जिरवितात.'' न्युयॉर्कमधील लोकांशी मुलाकती घेण्यात काही अधिक दिवस घालविल्यावर बाबा आपल्या जुन्या व नव्या अनुयायांना भेटण्याकरिता विमानाने गेले व ऑगस्ट १९५२ च्या शेवटी भारतात परतले. त्यानंतर लगेच आणखी काही मस्तांशी संपर्क साधण्याकरिता त्यांनी भारतात पुढील प्रवास सुरु केला. परंतु यावेळी त्यांचा उपक्रम जाहीर केलेल्या सार्वजनिक दर्शनस्थळी जे लोक जमत असत त्यांना आधात्मिक आशीर्वाद

*तोपर्यंत स्वतःच्या अवतारत्वाबद्दल बाबांनी सार्वजनिकरीतीने काहीच जाहीर केले नव्हते व त्यांना लोक सामान्यपणे सद्गुरु म्हणून संबोधित असत. तथापि पुरवणी ३० मध्ये बाबांनी अवतार व सद्गुरुंच्या भूमिकेमधील फरक स्पष्ट केला आहे. – संपादक

प्रदान करण्याच्या कार्यावर जास्त केन्द्रित करण्यात आला होता. १९५४ च्या सप्टेंबर महिन्यात ह्या सार्वजनिक  दर्शनाच्या कार्यक्रमांनी उच्चांक गाठला. जेव्हा बाबांनी आपल्या पुरुष अनुयायांना 'अंतिम' आध्यात्मिक खाजगी मिटींग करिता अहमदनगर येथील आपल्या आश्रमात आमंत्रित केले होते. भारतातील सर्व भागातून तसेच आशिया, युरोप व अमेरिका येथील अंदाजे एक हजार लोक आले होते. जे लोक आधी पोहोचले त्यांना १२ सप्टेंबर १९५४ रोजी अहमदनगरला सभोवतालच्या प्रदेशातून आलेल्या साठ हजार लोकांचा मेळावा पहावयास मिळाला जो बाबांचे आशीर्वाद प्रसादरुपाने प्राप्त करण्यासाठी जमला होता.  रमणीय व हृदयद्रावक मेळाव्यानंतर बाबा स्वतः दररोज हजर असलेल्यांना उपदेशपर पाठ देत असत. एक हजार आमंत्रित अनुयायांना २९ सप्टेंबर रोजी बाबांनी प्रबोधित केले व आशीर्वाद देऊन त्यांना परत पाठविले. सात ऑक्टोबर १९५४ ला वर्णमाला फळीचा वापर बाबांनी बंद केला व निवेदनासाठी ते केवळ हावभावांचा वापर करु लागले. (ही एक मनोरंजक गोष्ट आहे की निवेदनासाठी बाबा ज्या हावभावांचा उपयोग करीत असत ती निवेदन पध्दती मौन व्यक्तींच्या बोटांच्या साहाय्याने ए.बी.सी. ही अक्षरे तयार करुन निवेदन करण्याच्या पध्दतीसारखी नाही किंवा मूकबधिरांची चिन्हांची भाषा पध्दतीही नाही. परंतु ती मुक्त सोपी व अत्याधिक हावभावांची स्पष्टपणे वर्णन करण्याची केवळ त्यांचीच एकमेव पध्दती आहे.)

बाबांनी पुन्हा एकदा जाहीर केले की, त्यांचे मौन भंग, प्रकटीकरण व मृत्यू समीप आलेला आहे. जेव्हा ते मौनभंग करतील तेव्हा ते एकच शब्द बोलतील तो शब्दांच्या 'शब्द' असेल व तो मनुष्यांच्या अंतःकरणात खोलवर शिरेल.

याप्रमाणे परत एकदा मुर्शिदा ड्यूसच्या सहकार्याने मेहेरबाबांचे आजपर्यंतचे जीवन लिहिण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या जीवनकार्याचे महत्व त्यांच्या संकलित घटनांवर यथार्थपणे विशद करण्याचे व मुल्यमापनाचे काम इतिहासावर सोपविले आहे. आपण फक्त वर्तमान काळातील अगदी नजीकच्या कालखंडात जे सहभागी होत आहेत, आपल्या प्रेमाचा वाटा व मानवी निष्ठा बाबांच्या प्रती अर्पण करु शकतो व कृतज्ञता व्यक्त करतो की, एका अत्यंत महान गोष्टीने आपल्या जीवनात पदार्पण केले आहे.

– डॉन. इ. स्टीव्हन्स

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

गत १८ वर्षांचे काळात, गॉड स्पिक्सच्या प्रथम आवृत्तींचे प्रकाशन झाल्यापासून मेहेरबाबांचा प्रभाव जगभर पसरला व ते लक्षावधी लोकांचे आशा व श्रध्दास्थान बनले. जानेवारीच्या अखेर म्हणजे चार वर्षांपूर्वी त्यांनी आपले शरीर सोडले. भारतातील अहमदनगर जवळ मेहेरबादला त्यांची समाधी असून ती त्यांनी अनेक वर्षांपूर्वी स्वतःच्या सूचनेप्रमाणे करवून घेतली होती.

मेहेरबाबांची या कालखंडात जागतिक समस्या हाताळण्याची विश्वव्यापकता व तिचा मानवतेवरील प्रभाव तसेच सर्व धर्मियांच्या व संप्रदायातील लोकांचा त्यांच्या प्रेमाला जो प्रतिसाद आहे, तो अनुभविने शक्य झाले आहे. अगदी सुरुवातीपासून मेहेरबाबांनी हे स्पष्ट केले आहे की ,ते कोणत्याच विशिष्ट धर्मसंप्रदायाचे नाहीत. या ऐवजी त्यांचा असा उद्देश होता की जगातील सर्व धर्मांच्या सत्याचे शब्दांमध्ये चैतन्य ओतावे. वारंवार केलेल्या स्पष्ट पण संक्षिप्त विधानातून मेहेरबाबांनी त्यांच्या कार्यातील स्वातंत्र्य व कोणत्याही समस्येकडे पाहण्याची व्यापकता याचे महत्व स्पष्ट केले आहे.

''माझा राजकारणाशी मुळीच संबंद नाही मला सर्व धर्म समान आहेत. सर्व जाती व पंथ मला प्रिय आहेत. जरी मी सर्व वादांची धर्मांची व राजकीय पक्षांची कदर करतो तरी पण मी कोणत्याचा वादाचा धर्माचा किंवा राजकीय पक्षाचा नाही व राहूही शकत नाही. कारण संपूर्ण सत्यात या सर्वांचा समावेश आहे व ते सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहे. ते सर्वांच्या पलिकडे जाते जेथे पृथकतेला मुळीच जागा नाही, जे सर्व एकसारखेच भ्रामक आहेत. सर्व जीवनाची एकता अखंड व अविभाज्य आहे. व सर्व काल्पनिक मतभेद असले तरी ती एकता अजेय व अनातिक्रमणीय बनून राहते.

''मी सर्वांनाच – मोठ्या व लहानांना – सारखाच प्राप्त होणारा आहे

संताना – ज्याचे उत्थान होते व पाप्यांना जे पतीत होता, सर्व विभिन्न मार्गांनी जे ईश्वरीय हाक देतात, संताना जे मला आवडतात व पापी ज्यांच्यासाठी मी आहे,यांना मी सारखाच प्राप्त होणारा आहे, व सारख्याच प्रकारे –सुफीवाद वेदान्त ख्रिश्चनधर्मी किंवा झोरोस्ट्रियनपंथी बुध्द धर्मी व इतर कोणत्याही वादांच्या व्दारां व तसेच कोणत्याही माध्यमाचे व्दारा नव्हे तर सरळ सरळ मी सर्वांना प्राप्त होण्याजोगा आहे.*

*ज्वालामय स्वतंत्र जीवन' या काळात १९५२ मध्ये दिलेल्या आदेशावरुन.

खूप वाद विवादाचा, मेहेरबाबांचा अवतारपणाचा विषय या दरम्यानच्या कालखंडात बऱ्याच अंशी स्पष्टही झालेला आहे. १९५५ ला जेव्हा गॉड स्पीक्सची प्रथम आवृत्ती वाचकांसमोर आली तेव्हा बाबांच्या अवतार कार्याची बाब त्यांच्या अगदी जवळचे अनुयायी वगळता फारच थोड्या लोकांना काही वर्षे सांगण्यात आली. त्यांच्या कार्याचे महत्व न जानता बहुतेकांनी बाबांना एक महान संत किंवा सद्गुरु म्हणून मानले होते.

बाबांनी प्रथमच १९५४ मध्ये सार्वजनिक रितीने स्पष्ट केले की, ते या युगाचे अवतार आहेत. एकदा सद्गुरु म्हणून त्यांना मान्य केल्यावर त्यांच्या भक्तांना त्यांच्या विश्वव्यापी उत्तरदायित्वाचा स्वीकार करण्याची अडचण राहिली नाही.

बाहेरचे लोक जे मेहेरबाबांच्या प्रभावशाली ज्वालामय स्वतंत्र जीवन या काळात १९५२ मध्ये दिलेल्या संदेशावरुन त्यांच्या व्यक्तिमत्वावर विस्मयचकीत झाले होते पण व्यक्तीशः शरण जाऊन बाबांशी तन्मय होण्याची संधी प्राप्त न झालेल्या लोकांना बाबांच्या बाह्यकार्याचे व त्यांच्या अवतार–भूमिकेचे परिणाम अजमावणे थोडेघाईचे होईल. बाबा या युगाचे अवतार आहेत या विधानावर फारच थोड्या लोकांनी कडक टीका केली ही गोष्ट आश्चर्यकारक आहे. गॉड स्पीक्स वाचून अनेकांची खात्री झाली की असल्या प्रकारचे ज्ञान केवळ आध्यात्मिकदृष्ट्या अगदी उच्चतम अवस्थेत पोहचलेल्या व्यक्तिकडूनच दिल्या जाऊ शकते. म्हणून या संदर्भात कोणतेही मत प्रदर्शित करण्यापूर्वी वाट पाहाणे व निरीक्षण करणे अधिक योग्य ठरेल.

बाबांना ज्यांनी मानवदेहात पाहिलेच नाही व ज्यांचा परंपरागत रितीने अध्यात्माकडे कल नाही अशांनी बाबांना पुरातन पुरुष म्हणून प्रथमच मान्य केले असे नाही तर वैफल्यग्रस्त व गोंधळयुक्त जीवनात सत्याचा शोध घेणारे प्रयोगशील व क्रांतीकारी तरुण या मौनी सद्गुरुची प्रतिमा व शब्द ओळखावयास लागले हे एक विलक्षणच आहे. मार्ग न सापडल्यामुळे वारंवार आलेल्या अपयशांनी ताणलेल्या त्यांच्या प्रवृत्तींना बाबांच्या प्रतिमेत त्यांच्या प्रवचनांच्या पुस्तकांमध्ये व जीवनविषयक मुद्रित लहान कार्डावरील विधानांमध्ये एकाएकी उत्तर मिळाले.

या पूर्वीच्या दशकांमध्ये बाबांनी वारंवार प्रतिपादिले होते की, अवताराचे आगमन व त्यांच्या शब्दांचे पालन या गोष्टी सृष्टीच्या गरजेनुसार

लवकर घडून येतात. जेव्हा त्याची जास्त गरज असते तेव्हा अवतार अवतरतो व त्याचा शब्द स्वीकारला जातो कारण ती एकच गोष्ट आहे की, जी समाधान देऊ शकते. पिढ्यानपिढ्या योग्य व विश्वासार्ह उद्दिष्टांचा शोध घेणे हे मनुष्याचे लक्ष्य सारखे वाढतच आहे. आपल्या काळात हे इतके निकडीचे झाले आहे की, सामाजिक अस्वास्थ्याच्या लहरी एका नंतर एक प्रकट झाल्या.

अशा या सामाजिक अस्वास्थामध्ये मेहेरबाबांचे अवतरण सृष्टीचे प्रयोजन तसेच सर्व समावेशक प्रेमाच्या एका स्पष्ट विधानाचे सोबत झाले आहे. ज्याच्या प्रभावामुळे गरजेचे कच्चे ओरखडे ताबडतोब शमविले जाऊन शांत होतात व मौन आणि दिलासा देणारे अश्रू ओसंडू लागतात. सृष्टी हे एक वाहन म्हणून बाबा वारंवार वर्णन करतात की ज्यामुळे आपल्या स्वतःचे दिव्यत्व जाणीवपूर्वक ओळखण्यासाठी परमात्म्याची लहर फलीभूत होते.

गॉड स्पीक्स मधील काळजीपूर्वक लिहिलेल्या विधानांधून त्या पध्दतीचे वर्णन करतात की ज्यामुळे चेतनेच्या निर्मितीचे तंत्र विकसित झाले. सृष्टीच्या व्दैतात जी अनंत आव्हाने समोर आलेली आहेत. ती सोडवित असताना बाबांनी या ग्रंथात अनंत एकतेची सत्यता व उत्क्रांत चेतना सूक्ष्मरीतीने व तपशीलवार मांडलेली आहे.

सृष्टीच्या व्दव्दांचा अनुभव करण्याकरिता जे भौतिक रुप माध्यम म्हणून कार्य करते ते परमात्म्याच्या स्वतःला दिव्यरुपात जाणून घेण्याच्या निरंतर वाढणाऱ्या इच्छेची संकीर्ण अवांतर उत्पत्ती होय. स्वरुपांच्या अवस्थांच्या उत्क्रांतीचा आवेग, योग्यतेची कशीतरी केलेली निवड नसून , ती एक वाढत्या अधिक संकीर्ण साधनेच्या उर्वरीत अनुभवांच्या आवश्यकतेची फल निष्पत्ती होय. चेतनेची संपूर्णता व उत्क्रांती हे समग्र सृष्टीचे उद्दीष्ट आहे, हे यात वर्णिले आहेः

''व उत्क्रांतीच्या प्रक्रियेच्या संदर्भात हे नेहमी स्मरणात ठेवले पाहिजे की, सुरुवात म्हणजे चेतनेचा प्रारंभ , उत्क्रांती म्हणजे चेतनेची उत्क्रांती : व अंत म्हणजे जर काही अंत असेल तर तो चेतनेचा एक अंत असेल.*''

मेहेर बाबांनी विस वर्षांपर्यंत ह्या व ह्याबरोबर दैनंदिन जीवनात दिलेल्या अनेक संतुलीत व्यावहारिक 'अंतर्दृष्टी 'त्याच होत की ज्याकरिता तरुणांची एकसारखी गर्जना करुन मागणी होती. त्यांनी बाबांच्या स्वरुपाला अनुभवातून ओळखले,

---

* दि अवकेनर ग्रंथ ८ क्रमांक ४,१९६२

त्याचा अर्थ असा की, आधुनिक जीवनाच्या 'भ्रमजाल'च्या उत्तराचे रुपात ज्याप्रमाणे हातातील मोजे त्याच मापाचे असतात. अगदी हेच बाबांनी म्हटले होते की अवतार अगदी असाच असायला पाहिजे. समानतेवर दृष्टी टाकल्यास आपल्याला ही शंका येणार नाही की, बाबांनी जे म्हटले तेच बाबा या युगांचे अवतार आहेत.

परंतु या अवधित घडलेल्या बाबांच्या व्यक्तिगत जीवनाविषयी काय ? फार पूर्वी वर्तविलेल्या ओक्लाहोमा संस्थानातील प्रेग शहराजवळ घडलेल्या १९५२ मधील गंभीर मोटार अपघात व नंतरचा त्याहीपैक्षा गंभीर अपघात –की , जो भारतात साताऱ्याजवळ डिसेंम्बर १९५६ मध्ये घडला व ज्यामध्ये त्यांच्या नितंबाचे हाड (Hip Bone) चुरा झाले होते व डॉ. निलू जागीच ठार झाले होते. असे घडलेले असतानाही बाबांनी भरपूर आंतरिक व बाह्य कार्य केले ह्या दोन अपघातांचे संदर्भात एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, ज्या जगात आपण राहतो ते नियमबध्द  व संतुलित आहे व ते निश्चितच जादुच्या कांडीनी घडणाऱ्या चमत्काराचे नाही. अवतार स्वतः यातना भोगण्याच्यां प्रक्रियेव्दारां जो तो स्वतच स्वेच्छेने आपल्यावर घेतो, संतुलनला यथार्थ करतो. या दोन  प्रसंगी या दोन खंडावर बाबांनी आपले रक्त सांडले आहे, जे करणे त्यांना आवश्यक वाटत होते.

१९५६ मध्ये त्यांनी युरोप व अमेरिका व पृथ्वीभोवताल प्रवास केला. जग प्रवासात त्यांनी ऑस्ट्रेलियाला प्रथम भेट दिली. पाश्चिमात्य देशांना दिलेल्या १२ व्या भेटीचे विस्तृत वेळापत्रक दि अवकेनर ( ग्रंथ क्र. ४ ने.१ व क्र. ५न. २) व इतर नियतकालिकात आलेले आहे.

त्यांच्या १९५८ मधील पाश्चिमात्य देशातील १३ व्या प्रवासात त्यांनी अमेरिका व आस्ट्रेलियासह– प्रेमी व प्रियतमाच्या परस्परातील देवाण–घेवाणाचे स्नेहमय वातावरण निर्माण केले. ( दि. अवेकनर ग्रंथ ५, क्रमांक ३ व ४) या प्रसंगी हे स्पष्ट होते की, बाबा त्यांच्याकरिता आहेत की जे आपल्या अंतःकरणाचे गीत जाणतात. या कुतूहल निर्माण करणाऱ्या बाबच्या उपस्थितीचा या कुतूहल अनुभव घेणाऱ्यांना नाराज करण्यात आले नाही परंतु त्यांच्या भेटीबाबत मात्र प्रसिध्दी देण्यात आली नाही. प्रियतमाच्या

उपस्थितीतील ते यथार्थ जगणे होते. सिंहावलोकन केल्यास असे आढळले की, त्यांचा हा संपर्क अनेकांसाठी शेवटचाच ठरणार आहे, हे बाबा जाणत होते. त्यांनी तसे सूचित केले होते तरी आम्ही त्याकडे दुर्लक्ष केले.

मेहेर बाबांनी १९६२ मध्ये, एका महत्वपूर्ण नवीन चौकटीत जवळच्या लोकांना आपल्याकडे आकृष्ट करण्याचा पुन्हा चमत्कार केला. गतकाळात पौर्वात्य व पाश्चिमात्य अनुयायांचे मिलन अगदी मर्यादित स्वरुपाचे असावयाचे. १९६२ मध्ये मात्र हे मिलन विचारपूर्वक भव्य प्रमाणात होते.

शेकडोंनी बाब–प्रेमी मंडळी युरोप, अमेरिका, आस्ट्रेलियातून भारतातील पुणे शहरी आली. इराण, पाकिस्तान व भारतातून हजारोंनी लोक आलेत. पुण्याच्या गुरुप्रसादमध्ये प्रस्तुत १९६२ चे पूर्व–पश्चिम मिलन जणू एक प्रेमाच्या प्रवाहाचे व्यापक विभिन्न संस्कृतीचे नैसर्गिक मिलन होते. पाच दिवसपर्यंत बाबा हजारोंच्या संख्येनी एकत्र आलेल्या निकटच्या निमंत्रितांच्या समुहात बसले व विसंगत तत्वांना एकत्र मिसळले, जे केवळ यथार्थ एकता अर्थात परम प्रेमाला जन्म देते.

हे एक आश्चर्यच आहे की, या अविस्मरणीय व्यक्तीचे अपघातांनी मोडलेले व गंभीररीतीने प्रदीर्घ खडतर कार्यापायी झिजलेले शरीर अहोरात्र कसेकाय असंख्य प्रेमीजनांना भेटू शकत होते ? सहाव्या दिवशी तर ते याही पुढे गेले. त्यांनी गुरुप्रसारची दारे सताड उघडी करुन जनतेला आत त्यांच्यासमोर येऊन अभिलाषेनी भरलेले आध्यात्मिक आशीर्वाद प्राप्त करण्याकरिता येण्याची अनुमता दिली. सूर्योदयापासून तो सुर्यास्तापर्यंत हा सजीव प्रवाह त्यांच्या समोरुन सतत सरकत होता व शेवटी काळोख पडल्यामुळे दारे बंद करण्यात आली. तेव्हा बाबांची नजर आपल्यावर पडेल किंवा त्यांचा एक स्पर्श तरी मिळेल या खुळ्या आशेने असंख्य लोक चार रांगेत दूरपर्यंत उभे होते.

भारतातील प्रेमीजनाच्या मिलनाचे १९६३ व १९६५ मधील अल्प अपवाद सोडले तर बाबा एकसारखे कडक एकांतवासात राहात असत.शेवटी १९६६ च्या ऑगस्ट महिन्यात त्यांनी अशा सूचना दिल्या की,त्यांच्या खास निमंत्रणाशिवाय कोणालाच त्यांना भेटता येणार नाही. फारच कमी निमंत्रणे दिली

जात असत व अगदीच कमी अपवाद असत. त्यांनी सर्वांना सांगितले की त्यांच्या विश्वात्मक कार्याच्या ते अगदी उच्चतम अवस्थेत असून त्यांचे कार्य शंभर टक्के पूर्ण झाल्याचे त्यांना समाधान आहे.

हा त्यांच्या एकनिष्ठ असलेल्या अनुयायांना एक संकेत समजावयास पाहिजे होता.परंतु कुणी कधीच त्या दिवसाची कल्पना करीत नाही की, प्रियतम आपल्यामध्ये शारीरिक दृष्टीने उपलब्ध राहणार नाही. एक फेब्रुवारी १९६९ रोजी अगदी शिघ्र गतीने आपल्या सखोल प्रेमाच्या पसरलेल्या नेटवर्क व्दारां सर्व जगात वार्ता प्रसृत झाली की, आदले दिवशी दुपारनंतर मेहेरबाबांनी आपला देह सोडला. सात दिवसापर्यंत पुष्पहारांनी व सुगंधित गुलाबांच्या पाकळ्यांनी आच्छादिलेले बाबांचे शरीर फार पूर्वीच तयार करुन ठेवलेल्या समाधीत ठेवण्यात आले. त्यांचे मुखकमल एका हलक्या उशीवर किंचित उंच करुन ठेवण्यात आाले होते.कारण त्यांचे शब्द होते. ''मी झोपूनच माझ्या प्रेमियांना दर्शन देईन '' नेहमीप्रमाणे काय आवश्यक राहील याची कल्पना करुनच बाबांनी तशी तयारी केली होती. त्यांच्या अनुयायांनी, अनंताचे अनंत म्हणून आपल्या अनंतत्वात विलीन झाल्याचे ओळखले होते. बाबांना समाधीत ठेवल्यानंतर एप्रिल,मे व जुनमध्ये पौर्वात्य व पाश्चिमात्य देशातील अनेक लोकांनी फार मोठ्या समुहांनी गुरुप्रसाद ,मेहेराझाद, मेहेराबाद बाबांची समाधी व त्यांची निवासस्थाने यांना भेटी दिल्यात. आम्हाला हे कळत नाही की, तेथे काय घडले त्याचे वर्णन कोण कसे करु शकत होते. तेथे उपस्थित असलेल्या एखाद्या जवळ बसूनच आपण जाणू शकतो, हा एकच उपाय शक्य आहे. 'थ्री टॉक्स' नावाच्या १९६९ मध्ये मेहेर हाऊस पब्लिकेशन्स, सिडने, ऑस्ट्रेलिया येथून प्रकाशित केलेल्या पत्रकात, फ्रान्सिस ब्रेबाझॉन यांनी ही महान घटना अतिशय सुंदर रितीने रेखाटली आहे.

'गॉड स्पिक्स' या ग्रंथाच्या सुधारित आवृत्तीमध्ये मेहेरबाबांनी सूचित केलेले काही मुद्दे व दुरुस्त्या अंतर्भूत आहेत. पुरवणीला देखील काही गोष्टी जोडल्या आहेत. बऱ्याचशा रेखाचित्रात मामुली पण महत्वाचे बदल केले आहेत. पाच अधिक रेखाचित्रे जोडली आहेत. एक रेखाचित्र लुडविग डिम्फलने आपल्या प्रेमाचे प्रतिक म्हणून बनविले होते ते गॉड स्पिक्स मधील चेतनेच्या भूमिकेच्या

संदर्भात वापरलेल्या गूढ, सूफी व वेदान्तीक पारिभाषिक शब्दांशी संबंधित आहे. हे रेखाचित्र मेहेरबाबांनी देह सोडण्यापूर्वी बरीच वर्षे आधी बाबांच्याकडे पाठविले होते . हे चित्र मेहेर बाबांनी काळजीपूर्वक आपल्या नजरे खालून घातले होते असे एरच.बी. जेसावाला यांनी आम्हाला सांगितले. त्यामध्ये दोन किंवा तीन दुरुस्त्या करुन त्यावर त्यांनी पूर्ण समाधान व्यक्त केले व त्याचा 'गॉड स्पिक्स' करिता उपयोग करण्याची अनुमती दिली. ते रेखाचित्र इतके मोठे झाले की, ते स्वतंत्रपणे या ग्रंथाला जोडले आहे. मेहेरबाबांनी वेळोवेळी दिलेल्या वेगळ्या माहितीवरुन या ग्रंथाच्या विषयाला काही अधिक तळटीपा जोडलेल्या आहेत.

या ठिकाणी हे देखील लक्षात ठेवले पाहिजे की मथळ्याकरिता वापरलेले काही पारिभाषिक शब्द जे सुफी, वेदान्तीक व गूढ पारिभाषिक शब्द सूचक आहेत परंतु ते काही प्रसंगी या तीन अनुशासनात उपयोगात आणले असले तरी ते अगदी यथार्थ शब्द आहेत असे नाही. तरीही त्यांचा उपयोग विषय समजण्याच्या व तुलनात्मक अध्ययनाच्या दृष्टीने वाचकांसाठी करण्यात आला आहे. लुडविग डिम्फल–रचित संपूर्ण शब्दावलीला मेहेरबाबांनी देह सोडण्यापूर्वी मान्यता दिली होती.

अन्ती अवतार मेहेर बाबांच्या जीवनाविषयी ओघाने आलेला नैसर्गिक परिणाम व शब्द सूचित करणे हे आम्ही टाळू शकत नाही. मेहेरबाबांचे जीवन आंतरिक मनुष्याकरिता होते की जेणे करुन त्याला सत्याला वेढलेले भ्रमजाल तोडता यावेत, ज्यामुळे त्याने स्वतःला बंधनात टाकले आहे. याकरिता बाबांनी जी जीवनविषयक सिध्दांताची स्पष्टीकरणे दिली आहेत त्यांना भौतिक अनुशासनाच्या संदर्भात भरपूर अर्थ आहे. जेव्हा कुणी या युगातील श्रेष्ठातील सर्व श्रेष्ठाने दिलेल्या विविध विधानांचे अध्ययन करतो तेव्हा त्याला भौतिकशास्त्राच्या पध्दतीचा अर्थ कसा मूलभूत व क्रान्तीकारी आहे हे दिसून येते. भौतिक, रसायन, भूगर्भशास्त्र,तर्कशास्त्र व इतर शास्त्रात जे प्रशिक्षित आहेत ते जेव्हा मेहेरबाबांच्या जीवनाचा त्यांनी केलेल्या विधानांचा अभ्यास करतात तेव्हा ते त्या विधानांचा न्यायसंगत वापर प्रथम स्वतःच्या आंतरिक प्रकृतीच्या गरजेसाठी करतील. तथापि जसे बाबांचे शब्द आवश्यक प्रयोजनाचे व सुरक्षित पाठिंब्याचे भाव स्थापित करण्याचे पहिले कार्य पूर्ण करतात तेव्हा

महत्वाचा दुसरा पैलू अनिवार्यपणे स्वतःचे द्दढ प्रतिपादन करु लागेल. जीवन गतिमान होऊ लागते ते आंतरिक व बाह्य दोन्ही रुपाने होते. आंतरिक सत्यतेची लागोपाठ जलद ओळख झाल्यानंतर बाह्य कार्यातही समान अंतर्द्दष्टी येऊ लागते.

मेहेरबाबांच्या सरळ–सोप्या स्वसिध्द विधानांना मूलभूत व उत्तेजक भावार्थाच्या पारदर्शक दुर्बिणीतून अनेक फाटे फुटलेले दिसतात.ते कमीत कमी शब्द उपयोगात आणत असत. ते त्याचा जास्त विस्तार करीत नसत. ते मूलभूत सत्याचा केवळ महत्वाचा अन्वयार्थ देत व त्यामधून असंख्य अनिवार्य निष्कर्ष निघत असत. भौतिक विज्ञान शास्त्रांनी आवश्यक एक वेळ आपल्या सारभूत ‘स्व‘ ला पुन्हा संशोधनाचे गतिचक्र सुरु केले तेव्हा त्याला त्याच्या विज्ञानाच्या क्षेत्रावर मेहेरबाबांचा प्रभाव जाणवू लागल्याचा त्यांना अनुभव येऊ लागेल.

मेहेरबाबा असे आहेत. ते जीवनाच्या सर्व पैलूतून शांतपणे प्रवाहित होतात व हे कळण्यापूर्वी मनुष्याला याचे ज्ञान होते की, सर्व जीवन काहीच नसून ते म्हणजे मेहेरबाबाच मेहेरबाबांशी व्यवहार करीत असल्याची एक मोहक खेळ पाहण्यासारखे आहे. ही खचितच विश्वव्यापकतेत अंतिम स्थिती आहे.

सॅन फ्रान्सिस्को, कॅलिफोर्निया एप्रिल, १९७३
आय व्ही ओ. ड्यूस
डॉन. इ.स्टीव्हन्स

‘कोणताही पंथ, संप्रदाय किंवा संघटना स्थापन करण्यासाठी मी आलो नाही, ना की, नवीन धर्माची स्थापना करण्यासाठी. मी जो धर्म प्रदान करीन तो अनेकांच्या मागे असलेल्या एकाचे ज्ञान देण्याचे शिक्षण देईल. पुस्तक जे मी लोकांना वाचावयास लावीन ते असेल हृदयाचे पुस्तक ज्यामध्ये जीवनरहस्याची चावी असेल. मी मन आणि हृदयाचे सुखद मिलन घडवून आणील. मी सर्व धर्मांना व संप्रदायांना नवजीवन प्रदान करीन व त्यांना एका माळेतील मण्याप्रमाणे एकत्र आणेल ’

– मेहेर बाबा

# गॉड स्पिक्स

# भाग १

# चेतनेच्या अवस्था

सर्व आत्मे परमात्म्यात होते, आहेत व राहतील. सर्व आत्मे एकच आहेत.

सर्व आत्मे अनंत व शाश्वत आहेत. ते निराकार आहेत.

सर्व आत्मे एकच आहेत, आत्म्यांमध्ये भिन्नता नाही किंवा आत्मा म्हणून त्यांच्या स्वरुपात आणि अस्तित्वात फरक नाही.

आत्म्यांच्या चेतनेत भिन्नता आहे, आत्म्यांना असलेल्या चेतनेच्या (जाणीवेच्या) भूमिकेत फरक आहे. आत्म्यांच्या अनुभवात फरक आहे आणि अशाप्रकारे आत्म्यांच्या अवस्थेत भिन्नत्व आहे.

बहुसंख्य आत्म्यांना स्थूल देहाची चेतना असते, काही आत्म्यांना सूक्ष्म देहाची (प्राण) चेतना असते, फारच थोड्या आत्म्यांना मनोदेहाची (मनाची) चेतना असते आणि अत्यंत कमी आत्म्यांना ''स्व'' ची (आत्म्याची) चेतना असते.

बहुसंख्या आत्म्यांना स्थूल भुवनाचा (जगताचा) अनुभव असतो, काही आत्म्याना सूक्ष्म भुवनाचा (जगताचा) अनुभव असतो, फारच तोड्या आत्म्यांना मनोभुवनाचा (जगताचा) अनुभव असतो, अगदीच क्वचित आत्म्यांना परमात्म्याचा अनुभव असतो.

बहुसंख्य आत्मे स्थूल भूमिकेवर (अन्न भूमिका) असतात, काही आत्मे सूक्ष्म भूमिकेवर (प्राण भूमिका) असतात, अगदीच थोडे आत्मे मनोभूमिकेवर असतात आणि अगदी क्वचित आत्मे मनोभूमिकेच्या पलिकडील भूमिकेवर (विज्ञान भूमिका) असतात.

बहुसंख्य आत्मे फार बंधनात असतात, काही आत्मे थोड्या बंधनात असतात व अगदी थोडे आत्मे अगदी कमी बंधनात असतात व अगदीच थोडे आत्मे बंधनरहित असतात.

हे सर्व विविध चेतनेचे, विविध अनुभवांचे व विविध अवस्थांचे आत्मे परमात्म्यात असतात.

आता जर हे सर्व आत्मे परमात्म्यात आहेत व ते सर्व एकच आहेत तर त्यांच्या चेतनेत, भूमिकेत, अनुभवात व अवस्थांमध्ये वेगळेपणा का ?

या विविधपणाचे कारण आहे की, या आत्म्यांना विविध व परस्पर विरोधी संस्कार* असतात.

जास्तीत जास्त आत्म्यांना स्थूल संस्कार असतात. काही आत्म्यांना सूक्ष्म संस्कार असतात, अत्यंत थोड्या आत्म्यांना मनःसंस्कार असतात व अगदीच थोड्या आत्म्यांना मुळीच संस्कार नसतात.

स्थूल संस्कार असणारे, सूक्ष्म संस्कार असणारे, मनःसंस्कार असणारे व संस्कार रहित हे सर्व आत्मे परमात्म्यात असतात व ते सर्व एकच आहेत.

स्थूल संस्कार असणाऱ्या आत्म्यांना स्थूल देहाची चेतना असते व त्यांना स्थूल भुवनाचा अनुभव असतो.

सूक्ष्म संस्कार असणाऱ्या आत्म्यांना सूक्ष्म (प्राण) देहाची चेतना असते व त्यांना सूक्ष्म भुवनाचा अनुभव असतो.

मनःसंस्कार असणाऱ्या आत्म्यांना मनोदेहाची (मन) चेतना असते व त्यांना मनोभुवनाचा** अनुभव असतो.

संस्काररहित आत्म्यांना 'स्व' ची (आत्म्याची) चेतना असते व त्यांना परमात्म्याची अनुभूती असते. अशा प्रकारे स्थूल संस्कार असलेले आत्मे स्थूल देहाचे माध्यमातून स्थूल जगताचा अनुभव घेतात, जसे पाहणे, ऐकणे, वास घेणे, झोपणे, मल–मूत्र विसर्जन करणे इत्यादी विविध व अगदी भिन्न प्रकारचे अनुभव प्राप्त करतात. हे सर्व अनुभव स्थूल जगताचे असतात. सूक्ष्म संस्कार असलेले आत्मे सूक्ष्म देहाद्वारा क्रमाने सूक्ष्म जगताच्या तीन भूमिकांचा अनुभव

---

* (हे देखील पहा : मेहेरबाबाव्दारा ''दि फॉर्मेशन ॲन्ड फंक्शन ऑफ संस्कार्स'' डिस्कोर्सेस ६ वी आवृत्ती, ३ रा व्हॅलूम, सन फ्रॉन्सिस्को : सुफिझम रिओरिएटेड, इंड. १९६७ यांचे प्रकाशन) १:५४–६४– संपा)

| **भुवन जगत | | देह | |
|---|---|---|---|
| गूढवादी | गूढवादी | सुफी | वेदान्ती |
| स्थूल भुवन(जगत) | स्थूल देह | जिस्म–ए–कसीफ | स्थूल शरीर |
| सूक्ष्म भुवन(जगत) | सूक्ष्म देह | जिस्म–ए–लतीफ | सूक्ष्म शरीर(प्राण) |
| मनो भुवन(जगत) | मनो देह | जिस्म–ए–अल्ताफ | कारण शरीर, मनोदेह |

घेतात व या तीन भूमिकात त्यांना फक्त पाहण्याचे, ऐकण्याचे व वास घेण्याचे अनुभव असतात.

मनःसंस्कार असलेले आत्मे मनोजगतात मनो देहाव्दारां किंवा मनाव्दारां केवळ पाहण्याचे अनुभव घेतात व या पाहण्यात त्यांना परमात्म्याचे दर्शन होत असते.

संस्काररहित आत्मे 'स्व' व्दारा (आत्म्याव्दारां) परमात्म्याच्या अनंत शक्तीचा, अनंत ज्ञानाचा व अनंत आनंदाचा अनुभव घेतात.

ज्या आत्म्याला स्थूल देहाची चेतना असते त्याला ना सूक्ष्मदेहाची , ना मनोदेहाची, ना आपल्या 'स्व' ची चेतना असते.

ज्या आत्म्याला सूक्ष्म देहाची चेतना असते त्याला स्थूल देहाची चेतना नसते, मनोदेहाची चेतना नसते व 'स्व' ची देखील चेतना नसते.

ज्या आत्म्याला मनोदेहाची चेतना असते त्याला स्थूल देहाचे व सूक्ष्म देहाचे भान नसते व 'स्व' ची चेतना नसते.

ज्या आत्म्याला 'स्व' (आत्म्याची) ची चेतना असते त्याला स्थूल देहाची, सूक्ष्म देहाची व मनोदेहाची जाणीव नसते.

ज्या आत्म्याला स्थूल जगताचा अनुभव असतो त्याला ना सूक्ष्म जगताचा अनुभव असतो, ना मनोजगताचा अनुभव असतो, ना त्याला परमात्म्याचा अनुभव असतो.

ज्या आत्म्याला सूक्ष्म जगताचा अनुभव असतो तो स्थूल जगताचा अनुभव घेत नाही, त्याला मनोजगताचा अनुभव नसतो व परमात्म्याचा अनुभव तर नसतोच.

ज्या आत्म्याला मनोजगताचा अनुभव असतो, तो स्थूल जगताचा अनुभव घेत नाही, ना तो सूक्ष्म जगताचा अनुभव घेत, ना त्याला परमात्म्याचा अनुभव असतो.

ज्या आत्म्याला परमात्म्याचा अनुभव असतो तो स्थूल जगताचा अनुभव घेत नाही, सूक्ष्म जगताचा अनुभव घेत नाही व तो मनोजगताचाही अनुभव घेत नाही. याचा अर्थ असा की ज्या आत्म्याला ''स्व'' ची चेतना आहे व परमात्म्याचा अनुभव आहे त्याला स्थूल देहाची, सूक्ष्म देहाची व मनोदेहाची जाणीव नसते व तो स्थूल, सूक्ष्म व मनो जगतांचा अनुभव घेत नाही.

याचा अर्थ असा की, 'स्व' ची चेतना प्राप्त करण्यासाठी व परमात्म्याच्या अनुभूतीसाठी आत्म्याने स्थूल, सूक्ष्म व मनोदेहाची चेतना गमावली पाहिज. परंतु जो पर्यंत आत्मा स्थूल, सूक्ष्म व मनःसंस्कारांनी संस्कारित झालेला असतो तोपर्यंत आत्म्याला सातत्याने अनुक्रमे स्थूलदेहाची, सूक्ष्म देहाची व मनोदेहाची जाणीव असते व त्याला स्थूल, सूक्ष्म व मनोजगताचा अनुभव सातत्याने अनुभविणे आवश्यक होऊन जाते.

याचे स्पष्ट कारण असे आहे की, जोपर्यंत आत्म्याची जाणीव स्थूल संस्कारांनी संस्कारित झालेली असते तोपर्यंत आत्म्याला स्थूल शरीराव्दारे स्थूल संस्कारांचा अनुभव घेण्याशिवाय दुसरा मार्ग नसतो.

त्याचप्रमाणे जोपर्यंत आत्म्याची चेतना सूक्ष्म संस्कारांनी संस्कारित झालेली असते तोपर्यंत आत्म्याला सूक्ष्म देहाव्दारे सूक्ष्म संस्कारांचा अनुभव घेण्याशिवाय पर्याय नसतो.

त्याचप्रमाणे जोपर्यंत आत्म्याची चेतना मनःसंस्कारांनी संस्कारित झालेली असते तोपर्यंत आत्म्याला मनोदेहाव्दारे मनःसंस्कारांचा अनुभव घेण्याशिवाय पर्याय नसतो. जेव्हा स्थूल, सूक्ष्म व मनःसंस्कार नाहिसे होतात किंवा पूर्णपणे लुप्त होतात तेव्हा आत्म्याची चेतना सहजरीतीने व आपोआपच स्वतःकडे निर्देशित व केन्द्रित होते तेव्हा प्रस्तुत आत्म्याला अटळपणे परमात्म्याच्या अनुभवात तल्लीन होण्याशिवाय पर्याय नसतो.

आता स्थूल, सूक्ष्म व मनोदेह हे काही नसून केवळ आत्म्याच्या छाया आहेत. स्थूल, सूक्ष्म व मनोजगत हे देखील काहीच नसून फक्त परमात्म्याच्या छाया आहेत.

स्थूल, सूक्ष्म व मनोदेह सीमित असून त्यांना आकार आहेत व ते परिवर्तनीय व नष्ट होणारे आहेत. स्थूल जगत, सूक्ष्म जगत व मनोजगत ही मिथ्या आहेत. ही विश्वे शुन्य, कल्पना स्वरुप, रिक्त स्वप्ने आहेत. केवळ परमात्मा हाच एकमेव सत्य आहे.

म्हणून आत्मा जेव्हा स्वतःच्या स्थूल, सूक्ष्म व मनोदेहांच्या सहाय्याने स्थूल, सूक्ष्म व मनोजगताचा अनुभव घेतो तेव्हा तो प्रत्यक्षात खरे पाहता परमात्म्याच्या छायांचा स्वतःच्या छायांच्या मदतीने अनुभव घेत असतो.

हेच अन्य शब्दात सांगावयाचे झाल्यास, आत्मा स्वतःच्या मर्यादित व

नश्वर देहाव्दारे भ्रमाचा, शुन्याचा, कल्पनेचा व रिक्त स्वप्नांचा अनुभव घेतो.

आत्मा जेव्हा फक्त त्याच्या 'स्व' च्या सहाय्याने परमात्म्याचा अनुभव घेतो तेव्हा तो प्रत्यक्ष सत्यतेत सत्याचा अनुभव घेतो.

जेव्हा आत्म्याला आपल्या स्थूल देहाची चेतना असते तेव्हा तो स्वतः आपल्या स्थूल देहाशी एकरूप होतो व तो स्वतःला स्थूल शरीर म्हणूनच ओळखतो.

याचा अर्थ असा की, अनंत, शाश्वत, निराकार, आत्मा स्वतःला सीमित, नश्वर व सगुणसाकार म्हणून पाहतो.

या अज्ञानाचे कारण संस्कार आहेत. ज्या आत्म्याचे शाश्वत अस्तित्व परमात्म्यात आहे तो अगदी प्रारंभी संस्कारातून ज्ञान प्राप्त न करता अज्ञान प्राप्त करतो.

जेव्हा आत्मा विशिष्ट संस्काराप्रमाणे विशिष्ट शरीर प्राप्त करतो, तेव्हा त्या आत्म्याला ते शरीर आपणच असल्याची संवेदना व अनुभूती होऊ लागते.

पाषाणाच्या स्वरुपात असणाऱ्या आत्म्याला आपण पाषाण असल्याची अनुभूती होते.

यानुसार यथावकाश आत्मा अनुभव घेतो व त्याला वाटते की तो धातू, वनस्पती, कीडा, मत्स्य, पक्षी, प्राणी, पुरुष किंवा स्त्री आहे. भौतिक स्वरुपाचा कोणताही प्रकार किंवा रुपाचा कोणताही आकार प्राप्त झालेला असो, आत्मा अगदी सहजपणे स्वतः त्या स्वरुपाशी, आकृतीशी व आकाराशी एकरुप होतो व अनुभवितो की, ते स्वरुप, आकृती व आकार तो स्वतःच आहे.

आत्म्याला जेव्हा सूक्ष्म देहाची चेतना असते तेव्हा तो आत्मा अनुभवितो की, तो सूक्ष्म देहच आहे.

आत्म्याला जेव्हा मनोदेहाची चेतना असते तेव्हा तो आत्मा अनुभवितो की तो स्वतः मनोदेहच आहे.

तेव्हा केवळ संस्कारामुळेच (नक्श–ए–अमल किंवा संस्कार) निराकार असलेला आत्मा–अनंत आत्मा, असा अनुभव घेतो की तो निश्चितच स्वतः स्थूल देह किंवा सूक्ष्म देह (प्राण) किंवा मनोदेह (मन) आहे.

स्थूल जगताचा स्थूल रूपांव्दारां अनुभव घेत असताना, आत्मा असंख्य स्थूल देहांशी साहचर्य जोडतो व तोडतो. स्थूल देहांशी एकरूप होणे व

त्यापासून विभक्त होणे यालाच अनुक्रमे जन्म व मृत्यू म्हटले जाते.

शाश्वत व अमर असलेल्या, जन्म व मृत्यूरहित तथार्थतेत वास्तव्य करणाऱ्या आत्म्याला असंख्य वेळा जन्म-मृत्यूचा अनुभव केवळ संस्कारामुळेच घ्यावा लागतो.

संस्कारामुळेच जन्म-मृत्यूचा अनुभव असंख्यवेळा घेणाऱ्या आत्म्याला, जे जगत भ्रामक असून छाया आहे, त्या स्थूल जगताचा केवळ अनुभवच घ्यावा लागत नाही तर त्या बरोबरच आत्म्याला स्थूल जगताच्या सुख-दुःखाचा तसेच सद्‌गुण-दुर्गुणांचा देखील अनुभव घ्यावा लागतो.

सुख-दुःखाच्या व सद्‌गुण-दुर्गुणांच्या पलिकडे व त्यापासून पूर्ण मुक्त असणाऱ्या आत्म्याला केवळ संस्कारामुळेच स्थूल जगताच्या या सुख-दुःखांचा व सद्‌गुण-दुर्गुणांचा अनुभव घेणे आवश्यक होऊन बसते.

आता ही बाब सिद्ध झाली आहे की, जन्म-मृत्यूंचे, सुख-दुःखाचे व सद्‌गुण-दुर्गुणांचे अनुभव आत्म्याला केवळ स्थूल शरीराने स्थूल जगताचा अनुभव घेताना घ्यावे लागतात, परंतु आत्म्याचे स्थूल रूप ही आत्म्याची छाया आहे व स्थूल जगत ही परमात्म्याची छाया आहे.

अशा प्रकारे जन्म-मृत्यूचे, सुख-दुःखाचे व सद्‌गुण-दुर्गुणांचे जे आत्म्याने अनुभव घेतले आहेत ते दुसरे कशाचे नसून ते छायेचे अनुभव आहेत. म्हणून जे काही अशा प्रकारे अनुभविले जाते ते सर्व मिथ्या (भासमान) आहेत.

## आत्मा हाच परमात्मा आहे, हे अंतिम सत्य आहे.

आत्मा व परमात्म्याचे नाते सुस्पष्ट करण्याकरिता आपण परमात्म्याची तुलना एका अनंत महासागराशी – एका अमर्याद महासागराशी व आत्म्याची त्या महासागरातील एका थेंबाशी करुया. आत्मा या अमर्याद महासागराच्या (परमात्म्याच्या) कधीच बाहेर नसतो.

आत्मा हा कधीच परमात्म्याचे बाहेर असू शकत नाही, कारण परमात्मा हा अनंत व अमर्याद आहे. अमर्यादेच्या अमर्यादपणापलिकडे आत्म्याचे अस्तित्व कसे काय राहणार किंवा अमर्यादपणाच्या बाहेर तो कसा काय येऊ शकणार ? म्हणून आत्मा हा परमात्म्यामध्येच आहे.

आत्मा हा परमात्म्यात एकरुप पावलेला आहे ही महत्वाची बाब

प्रस्तापित केल्यानंतर, आपण थोडे पुढे जाऊन असे म्हणू की आत्मा हाच परमात्मा आहे. हे कसे ?

उदाहरणार्थ– आपण एका अमर्याद महासागराची कल्पना करु या. आपण ही देखील कल्पाना करु की, या अमर्याद महासागराच्या अमर्याद विस्तारातून आपण महासागरातील एक बिंदू वेगळा केला किंवा महासागरातील एक बिंदू बाहेर काढला. याचा अर्थ असा की, महासागरातील हा बिंदू, अमर्याद महासागरात असताना, अलग करण्यापूर्वी स्वतः महासागरच असतो व अमर्याद महासागरात महासागराचा एक बिंदू म्हणून त्याला अस्तित्व नसते, कारण महासागरातील प्रत्येक बिंदु जेव्हा थेंबाच्या मर्यादांनी (बंधन) मर्यादित नसतो तेव्हा तो महासागरच असतो.

जेव्हा अमर्याद महासागरापासून एक महासागराचा बिंदू वेगळा केला जातो किंवा एक थेंब म्हणून अमर्याद महासागरातून तो वेगळा काढला जातो, तेव्हा तो महासागरातील बिंदू, अमर्याद महासागराचा एक थेंब म्हणून स्वतःचे वगळे अस्तित्व प्राप्त करतो व त्या महासागरातील बिंदूकडे अमर्याद महासागराचा एक थेंब म्हणून पाहिले जाते.

वेगळ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास स्वतः अनंत, अमर्याद व सीमारहित असलेल्या महासागराला, आता त्या अनंत, अमर्याद व सीमारहित असलेल्या महासागराचा केवळ एक थेंब म्हणून पाहिल्या–ओळखल्या जाते आणि त्या अनंत, अमर्याद व सीमारहित असलेल्या महासागराच्या तुलनेत त्याच महासागराचा हा बिंदू किंवा त्याच महासागराच्या अंशाचा हा थेंब (this drop of the iota of ocean) अनंतपणे सीमिततेत अगदीच सीमित व अगदीच मर्यादित आहे. म्हणजेच अनंतपणे स्वतंत्र असलेला बिंदू स्वतःला अनंतपणे सीमित झालेला पाहतो.

अशाप्रकारे आत्म्याची तुलना आपण अनंत महासागराच्या एका थेंबाशी केलेली आहे, ज्या थेंबाने वरपांगी वेगळे अस्तित्व प्राप्त केले आहे असे भासत असले तरी वास्तविकपणे, अनंत परमात्म्याच्या अमर्यादेच्या अमर्यादपणाच्या बाहेर तो थेंब कधीही राहू शकत नाही, त्या अनंत परमात्म्याची तुलना आपण एका अनंत अमर्याद व असीम महासागराशी केलेली आहे.

परंतु ज्याप्रमाणे महासागराचा बिंदू , थेंब म्हणून सागरजलपृष्ठावरील

बुडबुडा होऊन, बुडबुडेपणामुळे तो बुडबुडा स्वतःस मर्यादा प्राप्त करतो व महासागरातील बिंदूवर, अनंत महासागरापासून वरपांगी वेगळे अस्तित्व बहाल करतो, त्याचप्रमाणे परमात्म्याशी एकरुप असलेला व स्वतः परमात्माच असलेला आत्मा आपले स्वतःचे अस्तित्व अनंत परमात्म्यापासून वरपांगी अगदी वेगळे असल्याचे अनुभवितो, याला कारण बुडबुड्याची (अज्ञानाची) मर्यादा, या अज्ञानाच्या बुडबुड्यामुळे आत्मा झाकला जातो. हा अज्ञानाचा बुडबुडा फुटताक्षणीच आत्मा केवळ परमात्म्याशी एकरुपच होत नाही तर तो स्वतः 'मीच परमात्मा' असल्याचा अनुभव घेतो.

आत्म्याने स्वतःच निर्माण केलेल्या अज्ञानाच्या बुडबुड्यामुळे जी मर्यादा निर्माण झाली, त्या मर्यादेमुळेच आत्म्याला परमात्म्यापासून वरकरणी वेगळ अस्तित्व, असण्याचा जणू वारसा प्राप्त झालेला आहे. अनंत परमात्म्यापासून स्वतःचे वेगळे अस्तित्व स्वतःच निर्माण केल्यामुळे, आत्मा जो स्वतःच अनंत अमर्याद व असीम आहे, तो स्वतःला एक अतिसीमित व अनंत बंधनात असल्याचा वरकरणी अनुभव घेतो.

* * *

# भाग २

# मूळ उर्मी व चेतनेच्या उत्क्रांतीचा प्रवास

एका अचेतन आत्म्याचा आता आपण विचार करु.

आत्म्याचे ठिकाणी अगदी प्रारंभी संस्कारही नव्हते व चेतनाही नव्हती म्हणून या अवस्थेत किंवा स्थितीत आत्म्याला स्थूल आकार किंवा शरीर, सूक्ष्म देह किंवा मनोदेह (कारण देह) नव्हते, कारण केवळ स्थूल, सूक्ष्म व मनःसंस्कारांच्या अस्तित्वानेच फक्त स्थूल, सूक्ष्म व मनोदेह अस्तित्वात येऊ शकतात आणि केवळ या शरीरांच्या अस्तित्वामुळेच स्थूल, सूक्ष्म व मनोजगताला अस्तित्व प्राप्त होणे शक्य होते.

अतः अगदी प्रारंभी आत्म्याचे ठिकाणी स्थूल, सूक्ष्म व मनोदेहाची चेतना नव्हती व आत्म्याला स्वतःचीही चेतना नव्हती व त्यामुळे आत्म्याला स्वाभाविकपणे स्थूल, सूक्ष्म व मनोजगताचे अनुभव नव्हते व त्याला परमात्म्याचा सुद्धा अनुभव नव्हता.

आत्म्याची ही अनंत, संस्काररहित, अचेतन प्रशांत अवस्था एका उत्तेजक शक्तिमुळे प्रतिध्वनित झाली, ज्या शक्तिला आपण 'प्रथम उर्मी' (स्वतःला जाणून घेण्याची प्रथम लहर किंवा उर्मी') असे म्हणतो.

ही प्रथम उर्मी परमात्म्यात अंतर्हित (सुप्त) होती.

आपण जेव्हा परमात्म्याची तुलना अनंत व अमर्याद महासागराशी करतो व परमात्म्याचे ठिकाण प्रथम उर्मी आली असे म्हणतो तेव्हा त्या तुलनेच्या परिभाषेत असे म्हणता येऊ शकते की, त्या अनंत व अमर्याद महासागराचे ठिकाणी प्रथम उर्मी किंवा लहर उठली.*

अनंततेमध्ये अमर्याद व मर्यादित दोन्हीही अन्तर्भूत आहेत.

आता ही प्रथम उर्मी अनंत होती की सीमित होती किवा ती प्रथम सीमित होती व नंतर अनंत झाली किंवा त्या उलट होती ?

प्रथम उर्मी ही अगदीच सीमित होती परंतु ती प्रथम उर्मी अनंततेची होती.

---

* (हे पहाः मेहेर बाबा, ''दि व्हिम फ्रॉम दि बियाँड'' बिमस् फ्रॉम मेहेर बाबा ऑन दि स्पिरिट्युअल पॅनोरमा (सन फ्रान्सीस्कोः सुफीझम दि ओरिएटेड इंक, १९५८) पान ७.११– संपादक)

अगदीच सीमित असणारी ही प्रथम उर्मी त्या अनंत महासागराची – परमात्म्याची होती व या अनंततेत अंतर्हित असलेली परतुं सीमित अशा या पहिल्या उर्मीचे प्रकटीकरण अनंत व अमर्याद महासागराच्या अत्यंत सीमित बिंदूच्या बंधनातून झाले.

परंतु सुप्त असलेल्या प्रथम उर्मीचा अगदीच सीमित असलेला प्रकटीकरणाचा बिंदू जो अत्यंत सीमित सुद्धा होता तो अनंत अमर्याद महासागरात असल्यामुळे हा प्रथम उर्मीच्या प्रकटीकरणाचा अत्यंत सीमित बिंदू सुद्धा अमर्याद होता.

या प्रथम अती–सीमित उर्मीच्या अती–सीमित बिंदूच्या प्रकटीकरणातून अनंताची छाया (जी छाया अंतिम सत्याची असल्यामुळे अनंत होती) हळूहळू बाहेर आली* व विस्तारीत होत गेली.

पहिल्या सुप्त उर्मीच्या प्रकटीकरणाचा अत्यंत सीमित बिंदूला ''ॐ'' बिंदू किंवा ''सृष्टी निर्मितीचा बिंदू'' असे म्हणतात. हा बिंदू अमर्याद आहे.

प्रथम उर्मीच्या तरंगाबरोबरच अत्यंत स्थूल प्रथम संस्काराची निर्मिती झाली. या संस्काराने आत्म्याला अनंततेच्या अगदी परिपूर्ण विपरित असे अगदी सीमित स्थूल प्रतिरूप म्हणून प्रस्तूत केले.

प्रथम उर्मीच्या या प्रथम अत्यंत स्थूल संस्कारामुळे अनंत आत्म्याने सर्वप्रथम अनुभव घेतला. अनंत 'आत्म्याचा' अगदी प्रथम अनुभव हा होता की, आत्म्याने त्याच्या स्वतःच्या अनंत संस्कारविरहित, अचेतन अवस्थेच्या अगदी विरुद्ध अनुभव घेतला.

अनंत आत्म्याच्या शाश्वत (चिरंतन) व अखंड स्थिरतेमध्ये या विरोधी स्थितीच्या अनुभवामुळे परिवर्तनशिलता आली व उत्स्फुर्तपणे तेथे एक प्रकारचा स्फोट घडून आला. या स्फोटामुळे अनंत आत्म्याची अचेतन प्रशांत अवस्था व अखंड समतोल अवस्था बिघडली (किंवा विस्कळीत झाली.) या उसळीचा किंवा प्रचंड धक्क्याचा परिणाम असा झाली की, अचेतन आत्म्याच्या अचेतनेतील प्रथम चेतनेला, परमात्म्याच्या अखंड अवस्थेपासून वरकरणी वेगळे असल्याच्या जाणीवेने भरुन टाकले. परंतु आत्मा अनंत असल्यामुळे जी

* यातून ध्वनीत होणारा भावार्थ असा की अनंताची छाया अत्यंत सीमित बिंदुतून पाझरली किंवा झिरपली.

प्रथम चेतना प्राप्त केली ती प्रत्यक्षात वेगळेपणाची होती. जो पूर्णपणे विरुद्ध व अत्यंत स्थूल असा प्रथम संस्कार होता. जी स्वाभाविकपणे आणि अनिवार्यतः सीमित पहिली चेतना होती.

ही जी प्रथम चेतना अनंत आत्म्याने प्राप्त केली ती स्पष्टपणे अत्यंत अति सीमित होती व ही चेतना आत्म्याच्या स्वतःच्या मूळ अनंत अवस्थेच्या अनुभवाच्या प्रमाणात पूर्णपणे विपरित होती.

याचा अर्थ असा की, सुरुवातीला संस्काररहित अनंत आत्म्याचे ठिकाणी जो प्रथम संस्कार आला, जो त्याला पहिल्या संस्काराच्या रुपात मिळाला तो निश्चितच स्थूल संस्कार होता व आत्म्याने जी प्रथम चेतना प्राप्त केली ती अत्यंत अती सीमित होती.

या बरोबरच त्याच क्षणी अनंत आत्म्याच्या अचेतनेला (नेणीवेला) अत्यंत स्थूल अशा पहिल्या संस्काराच्या अत्यंत अत्यंत सीमित अशा प्रथम चेतनेला प्रत्यक्षात अनुभव प्राप्त झाला.

या अनंत आणि शाश्वत आत्म्याला चेतना प्राप्त झाली. परंतु ही जाणीव संस्कारजन्य होती व ती चेतना त्याच्या शाश्वत अवस्थेची किंवा त्याच्या अनंत 'स्व' ची (स्वतःची) नव्हती परंतु ती चेतना त्याच्या अत्यंत स्थूल संस्कारामुळे झालेली अत्यंत सीमिततेची होती.

आता, जसे की, नंतर स्पष्ट करण्यात येईल, जर आत्म्याला संस्काराची जाणीव आहे तर त्याने या संस्कारांचा निश्चितच अनुभव घेतलाच पाहिजे. या संस्कारांचा अनुभव घेण्याकरिता आत्म्याच्या जाणीवेला योग्य माध्यमांद्वारा त्यांचा अनुभव घेणे आवश्यक आहे.

ज्याप्रमाणे संस्कार असतात त्याप्रमाणे त्या संस्कारांचे अनुभव असतात व त्या संस्कारांचे अनुभव घेण्यासाठी तसेच माध्यम आवश्यक असते. याचा अर्थ असा की संस्कारातून अनुभव निर्माण होतात आणि ते संस्कार अनुभवण्यासाठी उचित माध्यमाची आवश्यकता असते.

म्हणून अनंत, शाश्वत आणि निराकार आत्म्याला आता अत्यंत अत्यंत स्थूल असा पहिल्या संस्काराची अत्यंत अत्यंत सीमित प्रथम चेतना प्राप्त झाल्यामुळे, हे अगदी स्पष्ट आणि निश्चित आहे की, आत्म्याच्या या अत्यंत

अत्यंत सीमित प्रथम चेतनेने अत्यंत अत्यंत स्थूल प्रथम संस्काराचा अनुभव घेण्यासाठी अत्यंत अत्यंत सीमित आणि अत्यंत अत्यंत स्थूल प्रथम माध्यमाचा उपयोग केलाच पाहिजे.

या ठिकाणी मानवाच्या सीमित बुद्धिला आकलन होण्यासाठी एवढे सांगणे पुरेसे होईल की, आत्म्याची अगदी अत्यंत अत्यंत सीमित प्रथम चेतना, अत्यंत अत्यंत प्रथम स्थूल संस्काराचा अनुभव घेत असताना उचित अशा अत्यंत अत्यंत सीमित आणि अत्यंत अत्यंत स्थूल माध्यमात स्वतः केन्द्रित झाली आणि या निराकार आत्म्याने आपल्या स्वतःच्या अनंत शाश्वत 'स्व' ला (self) या अत्यंत अत्यंत स्थूल तसेच अत्यंत अत्यंत सीमित रुपाशी आपल्या प्रथम माध्यमाचे रुपात साहचर्य करण्यासाठी व एकरूपता प्रस्थापित करण्यासाठी अत्यंत सूक्ष्म रीतीने प्रवृत्त केले.

अविभाज्य 'आत्म्याची' प्रथम चेतना प्रथम माध्यमातून प्रथम संस्काराचा अनुभव घेताना आत्म्याला त्याच्या स्वतःच्या अनंत शाश्वत 'स्व' ला अत्यंत अत्यंत सीमित व अत्यंत स्थूल अशा प्रथम रुपाशी साहचर्य व एकरुपता साधण्याची प्रवृत्ती निर्माण करते, जे अत्यंत स्थूल व अत्यंत सीमित असलेले प्रथम शरीर विरोधी बीजाचे रुपात होते आणि प्रथम लहरीच्या तरंगाने (धक्क्याने) ज्याने स्वयंस्फुर्तीने स्वतःच आपले बीजारोपण केले ते अगदी प्रथमच व्द्वंव्दाचे रुपात सूक्ष्मरीतीने अंकुरीत व प्रकट झाले. नवीन प्राप्त केलेल्या चेतनेने, ज्यावेळेस त्याला सीमित स्थूल रुपाशी किंवा माध्यमाशी साहचर्य साधण्यास व एकरुप होण्यास प्रवृत्त केले त्यावेळेस आत्म्याच्या चेतनेने अनंत, शाश्वत, अखंड, निराकार आत्म्याला असा प्रत्यक्ष अनुभव दिला की तो स्वतःच ते सीमित स्थूल रुप आहे.

अशा प्रकारे अचेतन आत्म्याने प्राप्त केलेली चेतना परमात्म्याशी एकरुप होऊन व एकत्व साधून सत्याचा अनुभव घेण्याऐवजी व्दैतातून स्थूल रुपाशी साहचर्य व एकत्व साधून मायेचा अनुभव घेते आणि स्थूल रुपांसी साहचर्य करून त्या व्दारा वाढत जाणारे भिन्न असंख्य संस्कार संकलित करते व ती संस्कारित चेतना अनेक विविध संस्कारांच्या अनुभवामुळे हळूहळू उत्क्रांत होत जाऊन अधिकाधिक चेतना प्राप्त करुन असंख्य संस्कारांची वृद्धि करते.

आत्म्याने प्राप्त केलेली चेतना उत्क्रांतीच्या क्रमात ती कशी हळूहळू उत्क्रांत होते हे स्पष्टपणे व निश्चितपणे समजण्याकरिता आपण सचेत आत्म्याची ती अवस्था पडताळून पाहू की, जेथे त्या आत्म्याची चेतना अत्यंत सीमित व अत्यंत स्थूल माध्यम असलेल्या पाषाण रुपाशी साहचर्य करते आणि अशारीतीने आत्मा स्वतःला पाषाण म्हणून समजण्यास प्रारंभ करतो.

प्रत्यक्षात असंख्य कालचक्रात युगानुयुगात या विविध रुपांच्या प्रकारांच्या माध्यमातून विविध अनुभव प्राप्त केल्यानंतर आत्म्याची चेतना पाषाण अवस्थेत प्रविष्ट होते व त्याचा उपयोग करते परंतु या अवस्थेत येण्यापूर्वी अती सीमित व अती अती स्थूल वायुचे सात प्रमुख प्रकार आहेत. (ज्या मधून चेतना अनुभव घेते) ज्यांची सामान्य मनुष्याला निश्चितपणे कल्पना देखील करता येणार नाही व ते समजू देखील शकणार नाहीत.

केवळ सोयीसाठी आपण आत्म्याची (संस्कारित) चेतना जेव्हापासून पाषाण अवस्थेशी साहचर्य साधते व एकरुप होते, तेव्हा पासून प्रारंभ करु.

पाषाण रुपातही विविध प्रकार– उपजाती आहेत. आत्म्याच्या संस्कारांचे विविधतेनुसार एका नंतर एक या सर्व उप–जातींचा उपयोग योग्य माध्यमाचे रुपात त्या विविध व असंख्य संस्कारांचा अनुभव घेण्याकरिता करावा लागतो, जे पाषाण योनीत एकानंतर दुसरे याप्रमाणे संचित होत जातात.

जर आपण पाषाणाला अत्यंत स्थूल संस्कारांचे माध्यम मानतो तर निष्कर्ष असा निघतो की, परमात्म्याचे ठिकाणी शाश्वतरीतीने एकरुप असलेला आत्मा आता पाषाण योनीच्या माध्यमाव्दारा अती–सीमित चेतनेसह अती–स्थूल संस्कारांचा अनुभव घेतो.

अशा प्रकारे हा अनंत, अखंड, शाश्वत आत्मा (निराकार) जो शाश्वत रीतीने परमात्म्यात स्थित आहे, आपल्या अत्यंत सीमित चेतनेव्दारा अत्यंत सीमित स्थूल संस्कारांचा अनुभव घेत असताना पाषाणाच्या अगदी सर्व प्रथम उपजातीचा (अगदी प्रथम म्हणजे अगदी सर्वात प्रथम) अत्यंत सीमित स्थूल माध्यमाचा उपयोग करतो आणि याप्रकारे आत्मा जो ज्ञानेंद्रियाने समजू शकत नाही तो अंतःस्फुर्तीने स्वतःला पाषाण समजतो.

आत्म्याची अतिसीमित स्थूल चेतना अनेक युगे व कालचक्रे

लोटल्यानंतर अती स्थूल सीमित संस्कारांच्या असंख्य व विविध अनुभवातून पाषाणाच्या अगदी प्रथम उपजातीच्या माध्यमाव्दारा हळूहळू उत्क्रांत होत जाते. सरतेशेवटी अनुभवांची चरमसीमा गाठल्यानंतर आत्म्याची अगदी पहिल्या प्रकाराशी असलेली एकरुपता हळूहळू सोडल्या जाते व आत्मा पाषाणरुप सोडून देतो.

आत्म्याचे अस्तित्व आता काही काळापर्यंत माध्यमरहित राहते, परंतु उत्क्रांत झालेल्या अत्यंत सीमित चेतने बरोबर नुकताच टाकून दिलेल्या पाषाण योनीच्या सर्व प्रथम उपजातीचे अत्यंत स्थूल सीमित संस्कार राहतात.

अशा प्रकारे आत्मा आता माध्यम किंवा रुप रहित असून त्याला आता अत्यंत सीमित संस्कारांची चेतना असते. परंतु जोपर्यंत ती चेतना संस्कारात केन्द्रित झालेली असते तो पर्यंत आत्म्याला त्या संस्कारांचा अनुभव घेणे अनिवार्य असते म्हणून टाकून दिलेल्या पाषाण योनीच्या सर्वप्रथम उपजातीच्या संस्कारांचा अनुभव घेण्याकरिता, सोडून दिलेल्या पाषाण योनीच्या संस्कारात केन्द्रित झालेली आत्म्याची चेतना पाषाण योनीच्या अगदी त्यानंतरच्या दुसऱ्या उपजातीशी साहचर्य करायला सुरुवात करते. आत्मा पाषाणाच्या या उपजातीशी एकरुप होतो आणि आत्म्याची चेतना तत्पुर्विच्या पाषाण अवस्थेतील (प्रथम उपजातीच्या) संस्कारांचा अनुभव नुकत्याच प्राप्त झालेल्या नवीन अगदी दुसऱ्या उपजातीव्दारा घेऊ लागते.

जे या ठिकाणी समजून घ्यावयाचा आहे तो अत्यंत महत्वाचा मुद्दा असा आहे की, जेव्हा आत्म्याची चेतना एका रुपापासून किंवा माध्यमापासून स्वतःची एकरुपता सोडते व सोडलेल्या रुपाचे संस्कार मात्र संचित करते तेव्हा हे संस्कार दुसऱ्या उचित माध्यमासी साहचर्य साधून त्या माध्यमाव्दारा किंवा उपजातीव्दारा अनुभविले जातात. परंतु हे दुसरे माध्यम किंवा उपजात या पुर्वीच्या रुपाच्या उपजातीच्या संचित संस्कारातून नेहमी निर्माण होते व आकारास येते. आत्म्याने या शेवटच्या रुपाच्या उपजातीशी साहचर्य किंवा एकरुपता सोडलेली असली तरी आत्म्याच्या चेतनेने हे संस्कार संचित केलेले असतात.

अशा प्रकारे पाषाण योनीच्या एका मागून एक अशा विविध

उपजातीतून आत्म्याच्या चेतनेने अनुभवलेले असंख्य संस्कारांचे असंख्य व विविध अनुभव आत्म्याच्या चेतनेला जास्तीत जास्त उत्क्रांत होण्याकरिता अग्रेसर करतात.

अनुभवांची युगे व कालचक्रे लोटल्यानंतर सरतेशेवटी अशी एक अवस्था येऊन पोहोचते की, आत्म्याच्या चेतनेची प्रवृत्ती आत्म्याच्या पाषाण अवस्थेच्या अगदी अखेरच्या उपजातीशी देखील साहचर्य सोडते व जरी आत्म्याने पाषाण योनीच्या अगदी शेवटच्या उपजातीशी साहचर्य सोडलेले असते किंवा टाकून दिलेले असते तरी याप्रमाणे अत्यंत सीमित चेतना जी उत्क्रांत झालेली असते ती या टाकून दिलेल्या पाषाणाच्या अगदी शेवटच्या उपजातीच्या अत्यंत सीमित स्थूल संस्कारासोबत टिकून राहते.

कोणतेही माध्यम किंवा रुप नसलेला आत्मा आता पाषाण योनीच्या अत्यंत अंतिम उपजातीच्या अत्यंत सीमित स्थूल संस्काराबद्दल सचेत असतो. आत्म्याने हे संस्कार अनिवार्यतः अनुभविलेच पाहिजेत.

पाषाण योनीतील अगदी अंतिम उपजातीच्या संस्कारांचा आता अनुभव घेण्यासाठी आत्मा दुसऱ्या माध्यमाशी–धातूयोनीशी साहचर्य जोडतो व एकरुप होतो. हे धातू योनीचे माध्यम म्हणजे पाषाण योनीच्या अगदी शेवटच्या उपजातीच्या संस्कारांचा पिंड होय. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास, धातू योनीचा अगदीच पहिला प्रकार, पाषाण योनीच्या अगदीच अंतिम प्रकाराच्या संस्कारांनी निर्मिलेला व घडविलेला असतो.

अशा प्रकारे अनंत शाश्वत, निराकार आत्मा जो शाश्वततः परमात्म्यात स्थित आहे, तो उत्क्रांत झालेल्या चेतनेच्या माध्यमातून पाषाण योनीच्या अगदी अंतिम उपजातीच्या अत्यंत स्थूल व सीमित संस्कारांचा अनुभव घेण्याकरिता धातूयोनीच्या सर्व प्रथम उपजाती बरोबर साहचर्य करुन एकरुप होतो.

पाषाणयोनी प्रमाणे धातूयोनीचेही विविध प्रकार आहेत. आत्म्याची चेतना असंख्य व विविध गोळा केलेले संचित संस्कार अनुभवण्यासाठी धातूयोनीच्या विविध व असंख्य जातींचा माध्यम म्हणून उपयोग करते. अशा तऱ्हेने आत्म्याच्या चेतनेची उत्क्रांती विविध माध्यमांच्या अथवा विविध रुपांच्या

उपजातींच्याव्दारा विविध आणि असंख्य संस्कारांचे विविध तसेच असंख्य अनुभव घेत घेत गतिशील होते.

अशा प्रकारे आत्म्याच्या चेतनेच्या उत्क्रांतीची कालचक्रे लोटल्यानंतर सोडून दिलेल्या निम्नतर आणि निम्नतर उपजातीच्या संस्कारांचा अनुभव घेऊन खर्च करीत करीत, उच्चतर आणि उच्चतर उपजातींच्या रुपांची उत्क्रांती करीत करीत चेतना अधिकाधिक जास्त उत्क्रांत होत जाते.

आत्म्याची चेतना अत्यंत अंतिम पाषाण योनीतील उपजातीचे संस्कारांचा अनुभव अगदी पहिल्या धातूयोनीतील उपजातीच्या माध्यमाव्दारा घेऊन संपविते. जेव्हा पाषाण योनीतील अगदी अंतिम उपजातीचे सर्व संस्कार संपतात तेव्हा आत्म्याची चेतना स्वतः धातूयोनीच्या अत्यंत पहिल्या उपजातीचे साहचर्य सोडून ती उपजाती टाकून देते. परंतु आत्म्याची चेतना आता धातू योनीच्या अगदी पहिल्या उपजातीचे संस्कार राखून ठेवते.*

धातूयोनीतील हे अगदी प्रथम रुपाचे संस्कार सचेत आत्म्याकडून धातूयोनीच्या अत्यंत दुसऱ्या उपजातीशी (रुपाशी) साहचर्य करुन व एकरुप होऊन अनुभविल्या जातात. हे दुसरे रुप म्हणजे सचेत आत्म्याने त्यागलेल्या किंवा साहचर्य सोडलेल्या धातू योनीच्या अगदी प्रथम रुपाच्या संकलित संस्कारांचा पींड होय. अशा प्रकारे धातू योनीच्या विविध उपजातींची एक शृंखला निर्मिली जाते व आत्मा (किंवा अधिक स्पष्ट अर्थाने, आत्म्याची चेतना) धातूयोनीच्या प्रत्येक उपजातीशी साहचर्य करतो व सोडून देतो व अशा प्रकारे अगदी भिन्न संस्कार प्राप्त करतो व खर्च करतो.

या संस्कारांचा अनुभव घेत असतांना आत्मा एकापेक्षा एक उच्च रुपांच्या उपजातीच्या उत्क्रांतीसह चेतनेस अधिकाधिक उत्क्रांत करीत जातो. युगानुयुगे व कालचक्रे लोटल्यानंतर सरतेशेवटी आत्म्याची चेतना नुकत्याच

---

* (अत्यंत mosts हे वारंवार येणारे शब्द जसे अत्यंत प्रथम, अत्यंत नंतरचा, अत्यंत सीमित हे अनावश्यक व वाजवीपेक्षा जास्त उपयोजिले आहेत असे समजू नये. कारण एखाद्या योनीच्या प्रत्येक प्रकारच्या उदाहरणार्थ पाषाण योनीच्या असंख्य आवृत्या थोड्याफार फरकाने आहेत. त्याच योनीच्या नंतरच्या प्रकारात प्रविष्ट होताना व यातील फरक दाखविण्यासाठी हे आवश्यक आहे.

''अत्यंत शेवटचा'' याचा अर्थ नुकतीच जी योनी अनुभविली' ती, असा अर्था होतो, म्हणेज उपजातीचे सर्वोच्च व नवीन उत्क्रांत रुप व त्याला त्यानंतरच्या खालच्या दर्जाचा समजू नये– संपादक

साहचर्य व एकरुपता असलेल्या धातू योनीच्या त्याग केलेल्या उपांत्य उपजातीचा संस्कार अनुभवण्यासाठी धातूयोनीच्या अगदीच अंतिम उपजातीशी साहचर्य करते व एकरुप होते.

परमात्म्यात शाश्वतरीतीने लीन असलेला हा आत्मा जो अनंत व निराकार आहे तो आता स्वतःला धातू म्हणून समजतो.

धातू योनीच्या अगदी भिन्न उपजातीशी एकरुप होत असतानाही आत्मा पाषाण व धातूयोनीत घेतलेल्या अनुभवांप्रमाणे व अनुभवांच्या प्रमाणात एकाच वेळी स्थूल जगताचा अनुभव घेण्यास सुरुवात करतो.

विविध उपजातींची शृंखला असलेली धातूयोनी विविध उपजातींची शृंखला असलेल्या पाषाण योनी प्रमाणे जड, निर्जीव व भरीव आहे.

आत्मा किंवा अधिक खऱ्या अर्थाने आत्म्याची चेतना पाषाण योनी व धातू योनीतील उपजातींशी एकरुप होत असताना स्वतःला पाषाण किंवा धातू रुपच असल्याचे समजते व अशाप्रकारे स्वतःला जड, निर्जीव व भरीव म्हणून ओळखू लागते आणि स्थूल जगतात पाषाण व धातू योनींच्या संपूर्ण उत्क्रांतीमध्ये स्वतः जड, निर्जीव व भरीव अवस्थांचा अनुभव घेते.

चेतनेची महत्तर उत्क्रांती झाली असली तरी आत्म्याच्या जड आणि निर्जीव अवस्थेमध्ये जीवन आणि प्राणशक्ती सूप्तच असतात आणि त्यामुळे अशा जड अवस्थेत असणाऱ्या योनी आपणहून हालचाल करु शकत नाहीत. (याचा अर्थ त्यांना स्वेच्छेने हालचाल करणे शक्य होत नाही.) आणि म्हणून जीवन व प्राणशक्ती सुप्त असलेल्या जड व निर्जीववत योनीतील उपजातींशी साहचर्य करीत असताना स्थूल जगतात आत्म्याच्या चेतनेचा कल सरळ उभ्या ताठ स्थितीत राहण्याकडे नसून भूईसपाट आडव्या स्थितीत पडण्याकडे असतो.

धातूयोनीच्या विविध उपजातींच्या अगदी भिन्न व असंख्य संस्कारांचे विविध व असंख्य स्थूल अनुभव कित्येक युगे व कालचक्रे घेतल्यानंतर आत्म्याची चेतना सरते शेवटी धातूयोनीच्या अगदी अखेरच्या उपजाती पासून देखील आपले स्वतःचे साहचर्य वेगळे करते. अशा प्रकारे आत्मा अगदी अखेरच्या धातूयोनीच्या रुपाचा देखील त्याग करतो आणि नेहमीप्रमाणे पुन्हा

एकदा आत्म्याची चेतना अल्पकाळाकरिता कोणत्याही रुपाशी एकरुप राहत नाही. (अर्थात आता आत्मा कोणत्याही रुपाशिवाय आहे.)

या सचेत आत्म्याच्या अवस्थेत जेव्हा साहचर्य करण्याकरिता कोणतेही रुप नसते, तेव्हा आत्म्याची चेतना नुकत्याच त्यागलेल्या धातूयोनीतील अगदी अंतिम उपजातीच्या संस्कारातच केन्द्रित झालेली असते.

अशा प्रकारे सचेत आत्म्याला या अवस्थेत एकरुपता करण्याकरिता कोणताही देह नसल्यामुळे आत्म्याला केवळ धातू योनीच्या अगदी शेवटल्या उपजातीच्या संस्कारांची चेतना असते.

धातूयोनीच्या अगदी शेवटच्या उपजातीचे हे संस्कार सचेत आत्म्याने एखाद्या उचित माध्यमाव्दारा आत्म्याच्या चेतने करवी भोगून संपविलेच पाहिजेत. अगदी अखेरच्या धातूयोनीच्या उपजातीव्दारां प्राप्त झालेले संस्कार खर्च करण्याकरिता किंवा संपविण्याकरिता उचित माध्यम म्हणेज वनस्पती योनीची अगदी सर्वप्रथम उपजाती होय. ही वनस्पती योनीतील उपजाती म्हणजे दुसरे काहीही नसून धातूयोनीच्या अगदी अखेरच्या उपजातीच्या संकलित संस्कारांचा पिंड होय.

जेव्हा आत्म्याची चेतना आता अगदीच सर्वप्रथम वनस्पती योनीतील उपजातीशी साहचर्य करते तेव्हा अशा प्रकारे सचेत आत्मा त्या रुपाशी एकरुप होण्याकरिता प्रवृत्त होतो. आपण अनंत, शाश्वत व निराकार आहोत व शाश्वतरीतीने परमात्म्यातच आहोत ही सत्यस्थिती पूर्णपणे विसरुन आत्म्याला प्रत्यक्षात त्या वनस्पती योनीतील स्वतः उपजाती असल्याचे भान प्राप्त होते.

वनस्पती योनीच्या अगदी सर्वप्रथम उपजातीच्या अवस्थेत आत्म्याची चेतना स्थूल जगताचा अनुक्रमे पाषाणयोनी, धातूयोनी व वनस्पती योनीच्या अनुभवलेल्या व अनुभूती असणाऱ्या संस्कारानुरुप अनुभव घेते.

अशा प्रकारे स्थूल जगताचा अनुभव घेत असतांना, वनस्पती योनीशी साहचर्य साधलेली आत्म्याची ही चेतना आता वनस्पती रुप असल्याचे व तिला अर्धे जडरुप व अर्धे सजीव गुणधर्म असल्याचा अनुभव घेते. सचेत आत्मा स्थूल जगात आता वनस्पती योनी व्दारा सरळ उभी स्थिती प्रतिपादित करतो. ही वनस्पती जरी स्वतंत्ररीतीने स्वतःहून उभी राहू शकत नसली तरी ती स्वतःची

अशी स्थिती प्रतिपादीत करण्यासाठी अन्य माध्यमांच्या आधाराचा उपयोग करते तथापि हे वनस्पती रुप देखील आत्म्याच्या चेतनेला ऐच्छिक हालचाल करण्याचा अनुभव देण्यास असमर्थ असते.

धातूयोनीतील अगदी अंतिम उपजातीचे सर्व संस्कार वनस्पती योनीतील अगदी सर्वप्रथम उपजातीव्दारां आत्म्याच्या चेतनेने भोगून खर्च केल्या नंतर आत्म्याची चेतना वनस्पती योनीच्या अगदी पहिल्या उपजातीचा त्याग करते. (याचा अर्थ आत्म्याची चेतना वनस्पती योनीच्या अगदी सर्वप्रथम उपजातीशी असेलली एकरुपता सोडते.)

आता पुन्हा एकदा उत्क्रांत चेतना असली तरी, सचेत आत्मा रुपविरहीत असल्याचा अनुभव घेतो. आत्म्याची ही उत्क्रांत झालेली चेतना नुकत्याच टाकून दिलेल्या किंवा साहचर्य सोडलेल्या वनस्पती योनीच्या अगदी पहिल्या रुपाच्या संस्कारात केन्द्रीत झालेली असते.

आता कोणत्याही रुपात नसलेली आत्म्याची चेतना, वनस्पती योनीच्या अगदी पहिल्या उपजातीचे हे संस्कार अनुभविण्यासाठी उचित माध्यमाचा उपयोग करते, जी वनस्पती योनीच्या अगदी त्यानंतरचीच दुसरी उपजाती असते, ही त्यानंतरची वनस्पती योनीची दुसरी उपजाती अन्य काही नसून वनस्पती योनीच्या अगदी पहिल्या उपजातीच्या संकलित संस्कारांपासून तयार झालेला पींड असते.

वनस्पतीयोनीच्या अगदी दुसऱ्या उपजातीच्या माध्यमाव्दारा आत्म्याची चेतना वनस्पती योनीच्या नुकत्याच टाकून दिलेल्या शेवटच्या उपजातीचे संस्कार स्थूल जगात अनुभवू लागते. जेव्हा हे संपूर्ण संस्कार विविध अनुभवांव्दारा पूर्णपणे भोगून खर्च केले जातात तेव्हा आत्म्याची चेतना वनस्पती योनीच्या या दुसऱ्या उपजातीपासून मुक्त होते आणि पुन्हा तो आत्मा स्थूलरुप विरहीत असल्याचा अनुभव घेतो आणि शेवटी त्यागलेल्या उपजातीच्या रुपाच्या फक्त संस्कारात त्याची चेतना केन्द्रित होते. नंतर हे संस्कार अनुभवण्यासाठी आत्म्याची चेतना आत्म्यास वनस्पती योनीच्या त्यानंतरच्या उपजातीशी एकरुप होण्यास भाग पाडते. एका शरीरातून दुसऱ्या शरीरात ही संस्कारांच्या अनुभवांची व योनींच्या उपजातींची ही शृंखला अशा रीतीने तयार होते की, वरवर पाहता

तिला अंतच नाही असे दिसते आणि आत्म्याच्या चेतनेस पूर्णपणे स्वतः उत्क्रांत होण्याकरिता या दुष्टचक्रात अडकण्यावाचून दुसरा मार्ग उरत नाही.

या प्रकारे प्राप्त झेलेली आत्म्याची चेतना आत्म्याला जोपर्यंत निश्चितपणे हा अनुभव देत नाही की आत्मा अनंत, शाश्वत परमात्म्यात – शाश्वतपणे स्थित आहे आणि आत्म्याला तो अनंत शक्ती, ज्ञान व आनंदाचा अनुभव देत नाही तो पर्यंत हे कार्य चालते.

सर्वात महत्वाचा मुद्दा जो काळजीपूर्वक लक्षात ठेवला पाहिजे तो हा आहे की, आत्म्याच्या चेतनेच्या उत्क्रांतीचे चक्र जसजसे पुढे पुढे सरकत जाते व पुढील व महत्तर संस्कारांच्या अनुभवातून पुढील व महत्तर चेतना उत्क्रांत होत जाते तसतशी चेतनेची ही उत्क्रांती अजाणतेपणी श्रेष्ठतर व श्रेष्ठतर उपजातींची शृंखला उत्क्रांत करते आणि असे करीत असतानाच साहचर्य जोडलेल्या किंवा त्यागलेल्या किंवा टाकून दिलेल्या निम्न आणि निम्न उपजातीचे संस्कार जिरवित किंवा खर्च करीत जाते.

अशा प्रकारे एका विशिष्ट योनींच्या रुपांची जसे पाषाण योनी, धातू योनी, वनस्पतीयोनी किंवा इतर दुसऱ्या योनींच्या उपजातीच्या शृंखलेतील सुरुवातीची व शेवटची या मधील अंतर, जे एका विशिष्ट प्रकारच्या योनीची निम्नतम अथवा प्रारंभिक अगदी प्रथम उपजातीने सुरुवात होते व त्या विशिष्ट प्रकारच्या योनीच्या सर्वोत्तम किंवा सर्वोत्कृष्ट अगदी अंतिम उपजातीने समाप्त होते (ते अंतर) क्रमशः उत्तरोत्तर उच्चतर प्रकारच्या अशा रुपांच्या उत्क्रांतीव्दारा भरल्या जाते की, जी रुपें अपेक्षित संस्काराकरिता उपयुक्त होतात व आत्म्याच्या चेतनेला उत्तरोत्तर उच्चतर चेतना प्राप्त करण्याकरिता सहाय्यक होतात. थोडक्यात, एखाद्या विशिष्ट योनीच्या अगदी प्रथम व अगदी अंतिम उपजातींच्यामध्ये उत्क्रांत होणाऱ्या आत्म्याच्या चेतनेच्या आवश्यकतेला अनुरुप उत्क्रांत झालेल्या या विशिष्ट योनीच्या रुपांच्या विभिन्न उपजाती असतात.

आता आपण आपल्या मुद्यावर येऊ. आत्म्याची चेतना जेव्हा वनस्पती योनीच्या अगदी शेवटल्या उपजातीशी साहचर्य, साधते तेव्हा सचेत आत्मा वनस्पती योनीच्या या अगदी अंतीम उपजातीशी एकरुप होतो व नुकत्याच

अगदी शेवटी त्यागलेल्या वनस्पती योनीच्या उपान्त्य उपजातीच्या संस्कारांचा अनुभव घेतो.

वनस्पती योनीच्या अगदी उपान्त्य उपजातीचे संस्कार जेव्हा संपविले जातात तेव्हा सचेत आत्मा वनस्पती योनीच्या अगदी शेवटच्या उपजातीशी थोडाही वेळ एकरुप राहत नाही कारण आत्म्याच्या चेतनेने वनस्पती योनीच्या अगदी अखेरच्या उपजातीशी साहचर्य त्यागलेले असते. स्थूल जगातील भूमिवरील व पाण्यातील संपूर्ण वनस्पती योनीच्या युगानुयुगे व अनेक कालचक्रे अनुभव घेतल्यानंतर या वनस्पती योनीच्या अगदी अखेरच्या उपजातीचा देखील अगदी शेवटी सचेत आत्मा त्याग करतो.

सचेत आत्म्याने जरी वनस्पती योनीची अगदी शेवटची उपजाती त्यागलेली असते व आत्मा आता कोणत्याही रुपाविरहित अवस्थेत असला तरी उत्क्रांत झालेली चेतना तेथे असतेच व या चेतनेमुळे आत्मा (रुपविरहीत) वनस्पतीयोनीच्या अगदी शेवटच्या नुकत्याच त्यागलेल्या उपजातीच्या संस्काराविषयी सचेत असतो.

हे संस्कार निश्चितपणे खर्च करणे किंवा संपविणे आवश्यक असते. ह्या संस्कारांचा अनुभव घेण्यासाठी आत्म्याची चेतना आता उचित माध्यमाशी साहचर्य करते व वनस्पती योनीच्या अगदी शेवटल्या उपजातीच्या ह्या संस्कारांचा अनुभव घेते. यामुळे आत्म्याची चेतना कृमीयोनीच्या अगदी पहिल्या उपजातीशी एकरुप होण्यासाठी अशाप्रकारे आत्म्याला प्रवृत्त करते. हे लक्षात ठेवले पाहिजे की ही कृमीयोनीची अगदी प्रथम उपजाती ही अन्य काही नसून वनस्पती योनीच्या अगदी शेवटच्या उपजातीच्या संस्कारांचा संकलित (देह) पींड असतो.

जेव्हा सचेत आत्मा कृमीयोनीच्या अगदी पहिल्या उपजातीशी एकरुप होतो तेव्हा आत्म्याला तो प्रत्यक्षात स्वतः कृमी असल्याचा अनुभव येतो व तो कृमीसचेत होतो.

आतापर्यंत चेतनेची एवढी उत्क्रांती झाली असली तरी अजुनही आत्म्याला आपल्या सत्य, मूळ, अनंत, शाश्वत स्वरुपाची व शाश्वतरीतीने परमात्म्यात निहित असलेल्या अवस्थेची चेतना नाही. आत्मा जरी

शाश्वतरीतीने परमात्म्यात निहित असला तरी व अनंत निराकार असला तरी हा अंशतः सचेतन आत्मा आपण स्वतः स्थूल जगतात एक कृमी असल्याचा प्रत्यक्षात अनुभव घेतो. हे आहे अज्ञान. जो पर्यंत आत्म्याची चेतना पूर्णपणे उत्क्रांत होत नाही तो पर्यंत हे अज्ञान टिकून राहते. आत्म्याने संपूर्ण चेतना प्राप्त केली तरीपण असे म्हटले जाते की तो अज्ञानाने आच्छादलेला आहे. कारण ही संपूर्ण उत्क्रांत झालेली चेतना आत्म्याला त्वरित आत्मसाक्षात्कार घडवित नाही. उलटपक्षी जेव्हा आत्म्याची चेतना पूर्णपणे उत्क्रांत होते तेव्हा आत्मा स्वतःला एक मानव म्हणून समजण्यास प्रारंभ करतो.

आत्म्याची चेतना कृमीयोनीच्या अगदी पहिल्या उपजातीशी साहचर्य साधत असताना वनस्पतीयोनीच्या अगदी शेवटच्या उपजातीच्या संस्कारांचा अनुभव घेवून त्यांना खर्च करीत असते. जेव्हा वनस्पतीयोनीच्या सर्वात शेवटच्या उपजातीचे सर्व संस्कार जे आत्म्याने कृमीयोनीच्या अगदी प्रथम उपजातीशी एकरुप होऊन विविध अनुभवाव्दारां खर्च केलेले असतात व जेव्हा ते पूर्णपणे खर्च होतात किंवा संपतात तेव्हा कृमीयोनीची ही सर्वप्रथम उपजाती त्यागली जाते किंवा तिच्याशी साहचर्य सोडले जाते व आत्म्याला जरी कृमीयोनीच्या सर्वप्रथम उपजातीच्या संस्कारांची चेतना असली तरी तो पुन्हा एकदा शरीररहित होतो.

कृमीयोनीच्या अगदी पहिल्या उपजातीचे हे संस्कार अनुभवने व भोगून संपविणे अनिवार्य असते म्हणून आत्म्याची चेतना दुसऱ्या उचित माध्यमाशी साहचर्य साधते व आत्म्याला कृमीयोनीच्या त्यानंतरच्या अगदी पूढल्या उपजातीशी एकरुप होण्यासाठी प्रवृत्त करते. हे कृमीयोनीच्या पुढल्या उपजातीचे माध्यम दुसरे काही नसून केवळ कृमीयोनीच्या अगदी प्रथम उपजातीच्या संकलित संस्कारांचा पींड होय.

कृमीयोनीच्या एकामागून एक उपजाती अशाप्रकारे आकाराला येतात व त्यागल्या जातात. दरम्यान आत्म्याची चेतना कृमीरुपाच्या विविध उपजातींच्या माध्यमांव्दारा घेतलेल्या विविध संस्कारांच्या अनुभवातून तीव्रगतीने उत्क्रांत होते.

सचेतन आत्मा जेव्हा कृमीचेतन होतो व स्थूल जगात एक कृमी म्हणून

स्वतः अनुभव घेतो, तेव्हा त्याचे चेतनेला देखील अगदी पहिल्या वेळी ऐच्छिक चलनाची (voluntary movement) अनुभूती होते आणि आत्मा एक सजीव प्राणी असल्याचा अनुभव देखील घेतो. हा कृमीचेतन आत्मा अधिकाधिक महत्तर चेतना प्राप्त करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या भयंकर यातनांचे व्दारा स्थूल जगतात स्वतः पाठीचा कणा नसलेला प्राणी म्हणून अनुभव घेतो व कालांतराने अन्य अवस्थांमध्ये अवयव नसलेला, सरपटणारा – विविध उपजातींचा पृष्ठवंश प्राणी (vertibrate) म्हणून अनुभव घेतो. आत्म्याची चेतना कृमीयोनीच्या विविध उपजातीत ऐच्छिक चलनाच्या अधिक विविध अनुभवातून पार पडते. आत्म्याची चेतना ऐच्छिक चलनाच्या हालचालीतून कधी सरपटण्याच्या प्रक्रियेतून कधी दोन पायांनी, कधी पायांच्या अनेक जोड्यांनी तर कधी पायांच्या जोडीने व पंखांच्या जोडीने पुढे पुढे सरपटत जाण्याचा अनुभव घेते. कधी कधी कृमीचेतन आत्मा कृमीयोनीच्या विविध उपजातीत स्वतःला कधी केसाळ त्वचा असलेला प्राणी तर कधी गुळगुळीत, कधी मखमली, कधी खडबडीत किंवा खवल्यासारखी (कातडी) त्वचा असलेला स्वतःला समजतो. कृमीचेतन आत्म्याला निर्वाहासाठी व जगण्यासाठी सुद्धा अधिक तिव्रतेने संघर्ष करावा लागतो, ह्याचा देखील तो प्रखरतेने अनुभव घेतो. त्याला संवेदना व सजीवता असल्याची निसर्गदत्त देणगी असते.

कृमीचेतनेने युक्त असा हा आत्मा, कृमीयोनीच्या विविध उपजातींच्या विविध व असंख्य संस्कारांच्या महत्तर व असंख्य अनुभवातून चेतनेच्या पुढील उत्क्रांतीसह अनुभव घेऊन जाणीव प्राप्त करतो की, तो जल आणि स्थल ह्या दोन्ही ठिकाणी राहणारा प्राणी आहे. त्याला केवळ धरणीवरच ऐच्छिक चलन नसून, त्याला पाण्यात देखील जलविहार करण्याचे स्वातंत्र्य आहे.

चेतनेची उत्क्रांती अधिक स्पष्टपणे समजून घेण्याचे दृष्टीने आपल्या सोयीसाठी आपण कृमीयोनीमध्ये कृमीयोनीच्या विविध उपजाती, किटकांच्या विविध उपजाती, सरपटणाऱ्या प्राण्यांच्या विविध उपजाती व जलस्थल–प्राण्यांच्या विविध उपजातींचा समावेश करतो. थोडक्यात आपण कृमीयोनीमध्ये त्यांचा समावेश करतो की, ज्या जाती–उपजातींची प्रवृत्ती सरपटण्याची आहे किंवा ज्यांना अवयव (Limbs) पाय व पंख असूनही त्यांची सरपटण्याची

प्रवृत्ती आहे व जे पक्षी व चतुष्पाद प्राण्यापेक्षा अन्यथा एकदम भिन्न आहेत.

पाषाण आणि धातूयोनीमध्ये सरळ, लंब किंवा उभी राहण्याची अवस्था नव्हती. त्या योनीत भुईसपाट पडून राहण्याची अवस्था होती. त्यांच्या रुपाची ठेवण सपाट व भुपृष्ठाला समांतर होती. वनस्पतीयोनीची अवस्था सरळ व उभी होती. परंतु आता कृमीयोनी पुन्हा आडव्या योनी प्रकारची आहे जिला सरळ किंवा उभी स्थिती नसून जिचा कल पालथी होण्याकडे असतो.

कृमीयोनीच्या विविध उपजातींच्या सर्व संस्कारांचा अनुभव घेतल्यानंतर आत्म्याची चेतना कृमीयोनीच्या अगदी शेवटच्या उपजातीशी साहचर्य करते व जेव्हा सचेत आत्मा अनेक विविध अनुभवांची युगे व कालचक्रे लोटल्यानंतर स्थूल जगातील कृमीयोनीच्या अगदी शेवटच्या उपजातीचा त्याग करतो किंवा सोडतो, तेव्हा सचेत आत्मा पुन्हा योनी विरहित असल्याचा किंवा योनीशी साहचर्य नसलेल्या स्थितीचा असल्याचे स्वतःला पाहतो. परंतु आत्म्याची चेतना आता नुकत्याच त्यागलेल्या कृमीयोनीच्या अगदी शेवटच्या उपजातीच्या संस्कारात केन्द्रित झालेली असते. हे संस्कार अनुभवाव्दारां भोगून संपविणे अगदी अनिर्वार्य असते आणि हा अनुभव मिळविण्यासाठी उचित माध्यम आवश्यक असते.

म्हणून आत्म्याची चेतना, जी कृमीयोनीच्या अगदी शेवटच्या उपजातीच्या संस्कारात केन्द्रीत झालेली असल्यामुळे उचित माध्यमाशी साहचर्य करते आणि आत्म्याला कृमीयोनीच्या अगदी शेवटच्या उपजातीच्या संस्कारांचा अनुभव घेऊन संपविण्यासाठी, मत्स्ययोनीच्या अगदी पहिल्या उपजातीशी एकरुप होण्यास भाग पाडते. ही मत्स्ययोनीची अगदी पहिली उपजाती म्हणजे दुसरे काहीही नसून, कृमीयोनीच्या अगदी शेवटच्या उपजातीच्या संकलित संस्कारांचा पिंड होय.

कृमीयोनीच्या अगदी शेवटच्या उपजातीचे संस्कार अनुभवांव्दारा संपविल्या बरोबर मत्स्ययोनीची अगदी पहिली उपजाती सोडली किंवा टाकली जाते कारण आत्म्याची चेतना ह्या अगदी पहिल्या उपजातीशी संबंध तोडते व सचेत आत्मा त्या उपजातीशी तद्नंतर एकरुप होत नाही.

सचेत आत्मा आता पुन्हा एकदा जरी तात्पुरता रुपविरहित असतो

तरीही आत्म्याची चेतना अगदी प्रथम मत्स्ययोनीच्या अगदी प्रथम उपजातीच्या संस्कारात संचित झालेली असते.

मत्स्ययोनीच्या अगदी पहिल्या उपजातीच्या संस्कारांचा अनुभव घेण्यासाठी आत्म्याची चेतना उचित माध्यमाशी साहचर्य करते व सचेत आत्म्याला मत्स्ययोनीच्या अगदी पुढल्या उपजातीशी एकरुप होण्यास प्रवृत्त करते. ही उपजाती म्हणजे अन्य काही नसून मत्स्ययोनीच्या अगदी प्रथम उपजातीच्या संकलित संस्कारांचा पींड असते.

अनेक युगानंतर व कालचक्रानंतर मत्स्ययोनीच्या विविध उपजातीचे असंख्य विविध संस्कार अनुभविल्या नंतर व भोगून संपविल्यानंतर आत्म्याची चेतना शेवटी मत्स्ययोनीच्या अगदी उपान्त्य उपजातीचे संस्कार अनुभवून व भोगून संपविण्यासाठी मत्स्ययोनीच्या अगदी अंतिम उपजातीशी साहचर्य करते. अशाप्रकारे मत्स्याची चेतना असणारा आत्मा मत्स्ययोनीच्या विविध रुपांसी (उपजातींशी) एकरुप होत, स्थूल जगतात अनुभव घेतो की, तो सजीव जलचर प्राणी आहे. तसेच तो एक पाठीचा कणा असलेला, सजीव संवेदनशील ऐच्छिक चलनशिलतेची देणगी असलेला प्राणी असून अवयव असलेला (काही असल्यास) किंवा ज्यांचे कल्ल्यात रुपांतर झाले आहे असा सजीव प्राणी आहे, ज्याला निर्वाहासाठी व जगण्यासाठी संघर्ष करावा लागतो. मत्स्याची चेतना असणारा आत्मा सरळ उभ्या स्थितीत अनुभव घेत नाही, आपले डोके ताठपणे, कधीही उंचाऊ शकत नाही आणि सरळ लंब रुपात स्थित होऊ शकत नाही व स्थूल जगात सरळ उभी स्थिती प्राप्त करु शकत नाही.

आत्म्याच्या चेतनेने मत्स्ययोनीच्या अगदी उपान्त्य उपजातीचे सर्व संस्कार अनुभविल्यानंतर व भोगून संपविल्यानंतर त्वरीत मत्स्यचेतन आत्मा शेवटी मत्स्ययोनीच्या अगदी शेवटल्या उपजातीशी संबंध तोडतो व एकरुपता सोडतो. याप्रमाणे सचेतन आत्मा पुन्हा एकदा स्वतःला कोणत्याही रुपासी एकरुपता नसल्याचे अनुभवतो, परंतु आत्म्याच्या चेतनेला मत्स्ययोनीच्या अगदी शेवटल्या उपजातीच्या संस्कारांचे भान असते.

मत्स्ययोनीच्या अगदी शेवटच्या उपजातीचे हे संस्कार अनुभविणे व भोगून संपविणे अनिवार्य असते आणि म्हणून आत्म्याची चेतना आता दुसऱ्या

उचित माध्यमाशी साहचर्य करते व अशाप्रकारे आत्म्याला पक्षीयोनीच्या अगदी पहिल्या उपजातीशी एकरुप होण्यास भाग पाडते. जी पक्षीयोनी, मत्स्ययोनीच्या अगदी शेवटच्या उपजातीच्या संकलित संस्काराचा केवळ एक पींड असते.

पक्षी योनीच्या अगदी पहिल्या उपजातीत आत्म्याची चेतना मत्स्ययोनीच्या अगदी शेवटच्या उपजातीचे संस्कारांचा अनुभव घेऊन, त्यांना भोगून संपविते.

अशाप्रकारे जेव्हा सर्व संस्कार भोगून संपविले जातात तेव्हा आत्म्याची चेतना पक्षीयोनीच्या अगदी पहिल्या उपजातीपासून आपले साहचर्य सोडते आणि सचेत आत्मा पक्षीयोनीच्या अगदी पहिल्या उपजातीशी असलेले स्वतःचे एकरुपत्व सोडतो किंवा त्यागतो (म्हणजे पक्षीयोनीची अगदी पहिली उपजाती टाकून दिल्या जाते.)

सचेत आत्मा पुन्हा एकदा योनी विरहित असतो, परंतु त्याची चेतना अगदी नुकत्याच टाकून दिलेल्या पक्षीयोनीच्या अगदी पहिल्या उपजातीच्या संस्कारात केन्द्रित झालेली असते.

हे संस्कार अनुभवणे व भोगून संपविणे अनिवार्य असते आणि म्हणून आत्म्याची चेतना आपोआपच पक्षीयोनीच्या अगदी नंतरच्या दुसऱ्या उपजातीशी साहचर्य करते आणि सचेत आत्म्याला पक्षीयोनीच्या त्यानंतरच्या दुसऱ्या उपजातीशी  एकरुप होण्यास भाग पाडते. ही दुसरी उपजाती पक्षीयोनीच्या अगदी पहिल्या उपजातीच्या संस्कारांचा केवळ एक संकलित पींड असते.

पुढे पुढे युगानंतर युगे व कालचक्रानंतर काल चक्रे लोटल्यानंतर विशिष्ट योनीच्या विशिष्ट विविध उपजातीशी असणाऱ्या साहचर्याची व असाहचर्याची शृंखला संथपणे व प्रगमनशिलपणे पुढे पुढे सरकत जाते व सचेत आत्म्याला अनुभव घेण्यासाठी असंख्य विविध संस्कार देत जाते. प्रत्यक्षपणे व अप्रत्यक्षपणे आत्म्याच्या चेतनेचे हे साहचर्ये व असाहचर्ये करणे, हे चेतनेच्या उत्क्रांतीचे चक्र फिरते ठेवण्यासाठी निश्चितच आवश्यक असते. चेतनेच्या उत्क्रांतीच्या विश्वात्मक कारखाण्यातील स्थूल योनीची (रुपांची) उत्क्रांती ही अवांतर निर्मिती आहे.

पक्षी चेतन आत्मा पक्षीयोनीच्या एका उपजातीशी त्यानंतरच्या दुसऱ्या

उपजातीशी आणि त्यानंतर पुन्हा त्यापुढील दुसऱ्या उपजातीशी अशा प्रकारे एका मागून एक क्रमशः नियमितपणे एकरुप होत जातो. ही प्रक्रिया तोपर्यंत सुरु राहते की जो पर्यंत आत्मा पक्षीयोनीच्या सर्व उपजातींशी साहचर्य पावतो व त्या रुपांना सोडतो व स्थूल जगात बहुविध संस्कार आत्म्याच्या चेतनेकडून अनुभवली जात नाहीत आणि अशाप्रकारे सचेत आत्म्याची उत्क्रांत पावलेली चेतना आत्म्यास पक्षीयोनीच्या प्रत्येक रुपाशी (उपजातीशी) पक्षी म्हणून प्रत्यक्षपणे अनुभव घेण्यास भाग पाडते. आत्मा जरी शाश्वतरीतीने निराकार असला व परमात्म्यात स्थित असला तरी पक्षी चेतन आत्मा सुसंगतपणे स्वतःला ओळखतो की तो अन्य काही नसून स्थूल जगतातील धरणीवरील, पाण्यावरील व हवेतील पक्ष्यांच्या संस्कारांचे अनुभव घेत असताना एक पक्षी आहे. तो पंख असलेला, पाठीचा कणा असलेला, हवेत उडण्याची क्षमता असलेला व दोन पायांच्या आधाराने अगदी सरळपणे उभ्या स्थितीत राहण्याची क्षमता असणारा पक्षी म्हणून जाणीव प्राप्त करतो.

अगदी शेवटी पक्षी योनीच्या विविध उपजातीच्या अनुभवांची युगानुयुगे कालचक्रे लोटल्यानंतर, पक्षी चेतन आत्मा अगदी शेवटच्या उपजातीला सोडतो किंवा टाकतो. आत्म्याच्या चेतनेने पक्षीयोनीच्या अगदी शेवटच्या उपजातीचे साहचर्य सोडताक्षणीच पक्षीयोनीची अगदी शेवटची उपजाती सोडल्या किंवा टाकल्या जाते. पक्षीयोनीच्या अगदी शेवटल्या उपजातीत असताना चेतनेने अगदी उपान्त्य उपाजातीचे सर्व संस्कार अनुभवल्यानंतर व पूर्णपणे भोगून संपविल्यानंतर आत्म्याची चेतना स्वतः पक्षीयोनीच्या अगदी शेवटच्या उपजातीपासून साहचर्य सोडते.

पुन्हा सचेत आत्मा काही वेळेपुरता स्वतःला कोणत्याही योनीविना अस्तित्व असल्याचे अनुभवित असला तरी जास्त व महत्तर उत्क्रांत झालेली चेतना नेहमी तेथे असतेच (आत्म्याने एकवेळ चेतना प्राप्त केल्यानंतर, ती चेतना अधिकाधिक उत्क्रांत होत जाते व ती कधीच नष्ट होत नाही किंवा तिची अधोगती होत नाही.) योनीविना असलेल्या आत्म्याची ही चेतना आता नुकत्याच टाकलेल्या पक्षीयोनीच्या अगदी शेवटच्या उपजातीच्या संस्कारात केन्द्रित होते. आत्म्याच्या चेतनेने हे संस्कार खर्च करणे किंवा भोगून संपविणे

अनिवार्य असते म्हणून चेतना स्वतः उचित माध्यमाशी साहचर्य करते आणि अशा प्रकारे सचेत आत्म्याला प्राणीयोनीच्या अगदी प्रथम उपजातीशी एकरुप होण्यास भाग पाडते. आत्म्याची चेतना प्राणी योनीच्या अगदी प्रथम उपजातीव्दारा नुकत्याच टाकलेल्या व साहचर्य सोडलेल्या पक्षीयोनीतील सर्वात शेवटच्या उपजातीचे संस्कारांचा अनुभव घेते. हा प्राणी योनीतील अगदी प्रथम उपजातीचा प्रकार म्हणजे अन्य काही नसून नुकत्याच टाकून दिलेल्या पक्षीयोनीच्या अगदी शेवटल्या उपजातीच्या संस्कारांचा दृढपींड असतो.

पक्षीयोनीच्या अगदी शेवटच्या उपजातीचे असंख्य व विविध संस्कारांचे अनुभव प्राणी योनीच्या अगदी प्रथम उपजातीव्दारां अनुभविल्यानंतर आत्म्याची चेतना पक्षीयोनीच्या अगदी शेवटच्या उपजातीचे संस्कार पूर्णपणे भोगून संपविते आणि नंतर आपोआपच प्राणीयोनीच्या अगदी पहिल्या उपजातीशी असलेल्या एकरुपते पासून साहचर्य अलग करते. अशा तऱ्हेने योनीची उपजाती सचेत आत्मा सोडून देतो किंवा त्या योनीची उपजाती सोडली किंवा मृत्यूपावली असे म्हटले जाते.

सचेत आत्मा पुन्हा अधिकतर उत्क्रांत चेतनेसह स्वतःला रुपविरहित असल्याचे अनुभवतो, जरी त्या आत्म्याची चेतना नुकत्याच टाकून दिलेल्या किंवा साहचर्य सोडलेल्या प्राणी कोटीच्या अगदी पहिल्या उपजातीच्या रुपाचे संस्कारात केन्द्रित झालेली असते.

प्राणी योनीच्या अगदी पहिल्या उपजातीचे (नकुत्याच सोडलेल्या) संस्कार आत्म्याच्या चेतनेने अनुभवून संपविलेच पाहिजेत, जेणेकरुन सचेत आत्म्याला कोणत्याच रुपाच्या संस्काराची चेतना असता कामा नये. परंतु त्याला रुपविरहित व संस्कारविरहित असलेल्या स्वतःच्या अनंत शाश्वत अवस्थेच्या सत्यतेची जाणीव असली पाहिजे व ज्ञानयुक्त परमात्म्याचा अनुभव असलाच पाहिजे. संपूर्ण संघर्षमय काळात आत्मा आपल्याकरिता ती चेतना उपलब्ध करण्यासाठी जी त्याला त्याच्या 'स्व' च्या सत्यतेची अनुभूती करुन देईल याकरिता सचेत आत्मा त्या सर्व संस्कारांचा अनुभव करणे व त्यांना नष्ट करण्याच्या निरंतर प्रयत्नशील चेतनेबरोबर वरंपागी एका अविरत शृंखलेत (आत्मा) पुढे पुढे सरकत जातो, जे (संस्कार) या चेतनेला ''स्व'' च्या (जो

शाश्वतरित्या परमात्म्यात आहे.) सत्य अवस्थेपासून दूर स्थूल जगताच्या माया–प्रपंचाच्या व्दैताकडे आकृष्ट करीत असताना, आत्म्याच्या चेतनेला बांधून ठेवतात. अशा प्रकारे आत्म्याची चेतना ''स्व'' च्या यथार्थतेची चेतना प्राप्त करुन घेण्याच्या प्रयत्नात सुसंगतपणे अज्ञानाच्या आवरणात झाकली जाते.

आत्म्याच्या चेतनेने प्राणीयोनीच्या अगदी पहिल्या उपजातीचे संस्कार अनुभवून खर्च करावेत म्हणून आत्म्याची चेतना आता आपोआपच उचित माध्यमाशी साहचर्य करते, जे माध्यम प्राणीयोनीच्या अगदी प्रथम उपजातीच्या संस्कारांचा अनुभव घेण्यासाठी मदत करील व अनुमती देईल. आत्म्याच्या चेतनेचे हे साहचर्य सक्तीने सचेत आत्म्याला प्राणीयोनीच्या अगदी त्यानंतरच्या दुसऱ्या उपजातीशी एकरुप होण्यास भाग पाडते. ही प्राणीयोनीची अगदी दुसरी उपजाती अन्य काही नसून, प्राणीयोनीच्या अगदी पहिल्या उपजातीच्या संस्कारांचा दृढपींड होय.

प्राणी योनीच्या अगदी दुसऱ्या उपजातीच्या माध्यमातून संस्कारांचा अनुभव घेऊन भोगून संपविल्याबरोबर ही उपजाती सचेत आत्मा टाकून देतो. आत्मा पुन्हा एकदा अनुभवतो की त्याचे स्थूल जगातील कोणत्याही स्थूल रुपाशी (योनीशी) तादात्म्य नाही.

जेव्हा प्राणीचेतन आत्मा रुप विरहित असतो तेव्हा आत्म्याची चेतना नुकत्याच टाकलेल्या किंवा सोडलेल्या प्राणीयोनीच्या या अगदीच दुसऱ्या उपजातीच्या संस्कारांत केन्द्रित झालेली असते.

हे संस्कार भोगून संपविण्याचे दृष्टिने अनुभवावेच लागतात व म्हणून आत्म्याची चेतना अन्य माध्यमाशी आपोआपच साहचर्य प्रस्थापित करते व सक्तीने सचेत आत्म्याला प्राणीयोनीच्या अगदी या नंतरच्या पुढच्या उपजातीशी एकरुप होण्यास भाग पाडते.

प्राणी योनीच्या निरनिराळ्या उपजातींशी विविध व असंख्य साहचर्य जोडण्याची व तोडण्याची युगानुयुगे व कालचक्रे लोटल्यानंतर आत्म्याची चेतना सरते शेवटी त्या माध्यमाशी साहचर्य जोडते जे सचेत आत्म्याला प्राणी योनीच्या अगदी शेवटल्या उपजातीच्या अगदी अखेरच्या रुपासी एकरुप होण्यास भाग पाडते.

प्राणीचेतन आत्म्याच्या या सर्व अनुभवातून (आपल्या चेतनेच्या माध्यमातून) आत्म्याने स्थूल जगतातील पाण्यातील, धरणीवरील, धरणीच्या पृष्ठभागा खालील, प्राण्यांच्या विविध उपजातींशी स्वतःची एकरुपता केलेली असते आणि त्याला जाणीव व अनुभव येतो की तो सजीव प्राणी म्हणून, ज्याला सजीवता, संवेदनशीलता व ऐच्छिक चलनाची देणगी असलेला इंद्रिय संपन्न, सहसा चतुष्पाद प्राणी आहे. कधी शाकाहारी प्राणी म्हणून तर कधी मांसाहारी प्राणी म्हणून त्याला निर्वाहासाठी व जगण्यासाठी सतत संघर्ष करावा लागतो. प्राणीयोनीला सरळलंब किंवा उभी शरीर रचना नाही व त्यांची प्रवृत्ती मान खाली वाकलेली ठेवून खाली पाहण्याकडे असते. तथापि एप्स माकडं हे सर्वात जास्त उत्क्रांत प्रकारातील प्राणी आहेत. ते मानवाप्रमाणे सरळ उभे राहण्याकरिता प्रवृत्त होतात.

सरतेशेवटी युगानुयुगे व कालचक्रे लोटल्यानंतर आत्म्याची चेतना प्राणीयोनीच्या अगदी शेवटच्या उपजातीच्या माध्यमातून प्राणीयोनीच्या अगदी शेवटच्या उपांत्य उपजातीचे सर्व संस्कार जेव्हा अनुभवून खर्च करुन संपविते तेव्हा आत्म्याची चेतना प्राणीयोनीच्या अगदी शेवटल्या उपजातीपासून आपले साहचर्य सोडते व सचेतन आत्मा प्राणीयोनीच्या शेवटल्या उपजातीशी तद्नंतर एकरुपता करीत नाही. आत्म्याच्या चेतनेने या योनीशी साहचर्य सोडलेले असते व ते रुप टाकून दिलेले किंवा सोडलेले असते. तथापि प्राणीयोनीच्या अगदी शेवटच्या उपजातीला टाकून दिलेले असले किंवा सोडलेले असले तरी प्राणीयोनीच्या अगदी शेवटल्या उपजातीचे संस्कार मात्र शिल्लक असतात किंवा राखून ठेवलेले असतात व आत्म्याची चेतना प्राणीयोनीच्या अगदी शेवटल्या उपजातीच्या संस्कारावर केन्द्रित किंवा एकाग्र केलेली असते. सचेतन आत्मा पुन्हा एकदा योनीविरहित होतो.

हे संस्कार अगदी अनिवार्यतः अनुभवून संपवावे लागतात आणि त्यामुळे आत्म्याची चेतना आता दुसऱ्या उचित माध्यमाशी स्वतः साहचर्य करते व आत्मा अनिवार्यपणे स्वतःच्या चेतनेव्दारा मानवयोनीतील अगदी प्रथम देहाशी एकरुप होण्यास प्रवृत्त होतो. हा मानवदेह अन्य काही नसून प्राणी योनीच्या अगदी अंत्य उपजातीच्या संस्कारांचा दृढपिंड किंवा साच्या असतो.

अगदी पहिल्या मानवदेहाव्दारां आत्म्याची चेतना प्राणी योनीतील अगदी शेवटल्या उपजातीचे संस्कार अनुभवून पूर्णपणे खर्च करते.

आत्म्याच्या चेतनेत, प्राणीयोनीच्या अगदी शेवटल्या उपजातीचे (देहाचे) संस्कार अनुभवून पूर्णपणे संपविले जातात तेव्हा आत्म्याची चेतना मानवयोनीतील अगदी प्रथम देहाशी आपले स्वतःचे साहचर्य सोडते आणि सचेतन आत्म्याचे आपोआपच त्याचे शरीराशी असलेले साहचर्य सुटते किंवा टाकल्या जाते. यालाच अगदी प्रथम मानदेहाचा मृत्यू असे म्हटले जाते. परंतु आत्म्याची चेतना आता अगदी पहिल्या मानवदेहाच्या संस्कारात केन्द्रित किंवा एकाग्र झालेली असते व आत्मा आता तात्पुरता देहविरहित (स्थूलदेह) झालेला असतो.

अगदी प्रथम मानवदेहाचे संस्कार अनुभवून पूर्णपणे संपविण्याकरिता आत्म्याची चेतना दुसऱ्या उचित माध्यमाशी स्वतः साहचर्य करते व त्यानंतर सचेतन आत्मा अगदीच त्या पुढच्या दुसऱ्या मानवदेहाशी एकरुप होण्यास प्रवृत्त होतो. हा मानवदेह अन्य काही नसून नुकत्याच टाकून दिलेल्या किंवा सोडलेल्या अगदी प्रथम मानवदेहाच्या संस्कारांचा साच्या किंवा दृढपिंड असतो. सचेतन आत्म्याचे त्यानंतरच्या मानवदेहाशी किंवा त्यानंतर पुढील मानवदेहाशी एकरुप होणे याला मानवाचा जन्म म्हटले जाते.

आत्म्याच्या चेतनेने अगदी प्रथम मानवदेहाशी साहचर्य केल्याबरोबर चेतनेची उत्क्रांती समग्र व परिपूर्ण होते.* मानवयोनीतील (देहात) आत्म्याची चेतना[१] ज्याअर्थी पूर्णपणे विकसित झालेली असते त्याअर्थी मानवदेहाची देखील

---

* (टिप– मेहेरबाबा असे म्हणतात की असे विषय आता अधिक काळाकरिता अनिश्चित सोडायला नको, जरी ते मान्य करतात की उत्क्रांती मध्ये विश्वास किंवा अविश्वास मनुष्याच्या आध्यात्मिक प्रगतीला कोणत्याच प्रकारे चालना देत नाहीत किंवा आध्यात्मिक प्रगती मध्ये अडथळा आणत नाहीत. ते उत्क्रांतीचे व पुनर्जन्माचे आध्यात्मिक महत्व पुढील प्रमाणे सांगतात. ''उत्क्रांतीमधील संघर्षानेच आत्मा चेतनेचा पूर्ण विकास करण्यासाठी मनुष्य योनीत सक्षम होतो व उद्देश साध्यझाल्यावर उत्क्रांतीच्या प्रवासाची अवांतर फळे (नक्शे–अमल किंवा संस्कार) चेतनेला जशीच्या तशी कायम ठेवून–नष्ट करावी लागतात म्हणून पुर्नजन्माची प्रक्रिया संस्कार नष्ट करण्यासाठी सुख दुःखाच्या भट्टीतून पार पाडून आत्म्याला समर्थ करते.''– संपादक)

---

[१] (या पुस्तकाच्या पुरवणीमध्ये पुरवणी टिप्पणी क्र. १ पहा/सर्व क्रमांकित संदर्भ पुरवणीमध्ये समाविष्ट आहेत.)

उत्क्रांती पूर्ण झालेली असते.

सचेतन आत्म्याने एकदा मानव योनीतील अगदी पहिल्या मानव देहाशी तादात्म्य साधले की, त्यानंतर मानव योनीत नवीन उच्चतर देहाची उत्क्रांती होत नाही.

थोडक्यात मानवदेहात आत्म्याची चेतना समग्र व परिपूर्ण असते. चेतनेच्या उत्क्रांतीची प्रक्रिया स्थिर होते. चेतनेच्या उत्क्रांतीच्या दरम्यान उत्क्रांत झालेला मानवदेह हा सर्वोच्च व अती उत्कृष्ट देह होय. म्हणून मानवात चेतनेचा पूर्णपणे विकास झालेला आहे आणि युगानुयुगानंतर व कालचक्रानंतर आकारास आलेले किंवा साच्यात घडवलेले शरीर अत्यंत परिपूर्ण शरीर किंवा माध्यम आहे म्हणून आत्म्याची चेतना या पूर्णपणे विकसित माध्यमाचा संपूर्ण संस्कार अनुभविण्यासाठी व पूर्णपणे भोगून संपविण्यासाठी उपयोग करते, की, ज्यामुळे पूर्णपणे सचेतन आत्मा जे काही संस्कार असतील त्या सर्वांपासून पूर्णपणे संस्कारविरहित होतो व अशाप्रकारे तो स्वतःची सत्य, शाश्वत व अनंत, परमात्म्यात एकरुप असलेल्या अवस्थेचा साक्षात्कार करण्याकरिता समर्थ होतो.

* * *

# भाग ३

# विविध साम्राज्यांची स्वभाव वैशिष्ट्ये

मानव देहात चेतनेचा पूर्ण विकास प्राप्त करण्याकरिता उत्क्रांतीच्या प्रक्रियेला सात प्रमुख उड्या माराव्या लागल्या, त्या म्हणजे पाषाणापासून धातूपर्यंत, धातूपासून वनस्पती पर्यंत, वनस्पतीपासून कृमीपर्यंत, कृमी पासून मत्स्यापर्यंत, मत्स्यापासून पक्षापर्यंत, पक्षापासून प्राण्यापर्यंत आणि शेवटी प्राण्यापासून मानवीप्राण्यापर्यंत व प्रत्येकाच्या अंगी वेगवेगळी स्वभाव वैशिष्ट्ये आहेत.

**पाषाण साम्राज्य व धातू साम्राज्याचे स्वभाव वैशिष्ट्ये**

पाषाणरुपांमद्ये व धातूरुपांमध्ये आत्म्याला भौतिक जगताचे प्रारंभिक अनुभव असतात. धातू साम्राज्य हे पाषाण साम्राज्याप्रमाणे निरिंद्रिय व घन आहे. हे दोन्ही साम्राज्ये आपआपल्या विस्तार कक्षात विविध समृद्ध प्रकारांना समाविष्ट करुन आहेत. पाषाण आणि धातूच्या जड अवस्थेमध्ये सजीवता व ऊर्जाशक्ती सुप्त असतात. त्यामुळे त्यांना निर्जीव मानले जाते. पाषाणरुप व धातूरुप आपणहून एका जागेवरुन दुसरीकडे जाऊ शकत नाहीत म्हणजेच त्यांना स्वतःहून हालचाल करता येत नाही. याच कारणामुळे चेतना जी स्वतः या रुपांशी साहचर्य करते ती या स्थूल जगतात (सरळ किंवा ताठ उभ्या स्थिती ऐवजी) पहुडलेल्या अवस्थेत भूपृष्ठाला समांतर स्थितितून स्वतःला प्रकर्षाने प्रतिपादित करण्यांकडे नैसर्गीक प्रवृत्ती ठेवते.

**वनस्पती साम्राज्याचे स्वभाव वैशिष्ट्ये**

वनस्पती साम्राज्यात चेतना स्वतःला अर्धसजीव व अर्धनिर्जीव स्थितीत असल्याचा अनुभव घेते. वनस्पतीरुपात वृध्दिंगत झालेली चेतना स्थूल जगात सरळ उभ्या अथवा ताठ उभ्या स्थितीव्दारे स्वतःचे अस्तित्व प्रकर्षाने प्रतिपादित करते. वनस्पतीरुपांना स्वतःची उभी स्थिती राखून ठेवण्यासाठी जमीन किंवा खडकासारख्या, दुसऱ्या अन्य गोष्टींचा आधार घ्यावा

लागतो. त्यांची मूळे एकाच ठिकाणी रुजत असल्यामुळे, ना त्या स्वतःहून उभ्या राहू शकत ना त्या आपण होऊन एका जागेवरुन दुसऱ्या जागेवर जाऊ शकत.

**कृमी – साम्राज्याची स्वभाव वैशिष्ट्ये**

कृमी चेतनेत आत्मा ऐच्छिक हालचालीचे अनुभव संचित करतो. तो स्वतः सजीव असल्याचा अनुभव घेतो. अधिक जास्त व पुढील चेतना प्राप्त करण्याच्या संघर्षमय प्रयत्नात कृमी चेतन आत्मा स्वतःला स्थूल जगतात, प्रथम पाठीचा कणा नसलेला व नंतर पाठीचा कणा असलेला कृमी म्हणून अनुभव घेतो व अगदी भिन्न प्रकारच्या कृमीउपजातीतून पुढेपुढे सरपटत जातो. कधी दोन पायांनी, कधी पायांच्या अनेक जोड्यांनी, तर कधी कधी पायांच्या जोडीने व पंखांच्या जोडीने सरपटत जाण्याकरिता ऐच्छिक हालचाल करतो. कृमींचा पृष्ठभाग (त्वचा) कधी केसाळ, गुळगुळीत, मखमली, खडबडीत किंवा कधी खवल्यासारखा असू शकतो. कृमीला अस्तित्वाकरिता व जिवंत राहण्यासाठी संघर्षातून जावे लागते व त्याला संवेदना व सजीवता याची निसर्गदत्त देणगी असते. कधी तो जमिनीवर अथवा पाण्यात राहणारा प्राणी असतो अर्थात तो स्वेच्छने केवळ जमिनीवरच चालू–फिरु शकत नाही तर त्याला पाण्यात सुध्दा गतिक्षमता असते. ह्या स्पष्टीकरणाच्या दृष्टिकोणातून, कृमी–रुपाच्या अंतर्गत, सर्व कृमी, कीटक, सरपटणारे प्राणी आणि पाण्यात अथवा जमिनीवर राहणारे प्राणी यांचा आपआपल्या उपजातींसह समावेश होतो. त्यांना जरी पाय आणि पंख असले तरी त्यांची सरपटत जाण्याची प्रवृत्ती असते व ते पक्षी आणि चतुष्पाद प्राण्यापासून भिन्न असतात. कृमी–देह पहुडलेल्या स्थितीत असतो, तो सरळ, लंब किंवा उभ्या अवस्थेत नसतो आणि त्याची प्रवृत्ती पालथे पडून राहण्याकडे असते.

**मत्स्य–साम्राज्याचे स्वभाव वैशिष्ट्ये**

मत्स्यचेतन आत्मा (पाठीचा कणा असलेला, सजीवता व संवेदना आणि ऐच्छिक हालचाल करण्याची निसर्गदत्त देणगी असलेला) मत्स्यांच्या विविध उपजातींशी एकरुप होऊन स्थूल जगताचा पाण्यातील सजीव प्राणी

म्हणून अनुभव घेतो आणि त्याला कल्ले असतात. पोषणासाठी व जीवंत राहण्याकरिता त्याला संघर्ष करावा लागतो. मत्स्यचेतन आत्मा स्थूल जगात आपले अस्तित्व सरळ उभे राहून प्रतिपादित करीत नाही तर डोके कधीही उंच व ताठ न ठेवता स्वतः पहुडलेल्या स्थितीत असल्याचा अनुभव घेतो.

**पक्षी–साम्राज्याचे स्वभाव वैशिष्ट्ये**

खग–रुप चेतनेस नवीन अनुभवांनी समृध्द (उज्वल) करते कारण त्याचे ठिकाणी पिसांनी आच्छादलेला पाठीचा कणा असल्यामुळे तो हवेत उडण्यास आणि आपल्या दोन पायांच्या सहाय्याने स्थूल जगात सरळ उभी स्थिती राखून ठेवण्यास सक्षम असतो.

**प्राणी–साम्राज्याचे स्वभाव वैशिष्ट्ये**

पशू–रुप चेतनेला अधिक जास्त विस्तारीत करते कारण पशू साम्राज्यात अस्तित्वात असणाऱ्या उच्चतर विविध प्रकारांव्दारां ते नवीन अनुभव प्राप्त करु शकते. सजीवता, संवेदना व ऐच्छिक हालचाल करण्याच्या शक्तीने संपन्न असलेल्या चतुष्पाद प्राण्यांना अस्तित्वाकरिता व जिवंत राहण्यासाठी संघर्षास तोंड द्यावे लागते. ते कधी शाकाहारी कधी मांसाहारी असतात. प्राणी चेतना स्थूल जगात आपले अस्तित्व सरळ किंवा उभ्या शरीरस्थितीव्दारे दर्शवित नाही, परंतु खाली वाकलेल्या मस्तकाने खाली पाहाण्याची प्रवृत्ती असते. तथापि एप्स्–माकडं हे सर्वाधिक उत्क्रांत जातीचे प्राणी आहेत व त्यांची मानव प्राण्याप्रमाणे सरळ उभे राहण्याची नैसर्गिक प्रवत्ती असते.

**मानव–साम्राज्याचे स्वभाव वैशिष्ट्ये**

आत्म्याची उत्क्रांत होणारी चेतना मानव देहात परिपूर्ण विकास पावते. चेतनेच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेचा अंत मानव देहात होतो. येथे चेतना परिपूर्ण व समग्र झालेली असते.

जेव्हा मानवप्राणी जन्माला येतो तेव्हा तो केवळ पोटावर आडवा पडू शकतो आणि या अवस्थेचा अनुभव तो बऱ्याच काळपर्यंत घेत राहतो. परंतु

लवकरच प्रथम ताठ बसण्याची व नंतर सरळ उभे राहण्याची प्रवृत्ती तो व्यक्त करतो. आत्म्याची पूर्णपणे उत्क्रांत झालेली मानवी चेतना अन्ततः स्थूल जगात आपले अस्तित्व उभ्या शारीरिक अवस्थेव्दारां प्रकर्षाने प्रकट करते.

**उन्नतावस्थेत जाणारा आत्मा**

''मी खनीज म्हणून मृत्यू पावलो आणि रोपटे झालो,
मी रोपटे म्हणून मृत्यू पावलो व प्राणी म्हणून उत्थान झाले,
मी प्राणी म्हणून मृत्यू पावलो व मी मनुष्य झालो,
मला भीती का वाटावी ? मृत्यूमुळे माझा केव्हा ऱ्हास झाला ?
अजून, परत एकदा, मी मनुष्य म्हणून मरेन, उंच भरारी मारण्यासाठी
भाग्यशाली देवदूतांसह, परंतु या देवदुतांच्या अवस्थेपासून देखील
मी पुढे गेलेच पाहिजे, ईश्वराव्यतिरिक्त सर्व नष्ट होणारे आहे.
जेव्हा, मी माझ्या देवदूत आत्म्याचा त्याग करेन,
मी असा बनेल, जे मनाने कल्पिलेले नसेल
ओह, माझे अस्तित्व न राहो ! कारण अस्तित्वहीन स्थिती
वाद्यनादात उद्‌घोषित करते, ''आम्ही परत त्याच्याकडे जाणारच!''

**– रुमी**

* * *

## भाग ४

# पुनर्जन्म व चेतनेचा संस्काररहित समतोल

आत्म्याच्या चेतनेच्या उत्क्रांतीच्या प्रवाहात आत्मा विविध, सीमित स्थूल देहाशी जाणीवपूर्वक स्वतःला एकरुप करीत असताना अजाणतेपणी त्याचवेळी स्वतःच्या सीमित सूक्ष्म शरीराशी व सीमित मनोदेहाशी एकरुप होत असतो. त्या सूक्ष्म व मनोदेहाचे आत्म्याशी असलेल्या घट्ट, एकसंघ व अचेतन संबंधामुळे, चेतनेच्या संपूर्ण उत्क्रांतीच्या प्रवाहात त्यांचे अगदी प्रथम उर्मिपासून आत्म्याशी साहचर्य होते.

अधिकतर उच्चतम चेतनेच्या उत्क्रांतीच्या ओघात प्राप्त झालेल्या संस्कारांचा अनुभव घेण्यासाठी आत्मा वारंवार व जाणीवपूर्वक सीमित स्थूल योनीशी साहचर्य सोडत होता जी स्थूल योनी माध्यम म्हणून कार्य करीत होती. असे असले तरी, जाणीवपूर्वक किंवा अजाणतेपणी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे आत्मा सीमित सूक्ष्म देहाशी व सीमित मनोदेहाशी आपले साहचर्य कधीच सोडू शकला नाही.

उलटपक्षी आत्मा जेंव्हा सीमित स्थूल देहाच्या कोणत्याही एका माध्यमाशी असणाऱ्या आपल्या एकरुपतेपासून वेगळा होतो तेव्हा त्या आत्म्याचे सीमित सूक्ष्मदेहाशी अजाणतेपणे साहचर्य असते. त्या सूक्ष्मदेहाने आपल्या मर्यादित सीमित प्राण (चालकशक्ती) शक्तीने (आता स्थूलदेह विरहित असलेल्या) आत्म्याच्या चेतनेस त्यानंतरच्या सीमित स्थूलदेहाच्या पुढील माध्यमाशी एकरुप होण्यस प्रवृत्त करण्याकरिता आत्म्यास बळकट केले, कारण या नवीन प्राप्त होणाऱ्या स्थूल देहरुपी माध्यमाव्दारा शेवटी त्यागलेल्या सीमित स्थूल देहाचे संस्कार अनुभवता यावे, जे संस्कार या आत्म्याच्या सीमित मनोदेहात ठेवलेले व प्रतिबिंबित झालेले असतात.

हे अगदी स्वाभाविक आहे की, आत्म्याच्या अधिकतर व उच्चतर चेतनेच्या उत्क्रांतीसोबत आत्म्याला अधिकतर सीमित प्राण शक्तींनी बलिष्ट करण्यासाठी व शेवटच्या निम्नतर सीमित स्थूल देहाच्या संस्कारांनी उत्क्रांत झालेल्या उच्च व उच्चतर प्रकारच्या सीमित स्थूल देहांशी एकरुपता

करण्यासाठी अधिकाधिक स्थूल चेतन आत्म्याची चेतना अनुकूल व्हावी या दृष्टीने ही आत्म्याच्या सीमित सूक्ष्मदेहाची देखील उत्क्रांती होते.

याचप्रमाणे आत्म्याच्या अधिकतर आणि अधिकतर चेतनेच्या उत्क्रांतीने प्राप्त केलेले व एकत्र केलेले, वाढते असंख्य व विविध संस्कार सामावून घेणे, राखून ठेवणे, व प्रतिबिंबीत करणे ह्या सर्व गोष्टी होत असतानाच आत्म्याच्या सीमित मनोदेहाची (कारण शरीर किंवा मन) सुद्धा उत्क्रांती होत असते.

अशा प्रकारे आत्मा जेव्हा वनस्पती योनीच्या विविध उपजातींशी आपली एकरुपता करण्याकडे प्रवृत्त होतो तेव्हा आत्म्याचे उत्क्रांत झालेले सीमित सूक्ष्म शरीर व सीमित मनोशरीर यापेक्षा जास्त उत्क्रांत झालेल्या आत्म्याच्या सीमित सूक्ष्म देहाशी तसेच सीमित मनोदेहाशी साहचर्य करण्याकरिता महत्तर व दृष्य चिन्हें दर्शविणे सुरु करतात आणि ही चिन्हें वनस्पती–योनीत विविध जलद परिवर्तन चक्राच्या स्वरुपात दिसून येतात. त्याच प्रमाणे वनस्पती योनीच्या स्वरुपातील आत्मरक्षणाची व परिस्थितीवर मात करुन जगण्याची (survival of the fittest) वैशिष्ठ्यपूर्ण विविध व अर्थपूर्ण प्रवृत्तीची प्रथम चिन्हे दर्शविणे सुरु होते.

आत्म्याच्या सीमित मनोदेहाची ही प्रवृत्ती कृमी, पक्षी व मत्स्य योनीत क्रमशः व सावकाश सहज प्रवृत्तीच्या स्वरुपात परिवर्तीत होते व प्राणी योनीमध्ये ही सहज प्रवृत्ती आत्म्याच्या सीमित मनोदेहातील एक सीमित पैलू म्हणून पूर्णतः व्यक्त होते. क्रमाक्रमाने ही सहज प्रवृत्ती पुढे पुर्णपणे बुद्धित रुपांतरीत होते. ही बुद्धि, स्थूल जगताचा अनुभव घेणाऱ्या स्थूल चेतन मानवी आत्म्याच्या मानवी देहातील मनोदेहाच्या अभिव्यक्तीचा सर्वोच्च सीमित पैलू आहे.

म्हणून मानव योनीतच केवळ सूक्ष्म देहाचा व मनोदेहाचा संपूर्ण विकास झालेला असतो व त्यामुळे आत्मा जाणीवपूर्वक मानव देहाशी साहचर्य करीत असताना असे म्हणता येईल की आत्मा मानवी शरीर, सूक्ष्म शरीर व मनोशरीर तसेच स्थूलाच्या पूर्ण जाणीवेसह पुर्णतः संपन्न असतो.

मानदेहात आत्म्याने जरी चेतना प्राप्त केलेली असली व तो जरी स्थूल जगताचा अनुभव घेत असला तरीही स्थूल चेतन मानवीआत्म्याला सूक्ष्मदेहाची

चेतना नसते व त्यामुळे तो सूक्ष्म जगताचा अनुभव घेऊ शकत नाही. तसेच त्याला मनोदेहाची देखील चेतना नसते व त्यामुळे तो मनोजगताचा अनुभव घेऊ शकत नाही.

आत्म्याला जरी केवळ स्थूल चेतना असली व तो सूक्ष्म व मनाचे बाबतीत अचेत असला तरी तो स्थूल जगतात अप्रत्यक्षपणे सूक्ष्म व मनोदाहांचेव्दारे कार्य करीत असतोच. स्थूल चेतन मानवी आत्मा आपल्या सूक्ष्म व मनोदेहाबद्दल व संबंधीत सूक्ष्म व मनोजगताबद्दल अचेत असल्यामुळे त्याला सूक्ष्माच्या प्राणशक्तीची व मनोजगतातील मनाची जाणीव नसते, तरीही तो विविध स्थूलपैंलूंव्दारा प्राणशक्तीचा जसे ''अणूशक्ती'' चा उपयोग करु शकतो व तो मनाच्या विविध पैलूंव्दारा जसे इच्छा, भावना व विकार, मनाचा उपयोग करु शकतो. या सर्वांमध्ये 'इच्छावासना' हा मनाचा प्रभाव असलेला सर्वात वरचढ पैलू आहे.

म्हणून ह्या आत्म्याला आता अगदी पहिल्या स्थूल मानवदेहाची संपूर्ण स्थूल चेतना असते, तरी सूक्ष्म व मनाविषयी तो पूर्ण अचेत असतो. तो स्थूल जगतात अगदी शेवटच्या त्यागलेल्या किंवा सोडलेल्या प्राण्याच्या स्थूल देहाच्या संस्कारांचा अनुभव घेतो.

अगदी शेवटच्या प्राण्याच्या स्थूल देहाचे संस्कार जेंव्हा भोगून संपविले जातात तेव्हा स्वाभाविकपणे अगदी पहिल्या मानवाचा स्थूल देह आत्म्यापासून वेगळा होतो. आत्म्याच्या या अनुभवाला सर्वत्र भौतिक दृष्टीने मनुष्याचा मृत्यू म्हणून संबोधिले जाते.

या पूर्वीच स्पष्ट केल्यानुसार, अगदी प्रथम मानवी स्थूल देहापासून जरी हा आत्मा वेगळा झाला असला तरी तो सूक्ष्म व मनोदेहापासून कधीच वेगळा झालेला नसतो.

हे देखील पूर्वी स्पष्ट केले आहे की, जरी हा आत्मा अगदी प्रथम मानवी स्थूल देहापासून वेगळा झालेला असला तरी टाकून दिलेल्या किंवा सोडलेल्या अगदी प्रथम स्थूल मानव देहाचे संस्कार सूक्ष्म व मनोदेहाव्दारां आत्मा राखून ठेवतो व अनुभव घेतो आणि नुकत्याच टाकून दिलेल्या आधीच्या मानव देहाचे संस्कारांचा अनुभव घेण्यासाटी आत्मा पुन्हा अगदी नंतरच्या दुसऱ्या

मानवदेहाशी साहचर्य प्रस्थापित करतो. वस्तुतः हा दुसरा मानव देह, अन्य काही नसून आत्म्यापासून वेगळा झालेल्या आधिच्या शरीराच्या किंवा देहाच्या संचित संस्कारांचा (एकत्रीकरण केलेला) दृढपिंड असतो. अशा प्रकारे आत्म्याच्या अगदी दुसऱ्या मानव देहाशी प्रस्थापित होणाऱ्या साहचर्याला सर्वत्र भौतिकदृष्टीने मनुष्य प्राण्याचा जन्म म्हणून संबोधिले जाते.

मनुष्याचा मृत्यू व (त्यानंतर होणारा) जन्म यामध्ये जे दर्शनी अंतर असते, म्हणजे या काळखंडात स्थूल चेतन आत्मा, आपल्या पूर्ण विकसीत सूक्ष्म व मनोदेहाशी साहचर्य करुन नुकताच त्यागलेल्या मानव देहाच्या परस्परविरोधी संस्कारामध्ये वरचढ असलेल्या संस्कारांचा (म्हणजे विरुध्द संस्कारामध्ये असलेल्या फरकाचा) अनुभव घेतो. मृत्यू आणि जन्म या मधील दर्शनी अंतरातील आत्म्याच्या या स्थितीला सामान्यपणे नरक किंवा स्वर्ग असे म्हटले जाते. आत्मा जो आता संपूर्ण सचेत आहे त्या मानव देहातील सचेत आत्म्याच्या चेतनेने मानव देहाशी मधून मधून साहचर्य करणे व त्यापासून विगलित होणे या प्रक्रियेला ''पुनर्जन्म प्रक्रिया'' अशी संज्ञा दिली जाते.

विरुध्द असलेल्या संस्कारामध्ये जे वरचढ असतात (जसे सद्‌गुण आणि दुर्गूण, चांगले व वाईट, पुरुष व स्त्री वगैरे) ज्यांचा आत्म्याने अनुभव घेतलेला असतो व तो आता फक्त सूक्ष्माशी व मनाशी साहचर्य करुन सद्‌गुणांचा व चांगुलपणाचा अनुभव घेत असेल (म्हणजे विरुध्द संस्कारांच्या विधायक पैलूंचा) तर आत्मा स्वर्गात आहे असे म्हटले जाते. जर हा अनुभव दुर्गुण व वाईटाचा असेल (म्हणजे विपरित संस्काराच्या विधायक पैलूंचा असेल) तर आत्मा हा नरकात आहे असे म्हटले जाते.

स्वर्ग आणि नरक ह्या अवस्था  दूसरे काही नसून केवळ आत्म्याच्या चेतनेच्या तीव्र अनुभवांच्या अवस्था आहेत. आत्मा जेव्हा स्थूल मानव देह किंवा शरीर सोडून देतो तेव्हा आत्मा विरुध्द संस्कारांमध्ये वरचढ असलेल्या संस्कारांच्या प्रतिरुपाचा (म्हणजे विरुध्द संस्कारात असलेल्या फरकाचा) अनुभव घेतो. सर्व साधारण हा जो समज आहे, त्यानुसार आत्मा स्वतः स्वर्गात किंवा नरकात जात नाही, कारण तो शाश्वत रीतीने अनंत असून शाश्वतरीत्या परमात्म्यात आहे. ती आत्म्याची चेतना असते जी संस्कारांचा अनुभव घेते.

ज्या क्षणी संस्कारामध्ये वरचढ असलेल्या प्रतिरुपाचा (म्हणजे दोन विरुध्द संस्कारामध्ये असलेल्या फक्त फरकाचा) अनुभव घेतल्या जातो व ते भोगून संपविले जातात व ज्या क्षणी शेवटच्या त्यागलेल्या मानव देहाचे विरुध्द संस्कारामध्ये जवळ जवळ समतोल राखण्याची वेळ येते, अशावेळी आत्मा आपोआपच त्यानंतरच्या अगदी दुसऱ्या मानव देहाशी साहचर्य साधतो. हा दुसरा मानव देह म्हणजे विरुध्द संस्कार जे जवळ जवळ समांतर होण्याचे स्थितीत आले होते त्यांचा संकलीत दृढपींड असतो.

अशा प्रकारे आत्म्याची स्थूल चेतना नरकाचा किंवा स्वर्गाचा अनुभव घेतल्यानंतर पूर्व जन्माचे परस्पर विरोधी उर्वरित संस्कार अनुभविण्यासाठी व ते भोगून संपविण्यासाठी दुसरा जन्म घेते व त्या नंतरच्या (पुढील) मानव देहाशी साहचर्य साधते.

आधीच सांगितल्याप्रमाणे आत्म्याचा हा दुसरा मानव देह, दुसरे काही नसून शेवटच्या जन्मातील उर्वरित स्परस्पर विरोधी संस्कारांची संकलीत घडणच होय.

अशा प्रकारे मानव देहाच्या किंवा मानव प्राण्याच्य जन्म–मृत्यूची वरवर पाहता न संपणारी शृंखला बनत जाते व नष्ट होत जाते. स्थूल चेतनेच्या संपूर्ण उत्क्रांतीच्या क्रमात त्याने संपूर्ण स्थूल चेतना प्राप्त केल्यावर ही आत्म्याच्या मानव देहाची पुनर्जन्माची मालिका आहे. आत्म्याच्या अगदी अचेतन अवस्थेपासून (ज्याची तुलना मनुष्याच्या गाढ निद्रेशी करता येईल.) तो त्याने संपूर्ण स्थूलचेतना प्राप्त करीपर्यंत (ज्याची तुलना मनुष्याच्या डोळे उघडे ठेवून अनुभविली जाणाऱ्या जागृतावस्थेशी करता येईल) या भौतिक जगतातील अनुभव घेत असताना तो आत्मा तोच तो एक अखंड, अनंत, निराकार आणि शाश्वतत: परमात्म्यात स्थित असतो.

प्रथम उर्मी शाश्वत व अनंत 'स्व' बद्दल सचेत होण्यासाठी अचेतन आत्म्यात प्रगट झाली. उत्क्रातीच्या संपूर्ण प्रक्रियेच्या ओघात पुनर्जन्म त्या प्रथम उर्मीची उत्स्फुर्त परिपूर्ण निष्पत्ती होती.

ज्याप्रमाणे यापूर्वी उल्लेख केला गेला आहे, आपण आता समजू शकतो की, आत्म्याच्या चेतनेच्या उत्क्रांतीचे चक्राने निम्नतर प्रकारच्या सोडून

दिलेल्या रुपाचे संस्कार नष्ट करीत असतानाच आत्म्याने उच्चतर व उच्चतर रुपांची उत्क्रांती करण्याचे बरोबरच आणखी पुढे उच्चतर चेतना उत्क्रांत केली. आत्म्याच्या चेतनेची उत्क्रांती अशाप्रकारे प्रत्यक्षपणे आत्म्याला स्थूल जगताच्या उच्चतर व उच्चतर योनींच्या स्थूल प्रकारांशी एकरुप होण्यासाठी व तत्सबंधीचे असंख्य विविध संस्कार गोळा करण्यासाठी कारणीभूत होते.

स्पष्ट, आकारयुक्त व प्रमुख घन स्थूल योनी (अगदी प्रथम सात प्रमुख अत्यंत अमूर्त वायुरुप व द्रवरुप योनीनंतर) जिच्याशी आत्म्याच्या चेतनेने साहचर्य केले होते (उच्चतर व उच्चतर चेतनेच्या प्रत्येक उडी बरोबर) त्या योनींना सात पायऱ्यांनी वेगळे केले आहे. पाषाण ते धातू, धातू ते वनस्पती, वनस्पती ते कृमी, कृती ते मत्स्य, मत्स्य ते पक्षी, पक्षी ते प्राणी व शेवटी प्राण्यापासून मानवापर्यंत.

पहिल्या उर्मिच्या अगदी प्रथम सीमित संस्काराने अचेतन आत्म्याला अगदी सीमित पहिली चेतना दिली. विविध संस्कारांनी क्रमशः आत्म्यासाठी महत्तर सीमित चेतना प्राप्त केली व शेवटी आत्म्याने जेव्हा अगदी प्रथम मानवदेहाशी एकरुपता केली तेव्हा चेतनेची उत्क्रांती पूर्ण झाली.

मानव देहात आत्म्याने परिपूर्ण व समग्र चेतना प्राप्त केली म्हणून आत्म्याला मानवदेहात परिपूर्ण व समग्र चेतना प्राप्त केल्यानंतर चेतनेची उत्क्रांती करण्यासाठी कोणत्याच अधिक अन्य श्रेष्ठतर योनीची गरज उरत नाही.

ही चेतना परिपूर्ण व समग्र असते. या आत्म्याने जरी परिपूर्ण व समग्र चेतना प्राप्त केली असली तरी त्याला तो स्वतः अजुनही एकमेव अखंड, शाश्वत व अनंत असल्याची मुळीच चेतना नसते व तो अनंत ज्ञान, शक्ती व परमानंद यांचा अनुभव घेत नाही. परंतु तो केवळ मानवरुपाशी व त्याच्या विविध पैलूंबाबत पूर्ण सचेत असतो व स्थूल जगताचा परिपूर्ण अनुभव घेतो.

आत्मा परिपूर्ण सचेत असला तरी जे संस्कार आत्म्याच्या चेतनेने टाकून दिलेल्या मृत झालेल्या मानव देहाव्दारां प्राप्त झालेले असतात, त्या नको असलेल्या (जरी आवश्यक) संस्कारांच्या ओझ्यामुळे आत्मा आपल्या मूळ अनंत अवस्थेबद्दल जाणीवरहीत असतो. नुकत्याच मृत झालेल्या मानवी देहाचे

संस्कार आत्म्याच्या संपूर्ण चेतनेशी अजुनही चिकटून असतात आणि नेहमीप्रमाणे आत्म्याची चेतना नुकत्याच टाकून दिलेल्या मानवी देहाच्या या स्थूल संस्कारात केन्द्रिभूत होते.

ह्या संस्कारांचे ओझे चेतनेवरून दूर करण्याच्या प्रयत्नात आत्म्याची स्थूल चेतना आत्म्याला या अनेक पुनर्जन्माच्या शृंखलेत घेतलेल्या असंख्य विरोधी अनुभवाव्दारा हे संस्कार अनुभविण्यासाठी व भोगून संपविण्यासाठी प्रवृत्त करते. पुनर्जन्माच्या या प्रक्रियेत, संस्काराच्या ओझ्यातून स्वतःला मुक्त करण्याच्या प्रयत्नात आत्म्याची चेतना पुनर्जन्माच्या प्रत्येक पायरीवर अजून स्वतःला जास्त गुंतवून घेते. विरोधी संस्कारांचे अनुभव जेव्हा जवळ जवळ समान व्हावयास लागतात नेमके तेव्हाच आत्म्याची चेतना दुसऱ्या नवीन मानव देहाशी साहचर्य करुन हा समतोल भंग करुन टाकते. हे साहचर्य केले नसते तर विरोधी संस्कारांचे परिणाम अन्यथा त्या त्या विरोधी अनुभवांच्या समतोलाने नष्ट झाले असते व अशाप्रकारे आत्म्याच्या चेतनेला संपूर्ण विरोधी संस्कारापासून मुक्त केले असते.

या ठिकाणी ''उत्कृष्ट तराजुची'' उपमा योग्य होईल. उत्क्रांतीच्या प्रक्रियेत आत्म्याने प्राप्त केलेली चेतना उत्कृष्ट तराजूच्या आधार बिंदूच्या निर्देशकासारखी (काट्या सारखी) असते व तराजूच्या दोन पारड्यात असमान वजनाचे विरोधी संस्कार जसे सद्‌गुण व दुर्गुण इत्यादी घातलेले असतात.

अशा प्रकारे आधार बिंदूच्या निर्देशका सारखी कार्य करणारी चेतना, समतोल प्राप्त करण्याचा प्रयत्न करते, परंतु जो पर्यंत अनुभव घ्यावयाचे राहिलेले असमान विरोधी संस्कार अस्तित्वात असतात तोपर्यंत हा समतोल साधणे अशक्य होते.

म्हणून आत्म्याची स्थूलचेतना विरोधी संस्कारांचा एकूण समतोल साध्य करण्यासाठी वरचढ असलेले विरोधी संस्कार अनुभवण्याचा सतत प्रयत्न करीत असते.

परंतु शोकांतिका अशी आहे की, आत्म्याची स्थूल चेतना वरचढ असलेल्या (दोन मधील जास्त असलेल्या) विरोधी संस्कारांचा क्रमशः अनुभव घेत असताना, समतोल साध्य करण्याच्या अगदी जवळ येऊन पोहचते तेव्हाच

असे घडते की, आत्म्याची चेतना वरचढ असलेले विरोधी संस्कार अनुभविण्यात निरपवादपणे अती व्यग्र होते व ही व्यग्र झालेली चेतना अशा मर्यादेपर्यंत त्यांचा अनुभव घेते किंवा त्यांना भोगून संपविते की, हे वरचढ विरोधी संस्कार अनुभवांव्दारां अशा पातळीवर कमी केले जातात की, जे संस्कार आधी मूळच्या वरचढ विरोधी संस्कारामुळे पारड्यात हलके होते (आधी कमी असलेले) ते आता वरचढ (जड) होतात व फार मोठा असमतोल घडून येतो. ज्यामुळे आधाराचे ठिकाणी निर्देशक म्हणून काम करणारी चेतना झूकते किंवा तिच्या मूळ अनुभवाच्या अगदी विरुध्द दिशेने वळते.

अशा महत्वाच्या क्षणी आत्म्याची चेतना दुसऱ्या मानव देहाव्दारां आता हे नवीन वरचढ झालेल्या विरोधी संस्कारांचा अनुभव घेण्याकडे वळते. आत्म्याच्या चेतनेची ही महत्वाची गरज भागविण्यासाठी मानवप्राणी माध्यम म्हणून दुसरा देह किंवा जन्म घेतो. जो देह आता हे जास्तीचे वरचढ असलेले विरोधी संस्कार भोगून संपविण्यासाठी, किंवा खर्च करण्यासाठी किंवा अनुभविण्यासाठी प्रयत्न करतो.

हे अगदी स्वाभाविक आहे की, आता मानवी आत्म्याने अभिव्यक्त केलेले प्रबळ गुण हे वरचढ विरोधी संस्कारनुरुप राहतील. (म्हणून विरोधी संस्कारामध्ये जे जास्त असतील.) ज्या संस्कारांचा हा मानव देह निश्चीतच एक मुर्तमान पिंड होय.

याप्रमाणे पुनर्जन्माच्या प्रक्रियेमध्ये पुर्णत्वाने विकास पावलेल्या सूक्ष्म व मनोदेहांनी संरक्षिलेल्या (जरी त्यांची जाणीव नसते तरी) पूर्णपणे स्थूल चेतना असलेल्या आत्म्याकडून असंख्य व विविध विरोधी संस्कारांचा अनुभव अनिवार्यपणे घेतला गेलाच पाहिजे, जे संस्कार एकदम परस्पर विरोधी असतात व ज्यांच्या अनुभवांची न संपणारी श्रृंखला असते.

स्थूल देहाशी साहचर्य करुन आत्मा, पूर्वी संकलित केलेले विरुध्द संस्कार भोगून संपविण्याचा प्रयत्न करतो, परंतु असे करण्यात त्याला क्वचितच यश मिळते. उलटपक्षी तो बहुधा परस्पर विरोधी नवीन संस्कार वारंवार संकलित करतो. स्थूल देह जेव्हा संस्कारांना जवळपास संपवितो की, ज्यांच्यामुळे तो अस्तित्वात आला होता, तो देह सोडला जातो. उर्वरित विरुध्द

संस्कारामध्ये पुण्य किंवा पाप जे प्रबळ असेल ते आत्म्याला स्वर्गात किंवा नरकात घेऊन जाते. देहरहित जीवनात देखील सर्व विरोधी संस्कारांमध्ये तीव्र झालेल्या संस्कारांचा आत्मनिष्ट अनुभव घेऊन ते संपविण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु स्वर्ग किंवा नरक अवस्थेत देखील संस्कार शुन्यतेचा समतोल सामान्यपणे जवळ आलेला असतानाच नेमका चुकतो व उर्वरित प्रबळ असलेले परस्पर विरोधी संस्कार आत्म्याच्या चेतनेला नवीन स्थूल माध्यमाशी साहचर्य करण्यासाठी पुढे ढकलतात. मृत्यू समयी किंवा जन्माच्या वेळी देखील पूर्ण संतुलन साधल्या जात नाही. तो समतोल फक्त भौतिक जगतातच प्राप्त होऊ शकतो म्हणून चेतनेस संस्काररहित समतोल प्रस्थापित करण्यास यश मिळपर्यंत या भौतिक जगतात जीवनाची न संपणारी श्रृंखला उर्वरित संस्कारामुळे कायम टिकून राहते.

पूनर्जन्माच्या प्रत्येक अवस्थेत व प्रत्येक श्रेणीत पूर्णपणे मानवी चेतना असलेल्या आत्म्याची चेतना ज्या देहाबरोबर ती एकरुप झाली होती व जे देह तिने सोडले होते अशा मानवी देहाच्या अधिकाधिक तीव्र संस्कारात घट्टपणे केंद्रित* होते. ह्या दृढ संस्कारापासून सुटका नाही* असे दिसून येते. हे संस्कार

---

* हे माहीत आहे की सृष्टी ही काही आकस्मिक घटना नाही व हिच्या प्रकट रुपाच्या दिसण्यापेक्षा काही गूढ अर्थ आहे. सर्व युगातील द्रष्ट्यांनी जगाचे या बाबतीत लक्ष वेधले आहे की या गृहावर मनुष्य आपल्या जीवनाचा काही काळ भलेही केवळ इंद्रियजीवनाशी एकरुपता करील तरी परमात्म–साक्षात्कार हे त्याचे पारलौकिक ध्येय आहे.

'मननवी' या मौलाना रुमी यांच्या ग्रंथात एक दृष्टांत दिलेला आहे, तो हा मुद्दा स्पष्ट करतो. वाघाचे एक पिल्लू मेंढ्यांच्या एका कळपात जोपासले गेले. जसजसे पिल्लू मोठे होत गेले तसतशे ते मेंढ्यांबरोबर चरायला लागले व मेंढ्यांसारख्या आवाजात ओरडायला लागले, ज्यामुळे त्याने आपण शेळ्यापासून काही निराळे आहोत याचा कधीच विचार केला नाही. तथापि एक दिवस जंगलातून एक वाघ त्या कळपातील पिलाजवळ आला व त्याला म्हणाला– ''तुला माहीत आहे का की, तू माझ्यासारखा एक वाघ आहेस व मेंढ्यापैकी तू एक नाहीस. त्यानंतर त्याने भटकलेल्या त्या वाघाचे मन वळवून जवळच्या नदीत स्वतःचे सत्य स्वरुप काय आहे याचे यशस्वीरीतीने खरे ज्ञान दिले.

या बोधकथेचा भावार्थ हा आहे की, मनुष्य देखील स्वतःला इंद्रियजगताशी एकरुप होऊ देतो व यातून बाहेर पडण्याचा जणू मार्ग नसल्याचे त्याला दिसते. परंतु यातून बाहेर पडण्याचा मार्ग आहे. कारण शेवटी एक सद्गुरु प्रकट होतो व तो यथार्थ ज्ञान देतो तेव्हा त्याचा उद्धार होतो व वेळ आल्यावर तो स्वतःला अंतिम लक्ष्य–परमात्म–साक्षात्काराच्या समोरासमोर असल्याचे पाहतो.)

अनुभव घेऊन संपविलेच पाहिजेत आणि जितक्या जास्त संस्कारांचा अनुभव घ्याल तितके ते संस्कार जास्त केन्द्रिभूत किंवा तीव्र होतात.

केन्द्रिभूत झालेल्या संस्कारांना विरळ करण्याचा एकमेव उपाय हा आहे की मानव चेतन आत्म्याच्या चेतनेने या संस्कारांचा अनुभव वाढत्या प्रमाणात व अधिक शीघ्र गतीने अशाप्रकारे इतक्या मोठ्या प्रमाणात पुनः पुन्हा जास्त जलद गतीने घ्यावा की, प्रत्येक अनुभव केलेला संस्कार व या अनुभवाने निर्माण केलेला संस्कार कसल्यातरी विरोधी संस्काराने संतुलित झाला पाहिजे.

परस्पर विरोधी संस्कारांच्या संतुलनाचा व प्रति संतुलनाचा खेळ पुनर्जन्माच्या संपूर्ण प्रक्रियेत सुरु असतो व या खेळावरच पुनर्जन्माची प्रक्रिया आधारित आहे. अज्ञान शृंखलेपासून मानव चेतन आत्म्याची अंतिम मुक्ती व आत्मचेतनेचा अंतिम साक्षात्कार या खेळावरच अवलंबून आहे.

याप्रमाणे पूर्णतया स्थूलचेतन मानवी आत्म्याने पुनर्जन्माच्या मालिकेत, असंख्य व विविध विरोधी संस्कारांचे अनुभव अनिवार्यपणे घेतलेच पाहिजेत. जे संस्कार पूर्णतया परस्पर विरोधी असून असे दिसते की ते न संपणाऱ्या सुसंगत अनुभव शृंखलेत आहेत.

म्हणून स्थूलचेतन मानवी आत्मा, जो आता पूर्णपणे सचेत आहे, स्थूल जगतात परस्पर विरोधी अनुभव घेतो. त्यामुळे आत्म्याच्या चेतनेला स्वतः एकरुप होऊन किंवा पुनर्जन्म घेऊन या प्रक्रियेत अनेक वेळा कधी पुरुष म्हणून तर कधी स्त्री म्हणून आणि तसेच या उलटसुलट रुपात विविध जातीतून, संप्रदायातून, राष्ट्रियत्त्वातून, रंगरुपांतून व निरनिराळ्या ठिकाणी कधी श्रीमंत तर कधी भिकारी, कधी निरोगी तर कधी रोगट इत्यादी जन्म घ्यावे लागतात. या अवधित सदा सर्वकाळ आत्मा परस्पर विरोधी संस्कारांचे पुनरावलोकन करीत असताना, विरोधी संस्कारांची निर्मिती करीत असतो व त्याच वेळेस विपरित अनुभवांचेव्दारे त्याना नष्ट करीत असतो.

केवळ या विविध परस्परविरोधी संस्काराव्दारे व त्यांच्या अनुक्रमे परस्पर विरोधी संस्काराव्दारे भौतिक जगतात स्थूल चेतन मानवीआत्मा संभवतः एक दिवस लक्षावधी जन्म व मृत्यूनंतर या जन्ममृत्यूंच्याव्दारा

घेतलेल्या परस्पर अनुभवातून उर्वरित व तीव्र अशा परस्परविरोधी संस्कारांचा* समतोल साधण्याकरिता किंवा त्यांना विरळ करण्याकरता समर्थ होतो.

हे मानवदेहाचे मृत्यू व त्या अनुषंगाने येणाऱ्या जन्मांचे चक्र पूर्ण स्थूल चेतन मानवी आत्म्याच्या पूर्णपणे उत्क्रांत झालेल्या चेतनेस प्रेरित करण्यास सरतेशेवटी यशस्वी होते. ही प्रेरणा आत्म्याच्या पूर्णपणे उत्क्रांत झालेल्या चेतनेस त्याच्या स्वतःच्या शाश्वत स्थितीचा आणि अनंतत्वाचा साक्षात्कार जेथे होतो तेथपर्यंत त्या चेतनेस आत्मानुवर्ती उत्क्रांत होण्यास कारणीभूत होते.

जसजसे परस्परविरोधी स्थूल संस्कार हळूहळू जीर्ण व कमी कमी तीव्र होत जातात तसतशी चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीची प्रक्रिया हळूहळू घडून येते.

या स्थितीमध्ये स्थूलचेतन मानवी आत्म्याची चेतना स्थूल जगतापासून हळूहळू आपले संबंध तोडते. हे संबंध तोडल्या जात असतानाच चेतनेची आत्मानुवर्ती उत्क्रांती अंतरात्म्याकडे वळते आणि क्रमाक्रमाने या स्थूल जगताचे संस्कार अनुभविण्यापासून मुक्त होत जाते.

स्थूल चेतनेची ही आत्मानुवर्ती उत्क्रांती तेव्हाच फक्त शक्य असते की, जेव्हा परस्पर विरोधी संस्कार हळूहळू अतिप्रदीर्घ प्रक्रियेनंतर पुनर्जन्माच्या अटळ प्रक्रियेव्दारे जीर्ण होत जातात. ही प्रक्रिया परस्पर विरोधी स्थूल संस्कारांच्या व परस्परविरोधी स्थूल अनुभवांच्या चरमसीमेपर्यंत चालते.

✻ ✻ ✻

---

* टीप– सारपा आरजू होने ने बन्दा कर दिया हमको । बगर ना हम खुदा थे गर दिल वे मददुवा होते।।
– मीर तकी

''वस्तुस्थिती अशी आहे की, नखशिखान्त इच्छा–वासनांच्या ओझ्याने लादलेल्या माझ्या स्थितीने मला गुलाम बनविले आहे. माझे हृदय व मन जर निरिच्छ असते तर मी वास्तविक परमात्माच असतो.''

# भाग ५
# भूमिका
## मुक्त होणाऱ्या चेतनेची आत्मानुवर्ती उत्क्रांती

स्थूल जगताच्या गुंत्यातून आत्म्याची चेतना जेव्हा मोकळी होण्याकरिता परिपक्व होते[२] तेव्हा ती चेतना आध्यात्मिक मार्गावर प्रवेश करते व अंतर्मुख होते. तिचे स्थूल संस्कार आता सौम्य होतात. ते क्षीण होतात किंवा अधिक सूक्ष्म होतात व परिणामतः आत्मा सूक्ष्म चेतन होतो. संस्कारांच्या ओझ्यातून मूक्त होण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीची ही पहिली पायरी होय. स्थूल अनुभवांच्या परिपक्वतेसाठी मानवी देहाच्या अगणित जन्ममृत्यूंच्या चक्रांना हातभार लावावा लागतो. ती परिपक्वता अंतिमतः आत्म्याच्या चेतनेला मुक्त करणाऱ्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या मार्गावर पुढे ढकलते, ज्या ठिकाणी संस्कार अधिकाधिक क्षीण होत जातात व शेवटी नष्ट होतात. स्थूल संस्कार सूक्ष्म संस्कार बनतात, सूक्ष्म संस्कार मनः संस्कार बनतात व सरते शेवटी मनःसंस्कार मिटविल्या जाताता व, त्यामुळे चेतना 'सत्याला' प्रतिबिंबित करण्यासाठी मुक्त होते.

आत्मानुवर्ती उत्क्रांतीची प्रक्रिया सामान्यपणे क्रमाक्रमाने (हळूहळू) होते. मनुष्याला देहाचा तसाच संस्कारांचा वारसा पशूपासून आला आहे व म्हणून स्थूल संस्कार अत्यंत प्रबळ असतात. अत्यंत क्वचित लोकांच्या संबंधात स्थूल संस्कार एकदम नाहिसे होऊ शकतात आणि आत्म्याची मुक्त झालेली चेतना परमात्म्याचा अनुभव घेते. परंतु स्थूल संस्कारासाठी त्यांचे क्षीण व कमजोर होत जाणे (अशा प्रकारे त्यांचे सूक्ष्म व मनः संस्कारात संक्रमित होत जाणे) व नंतर पूर्णतः नष्ट होणे ही अधिक सामान्य बाब आहे. सर्वसामान्य नियमानुसार जो आत्मा स्वनिकेतनाकडे प्रवासाला निघाला आहे तो स्थूल जगतात परत येत नाही, जणू ज्या जंगलात तो स्वतःला हरवून बसला होता. याचा अर्थ असा नव्हे की, सूक्ष्म चेतन आत्मा स्थूल देह घेत नाही किंवा आपल्या स्थूल देहाने भौतिक जगतात रहात नाही. याचाच अर्थ असा आहे की, त्यानंतर आत्म्याची चेतना स्वतःला स्थूल देहात किंवा भौतिक जगतात गुंतवून घेत नाही व ती प्रामुख्याने सूक्ष्म जगतात तल्लीन असते. सामान्य नियम असा आहे की, आत्मा प्रथम स्थूल जगताशी व त्या नंतर सूक्ष्म जगताशी व शेवटी मनोजगताशी आपले संबंध तोडतो व आपण सर्वांच्या पलिकडे असल्याचा

त्याला अनुभव येतो. हा मार्ग आक्रमित असताना तो सहा भूमिका पार करतो. यापैकी पहिल्या तीन भूमिका सूक्ष्म जगताच्या आहेत, चवथी सूक्ष्म व मनोजगताच्या सीमारेषेवर (मध्ये) आहे, आणि पाचवी व सहावी भूमिका मनोजगताच्या आहेत. परमात्म्यात नित्य निवास करणारा आत्मा या सर्व भूमिकांच्या पलिकडे आहे.

**पहिली व दुसरी भूमिका**

जशी स्थूल चेतन मानवी आत्म्याची स्थूल चेतना क्रमशः उत्क्रांत होते, तशी ही आत्मानुवर्ती उत्क्रांत होणारी स्थूल चेतना आत्म्याच्या पूर्ण विकसीत झालेल्या सूक्ष्म शरीराच्या माध्यमाव्दारां सूक्ष्म जगताच्या पहिल्या भूमिकेचा[३] अंशता अनुभव घेते.

या अवस्थेमध्ये स्थूल चेतन मानवी आत्म्याच्या आत्मानुवर्ती उत्क्रांत स्थूल चेतनेला, सूक्ष्म जगताच्या पहिल्या भूमिकेची पहिली ओझरती दर्शने मिळतात व त्या ओझरत्या दर्शनाचा किंवा संस्कारांचा अंशतः स्थूल शरीराव्दारां व अंशतः सूक्ष्म शरीराव्दारा ती चेतना अनुभव घेते. त्या ठिकाणी स्थूल व सूक्ष्म इंद्रियांचा एकाचवेळी उपयोग केला जातो.

हीच स्थिती आहे की ज्या ठिकाणी मानवी आत्मा, रेखाचित्र क्रमांक १ मध्ये दाखविल्यानुसार सीमारेषेवर उभा आहे असे म्हटले जाते, जी सीमारेषा स्थूल व सूक्ष्म जगतांना निर्देशित करते. या मानवी आत्म्याची चेतना चमत्कारीक गोष्टींचा अनुभव घेते. तो आपल्या स्थूल डोळ्यांनी सूक्ष्म भूमिकेची ओझरती दर्शने घेतो. आपल्या स्थूल कानांनी सूक्ष्म भूमिकेचे स्वर्गीय संगीत ऐकतो व आपल्या स्थूल नाकाने तो सूक्ष्म सुगंधाचा आनंद घेतो. थोडक्यात म्हणजे, सूक्ष्म जगताच्या पहिल्या भूमिकेवर अंशतः असणारा सूक्ष्म चेतन मानवी आत्मा स्थूल इंद्रियांनी सूक्ष्म संस्कारांचा अनुभव घेतो.

स्थूल चेतनेच्या क्रमशः पुढील आत्मानुवर्ती उत्क्रांती बरोबर, स्थूलचेतन मानवी आत्मा सूक्ष्म जगताची पहिली भूमिका पूर्णपणे अनुभवतो. स्थूल चेतन मानवी आत्मा तदनंतर स्थूलचेतन न रहाता तो आता सूक्ष्म चेतन असतो. हा सूक्ष्मचेतन मानवी आत्मा क्रमशः सूक्ष्म जगताच्या दुसऱ्या भूमिकेबद्दल[४] सचेत होतो. हे सूक्ष्मजगत अमर्याद प्राणशक्तीचे क्षेत्र आहे. ही परमेश्वराची अनंत शक्ती आहे, जेव्हा ही शक्ती एका मर्यादेत परिवर्तित केली

जाते तेव्हा ती सूक्ष्म जगताच्या अनंत प्राणशक्तीच्या स्वरुपात येथे प्रकट होते.

मानव देहात असताना आत्म्याला जेव्हा सूक्ष्म चेतना असते तेंव्हा तो शरीर (स्थूल) व मनाबद्दल (किंवा मनोदेहाबद्दल) अचेत असतो. असे असले तरी तो अप्रत्यक्षपणे परंतु सूक्ष्म भूमिकेवर स्थूल शरीराने मनाव्दारां (मनोदेहाव्दारा) कार्य करतो.

सूक्ष्मचेतन मानवीआत्मा जरी स्थूल शरीर व मनोदेहाबद्दल अचेत असला व त्यामुळे स्थूल जगताचा व मनोजगताचा अनुभव घेत नसला तरी तो स्थूलाच्या विविध पैलूंव्दारां – जसे खाणे, पिणे, झोपणे, पाहणे, स्पर्शानुभव करणे, ऐकणे वगैरे करिता स्थूल शरीराचा उपयोग करु शकतो आणि त्याचप्रमाणे तो जसे इच्छा, विचार व भावना अशा प्रकारच्या मनाच्या (मनोदेह) विविध पैलूंव्दारां मनोदेहाचा उपयोग करु शकतो.

दुसऱ्या भूमिकेवरील सूक्ष्मचेतन मानवी आत्मा चेतनेच्या अधिकतर आत्मानुवर्ती उत्क्रांतीमुळे, सूक्ष्म जगताच्या अनंत प्राणशक्तीची चेतना क्रमशः प्राप्त करतो व विस्मयकारी प्रदर्शन करण्याची किंवा लहान सहान चमत्कार करण्याची क्षमता प्राप्त करतो. उदा. केवळ इच्छा केल्याबरोबर तो शुष्क वृक्ष हिरवा करु शकतो किंवा त्याउलट करु शकतो, तो रेल्वेगाड्या व मोटारगाड्या थांबवू शकतो, कोरड्या विहिरीत स्वच्छ पाणी आणू शकतो व अशा प्रकारच्या इतर गोष्टी तो करु शकतो. दुसऱ्या भूमिकेवरील हा सूक्ष्मचेतन मानवीआत्मा, सूक्ष्म देहाच्या सूक्ष्म इंद्रियांव्दारां सूक्ष्म जगताचा अनुभव घेतो. तो आता स्थूल जगतांविषयी पूर्णपणे अनभिज्ञ असतो. जरी तो बाह्यवर्तनावरुन खाताना, झोपताना व सुख दुःखाची भावना असलेल्या एखाद्या सर्वसाधारण माणसासारखा दिसत असला तरी त्याची आत्मानुवर्ती उत्क्रांत होणारी चेतना स्थूलाचा अनुभव घेत नाही. परंतु सूक्ष्म जगताचा अनुभव घेते व सूक्ष्म जगताचे केवळ दृष्यांचे, सुगंधाचे व ध्वनीचे नवीन सूक्ष्म संस्कार निर्माण करते.

**तिसरी भूमिका**

सूक्ष्मचेतन मानवी आत्म्याच्या सूक्ष्मचेतनेची अधिक पुढील आत्मानुवर्ती उत्क्रांती आत्म्याला सूक्ष्मजगताच्या तिसऱ्या भूमिकेचा[५] अनुभव घेण्यास भाग पाडते. येथे सूक्ष्म चेतना सूक्ष्म जगताच्या अपार प्राणशक्तीची अधिकतर चेतना प्राप्त करते व आत्मा अधिकतर मर्यादित शक्ती अनुभवितो. येथे तो महान चमत्कार करण्यास समर्थ होतो. जसे आंधळ्याला दृष्टी देणे व

अपंगाला अवयव देणे. येथे हा सूक्ष्म चेतन मानवी आत्मा, सूक्ष्म जगताच्या वेगवेगळ्या भूमिका  व जगतांचा अनुभव घेण्यास सक्षम होतो, ज्याप्रमाणे स्थूल सचेत मानवी आत्मा त्याचे जवळ असलेल्या स्थूल वाहनाचा[६] उपयोग करुन आशिया ते ऑस्ट्रेलिया किंवा अमेरिकेत प्रवास करण्यास सक्षम असतो.

सूक्ष्म जगताची दुसरी व तिसरी भूमिका ह्या प्रमुख भूमिका असून ज्या केवळ सूक्ष्म जगताच्या क्षेत्रात आहेत. पहिली भूमिका ही अंशतः सूक्ष्म जगताच्या क्षेत्रातील आहे व अंशतः स्थूल जगतात आहे. याच प्रमाणे चवथी भूमिका ही अंशतः सूक्ष्मजगतात व अंशतः मनोजगतात आहे. चवथी भूमिका ही मनोभुवनाचा उंबरठा म्हणून ओळखली जाते.

**चवथी भूमिका**

सूक्ष्म चेतन मानवी आत्म्याच्या चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीतील क्रमशः झालेल्या अधिक पुढील प्रगतीमुळे आत्म्याची चेतना आत्म्याला चवथ्या भूमिकेचा अनुभव घेण्यासाठी प्रवृत्त करते. चवथ्या भूमिकेवर आत्म्याला अमर्याद प्राण शक्तीची संपूर्ण चेतना असते व ती हीच अमर्याद प्राणशक्ती आहे की, जी परमेश्वराच्या अनंत शक्तीची छायामय बाजू आहे. येथे आत्मा परिपूर्ण शक्तींनी सुसज्ज असतो व तो मेलेल्यास जीवंत करण्यास व नवीन सजीव प्राणी व नवीन जीवन संपन्न जगत* निर्माण करण्यास समर्थ असतो. चवथ्या भूमिकेवर गूढ शक्ती नसतात. त्या दिव्य शक्ती असतात.

रेखाचित्र क्रमांक १ वर दाखविल्याप्रमाणे चवथ्या भूमिकेवर अमर्याद प्राणशक्तीच्या कोठाराची किल्ली जवळ असलेला सूक्ष्म चेतन मानवी आत्मा मनोजगताच्या उंबरठ्यावर उभा असलेला दिसतो. या आत्म्याला तीव्र इच्छा व भावनांच्या भयंकर वादळाला तोंड द्यावे लागते, ज्या इच्छा व भावना मनोजगतातील मनाच्या पैलू आहेत. या अवस्थेमध्ये आत्मा जणू काळोख असलेल्या रात्रीच्या अवस्थेचा अनुभव घेतो. इकडे आड तिकडे विहीर अशा मधल्या स्थितीत त्याला सापडल्यासारखे होते. या अनंत प्राणशक्तीला आपल्या इच्छेनुसार वापर करण्याचे प्रचंड उत्तेजन, या पेचप्रसंगी विश्वासघातकी शत्रू म्हणून सिध्द होते. जेंव्हा सूक्ष्म चेतन मानवी आत्म्याच्या

---

*(टीप– कुतूब अवस्थेतील विज्ञानचेतन आत्मे किंवा पूर्णपुरुष (सद्‌गुरु) अशा घटनांवर नियंत्रण ठेवतात व अशा स्थूल दुर्घटना परमात्म्याच्या पूर्व–नियोजनाशिवाय घडणार नाहीत यावर लक्ष ठेवतात.)

चेतनेची आत्मानुवर्ती उत्क्रांती सर्व इच्छांवर प्रभूत्व मिळविणयासाठी वेगाने अचूकपणे प्रगत होत असते.

या कळसावर पोहोचलेल्या तीव्र इच्छांनी चवथ्या भूमिकेवरील आत्म्यावर जर मात केली व आत्म्याने या शक्तींचा दुरुपयोग केला तर या पेचपसंगी चवथ्या भूमिकेवरील आत्म्याचे बाबतीत अपरिमित प्राणशक्ती मोकळी करण्याचा अनुभव अनिवार्यतः प्राणघातक सिध्द होतो. याचा परिणाम असा होतो की, आत्म्याने प्राप्त केलेली सर्व चेतना भयानकरित्या उधळली जाते व आत्म्याजवळ अगदी मर्यादित चेतना शिल्लक रहाते व तो पुन्हा एकदा स्वतः पाषाणरुपाशी एकरुप होतो. त्यानंतर पाषाण योनीपासून पुढे पूर्ण चेतना प्राप्त करण्यासाठी या आत्म्याला पुन्हा उत्क्रांतीच्या पूर्ण प्रक्रियेमधून जावे लागते.

चवथ्या भूमिकेवरील आत्म्याला अर्धसूक्ष्म व अर्धमनःसंस्कार असतात. त्याचे ठिकाणी चांगल्या किंवा वाईट स्वरुपाच्या तीव्र आणि दुर्दम्य इच्छा वासना असल्यामुळे तो मोहात पाडणाऱ्या प्रलोभनांच्या आधीन होऊ शकतो. प्रचंड शक्ती जवळ असल्यामुळे तो तिचा चांगला किंवा वाईट वापर करण्यासाठी प्रवृत्त होतो. जर त्याने त्याच्या शक्तीचा कामवासनेच्या तृप्तीसाठी, किंवा नाव लौकिक किंवा प्रसिद्धिसाठी, किंवा काही अन्य क्षूद्र कारणासाठी दुरुपयोग केला तर आत्म्याच्या या चेतनेचे अधःपतन ताबडतोब होते व ती चेतना पुन्हा पाषाण अवस्थेच्या चेतनेप्रत खाली उतरते. परंतु जर प्रलोभनांवर विजय प्राप्त करुन त्याने त्याच्या प्रचंड शक्तीचा सदुपयोग केला किंवा शक्तीचा मुळीच उपयोग केला नाही तर तो पाचव्या भूमिकेवर जातो, जेथे तो सुरक्षित असतो व त्याच्या अधःपतनाची मुळीच शक्यता नसते. परंतु जर त्याने आपल्या शक्तीचा चांगला उपयोग केला तर कुतुब अवस्थेचे विज्ञान चेतन आत्मे किंवा सद्‌गुरु (परंतु जीवनमुक्त किंवा मज्झूब नाही) त्या आत्म्याला कधी कधी सहाव्या भूमिकेवर ओढतात.

स्थूल जगतात शक्तीचा सदुपयोग भौतिक गोष्टींच्या व आध्यात्मिक उद्दिष्ट – पूर्तीसाठी होऊ शकतो. उदा. संपत्ती इतरांच्या भौतिक कल्याणासाठी म्हणजे धर्मार्थ दवाखान्यासाठी, उपासमार थांबविण्यासाठी व विपत्तीत सापडलेल्यांना मदत करण्यासाठी तसेच लोकांच्या आध्यात्मिक कल्याणासाठी, जसे आध्यात्मिक शिक्षण व आध्यात्मिक विकासासाठी संपत्तीचा उपयोग होऊ शकतो. परंतु चवथ्या भूमिकेत शक्तीचा सदुपयोग

अनिवार्यतः केवळ इतरांचे आध्यात्मिक कल्याण साधण्यात निहीत आहे. ह्या शक्तींचा उपयोग कदापिही कोणत्याही व्यक्तीच्या भौतिक उन्नतीसाठी केला जाऊ शकत नाही. तो निश्चितच दुरुपयोग होय. चवथ्या भूमिकेवरील शक्तिच्या सदुपयोगाचे आपल्याला पुढील गोष्ट उदाहरण म्हणून घेता येईल. – समजा एक आध्यात्मिक पथिक वाळवंटातून चालत जात आहे व अत्यंत तीव्र तृष्णेमुळे अगदी मरणासन्न स्थितीत आहे. चवथ्या भूमिकेवरील आत्मा त्याचे समोर स्थूल शरीरात उपस्थित होऊ शकतो व त्याला भांडेभर पाणी देऊन समाधान देऊन अदृष्य होऊ शकतो. अशा उपयोगाला शक्तीचा सदुपयोग म्हणता येईल.

शक्तींचा उपयोग व्यक्तिगत किवा सामुहिक लाभाकरिता केला जाऊ शकतो. परंतु चांगला उपयोगही आत्म्याला बंधनात ठेऊ शकतो व त्याची पुढील प्रगती खुंटित करु शकतो आणि त्यामुळे चवथी भूमिका पार करणे अतिशय कठीण व भयंकर धोकादायक गोष्टींनी भरलेली आहे. जी व्यक्ती चवथ्या भूमिकेवर स्थित झालेली आहे तिला आपल्या प्रबळ इच्छांच्या पूर्ततेसाठी आपल्या अधिकारात असलेल्या प्रचंड शक्तीचा उपयोग करण्यापासून स्वतःला परावृत्त करणे अत्यंत कठीण जाते.

चवथी भूमिका ही मनोजगताचा उंबरठा होय. इतर कोणत्याही सूक्ष्म भूमिकांपेक्षा या भूमिकेवर आध्यात्मिक मार्गावरील पथिक विशेष करुन इतका अधिक भावविवश असतो की, त्याचे अति–अधःपतन संभवनीय असते. चवथ्या भूमिकेवरील आत्म्याला ज्या पेचप्रसंगाला सामोरे जावे लागते तो अतिगंभीर व भयंकर धोक्याचा असतो कारण मनावर संपूर्ण नियंत्रण मिळविण्यापूर्वीच त्याला प्रचंड दिव्य शक्ती प्राप्त झालेल्या असतात. तो आपल्या मनावर पूर्ण नियंत्रण ठेऊ शकत नाही. कारण जोपर्यंत मनोजगताचे पाचव्या भूमिकेवर उन्नत होत नाही तो पर्यंत तो प्रत्यक्षपणे आपल्या मनाचा अनुभव घेऊ शकत नाही किंवा उपयोग करु शकत नाही. स्थूल चेतन मानवी आत्म्याप्रमाणे चवथ्या भूमिकेचा सूक्ष्म चेतन आत्मा देखील अप्रत्यक्षपणे आपल्या मनाचा उपयोग करतो. या चवथ्या भूमिकेवर आता मन पूर्णपणे जागरुक असते. ते आपल्या पूर्ण विकसित सर्व विचारांच्या, भावनांच्या व इच्छांच्या पैलूत कार्य करते, ज्यांनी यावेळी मनावर दडपण आणणाऱ्या तीव्रतेचा कळस गाठलेला असतो.एका बाजूने आत्मा आपल्या बंडखोर मनावर प्रभूत्व मिळविण्याचा व स्वैर सुटलेल्या इच्छावासनांच्या विध्वंसक शक्तींना ताब्यात

ठेवण्याचा प्रयत्न करतो. दुसऱ्या बाजूने पूर्णतः त्याचे ताब्यात असलेली भूमिकांची अमर्याद प्राणशक्ती, व्यक्त होण्यासाठी किंवा उपयोजिली जाण्यासाठी सतत प्रयत्नशिल असते.

आत्मा आपल्या शक्तीचा गैरवापर करण्यासाठी जर प्रबळ प्रलोभनांना बळी पडला तर मनाच्या शक्तीचा कल्पनातीत व्यापक प्रमाणावर भिषण स्फोट होतो. त्या स्फोटामुळे मुक्त झालेले विस्फोटक घटक चेतनेला पूर्णतः उधळून लावतात व चेतनेचे चवथ्या भूमिकेवरील सूक्ष्मचेतनेच्या शिखरावरुन पाषाणचेतनेच्या अविकसित अगदी खालच्या स्तरावर प्रलयकारी अधःपतन होते जी (अविकसीत)चेतना आत्म्याने उत्क्रांतीच्या अगदी प्रारंभीच अनुभवलेली होती. या चेतनेच्या छिन्नभिन्न होण्याच्या आत्मिक विध्वंसाची तुलना दुरुस्त न होणाऱ्या विद्युत प्रवाहाच्या खंडीत मार्गापायी झालेल्या विद्युत बल्बच्या वितळण्याशी करता येते. अधःपतन झालेल्या या आत्म्याला आता परत चेतनेच्या उत्क्रांतीच्या होणाऱ्या प्रदीर्घ कष्टप्रद उत्थानातून जाण्याशिवाय पर्याय नसतो. त्याला उत्क्रांतीच्या युगायुगातून व अगणित योनींमधून पूनर्जन्म घेत व परत क्रमशः धिराने भूमिकांमधून उत्क्रमित होण्याशिवाय पर्याय रहात नाही. चवथ्या भूमिकेवरील शक्तीचा दुरुपयोग केला तरच हे चेतनेचे छिन्नभिन्न होणे केवळ चवथ्या भूमिकेवरील चेतनेच्या बाबतीतच घडते आणि तेही फारच क्वचित घडते. ही वस्तुस्थिती आहे की, साधारणपणे चेतना एकदा प्राप्त केली की, ती कधीच नष्ट होत नाही. परंतु चवथ्या भूमिकेवरील चेतनेच्या संदर्भात हा एकमेव अपवाद आहे.

आत्म्याने त्याच्या अधिकारात असलेल्या शक्तींचा गैरवापर केला नाही व इच्छा–वासनांना बळी न पडता त्यांचा सत्कार्यार्थ उपयोग केला तर चेतनेच्या अधिक पुढील आत्मानुवर्ती उत्क्रांतीमुळे सूक्ष्म चेतन मानवी आत्म्याची चेतना मनोजगताच्या पाचव्या भूमिकेचा अनुभव एकदम टाळून मनोजगताच्या सहाव्या भूमिकेचा कधी कधी प्रत्यक्ष अनुभव घेते.*

परंतु जर ही चेनेच्या चौथ्या भूमिकेवरील आत्म्याची चेतना चौथ्या भूमिकेवरील शक्तीचा उपयोग करीत नसेल व दुरुपयोगही करीत नसेल तर क्रमशः चेतनेच्या अधिक पुढील आत्मानुवर्ती उत्क्रांतीबरोबर चौथ्या

---

* (टीप– पाचव्या व सहाव्या भूमिकेचा अंतरभाव असलेल्या मनोजगतातील प्रवेशाची तुलना उंबरठा (चेतनेची चवथी भूमिका) ओलांडल्यानंतर खोलीत केलेल्या प्रवेशाशी करता येईल.)

भूमिकेवरील सूक्ष्म चेतन मानवी आत्मा चौथ्या भूमिकेच्या उंबरठा ओलांडतो व मनोजगताच्या पाचव्या भूमिकेत प्रवेश करतो.

**पाचवी व सहावी भूमिका**

चवथ्या भूमिकेतील सूक्ष्मचेतन मानवी आत्म्याच्या चेतनेच्या अधिकतर आत्मानुवर्ती उत्क्रांतीबरोबर सूक्ष्मचेतन मानवी आत्म्याची चेतना मनोभूमिकांच्या मनाशी एकरुप होते व मनोजगताचा अनुभव घेते.

मनोभूमिकांच्या या ''मनाचे'' दोन विभाग (कक्ष) आहेत. प्रथम कक्षात 'मनाची' अवस्था चौकस किंवा मननशील असते. या अवस्थेत मन 'विचार' म्हणून कार्य करते. जसे उच्च विचार, क्षूद्रविचार, चांगले विचार, वाईट विचार, भौतिक विचार, आध्यात्मिक विचार इत्यादी

व्दितीय कक्षात मनाची अवस्था प्रभावदर्शक व सहानुभूती दर्शक असते. या अवस्थेत मन 'भावना' म्हणून कार्य करते. जसे दुःखाची भावना, संवेदना, इच्छा–वासना, आर्ततेची भावना, व्यथा व वियोगाची भावना इत्यादी.

मनोजगताच्या मनाची ज्या अर्थी दोन कार्ये आहेत तर हे आवश्यक आहे की, मनाच्या क्षेत्रातील (म्हणजे मनोजगतातील) अनुभव देखील स्पष्टपणे दोन प्रकारचे असले पाहिजेत.

अशा प्रकारे मनोजगताचे दोन क्षेत्रं आहेत. विचारांच्या चेतनेचे पाचव्या भूमिकेचे क्षेत्र व भावनेच्या* चेतनेचे सहाव्या भूमिकेचे क्षेत्र म्हणून मनःचेतन, मानवी आत्म्याची पाचव्या भूमिकेतील[७] चेतना मनाच्या केवळ प्रथम कक्षाशी एकरुपत्व साधते व मनाच्या फक्त त्या अवस्थेबद्दल सचेत असते की, जी अवस्ता चौकस किंवा मननशील आहे. अशा प्रकारे पाचव्या भूमिकेचा मनःचेतन मनवी आत्मा हा विचारांचा निर्माता व विचारांवर प्रभुत्व ठेवणारा स्वामी आहे. तो सर्व स्थूल व सूक्ष्म चेतन आत्म्यांच्या केवळ विचारांवर नियंत्रण करण्यास समर्थ असतो. याचा अर्थ बहुधा चुकीचा लावला जातो की, हा आत्मा सर्व स्थूल व सूक्ष्म चेतन आत्म्यांच्या मनांना नियंत्रणात ठेवतो. (तो समग्र मनाला नियंत्रणात

* (टीप– आत्मानुवर्ती उत्क्रांत होणाऱ्या पाचव्या व सहाव्या भूमिकांच्या चेतनेतील फरकाची तुलना खोलीत (मनोजगतात) प्रवेश करणाऱ्या मनुष्याच्या दृष्टीकोनातील फरकाशी करता येईल. खोलीत प्रवेश केल्यानर मनुष्य आपल्या समोर सरळ पाहात असेल तर तो परमात्म्याला सहज समोरासमोर पाहतो, जेणे करुन त्याला सहाव्या भूमिकेची चेतना सरळसरळ प्राप्त होते, परंतु त्याची नजर जर खोलीच्या एखाद्या कोपऱ्यावर केन्द्रित झाली तर तो प्रथम केवळ पाचव्या भूमिकेची चेतना प्राप्त करतो.)

ठेवत नाही तर केवळ त्याच मनाच्या अवस्थेचे नियंत्रण करतो ज्या अवस्थेत मन केवळ विचार म्हणून कार्य करते.)

चेतनेच्या पाचव्या भूमिकेतील मनःचेतन मानवी आत्मा आपल्या चौकस व मननशील मनाशी एकरुपत्व साधत असताना, केवळ विचारांना उत्पन्न करतो. तो स्वतः मनाच्या दुसऱ्या अवस्थेतेशी एकरुप होत नाही. त्यामुळे संवेदना–भावना व इच्छावासनांवर प्रभूत्व प्रस्थापित करण्यास असमर्थ असतो.

तथापि पाचव्या भूमिकेतील मनःचेतन मानवी आत्मा चेतनेची अधिकतर आत्मानुवर्ती उत्क्रांती करीत असताना सहाव्या भूमिकेत मनोजगताच्या मनाच्या दुसऱ्या अवस्थेची चेतना प्राप्त करतो व अशा प्रकारे स्वतः दुसऱ्या स्थितीतील त्या मनाशी एकरुपता करण्यासाठी प्रवृत्त होतो. – प्रभावी व सहानुभूतीपूर्ण (संवेदनशील) मन अशा प्रकारे मनःचेतन मानवी आत्म्याच्या चेतनेने मनोजगताच्या सहाव्या भूमिकेतील चेतनेला समाविष्ट करुन घेतले.

सहाव्या भूमिकेतील चेतना असलेला मनःचेतन मानवीआत्मा मनाच्या भावनेच्या संपूर्ण चेतनेद्वारां मनोजगातचा अनुभव घेतो व अशाप्रकारे या अवस्थेत विचारांचा पूर्ण अभाव असतो. परंतु प्रत्यक्षात तो असा अनुभव घेतो व त्याला असे वाटते की, तो परमेश्वराला अगदी समोरासमोर पहात आहे व त्याला परमेश्वर सतत सर्वठायी व सर्वत्र असल्याची जाणीव होते. तो परमेश्वराला सतत पहात* असतो. परंतु तो परमात्म्यात स्वतःला परमात्मा म्हणून पाहू शकत नाही म्हणून तो परमात्म्याला पाहण्याच्या आपल्या अनुभूतीचा ताळमेळ परमात्म्याशी आपल्या स्वतःच्या एकरुपतेशी पटवून घेऊ शकत नाही आणि म्हणून तो ज्या परमात्म्यास समोरासमोर प्रत्यक्ष पहातो त्या परमात्म्याशी एकरुप होण्याकरिता त्याच्या ठिकाणी उत्कंठा, भाऊकता व व्यथा (तडफड) उत्पन्न होते. मनाच्या दुसऱ्या भावनेच्या अवस्थेशी हे एकरुप होणे हा दैवी प्रेमाचा प्रभावी पैलू होय जो सरते शेवटी परमात्म्यात विलीन होण्यास अग्रेसर होतो.

मनोजगताची पाचवी भूमिका ही विचारांच्या पूर्ण चेतनेची अवस्था होय,

---

* (टीप– एखादी सामान्य वस्तू सामान्यपणे आपण पाहतो, त्या प्रकारच्या पाहण्याशी या पाहण्याचा गोंधळ करु नये. परमात्म्याला समोरासमोर पहाणे हे मनोभूमिकेच्या एकमेव ज्ञानेंद्रियांव्दारां समजणे होय, व हे ज्ञानेंद्रिय ''पाहण्याचे'' आहे. येथे पथिकाला अंतर्ज्ञानाने परमात्म्याची ओळख पटते)

त्यामुळे येथे केवळ विचारांच्या निर्मितीवर व नियंत्रणावरील प्रभूत्व प्रस्थापित होते व उलट पक्षी संवेदना किंवा भावना व विचारावर प्रभूत्व व नियंत्रण प्रस्थापित होत नाही.

मनोजगताची सहावी भूमिका ही भावनावेगाच्या पूर्ण चेतनेची अवस्था आहे व अशाप्रकारे भावनेच्या निर्मिती व नियंत्रणावर स्वामित्व प्रस्थापित केले जाते व भावनेच्या क्षेत्रात एकही विचाराला आत शिरण्याची संधी मिळू शकत नाही. सहाव्या भूमिकेवरील चेतना विचाररहित असते आणि स्थूल व सूक्ष्म चेतन आत्म्यांच्या भावनावेगास नियंत्रित करते, याचा बहुधा चुकिचा अर्थ लावला जातो की, सर्व स्थूल व सूक्ष्म सचेत आत्म्यांच्या अंतःकरणावर चेतनेचे प्रभूत्व असते. (सहाव्या भूमिकेची चेतना असणारा आत्मा तथाकथित अंतःकरण नियंत्रित किंवा नियमीत करीत नाही. परंतु मनोभूमिकेवरील मनाच्या त्या अवस्थेला नियंत्रित व शासित करतो, जी भावना व इच्छांची संवेदना उत्पन्न करते.)

सहाव्या भूमिकेत परमेश्वरावरील प्रेम व त्याच्याशी एकरुप होण्याची इच्छा प्रत्यक्षात व पूर्णतः दर्शविल्या जाते. जेव्हा मनोजगताची सहावी भूमिका देखील पार केल्या गेलेली असते तेव्हा भ्रम नष्ट होतो व परमात्म्याचा साक्षात्कार होतो.

आत्मा जेव्हा मानवी देहात मनःचेतन* असतो तेंव्हा त्याला स्थूल व सूक्ष्म देहांचे भान नसते, परंतु तो प्रत्यक्षात नव्हे तर मनोभूमिकेवर स्थूल व सूक्ष्म देहांव्दारां कार्य करतोच म्हणून जरी मनःचेतन मानवी आत्मा स्थूल व सूक्ष्म शरीरांबद्दल अचेत असला व त्यामुळे स्थूल व सूक्ष्म जगतांचा अनुभव घेत नसला तरी तो अजाणतेपणे स्थूल देहाचा स्थूलाच्या विविध पैलूंव्दारां उपयोग करतो व त्यामुळे तो खाताना, पिताना, झोपताना, पाहताना, ऐकताना व स्पर्शानुभव करताना अगदी साधारण स्थूल चेतन मानवी प्राण्याप्रमाणे दिसत असला तरी तो आपल्या मनो–ज्ञानेद्रियाव्दारां ''पाहण्याच्या'' शक्ति बरोबर केवळ मनोजगता बद्दल सतत सचेत असतो. त्याचप्रमाणे तो अजाणतेपणे सूक्ष्मांच्या शक्तीचा विविध स्थूल पैलूंव्दारां अनुशक्तीच्या व अन्य शक्तीच्या

* (हे देखील पहा– ''मेंटल कॉन्शसनेस'' ''दि एव्हरिथिंग ॲण्ड दि नथिंग'' (न्यू साऊथ वेल्स ऑस्ट्रेलिया) मेहेर हाऊस पब्लिकेशन, १९६३) पृष्ठे ६३–६५– संपादक)

रुपात उपयोग करतो. परंतु त्याला सर्वकाळ मनोज्ञानेद्रियाव्दारां केवळ 'पहाण्याची' चेतना असते. मनःचेतन मानवी आत्म्यााल मनोजगतात केवळ एकच ज्ञानेंद्रिंय असते व ते असते 'पहाण्याचे'

अशाप्रकारे पाचव्या भूमिकेतील हा मनःचेतन मानवी आत्मा मनोदेहाने किंवा मनाने मनोजगताच्या पहिल्या अवस्थेचा अनुभव घेतो व मनाच्या पहिल्या अस्वस्थेची चेतना प्राप्त करतो. या ठिकाणी हा आत्मा मनाच्या पहिल्या अवस्थेस (म्हणजे स्थूलचेतन व सूक्ष्मचेतन मानवी आत्म्याचे विचार) नियंत्रित करण्यास समर्थ असतो. परंतु आता सूक्ष्म जगताच्या अनंत शक्तीच्या व अपरिमित प्राणशक्तीच्या विषयी पूर्णपणे अचेत असल्यामुळे तो कसलेही चमत्कार करण्यास पूर्णपणे असमर्थ असतो. असे असले तरी जसा हा मनःचेतन आत्मा सूक्ष्म चेतन मानवी आत्म्यांच्या मनाच्या पहिल्या कक्षेचे नियंत्रण करतो तशी सूक्ष्मचेतन मानवी आत्म्याची चमत्कार करण्याची उत्तेजना मनःचेतन मानवी आत्म्याच्या मनाच्या इच्छे किंवा अभिलाषे प्रमाणे थांबविल्या जाते, नियंत्रित केल्या जाते किंवा वाढविल्या जाते. मनःचेतन मानवी आत्मा जो इतरांच्या मनाचे विचार निर्माण व नियंत्रित करण्यास समर्थ असतो परंतु तो स्वतः स्थिर असतो व तो कधीच चेतनेच्या कोणत्याही निकृष्ट स्तरावर घसरु शकत नाही.

मनःचेतन मानवी आत्म्याच्या चेतनेची आत्मानुवर्ती उत्क्रांती क्रमाक्रमाने जसजशी अधिकतर व अधिकतर प्रगत होत जाते तसा तो आत्मा मनाच्या दुसऱ्या अवस्थेच्या (भावनेचा) स्वामित्वाचा अनुभव घेतो आणि तो आता मन अथवा मनोदेहाबद्दल पूर्णपणे सचेत होतो व सहाव्या भूमिकेवर समग्र मनोदेहाचा अनुभव घेतो. हा अनुभव परमात्म्याला समोरासमोर 'पाहण्याचा' व परमात्मा सर्व ठिकाणी व सर्वात 'पाहण्याचा' असतो.

आत्म्याच्या चेतनेचे बहुविध व परस्पर विरोधी संस्कारांचे अनुभव कमी व अधीक कमी होत गेले व ते संस्कार क्षीणतर व क्षीणतर होत गेले तेव्हा अगदी प्रथम भूमिकेपासून तो थेट सहाव्याह भूमिकेपर्यंत आत्म्याच्या चेतनेची आत्मानुवर्ती उत्क्रांतीची प्रगती क्रमशः व सावकाश होत गेली.

सहाव्या भूमिकेवरील आत्म्याची उत्क्रांत चेतना फक्त परस्परविरोधी

संस्कारांचे उरलेले शेवटचे लवलेश वगळता प्रत्यक्षात मुळीच संस्कार शिल्लक नसताना, मनोशरीराबद्दल पूर्णपणे सचेत होई पर्यंत व मनोजगताचा संपूर्ण अनुभव घेई पर्यंत आत्म्याच्या चेतनेची आत्मानुवर्ती उत्क्रांतीची जरजशी प्रगती होत गेली तसतशे विविध परस्पर विरोधी संस्कार क्रमशः विरळ व कमजोर होत गेले. म्हणजेच आत्मानुवर्ती उत्क्रंत चेतना मनाशी पूर्णतः एकरुप होते आणि आत्मा स्वतः 'मन' आहे हे अनुभविण्यास प्रवृत्त होतो. आणि हा आत्मा मन म्हणून शेवटला संपूर्ण संस्कार अनुभवतो की, तो परमात्म्याला समोरासमोर सर्वात पहातो परंतु स्वतःला मात्र परमात्म्यात पाहू शकत नाही.

बहुंतांश संस्काररहित* असलेला व केवळ मनाबद्दल सचेतन असलेला सहाव्या भूमिकेचा हा मनःचेतन मानवी आत्मा आता परमात्म्याला समोरासमोर पहातो आणि परमेश्वराला सर्वात पहातो. परंतु स्वतःला मात्र परमेश्वरात पाहात नाही, कारण तो अजुनही मनः सचेत असल्यामुळे तो स्वतःला 'मन' म्हणूनच समजतो. हा मनःसचेत मानवी आत्मा स्वतः मनाशी साहचर्य करतो व मन म्हणून स्वतः सचेत असतो आणि अजुनही आपण परमेश्वरापेक्षा काही वेगळे आहोत असे समजतो. स्थूल आणि सूक्ष्मचेतन असलेला मानवी आत्मा ज्याप्रमाणे स्थूल व सूक्ष्म जगताच्या वस्तू पहातो, त्यापेक्षाही अधिक स्पष्टपणे व अंतरबाह्य स्वरुपात हा सहाव्या भूमिकेवरील मनःचेतन मानवी आत्मा प्रत्यक्षात परमेश्वराला समोरासमोर पहातो.

या ठिकाणी आत्म्याची  चेतना, जिने विविध असंख्य आणि परस्पर विरोधी संस्कारांचे अनुभव घेतलेले आहेत, ती चेतना आता पसस्पर, विरोधी असणाऱ्या व्दंव्दात्मक संस्कारांच्या अखेरच्या अवशेषांचा अनुभव घेते. हा सहाव्या भूमिकेचा मनःचेतन मानवी आत्मा अनुजनही व्दैताचे भान ठेऊन स्वतःला परमेश्वरापासून वेगळे मानतो व स्वतःला 'मन' म्हणून समजतो.[१]

---

* (टीप– दुखणारा दात जो हळूहळू ढिला होत जातो परंतु बरेच दिवसपर्यंत पडत नाही अगदी या प्रमाणे खोटा अहं (Ego) पहिल्या आध्यात्मिक प्रवासाच्या शेवटच्या अवस्थेपर्यंत टिकून राहतो व आत्मा जसजसा आध्यात्मिक मार्गावर पुढे जात राहतो तसतसा तो जास्तीतजास्त क्षीण होत जातो व हे केवळ नेहमीकरिता सातव्या भूमिकेच्या अंतिम फना (मनोनाश) मध्ये लोप पावण्यासाठी व त्याची जागा अमर्याद 'सत्य–अहंने' घेतली जावी या साठी असते.)

**सातवी भूमिका**

मनाची चेतना असलेल्या मानवी आत्म्याच्या चेतनेची अंतिम आत्मानुर्ती उत्क्रांती जो पर्यंत आत्म्याला मनापासून वेगळे करण्याच्या अवस्थेपर्यंत पोहोचत नाही, (कारण मनाच्या चेतनेने परमेश्वराला एक वेगळे अस्तित्व दिले होते.) व स्वतःच्या 'स्व' शी– आत्म्याशी साहचर्य करावयास भाग पाडत नाही, तो पर्यंत हा व्दैताचा अनुभव रेंगाळत रहातो.

अशाप्रकारे आत्म्याची चेतना सरते शेवटी आता सातव्या भूमिकेच्या चेतनेचा अनुभव घेते असे म्हटले जाते. या ठिकाणी सातव्या भूमिकेवर 'स्व' चेतन मानवी आत्मा 'परमात्मा' म्हणून स्वतःबद्दल सचेत असतो आणि तो अनंत शक्ती, अनंत ज्ञान व अनंत परमानंदाचा अनुभव घेतो.

स्वप्रयत्नाने* सहावी भूमिका पार करुन मनःचेतन मानवी आत्म्याला सातव्या भूमिकेचा अनुभव घेणे हे अगदी अशक्य आहे.[१०] या ठिकाणी मनःचेतन मानवी आत्म्याला मनाच्या चेतनेपासून वेगळे करण्यासाठी व अनंत अवस्थेशी त्याचे ऐक्य अनुभविण्यासाटी, जाणीवपूर्वक अपरिमित परमानंदाचा अनुभव घेण्यासाठी व तसेच तो (आत्मा) शाश्वतरितीने परमानंदातच सामावलेला होता हे अनुभविण्यासाठी सद्गुरुची कृपा आवश्यक आहे.

अशा प्रकारे सातव्या भूमिकेवरील 'स्व' चेतन (आत्मज्ञानी) मानवी आत्म्याला अपरिमित व शाश्वत म्हणून 'स्व' बद्दल आता पूर्ण चेतना असते व तो प्राणशक्तीच्या उगमस्थानाबद्दल व मनाबद्दल सुद्धा सचेत असतो जे दुसरे काही नसून त्याच्या स्वतःच्या अपरिमित शक्तीचे व अपरिमित ज्ञानाचे छायावत पैलू होते.

आत्मसाक्षात्कार किंवा परमेश्वर–साक्षात्कार झालेला हा 'स्व' चेतन मानवी आत्मा अपरिमित शक्तीचा, ज्ञानाचा व परमानंदाचाच केवळ अनुभव घेत नाही तर एकाच वेळी त्याचे प्रसारण (Radiate) करतो. असे 'स्व' चेतन मानवी आत्मे देखील कधी कधी ह्या अपरिमित शक्तीचा, ज्ञानाचा व परमानंदाचा काहींच्या बाबतीत प्रत्यक्षपणे व जाणीवपूर्वक उपयोग करतात,

---

* (टीप– तथापि चेतनेच्या सहाव्या भूमिकेत जे असतात ते आपले शरीर सोडण्याचे वेळी परमात्म्याच्या साक्षात्काराचा अनुभव घेतात.)

तसेच इतर आत्म्यांना त्यांच्या संस्कारापासून व त्यांच्या संबंधीत स्थूल, सूक्ष्म व मनोदेह व जगातांच्या साहचर्या पासून मुक्त करण्यासाठी ह्या शक्तीचा उपयोग करतात.

परमात्म्याला आपल्या स्वतःच्या अनंत अवस्थेचे भान नसल्यामुळे व्यक्तिगत शाश्वत आत्म्याने (म्हणजे जीवात्म्याने) आत्मचेतना प्राप्त करण्याचे प्रयत्नात असंख्य आणि विविध संस्कार साठविले व अनुभविले. तो जीवात्मा या पूर्ण प्रयत्नात परिमित आणि क्षणिक अस्तित्वाशी निगडीत झाला, तसेच स्थूल जगताच्या स्थूल चेतनेची उत्क्रांती होत असताना आणि सूक्ष्म व मनोजगताच्या मनो भूमिकांच्या चेतनेची आत्मानुवर्ती उत्क्रांती होत असताना, स्थूल, सूक्ष्म व मनोजगतांची तो जीवात्मा उकल करीत गेला.

सद्गुरुंच्या कृपेने आपल्या कळसावर पोहोचलेल्या आत्म्याच्या चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीने आत्म्याला परमात्म्यामध्ये* आपल्या अनंत अवस्थेच्या आत्मसाक्षात्कारा प्रत नेले.

आत्म्याच्या चेतनेने अशा प्रकारे जेंव्हा 'स्व' चेतना प्राप्त केली व अनंत शक्ती, ज्ञान व परमानंदाचा अनुभव घेतला तेव्हा आत्म्याला त्याचे शाश्वतरीतीने अस्तित्व असल्याची अनुभूती झाली, 'स्व' चेतना प्राप्त करण्यासाठी घ्याव्या लागणाऱ्या प्रयत्नात स्थूल, सूक्ष्म व मनोदेहाचे व जगताचे संस्कार, अनुभव व साहचर्य हे दुसरे तिसरे काही नसून खचितच निरर्थक स्वप्न होते, तसेच स्थूल देहाशी, प्राणिमात्रांशी व मानवी प्राण्यांशी केलेली एकरुपता तसेच तीन जगताचे व सहा भूमिकांचे त्यांच्या सर्व लवाजम्यासह घेतलेले सर्व अनुभव, आत्म्याची चेतना जो पर्यंत अपरिपक्व होती तोपर्यंत याचे अस्तित्व सापेक्षरित्या आधारित केले गेले होते व राखले गेले होते. चेतनेची पूर्ण आत्मानुवर्ती उत्क्रांती झाल्यावर परिपक्वता केवळ सातव्या भूमिकेवरच प्राप्त झाली. यामुळे आत्म्याला 'स्व' चा (आत्म्याचा) साक्षात्कार झाला किंवा यामुळे आत्म्याला परमात्म्याच्या साक्षात्काराबद्दल पूर्णपणे चेतना प्राप्त झाली. दुसऱ्या

* (टीप– सौ बार तेरा दामन हाथोंमें मेरे आया जब आँख खुली देखा अपना ही गरीबाँ है – असगर ''मला शंभरवेळा असे वाटले की, तुझा दामन मी हाताने घट्ट पकडलेला आहे. मी माझे डोळे जेव्हा उघडले तेव्हा मला आश्चर्य वाटले की, मी पकडलेला दामन माझाच होता.'')

शब्दात, परमात्म्यातील आत्म्याची स्वतःची अनंत स्थिती जाणीवपूर्वक अनुभवली गेली.*

मनाच्या केवळ अंतिम नाशानंतर व मनोसंस्कारांचा पडदा झिजून निरुपयोगी झाल्यानंतर चेतना संस्कारिक बंधनापासून पूर्णतः मुक्तपणे कार्य करु शकते. याचा अर्थ असा आहे की, अगाध अशी खोल दरी पार करणे जी सहाव्या भूमिकेला सातव्या भूमिके पासून वेगळी करते. सातवी भूमिका श्रेष्ठातील सर्वश्रेष्ठाचे** निराकार निवासस्थान आहे. कल्पनेचे समग्र क्षेत्र पार केल्यानंतरच सर्वांत श्रेष्ठ किंवा अनंत परमात्म्याच्या सत्य स्वरुपाचा साक्षात्कार शक्य होतो. केवळ या सातव्या भूमिकेवर आत्म्याने आपल्या 'स्व' मध्ये अनंत ज्ञान, अनंत सत्य, अनंत शक्ती व अनंत आनंदाने संपन्न अशा अपरिवर्तनशील, शाश्वत, अविभाज्य तसेच निराकार परमात्म्याशी एकरुप असल्याचा अनुभव केल्यावरच 'स्व' च्या आत्मज्ञान प्राप्ती करिता उत्पन्न झालेल्या मूळ लहरीचा उद्देश पूर्ण होतो.

* * *

---

* (परमात्म्याचा साक्षात्कार झालेला मनुष्य हा सर्व शक्तीमान परमात्मा आहे. या शिवाय ज्याचेजवळ अधिक ज्ञान व चेतना आहे. तो पूर्णतः जागृतावस्थेत असतो. तो ज्ञान, ज्ञाता व ज्ञेय आहे. प्रेम, प्रेमी व प्रियतम आहे. तो प्रत्येक जीवात्म्यात आहे व प्रत्येकजण त्याच्यात आहे, हे तो जाणतो. परमात्म्याचा साक्षात्कार झालेल्या मनुष्याला हे माहीत आहे की, तो (आत्म्याच्या) अस्तित्वाचा आद्य आहे आणि अंत आहे. तो सदैव तोच तो होता आणि सत्याचा अनंत महासागर म्हणून सदैव राहिल. परंतु साधारण मनुष्याला तो कोठून आला व कोठे जाणार हे माहित नसते.)

** ('पक्षांचे सम्मेलन' या नावाने सामान्यपणे प्रसिध्द असलेली फरिदुद्दीन अत्तार लिखित ''मन्तिक–उत–तायर'' मधील ही सुफी बोधकथा वाचकांनी पहावी ज्यामध्ये भूमिकांमधील प्रवासाचे मनोवेधक वर्णन आहे. – संपादक)

# भाग ६
# दिव्य चेतनेच्या अवस्थांचा गोषवारा

मानव देह घेतल्यानंतर व संपूर्ण चेतना प्राप्त केल्यानंतर आत्म्याची ती पूर्ण चेतना परमाम्याचा अनुभव घेण्यासाठी आतुर झालेली असली तरी परमात्म्याचा अनुभव अजुनही आत्मा घेत नाही. संपूर्ण चेतना जरी प्राप्त केली असली तरी ही चेतना जोपर्यंत स्थूल संस्कारात केन्द्रित झालेली असते तो पर्यंत आत्मा अपरिहार्यपणे स्थूल शरीराबद्दल सचेत असतो व म्हणून त्याने स्थूल जगताचा अनुभव घेतलाच पाहिजे.

आत्म्याला सूक्ष्म व मनोशरीरांची व 'स्व' ची (सत्य स्वरुपाची) चेतना प्राप्त करणे मानव देहाशिवाय अशक्य आहे. त्याचप्रमाणे सूक्ष्म जगताचा, मनोजगताचा व परमात्म्याचा अनुभव घेणे आत्म्याला अशक्यच आहे. चेतनेच्या उत्क्रांतीसाठी व शरीरांच्या उत्क्रांतीसाठी तसेच स्थूल जगताचा अनुभव घेण्यासाठी स्थूल संस्कार असणे अत्यंत आवश्यक असतात आणि जोपर्यंत स्थूल संस्कार असतात तो पर्यंत आत्म्याला सूक्ष्म व मनोशरीराचे भान नसते.

मानव योनीत, संपूर्ण चेतनेच्या उत्क्रांतीमुळे आणि मानव प्राण्याच्या रुपात परिपूर्ण शरीराच्या उत्क्रांतीमुळे आणि स्थूल जगताचा संपूर्ण अनुभव घेतल्यामुळे आता स्थूल संस्कारांची अधिक आवश्यकता नसते. स्थूल संस्कार हे सूक्ष्म संस्कार होऊ शकतात, सूक्ष्म संस्कार हे मनोसंस्कार होऊ शकतात व मनोसंस्कार हे नाहिसे होऊ शकतात म्हणून मानव देहात आत्म्याला सूक्ष्म आणि मनोशरीर व स्वतःच्या आत्म्याची चेतना असू शकते आणि त्याला सूक्ष्म जगताचा, मनोजगताचा व परमात्म्याचा अनुभव असू शकतो. परंतु शोकांतिका अशी आहे की, मानवयोनीत पूर्ण चेतना प्राप्त केल्यानंतर आत्मा सूक्ष्म (प्राण) व मनोशरीराची व 'स्व' ची त्वरित चेतना प्राप्त करीत नाही व त्याच प्रमाणे सूक्ष्म व मनोजगताचा अनुभव घेत नाही व तसेच त्याला परमात्म्याचा अनुभव नसतो. याचे कारण असे आहे की, मानवयोनीत आत्म्याने पूर्ण चेतना प्राप्त केल्यावर स्थूल संस्कार हे सूक्ष्म संस्कार किंवा मनोसंस्कार होऊन त्वरित नाहिसे होत नाहीत. याचे कारण हे आहे की, शेवटच्या प्राण्यापासून बनलेला पहिला मानव देह जेव्हा त्यागला जातो तेव्हा पहिल्या मानव देहाच्या संस्कारांचा वारसा पाठीमागे सोडल्या जातो व नंतर जन्माला येणारा प्रत्येक मानव देव हा आधिच्या

मानव देहाच्या संस्कारापासून घडविला जातो. म्हणून आत्म्याला पूर्ण चेतना असली तरी जो पर्यंत स्थूल संस्कार अस्तित्वात असतात तो पर्यंत तो असंख्य मानव देह घेतो.

सरते शेवटी दोन पैकी एक गोष्ट घडते. आत्म्याचे स्थूल संस्कार अचानकपणे पूर्णपणे नाहिसे होतील व स्थूल शरीराची चेतना गमावून आत्मा 'स्व' ची चेतना प्राप्त करील, अशा प्रकारे स्थूल जगताचा अनुभव गमावून आत्मा परमात्म्याचा अनुभव प्राप्त करील किंवा दुसरी जास्त संभाव्य गोष्ट अशी आहे की, सरते शेवटी स्थूल संस्कार जीर्ण होऊन सूक्ष्म संस्कार बनतील व सूक्ष्म संस्कार अधिक निःष्प्रभ होऊन मनोसंस्कार बनतील व शेवटी मनोसंस्कार अशा प्रमाणात जीर्ण होतील की, ते नाहिसे होतील. अशा वेळेस आत्मा प्रथम स्थूल शरीराची चेतना व स्थूल जगताचे अनुभव हरवून सूक्ष्म शरीराची चेतना व सूक्ष्म जगताचे अनुभव प्राप्त करतो, नंतर आत्मा सूक्ष्म शरिराची चेतना हरवतो व मनोशरीराची चेतना प्राप्त करतो आणि सूक्ष्म जगताचे अनुभव विसरतो व मनोजगताचा अनुभव प्राप्त करतो. अगदी शेवटी आत्मा मनोशरिराची चेतना हरवितो व त्यामुळे आत्मा स्वतः आपली चेतना प्राप्त करीत मनोजगताचे अनुभव गमावून परमात्म्याचा अनुभव घेतो.

आत्म्याने 'स्व' चेतना प्राप्त केल्यानंतर व परमात्म्याचा अनुभव घेतल्यानंतर आत्मा तीन अवस्थांपैकी (दोन किंवा चार अवस्था नाही, परंतु तीन अवस्था मात्र निश्चित पणे) एक वारसा हक्काने स्वीकारतो.

**प्रथम अवस्था अः**

श्रेष्ठातील सर्वश्रेष्ठांचा अनुभव प्राप्त झाल्यानंतर आत्मा तत्क्षणी सामान्यतः आपली सर्व छायामय शरीरे (स्थूल, सूक्ष्म व कारण किंवा मन) तत्क्षणी टाकून देतो, व परमात्म्याच्या अनंत शक्ती, अनंत ज्ञान व अनंत आनंदाच्या तत्सबंधी गुणांचा उपयोग न करता समग्र व्यक्तिगत अनुभवांचा शाश्वतरीतीने आनंद घेतो.

**प्रथम अवस्था बः**

आत्मा जरी ह्या शरीराबद्दल पूर्णपणे अचेत असला तरी तो ह्या तीन शरीरांचा त्यानंतर काही काळ पर्यंत कदाचित त्याग करणार नाही, आत्म्याची अवस्था प्रत्यक्षात ''अ'' सारखीच असते फक्त त्याने आपली शरीरे शिल्लक

(राखून) ठेवलेली असतात.

**दुसरी अवस्था:**

आत्मा तीनही शरीरे राखून ठेवतो व त्याच वेळेस आत्मचेतनेसह तो आपल्या तीन छायांबाबतही (स्थूल, सूक्ष्म व कारण शरीरे) सचेत असतो व परमात्म्याच्या अनंत शक्ती, अनंत ज्ञान व अनंद आनंदाचा अनुभव घेतो. तो स्थूल जगताचा, सूक्ष्म जगतांचा व मनोजगताचा देखील परमात्म्याच्या छाया म्हणून अनुभव घेतो. परंतु तो मनोचेतन, सूक्ष्मचेतन व स्थूल चेतन असलेल्या इतर आत्म्यांकरिता परमेश्वराच्या शक्तीचा, ज्ञानाचा व परमानंदाचा उपयोग करीत नाही. म्हणून तो स्वतंत्र असतो.

**तिसरी अवस्था :**

ही अवस्था अगदी तंतोतंत दुसऱ्या अवस्थे सारखीच आहे, फक्त फरक हा आहे की, या अवस्थेतील ’आत्मा’ स्थूल सचेत आत्मे, सूक्ष्म सचेत करण्यासाठी व सूक्ष्मसचेत आत्मे मनोसचेत करण्यासाठी व मनोसचेत आत्मे ’स्व’ सचेत करण्यासाठी आपल्या अनंत शक्ती, ज्ञान व परमानंदाचा उपयोग करतो व तसेच एका झटक्याने देखील स्थूल सचेत आत्म्यांना ’स्व’ सचेत करुन टाकतो.

**मानवदेहामध्ये सूक्ष्म व मनोदहांचा संपूर्ण विकास व चेतनेची आत्मानुवर्ती उत्क्रांती:–** केवळ मानव देहातच सूक्ष्म (प्राण) व मनोदेह (मन) पूर्णपणे विकसित झालेली असतात म्हणून स्थूल चेतन आत्मा जरी प्राण व मनाबद्दल अचेत असला तरी तो अप्रत्यक्षपणे प्राण आणि मनाचा स्थूल भूमिकेवर कार्यकरण्यासाठी उपयोग करतो. तेव्हा स्थूलचेतन मानवी आत्मा जरी प्राण व मनाबद्दल अचेत असला व त्यामुळे प्राणशक्ती व मनाचा अनुभव घेत नसला तरी तो प्राणशक्तीचा विविध पैलूंव्दारां (जसे अणूशक्ती) उपयोग करु शकतो व मनाचा विविध पैलूंव्दारां, जसे विचार, इच्छा व भावनांचा उपयोग करु शकतो.

मानव देहात जेव्हा आत्म्याला सूक्ष्म चेतना असते तेव्हा त्याला स्थूल व मनोदेहाचे (मन) भान नसते, तरी पण तो शरीर व मन यांचे माध्यमातून अप्रत्यक्षपणे असले तरी सूक्ष्म भूमिकेवर कार्य करतोच. सूक्ष्मचेतन मानवी

आत्म्याला जरी शरीराचे व मनाच भान नसले व त्यामुळे त्याला स्थूल आणि मनोजगताचे अनुभव नसले तरी तो स्थूलाचा स्थूलाच्या विविध पैलूव्दारा, जसे खाणे, पिणे, झोपणे, पाहणे, स्पर्शानुभव घेणे व ऐकणे इत्यादी उपयोग करतो, तसेच तो मनाचा मनाच्या विविध पैलूव्दारां, जसे विचार, इच्छा व भावनांचा उपयोग करतो.

मानव देहाता आत्म्याला जेव्हा मनोचेतना असते तेव्हा त्याला स्थूल शरीराबाबत व सूक्ष्म (प्राण) देहाबाबत भान नसले तरी तो शरीराचे व प्राणाचे माध्यमातून अप्रत्यक्षपणे असले तरी मनोभूमिकेवर कार्य करतो. अशाप्रकारे मनोचेतन मानवी आत्म्याला शरीर (स्थूल) व प्राणाबद्दल (सूक्ष्म शरीर) जरी भान नसले व त्यामुळे तो स्थूल व सूक्ष्म जगताचा अनुभव घेत नसला तरी तो स्थूलाचा स्थूलाच्या विविध पैलूव्दारां जसे खाणे, झोपणे, पाहणे, स्पर्शानुभव करणे, ऐकणे इत्यादी उपयोग करु शकतो आणि तो प्राणशक्तीचा तिच्या विविध पैलूव्दारां उपयोग करु शकतो जसे– अणूशक्ती संबंधी इत्यादी.

उपमा द्यावयाची असल्यास आपण उदाहरणार्थ स्थूलचेतन मानवी आत्म्याला पृथ्वीवरील एक आत्मा म्हणून विचारात घेऊ (ज्याला आपण स्थूल भूमिकेवर एक प्रमाण (standard) मानू जो आत्मा सूर्यापासून दूर फेकल्या गेला आहे, जो सूर्य आपण केवळ  उपमेसाठी घेतला आहे व सूक्ष्म भुवनाच्या प्राणशक्तीचा व मनोभुवनाच्या मनाचा स्त्रोत धरला आहे. (उपमेतील सूर्य व पृथ्वी, चुकुनही कधी सूर्य मंडळातील सूर्य व पृथ्वी समजू नये.)

हा जो सूर्य ज्याला आपण आपले एक प्रमाण (standard) स्वीकारले आहे, तो आपली प्राणशक्ती व मनाची किरणे एकाचवेळी सतत पृथ्वीवर (ज्या पृथ्वीला आपण स्थूलासाठी एक प्रमाण म्हणून घेतले आहे.) पसरवितो. जो केवळ स्थूल चेतन आहे असा पृथ्वीवरील स्थूल चेतन मानवी आत्मा, अजाणतेपणे सूर्यकिरणांपासून मिळालेली सूक्ष्माची प्राणशक्ती, स्थूल जगतात प्राणशक्तीच्या पैलूचा अणुशक्तीच्या रुपात पूर्णपणे उपयोग करीत ग्रहण करतो. हा पृथ्वीवरील स्थूल चेतन मानवी आत्मा, स्थूल जगतात अजाणतेपणे देखील मनाच्या पैलूचा जसे विचार, इच्छा व भावना यांचा उपयोग करतो, जे तो या सूर्यकिरणांपासून सुध्दा ग्रहण करतो.

आपण आता उपमापुढे चालू ठेवण्याचे दृष्टीने सूक्ष्म चेतन मानवी

आत्मा अंतरिक्षातील आत्मा म्हणून घेऊया. हा आत्मा आता पृथ्वीवरील स्थूलचेतन मानवी आत्म्यापेक्षा सूर्याच्या पुष्कळच जवळ आहे. या अंतरिक्षातील सूक्ष्मचेतन मानवी आत्म्याला केवळ सूक्ष्माची चेतना आहे. प्राणशक्तीचा स्त्रोत, असलेल्या या सूर्यापासून तो जाणीवपूर्वक संपूर्णपणे प्राणशक्ती घेतो व नुकत्याच प्रसृत झालेल्या या प्रचंड प्राणशक्तीचा जाणीवपूर्वक उपयोग करतो. अशाप्रकारे हा सूक्ष्मचेतन मानवी आत्मा प्रचंड शक्ती वापरण्यास समर्थ होतो व आंधळ्याला दृष्टी देण्यास किंवा अपंगाला अवयव देण्यास सक्षम होतो. हे क्षेत्र पहिल्या तीन भूमिकांचे आहे. दुसऱ्या व तिसऱ्या भूमिकांमध्ये ज्या प्रमाणात प्रचंड शक्ती प्राप्त केली असेल त्या प्रमाणात प्रचंड शक्ती प्रखरतेने मोकळी करण्यास या आत्म्याला क्षमता प्राप्त होते.

हा सूक्ष्म चेतन मानवी आत्मा प्राणशक्तीच्या क्षेत्रात नुकत्याच उदयास आलेल्या अवस्थेतील (Nascent state) प्राणशक्तीचा जाणीवपूर्वक उपयोग करीत असताना त्याला मनाचे भान नसते. त्यामुळे अजाणतेने तो मनाच्या पैलूंचा जसे विचार, इच्छा व भावना यांचा उपयोग करतो. अशाप्रकारे आपल्या प्राणशक्तीच्या चेतनेव्दारा प्रचंड शक्तीचा वापर करण्यास जरी तो समर्थ असला तरी मनाच्या पैलूंचा अजाणतेपणे उपयोग करीत असताना भावना प्रवणतेमुळे मनाच्या जाळ्यात फसतो. याच कारणामुळे हा सूक्ष्मचेतन मानवी आत्मा जरी बलाढ्य शक्तीसमृध्द असला तरी कधी कधी प्राणशक्तीचा चमत्कारदर्शक स्वरुपात जाणीवपूर्वक उपयोग करीत असताना तो खाली घसरुन सूक्ष्मचेतनेच्या निम्नतर स्तरावर पोहोचतो.

जास्त अचूकपणे सांगायचे झाल्यास सूक्ष्मचेतन मानवी आत्मा त्याने प्राप्त केलेल्या सूक्ष्मचेतनेच्या प्रमाणात तो एकतर पहिल्या, दुसऱ्या किंवा तिसऱ्या भूमिकेत असतो, किंवा एखादा असे म्हणू शकतो की, सूक्ष्म भूमिकेच्या क्षेत्रात पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या भूमिकांचा अंतर्भाव होतो आता चवथी भूमिका चेतनेची अशी अवस्था आहे की जी सूक्ष्म जगताच्या व मनोजगताच्या प्रदेशामधील सीमा दर्शक रेषा ओढते. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास चवथ्या भूमिकेवरील सूक्ष्मचेतन मानवी आत्मा (मनोजगताच्या) उंबरठ्यावर उभा असणाऱ्या मानवी आत्म्याप्रमाणे आहे, ज्या उंबरठ्यामुळे मनोजगतापासून सूक्ष्म जगताच्या मर्यादा ठरविल्या जातात.

म्हणून चवथ्या भूमिकेच्या चेतनेच्या पायरीवर असलेल्या सूक्ष्मचेतन मानवी आत्म्याला पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या भूमिकेची संपूर्ण चेतना असते व तो सूक्ष्म जगताचा पूर्ण अनुभव घेतो व त्यामुळे त्याला सूक्ष्म जगताच्या प्रचंड प्राणशक्तीची संपूर्ण जाणीव असते. अशाप्रकारे मनोजगताच्या उंबरठ्यावर असणारा हा मानवी आत्मा, अत्युच्च प्राणशक्तीवर अधिकार गाजवित असतानाच आता तो मनाच्या प्रदेशाच्या अगदीच जवळ असतो जे मन मनोजगत आहे व अशाप्रकारे मनाच्या पैलूंच्या प्रलोभी शक्तींबद्दल, म्हणजेच विचार, इच्छा व भावनेबद्दल तो अधिक ग्रहणक्षम असतो. हा चवथ्या भूमिकेवरील सूक्ष्म चेतन  मानवी आत्मा जरी सूक्ष्म जगतातील परमोच्च प्राणशक्तीचा जाणीवपूर्वक उपयोग करीत असला तरीही त्याला अजूनही मनाचे भान नसते म्हणून तो अजाणतेपणी मनाच्या पैलूंचा उपयोग करतो, जे पैलू आता अत्यंत बलिष्ठ आहेत व यामुळे या आत्म्याला मोहित करणारे आहेत. ज्या आत्म्याला वस्तुतः असे म्हणता येईल की, मनाच्या सर्वोच्च टोकावर पोहोचलेल्या (विचार, इच्छा, भावना) भयंकर वादळाला तोंड द्यावे लागते व ते सहन करावे लागते.

ही स्थिती चवथ्या भूमिकेवरील  मानवी आत्म्यासाठी अत्यंत धोक्याची आहे, कारण ती अत्यंत फसवी आहे. या ठिकाणी आत्मा सर्वोच्च प्राणशक्तीने सज्ज असतो व ती प्राणशक्ती अत्यंत चांगल्या कामासाठी किंव अत्यंत वाईट कामासाठी उपयोगात आणली जावू शकते. अशा सुसज्ज आत्म्याला सर्वोच्च टोकावर पोहोचलेल्या दोन शक्तींचा एक प्रकारे समतोल राखावा लागतो. सूक्ष्म जगताच्या प्राणशक्तीचे परमोच्च शिखर व मनोजगताच्या मनाच्या पैलूंचे बलिष्ठ शिखर ह्या त्या दोन शक्ती होत. चवथ्या भूमिकेवरील हा मानवी आत्मा जर मनाच्या पैलूंचा अजाणतेपणे उपयोग करुन ह्या पैलूंच्या (विचार, इच्छा व भावना) विवश करणाऱ्या प्रलोभनांना बळी पडला तर तो केवळ आपल्या प्रबळ इच्छांचा पूर्तीसाठी शिखरावर पोहोचलेल्या प्राणशक्तीचा अत्यंत वाईट गोष्टींकरिता शक्तिशाली चमत्कारांच्या रुपात प्रयोग करण्याचा मोह टाळू शकत नाही जसे मेलेल्याला जीवंत करणे, आंधळ्याला, आजाऱ्याला, अपंगाला रोगमुक्त करणे, इत्यादी तो रुपांच्या (of forms) संपूर्ण जगताची त्याच्या सर्व सृष्टीसह निर्माण करण्यास देखील समर्थ असतो इतकी चरमसीमेवर

पोहोचलेल्या प्राणशक्तीपासून प्राप्त केलेली शक्ती प्रचंड असते व हा सूक्ष्मचेतन मानवी आत्मा त्याबाबत सचेत असतो.

अशाप्रकारे शिखरावर पोहोचलेल्या मनाच्या पैलूंच्या विवश करणाऱ्या प्रबळ प्रलोभनांव्दारां केल्या गेलेला या चरमसीमवेर पोहचलेल्या प्राणशक्तीचा दुरुपयोग, दोन मूलभूत अलौकीक शक्तींमध्ये एक प्रकारे भयंकर दुरुस्त न होणारे शॉर्ट सर्किट (खंडित विद्युत प्रवाह) निर्माण करते. चरमसीमेवर पोहोचलेली प्राणशक्ती प्रचंड शक्तीच्या स्वरुपात व चरमसीमेवरील मनोशक्तीच्या दुर्दम्य इच्छांच्या स्वरुपात असलेल्या या दोन महान शक्तींच्या दुरुपयोगाचा परिणाम चवथ्या भूमिकेवरील सूक्ष्मचेतन मानवी आत्म्याच्या प्रगत चेतनेमध्ये कल्पनातीत भयंकर टक्कर व विस्फोट होण्यामध्ये होतो. या आत्म्याच्या चेतनेमध्ये परिपूर्ण गोंधळ अशा प्रकारे निर्मिला जातो की, ज्याचा परिणाम या मानवी आत्म्याची प्रगत चेतना पूर्णपणे छिन्नभिन्न होण्यामध्ये होतो. त्याचा परिणाम म्हणून सूक्ष्म चेतन मानवी आत्मा चेतनेच्या अगदी खालच्या पातळीवर निरपवादपणे अधःपतीत होतो. जी चेतना अगदीच सीमित प्रकारची अपक्व स्वरुपाची असते. यामुळे या मानवी आत्म्याला पाषाणयोनी स्वीकारावी लागते आणि पुन्हा उत्क्रांतीच्या प्रक्रियेतून जावे लागते.

**एका स्थूल चेतन वैज्ञानिकाचे उदाहरण–**

कधीकधी घडणाऱ्या एका दृष्टांताद्वारां आपण ही स्थिती स्पष्ट करण्याचा प्रयत्न करु, जो दृष्टांत प्रचंड शक्ती हाताळणाऱ्या सामान्य मानव प्राण्याच्या संदर्भात स्थूल भूमिकेवर कधीकधी घडतो, जो मानव प्रचंड शक्ती हाताळतो व आपल्या शक्तीचे प्रदर्शन करण्याच्या तीव्र इच्छेमुळे विवश झालेला असतो.

आता आपण चवथ्या भूमिकेवरील सूक्ष्मचेतन मानवी आत्म्याची तुलना वर वर्णिलेल्या स्थूल जगतातील एका महान नामांकित वैज्ञानिकाशी करुया. स्थूल भूमिकेची पूर्णतः जाणीव असल्यामुळे हा वैज्ञानिक केवळ प्रयत्नांची पराकाष्ठा करुन व विज्ञान क्षेत्रातील शक्तीचे परिक्षण करुन विशिष्ठ प्रयोगाद्वारा प्रचंड शक्ती मोकळी करण्याच्या शक्यतेचा पूर्णतः अनुभव घेतो.

आपल्या दुष्टांताच्या हेतू प्रित्यर्थ आपण गृहित धरुया की, प्रचंड शक्ती त्यांच्या आवाक्यात आहे व जी सरतेशेवटी त्याच्या पूर्णपणे नियंत्रणात येईल

याची क्रमशः या वैज्ञानिकाला पूर्ण जाणीव होते. नंतर त्याला त्या प्राणशक्तीचा उपयोग करण्याची तीव्र इच्छा होते.

स्थूल जगातील या स्थूल वैज्ञानिकाला प्राणशक्तीच्या सर्वोच्च संभाव्य स्थूल पैलूंची त्यावेळी जाणीव झाली तरी त्याला त्या प्राणशक्तीच्या प्रारंभीच्या अवस्थेची मुळीच जाणीव नसते, जी शक्ती केवळ सूक्ष्म जगताच्या क्षेत्राची असते व जी केवळ सूक्ष्मचेतन मानवी आत्माच अनुभवू शकतो व नियंत्रणात ठेवू शकतो व जिचा कधीच कोणत्याही परिस्थितीत प्रयोग करणे किंवा अनुभव घेणे स्थूल चेतन मानवी आत्म्याला शक्य होत नाही म्हणून स्थूल जगतात पृथ्वीवरील स्थूलचेतन वैज्ञानिकाला जेव्हा आण्विक शक्तीच्या सर्वोच्च संभाव्य स्थूल पैलूंबद्दल जाणीव असते, तेव्हा त्याला प्रत्यक्षात सूक्ष्मजगताच्या क्षेत्रातील केवळ सर्वोच्च स्थूल पैलूंपैकी फक्त एका सर्वोच्च स्थूल पैलूची जाणीव असते आणि जेव्हा हा वैज्ञानिक जो प्राणशक्तीच्या सर्वोच्च स्थूल पैलूंपैकी एका पैलूबद्दल सचेत असतो व जी शक्ती आता त्याचे संपूर्ण नियंत्रणात असते त्या शक्तीचा उपयोग करण्याची प्रबळ इच्छा त्याला संत्रस्त करुन टाकते जी इच्छा देखील मनोजगताच्या मनाची सर्वोच्च पैलू असते, तेव्हा त्या वैज्ञानिकाचे समग्र जीवन–भवितव्य अनिश्चित असते आणि ते अशाप्रकारे बहुधा पणाला लागलेले असते.

परस्पर विरोधी विचारांच्या अगदी अशाच पेच प्रसंगी ज्यावेळी असले विचार वैज्ञानिकाला एका बाजुने आपल्या शक्तीचे प्रदर्शन करण्यास उत्तेजित करतात व दुसऱ्या बाजुने संयमित होण्याकरिता शमवितात – शांत करतात, अशाच परस्पर विरोधी पेचप्रसंगी वैज्ञानिकाला अत्यंत काळजीपूर्वक समतोल राखावा लागतो. म्हणजेच त्याचे जवळ असलेल्या शक्तीच्या प्रचंड पैलूंचे संतुलन ठेवावे लागते. अशाप्रकारे एकतर जगाच्या कल्याणार्थ त्या शक्तीचा वापर करणे किंवा विध्वंसक परिणामासाठी दुरुपयोग करणे किंवा मुळीच उपयोग न करणे हे त्या वैज्ञानिकावर निर्भर असते. त्याला तीव्र इच्छांच्या स्वरुपातील मनाच्या दुर्दम्य व प्रभावी पैलूंच्या घटकांना धैर्याने तोंड द्यावे लागते. ज्या इच्छा शक्तीचे विध्वंसक व प्रलयंकारी स्वरुप व सामर्थ्य क्षमता लक्षात न घेता केवळ आपल्या स्वार्थापोटी त्याच्या अहंकाराला उत्तेजित करीत प्रसिद्धी, नावलौकिक व सामर्थ्य लालसेने प्रभावित झालेल्या तीव्र इच्छांच्या सामोरे जावे

लागते अशा परिस्थितीत वैज्ञानिक आता चरमसीमवेवर पोहोचलेल्या त्याच्या उत्कट इच्छेला जर बळी पडला व स्वार्थ हेतूसाठी प्राणशक्तीच्या सर्वोच्च पैलूंपैकी नियत्रित करणाऱ्या एका शक्तीचा गैरवापर करण्यास प्रवृत्त झाला तर अलिकडील हायड्रोजन बॉम्ब पेक्षाही, त्याचे नियंत्रणात असलेल्या अधिक शक्तिशाली व अतिशय मारक अस्त्रांचा विस्फोट करण्याच्या प्रयत्नाकडे तो अग्रेसर होतो.

अगदी याच ठिकाणी निर्णायक क्षण येतो. विनाशकारी परिणामांचा विस्तार करीत हा वैज्ञानिक आपल्या अस्त्रांचा विस्फोट करतो. अशाप्रकारे शक्तीचा वापर व तीव्र इच्छा या मधील जो समतोल मोठ्या प्रयासाने आता पर्यंत सांभाळला होतो तो पुर्णतः बिघडतो.

हा वैज्ञीनक स्वतःला सांभाळू शकला नाही व त्याच्या अस्त्रामधील अंतर्हित असलेल्या ज्या शक्तीने त्याला सुरक्षित ठेवले होते त्या शक्तीचा प्रचंड पैलू व जाणीवपूर्वक कल्पनातीत परिणामाकडे दुर्लक्ष करीत अस्त्रांचा विस्फोट करण्याची तीव्र इच्छा, या मधील समतोल किंवा संतुलन रावखण्यास तो असमर्थ होतो.

या सर्व गोष्टींची शोकांतिक अशी आहे की, ह्या वैज्ञानिकाला बॉम्बस्फोटाच्या परिणामाची जाणीव असूनही अतीस्वहित केन्द्रित झाल्यामुळे, सर्व आवश्यक खबरदारी घेऊनही, विस्फोटाच्या धक्क्याने प्रत्यक्षपणे सर्वप्रथम तोच बळी पडला. त्याचेवर ताबडतोब चमत्कारिक परिणाम हा झाला की, प्रथम तो स्वतःच्या प्रयोगाने पूर्णतः पराभूत व भयभित झाला व अगदी बेशुध्द होऊन जमिनीवर कोसळला. अधिक दुर्दैवी गोष्ट म्हणजे जेव्हा तो शुध्दिवर आला तेव्हा हे शुध्दिवर येणे त्याला काय भाव पडले ? तो एक महान प्रगत वैज्ञानिक होता या त्याच्या अवस्थेची त्याला संपूर्ण विस्मृती झाली. तसेच त्याला त्याच्या स्वतःच्या अगदी जवळच्या भूतकाळाचे, बालपणाचे, तरुण असताना केलेल्या उद्योगाचे, पत्नी, मुलाबाळांशी व मित्रांशी असलेल्या सर्व साहचर्याचे स्मरण करण्यास तो असमर्थ झाला. त्याच्यात झालेला सर्वात मोठा बदल हा होता की, त्याचे काही हरविले असे सुध्दा त्याला वाटले नाही, म्हणजेच त्याची स्मृती व तो एक महान वैज्ञानिक होता याबद्दलची जाणीव त्याने हरविली होती, याची ही जाणीव त्याला नव्हती. डॉक्टर मंडळी अशा घटनेला स्मृती – विभ्रम

(amnesia) असे म्हणतात. त्याला जी शुध्द होती ती केवळ एका गोष्टीची की, तो एक अतिशय प्राथमिक प्रकारचा माणूस होता. त्याने नंतर नव्याने आपले जीवन सुरु केले. त्याला एक वेळ सुध्दा ही कल्पना आली नाही की तो एका महान वैज्ञानिकाचे जीवन जगला होता व प्राणशक्तीच्या अफाट व प्रचंड घटकांवर त्याचे नियंत्रण होते. चवथ्या भूमिकेवरील अत्यंत उन्नत झालेल्या सूक्ष्मचेनत मानवी आत्म्याची शोकांतिका अगदी या प्रमाणेच घडते, तो प्राणशक्तीची साक्षात मूर्ती असल्यामुळे सूक्ष्म जगतात सर्वोच्च स्थितीत असलेल्या प्राणशक्तीचा दुरुपयोग करतो व परिणामतः अत्यंत सिमित चेतना ठेवून बाकी तो सर्व चेतनेला पारखा होतो. उत्क्रांतीच्या नियमाप्रमाणे त्या अत्यंत सीमित चेतनेचा अनुभव घेण्यासाठी जिला (चेतनेला) अत्यंत ओबड धोबड पाषाण योनी स्वीकारावी लागते.

दैवी शक्तीच्या गैरवापराद्वारा* चवथ्या भूमिकेवरील आत्म्याचे आध्यात्मिक भवितव्य नष्ट होण्यापासून त्याचे रक्षण करणे, हे सद्‌गुरुच्या कार्यापैकी एक कार्य असते.

जर चवथ्या भूमिकेवरील आत्मा त्याचे मनावरील नियंत्रण गमविण्याच्या बेतात असेल तर सद्‌गुरु बहुधा त्याच्या सर्व शक्ती हिरावून घेतात. सद्‌गुरु सर्व सूक्ष्मचेतन व स्थूलचेतन आत्म्यांच्या मनावर नियंत्रण ठेवू शकतात. वास्तविक पाहता अधःपतनाची उदाहरणे या प्रमाणे विरळ आहेत व ते नियमाला अपवाद म्हणून घडून येतात. याचा संबंध सरतेशेवटी सद्‌गुरुंनी ठेवलेल्या सतर्कतेच्या अपयशाशी न जोडता तो संबंध स्वतः परमात्म्यातील मूळ

* (टीप– येशूच्या 'प्रलोभनांचे' संदर्भात संपादकांनी विचारले असताना मेहेर बाबांनी सांगितलेः ''वास्तविकता ही आहे की, येशूला सैतानाने प्रलोभित केले नाही तर येशूने स्वतःला प्रलोभित करुन घेतले व त्याने प्रलोभनांवर विजय प्राप्त केला. या मागे एक मोठा हेतू होता. त्याला स्वतःला प्रलोभित व्हावे लागले ज्यामुळे त्यांनी त्या उत्तेजक शक्तींचे ओझे ज्याने त्यावेळेस जगाला आक्रांत करुन सोडले होते, ते आपल्या खाद्यावर घेतले. येशूने नंतर सर्व प्रलोभनांवर विजय प्राप्त केला व अशा प्रकारे त्यांनी एका प्रचंड शक्तीची निर्मिती केली जी विश्वव्यापी प्रलोभनकारी शक्तींकरिता एक भिषण गतिरोधक म्हणून सिध्द झाली. बुध्दाच्या बाबतीत देखील हेच खरे होते व अवतारकाळात प्रत्येकवेळी असेच घडत असते. परमात्म्याचा अवतार जेव्हा जेव्हा पृथ्वीवर प्रकट होतो, तेव्हा त्याचे ईश्वरत्व वैश्विक धक्का देते व त्याचा परिणाम हा विश्वव्यापी असतो, म्हणजे या वैश्विक धक्क्याचा केवळ मानवालाच लाभ होत नसून त्याचा लाभ सर्व सृष्टीतील प्रत्येक वस्तुला मिळतो.)

उर्मिशी जोडला पाहिजे म्हणून हे अक्षरक्षः सत्य आहे की, विश्वात घडणारी प्रत्येक गोष्ट मग ती लहान असो की, महान सर्वशक्तीमान परमात्म्याच्या केवळ इच्छाशक्तीनुसारच घडते.

या ठिकाणी हे समजणे महत्वाचे आहे की, मानवयोनीत एकदा संपूर्ण चेतना प्राप्त केली की, ती वास्तविक कधीच गमविली जात नाही, हे प्रस्तापित सत्य आहे, असे असले तरी चवथ्या भूमिकेतील सूक्ष्मचेतन मानवी आत्म्याची या संदर्भात प्राप्त चेतना गमविण्याची संभावना असते. चवथ्या भूमिकेवरील शक्तींचा गैरवापर केला तरच असे घडते आणि अधिकारात असलेल्या सर्वोच्च प्राणशक्तीचा समतोल अनंत इच्छांच्या प्रबळ प्रलोभनांचेव्दारां, ज्या अनंत इच्छा मनाच्या  सर्वोत्तम पैलू आहेत त्या राखल्या गेल्या नाहीत तरच असे घडते. विचार, इच्छा व भावना हे मनाचे मूलभूत तीन पैलू असले तरी इच्छा हा मनाचा सर्वोच्च पैलू होय.

चवथ्या भूमिकेतील सूक्ष्मचेतन मानवी आत्मा जर त्याचे अधिकारात असलेल्या प्राणशक्तीचा गैरवापर करीत नसेल व अनंत प्राणशक्तीचा दूरदर्शीपणे सर्वोच्च हितासाठी उपयोग करुन समतोल राखत असेल तर चवथ्या भूमिकेवरील हा आत्मा केवळ चवथ्या भूमिकेचा उंबरठाच पार करुन मनोजगताच्या पाचव्या व सहाव्या भूमिकांच्या प्रदेशात प्रवेश करीत नाही तर तो सरळ सहाव्या भूमिकेची चेतना प्राप्त करतो. याचे कारण असे आहे की हा आत्मा (सूक्ष्म चेतनेसह व परमोच्च प्राण शक्तीच्या विवेकपूर्ण वापरासह) मनाचे अत्यंत मोहित करणारे व प्रभावी सर्वोच्च पैलू, जे आपल्या चरम सीमेवर अत्यंत प्राबल्याने फसविणारे होते, ते म्हणजे विचार, इच्छा व भावना यांना विरोध करुन पराजित करण्यास समर्थ होतो. अशा प्रकारे हा सूक्ष्म चेतन मानवी आत्मा चरमसीमेवरील इच्छा, विचार व भावना यांचेवर मात करुन सरळसरळ सहाव्या भूमिकेची चेतना प्राप्त करतो व त्यांचा स्वामी होतो, जो आता त्यांचेवर नियंत्रण करतो व ज्याला आता त्यांना निर्माण करण्याची देखील क्षमता असते.

सूक्ष्म जगतात मुक्त झालेल्या चरम सीमेवरील प्राणशक्तीचा प्रचंड पूर आलेला असतांना देखील काही सूक्ष्मचेतन मानवी आत्मे, त्यांचा ना उपयोग करतात ना गैरवापर करतात व जेव्हा असे आत्मे, त्यांच्या चरमसीमेवर असलेल्या इच्छांना देखील बळी पडत नाहीत तेव्हा हे सूक्ष्मचेतन मानवी आत्मे

चवथ्या भूमिकेचा उंबरठा ओलांडून मनोजगताच्या प्रदेशातील पाचव्या भूमिकेची चेतना प्राप्त करतात. या ठिकाणी हे मनःचेतन मानवी आत्मे त्यानंतर आपल्या मनाचे गुलाम रहात नाहीत कारण ते आता मनातील विचारांना नियंत्रित करण्याच्या पहिल्या अवस्थेबद्दल सचेत असतात.

पाचव्या व सहाव्या भूमिकेतील मनःचेतन मानवी आत्मे आता मनाबद्दल पूर्णपणे सचेत असतात व ते पाचव्या व सहाव्या भूमिकेतील चेतनेच्या प्रगतीच्या प्रमाणात मनोभूवनाचा अनुभव घेतात. पाचव्या व सहाव्या भूमिकेतील मनःचेतन मानवी आत्म्यांना सूक्ष्मजगताच्या पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चवथ्या भूमिकांच्या चेतनेच्या परिमाणाबाबत त्यानंतर जाणीव नसते व ते सूक्ष्मजगताचा तद्नंतर मुळीच अनुभव घेत नाहीत म्हणून हे मनःचेतन मानवी आत्मे सूक्ष्म जगताच्या प्रचंड प्राणशक्तीबद्दल अचेत असतात. म्हणून हे मनःचेतन मानवी आत्मे जरी मनाचे सचेत स्वामी असले तरी आता ते सूक्ष्म जगताच्या प्राणशक्तीच्या सामर्थ्याविषयी पूर्णपणे अचेत असतात आणि याच कारणामुळे हे मनःचेतन मानवी आत्मे कधीच कोणताही चमत्कार करु शकत नाहीत. मनःचेतन आत्म्यांची प्रगत झालेली चेतना सूक्ष्मचेतन मानवी आत्म्यांच्या चेतनेपेक्षा जास्त प्रगत झालेली असली तरी ते कधी मृत्यू झालेल्यास जीवंत करु शकत नाहीत, आंधळ्याला दृष्टि देऊ शकत नाहीत किंवा अपंगाला अवयव देऊ शकत नाहीत. तथापि हे मनःचेतन मानवी आत्मे मनाचे चेतनायुक्त स्वामी असल्यामुळे ते स्थूलचेतन व सूक्ष्मचेतन मानवी आत्म्यांची मने निर्माण आणि नियंत्रित करु शकतात. त्यांच्या करिता आवश्यकता वाटल्यास निर्माण करणे व नियंत्रित करणे जणू पोरखेळ असतो. मनःचेतन मानवी आत्म्यांचे संबंधात आपण हे गृहित धरुया की त्यांची स्थिती सूर्याजवळ आहे. (सूर्याला आपण उपमेसाटी आपले प्रमाण – standard – मानले आहे.) मानव देहातील हा आत्मा, मनाचे पैलू, जसे– विचार इच्छा व भावना जाणीवपूर्वक ग्रहण व नियंत्रित करतो व मनोजगतात मनाचा पूर्णपणे उपयोग करतो– जे मन सूर्यापासून उत्पन्न होते (जो सूर्य आपण स्पष्टीकरणाच्या हेतूने मूळ स्त्रोत म्हणून विचारात घेतो.) याप्रमाणे मनःचेतन मानवी आत्मा पाचव्या व सहाव्या भूमिकांच्या क्षेत्रात न केवळ मनाबद्दल व त्याच्या पैलूंबद्दल पूर्णपणे सचेत असतो, तर इतर सर्व मनांचेही विचार, इच्छा व

भावना निर्माण व नियंत्रित करण्याची पात्रता व सामर्थ्य देखील त्याचे ठायी असते. आत्मा आता अगदी स्थिर असतो व तो ज्याप्रमाणे चवथ्या भूमिकेवरील सूक्ष्मचेतन मानवी आत्मा अधःपतीत होतो त्याप्रमाणे चेतनेच्या कोणत्याही निम्नतर स्तरावर कधीच अधःपतीत होऊ शकत नाही किंवा खाली घसरु शकत नाही. (त्याचे कारण असे की, स्थूल चेतन मानवी आत्मा व सूक्ष्मचेतन मानवी आत्मा हे त्यांच्या मनाचे गुलाम असतात उलटपक्षी मनःचेतन मानवी आत्मा आपल्या मनाचा स्वामी असतो.)

अगदी शेवटी आत्मचेतन मानवी आत्म्याची स्थिती स्वतः सूर्यात स्थित असलेल्या आत्म्याप्रमाणे असते. (स्पष्टीकरण समजण्याचा प्रयत्न करताना वाचकांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, सूर्याचा जो संदर्भ दिलेला आहे. तो केवळ उपमा म्हणून दिलेला आहे. हा सूर्य म्हणजे आपल्या पृथ्वीचा सूर्य आहे, असा गैरसमज वाचकांनी करुन घेऊ नये किंवा पृथ्वीवरील सूर्याला अनंत शक्ती, ज्ञान व आनंद यांच्या अनंत व शाश्वत उगमस्थानाचे खरे प्रमाण मानू नये, त्याचप्रमाणे आपण आपल्या पृथ्वीच्या सूर्याला कसल्याही प्रकारचे महत्व देता कामा नये, कारण पृथ्वीचा सूर्य काहीच नसून, केवळ स्वतः आत्म्याने निर्मिलेल्या सृष्टीच्या निर्मितीमधील वस्तूंपैकी एक वस्तू आहे.)

आत्मज्ञानी सातव्या भूमिकेतील मानवी आत्म्याला या सूर्याची चेतना असते (जो आपण मन व प्राणशक्तीच्या मूळ स्त्रोताचे उदाहरण म्हणून घेतला आहे.) व तो जरी निरपवादपणे अनंत शक्ती, ज्ञान आणि आनंदाचा शाश्वत रीतीने अनुभव घेत असला व परावर्तित करीत असला तरी काही बाबतीत असा आत्मा ह्या अनंतशक्ती, ज्ञान व आनंदाचा जाणीवपूर्वक अगदी सरळ सरळ स्थूल सूक्ष्म व मनोजगताच्या संस्कारांपासून आत्म्यांना मुक्त करण्यासाठी उपयोग करतो.

* * *

# भाग ७

# सात घड्यांचा पडदा

कबीर एक सद्‌गुरु होते व तसेच ते एक कवी देखील होते. त्यांचा काव्यग्रंथ 'कबीर वाणी' हा परमात्मा, ईश्वरप्रेम, अध्यात्म मार्ग व मायावी सृष्टी इत्यादीवर केलेल्या सुबोध स्पष्टीकरणामुळे एक अद्वितीय ग्रंथ आहे. कबीर हे सद्‌गुरु असल्यामुळे त्यांनी अगदी सर्वसाधारण मनुष्यासाठी जितके उपदेशपर सांगितले तितकेच त्यांनी अध्यात्म मार्गावरील साधकांसाठी देखील सांगितले आहे. त्यांनी दृष्टांताव्दारे तसेच अगदी सोप्या शब्दात काही आध्यात्मिक रहस्यांना निःसंकोचपणे उघड केले, ज्याचा अर्थ सर्वसाधारण मनुष्याला समजत असला तरी जे केवळ आध्यात्मिक दृष्ट्या प्रतिभावंत आहेत अशांनाच कबीरांच्या अधिकांश वचनांच्या मुळाशी असणारा सखोल अर्थ यथार्थपणे समजतो.

असे काही योगी आहेत (जे लोक गूढ ज्ञानाच्या एका नियमबध्द मार्गाचा अभ्यास करतात.) ते जेव्हा तात्पुरत्या समाधी अवस्थेत असतात तेव्हा आपणहून स्वतःची स्थूल शरीरे हवेत लोंबकळत ठेवू शकतात. काही असे आहेत की, जे स्थूल शरीराने बाह्य साधनांची मदत न घेता पाण्यावर चालू शकतात किवा हवेत उडू शकतात आणि असे असले तरी हे सर्व काही त्यांनी दैवी प्रेमाचा अनुभव घेतल्याचे चिन्ह किंवा प्रमाण नाही. जर हे आध्यात्मिक तराजूवर तोलले तर ह्या चमत्कारांना मुळीच किंमत नाही. वास्तविक पाहता सर्वसाधारण योग्याचे चमत्कारांचे व्यवहार आध्यात्मिक मार्गापासून न केवळ दोन धृवा इतके दूर असतात, तर ते प्रत्यक्षात व्यक्तिला आध्यात्मिक प्रगतीकडे उत्क्रांत होण्यासाठी अडथळा बनतात.[११,१२] एका हिंदू सद्‌गुरुच्या जीवनातील पुढील प्रसंग, सद्‌गुरु जे सत्याचे मूर्तिमंत रुप असतात, ते अशा व्यवहारांना किती तुच्छ लेखतात, हे दर्शवितो. सद्‌गुरु एके दिवशी एका नदिच्या काठावर बसून, अगदीच अल्पशा म्हणजे एक आण्याचे भाड्यात प्रवाशांना नदी पार करणाऱ्या एका लहान होडीची वाट बघत होते. एका योग्याने अशाप्रकारे वाट बघत बसलेल्या गुरुला पाहिले. तो योगी त्यांचे जवळ आला व अक्षरशः पाण्यावर चालत जाऊन नदी ओलांडून पुन्हा तसाच परत आला व म्हणाला,

''अशा प्रकारे नदी पार करणे किती सोपे आहे, आहे की नाही ?'' सद्गुरुने स्मित हास्य करीत उत्तर दिले. ''होय, परंतु त्याची किंमत होडीच्या भाड्याच्या एक आण्यापेक्षाही कमीच होते.''

आपल्या नीच इच्छांवर सतत नियंत्रण ठेवण्याची क्षमता असणे ही काही लहान उपलब्धी नव्हे. सर्व इच्छांचा सदुपयोग करण्याची पात्रता टिकाऊ स्वरुपात स्थापित करण्यातील यश हे खरोखर महत्तर कार्य आहे. परंतु एकदाचे नेहमीकरिता सर्व इच्छांना जाळून खाक करण्याचे कार्य सर्वात महान आहे, जे केवळ दैवी प्रेमच करु शकते. दिव्य प्रेमाच्या संबंधात जसा दिखाऊपणा कधीच नसतो म्हणून हे प्रेमात जळणे नेहमी धूराशिवाय असते, म्हणजेच त्यामध्ये देखावा नसतो. अशी काही वेळ असते की कधी दैवी प्रेमाचे प्रकट प्रदर्शन हे उदात्त व श्रेष्ठ दर्जाची कृती मानल्या जाऊ शकते परंतु कोणत्याही वेळी केवळ ईश्वरी प्रेमाच्या प्रदर्शनाचा देखावा करणे यात मात्र परमेश्वराचा अपमान करण्यासारखे आहे. त्यामुळे कबीर म्हणतात की ध्यान करण्याच्या कृतीमध्ये जेव्हा एखादा परमेश्वरावर ध्यान करण्याकरिता[१३,१४] आसनस्त होतो त्यावेळेस त्याने कोणताही देखावा करण्याचे टाळणे हे शिकले पाहिजे. जसे स्वतःचे शरीर दोलायमान करणे, जरी असे करणे केवळ त्यांच्या स्वतःच्या संतुष्टीसाठी असले तरी.

जर स्वप्नांची तुलना केली तर भौतिक जीवन हे खरोखर सत्य आहे. त्याचप्रमाणे आध्यात्मिक मार्गाच्या सत्यतेशी जर त्याची तुलना केली तर इहलोक व सर्व ऐहिक जीवन मनुष्याचे बाबतीत एक अर्थशून्य स्वप्नानुभव आहे. परंतु ज्याप्रमाणे इहलोक व इहलोकातील सर्व अनुभव हे मायावी किंवा भ्रमात्मक आहेत, त्याचप्रमाणे सत्याकडे अग्रेसर होणारा आध्यात्मिक मार्ग देखील तसाच आहे. पहिल्यास मिथ्यामाया व दुसऱ्यास खरी माया असे म्हणता येईल. त्यांच्या मध्ये प्रचंड फरक असला तरी सुध्दा त्या दोन्हीही मायाच आहेत, कारण एकमेव परमेश्वरच केवळ सत्य आहे.

जेव्हा ज्ञान* प्राप्त केले जाते तेव्हा अज्ञान दूर फेकले जाते. परंतु अज्ञान

* (टीप– सांसारिक ज्ञान या अर्थाने न घेता अंतर्ज्ञान या अर्थाने– संपादक)

जाण्यासाठी ज्ञान प्राप्त केलेच पाहिजे. एका दृष्टीने पाहता परमेश्वर आणि परमेश्वराला पाहण्याची व परमेश्वराशी एकरुप होण्याची मनुष्याची क्षमता तेथे सदैव असतेच. उलटदृष्टीने पाहता जोपर्यंत मनुष्य आध्यात्मिक मार्गावर पोहोचत नाही किंवा प्रत्यक्षात त्याला परमेश्वराचा साक्षात्कार होत नाही, तोपर्यंत सत्य मनुष्यापासून लपलेले असते. ही दर्शनी विसंगीती दोन निराळ्या घटाकांमुळे असते. एक बाब म्हणजे मनुष्याचे सत्याविषयीचे अज्ञान व दुसरी वास्तवता म्हणजे सत्य हे विवेक सामर्थ्याच्या पलिकडे व बुद्धिक्षेत्राच्या किती तरी वरचे आहे. वास्तविक गोष्ट अशी आहे की, मनुष्य परमेश्वर झाला आहे व मनुष्य परमेश्वर होऊ शकतो, याचे अगदी सरळ कारण हे आहे की, मनुष्याला याची जाणीव असो किंवा जाणीव नसो तो परमेश्वर आहे. फक्त जो पर्यंत मनुष्याचे अज्ञान कायम असते तोपर्यंत मायेतील वस्तूंच्या विपुल विविधतेला अंत नाही असे दिसून येईल. जेव्हा दैवी ज्ञान प्राप्त होते तेव्हा त्याला साक्षात्कार होतो की, परमेश्वराच्या अखंड एकत्वाला अंत नाही. विश्वव्यापी द्वैताच्या मायेत मनुष्य व परमेश्वर यामधील दर्शनी वेगळेपणा, सद्‌गुरु कडून मधले ''आवरण'' व ''पडदा'' या शब्दात निश्चितपणे संदर्भित केला जातो. हाफीज हे सद्‌गुरु होते. ते एक महान कवी देखील होते, ते म्हणतात :

''मियानो आशिको माशूक हेच हायल निस्त
तू खूद हिजाबे खुदी, हाफिज अज मियान बरखेज ''

प्रेमी व प्रियतमामध्ये मुळीच, अडसर नाही. हाफिज तू स्वतःला उचलून दूर कर, तू स्वतःच तुझ्या ''स्व'' वरील आवरण आहेस.

कबीर पडद्यांच्या सात घड्या दूर सारण्याचे संदर्भात म्हणतातः–

''तेरे घुंघट के पट खोल, तुझे राम मिलेगा!'' ''तू तुझ्या पडद्यांच्या घड्या उघड, तुला राम (परमेश्वर) भेटेल.'' घुंघट या शब्दाचा अर्थ म्हणजे, स्त्रीच्या डोक्यवर व चेहऱ्यावर जो पदर अनेक घड्यांमध्ये घेतला जातो तो पडदा. आध्यात्मिक भाषेत तो पडदा अज्ञानाच्या घट्ट घड्यांचे प्रतिनिधित्व करतो, जो मनुष्याला त्याच्या सत्य स्वरुपापासून लपवून ठेवतो. या पडद्याची एक एक घडी उचलण्याचा अर्थ असा की, आध्यात्मिक पथावरील पथिकाचा पहिल्या भूमिकेपासून तो पाचव्या भूमिकेच्या शेवटपर्यंत पायरी पायरीने प्रवास.

तो पदर (पडदा) अज्ञानात असलेल्या मनुष्याला सर्वज्ञ असलेल्या

परमात्म्यापासून वेगळे करतो, तो इतका सूक्ष्म आहे की त्यामधून अत्यूच्च तसाच अत्यंत सूक्ष्म विचार देखील भेदून जाऊ शकत नाही. या पडद्याला सात घड्या असतात ज्या निरनिराळ्या सात गर्द रंगाच्या असतात. प्रत्येक घडी वेगळ्या गाठीने बांधलेली असते, अशाप्रकारे सात घड्यांना सात गाठी असतात. सात रंग हे सात मूलभूत वासनांना प्रदर्शित करतात जे रंग सात मूलभूत संस्कारांशी जुळणारे आहेत, जसे काम, वासना, लोभ, क्रोध इत्यादी, ज्यांचा संबंध चेहऱ्यावरील संवेदनांच्या सात इंद्रियांचे व्दाराशी असतो. जसे १) मुख २) उजवी नाकपुडी ३) डावी नाकपुडी ४) उजवा कान ५) डावा कान ६) उजवा डोळा ७) डावा डोळा

वास्तविक सत्य आणि केवळ सत्य म्हणून पाहिले तर आत्मा हाच सदैव परमात्मा आहे जो अनादि आहे व अंतरहित आहे. मिथ्या मायेचा प्रारंभ सात भौतिक पायऱ्या वरील आत्म्याच्या अवतरणापासून सुरु होतो व आत्म्याच्या सातव्या आधात्मिक भूमिकेवर पोहोचल्यावर खऱ्या मायेचा अंत होतो.

परमात्मा प्रचंड विश्व आहे व परमात्मा अगदी लहान विश्व आहे आणि परमात्मा सदैव या दोन्हींच्याही पलिकडे देखील आहे. जाणतेपणी मानव शरीर आहे व मानव मन आहे. परंतु अजाणतेपणी जसे मानव गाढ निद्रेत असताना तो या दोहोंच्याही पलिकडे आहे.

साम्य दाखविण्याचे दृष्टीने हे खरे आहे की, मानव परमात्म्याच्या प्रतिमेत घडला आहे. त्याच्या मस्तकाचे शिखर म्हणजे विज्ञान भूमिका, अर्शे–आला, सर्वोच्च आध्यात्मिक अवस्था किंवा ब्रह्माचे आसन सूचविते. त्याचा भालप्रदेश दिवत्वाच्या प्रवेशद्वारा प्रमाणे आहे. त्याच्या भालप्रदेशाचा मध्यभाग दोन नेत्रांच्या अगदी वर असणारा हा आंतरिक किंवा तृतीय नेत्राचे स्थान होय. ज्यावेळेस 'पडदा' त्याच्या सात घड्यांसह अगदी शेवटी दूर सारला जातो, त्यानंतर मानव त्याचे तृतीय नेत्राने परमात्म्याला समोरासमोर पाहण्यास समर्थ होतो. तो बाह्य नेत्राने सामान्यपणे स्वतःचे स्थूल शरीर व स्थूल जगत ज्याप्रमाणे पाहू शकतो त्यापेक्षाही आधिक प्रत्यक्षपणे व स्वाभाविकपणे परमात्म्याला समोरसमोर पाहण्यास सक्षम होतो. भालप्रदेशात स्थित असलेल्या दैवी प्रवेशव्दारी पोहोचण्याकरिता मनुष्याला सप्तद्वारातून जावे लागते, जी द्वारें सात

इंद्रियद्वारांच्या स्वरुपात चेहऱ्यावर विद्यमान आहेत.

जेव्हा एखादा साधक (अध्यात्म मार्गात दिक्षित) आध्यात्मिक मार्गावर प्रत्यक्षपणे प्रवेश करण्यासाठी यशस्वी होतो तेव्हा त्याच्यासाठी केवळ एक म्हणजे एकात सात (seven-in-one) अशी उद्दिष्टपूर्ती करणे होय व ते पडद्यांच्या सात घड्यांपैकी पहिल्या घडीला लागू होते, जसे १) पहिली गाठ सुटणे २) पहिली घडी नाहिशी होणे ३) प्रथम मूलभूत इच्छा वासनांचा संपूर्ण नाश होणे. ४) संबंधित मूलभूत संस्कार पुसले जाणे ५) सात गर्द काळ्या रंगापैकी पहिला रंग नाहिसा होणे ६) पहिल्या द्वारातून प्रवेश करणे (जे मुखाने दर्शविल्या गेले) ७) सूक्ष्म जगताच्या पहिल्या भूमिकेवर (प्राण भूवन किंवा आलम–ए–मलकूत[१५]) येऊन पोहोचणे.

साधारण मनुष्य स्वप्नात सूक्ष्म चेतनेद्वारा त्याच्या सूक्ष्म देहाचा अंशतः उपयोग करु शकतो. परंतु तो केवळ स्थूल अनुभवांचे बाबतीत व स्थूल पदार्थांचे संबंधातच असे करण्यास समर्थ असतो. ज्याप्रमाणे तो स्थूल जगताचा संपूर्ण स्थूलचेतनेसह आपल्या स्थूल शरीराचे माध्यमातून अनुभव घेतो त्याचप्रमाणे पहिल्या भूमिकेवरील साधक सूक्ष्म जगताचा सूक्ष्म चेतनेसह आपल्या सूक्ष्म देहाद्वारा अनुभव घेण्यास प्रारंभ करतो.

जर पहिल्या भूमिकेतील साधक अधिक पुढे प्रगती करण्यास समर्थपणे यशस्वी झाला तर तो सूक्ष्म जगतात चवथ्या भूमिकेपर्यंत पुढे जात राहतो. या प्रगतीच्या अंतर्गत क्रमशः दुसरी आणि तिसरी, एक म्हणजे एकात सात अशा उद्दिष्टांची पूर्तता (प्राप्ती) सम्मिलित असतेच जी पहिल्या उपलब्धीमध्ये प्राप्त झालेल्या सात घड्यांच्या परिणामांना समांतर असते. दुसऱ्या व तिसऱ्या द्वारातून हे जाणे (जे उजव्या व डाव्या नाकपुड्याद्वारां दर्शित केले आहे.) यथार्थ मायेची आधीपेक्षाही अजून जास्त प्रगल्भता आणते, म्हणजेच आध्यात्मिक मार्गाची आधीपेक्षा जास्त श्रेष्ठ चेतना त्याला प्राप्त होते. दुसऱ्या द्वारातून गेल्यावर साधक सूक्ष्म जगताच्या अधिक जास्त विस्मयकारक गोष्टींचा अनुभव घेतो आणि त्याचवेळेस या विस्मयकारक गोष्टींच्या चक्रव्यूहात अडकण्याचा धोका पत्करण्यास प्रारंभ करतो. आध्यात्मिक पथावरील तिसऱ्या द्वारापलिकडील ही गूढ प्रलोभने अजूनही जास्त प्रचंड आहेत व त्यामुळे मंत्रमुग्ध होण्याचे प्रसंग देखील जास्त प्रभावी आहेत. ज्या प्रमाणे स्थूल चेतना असणारे स्थूल जगताला

व त्याच्या (मायावी) भ्रमात्मक अनुभवांना सत्य मानतात अगदी त्याचप्रमाणे सूक्ष्म जगतातील साधक ते ज्या भूमिकेवर असतात त्या भूमिकेच्या विस्मयात व्यग्र होत असताना ते त्या चमत्कारंना अंतिम सत्य मानण्याची चूक करु शकातात म्हणून साधक ज्या भूमिकेत असतो त्या भूमिकेतील अत्यानंदात भ्रमित झाल्यामुळे तेच अंतीम साध्य आहे असे मानून बहुधा तेथेच अडकून पडतो. जो पर्यंत सद्‌गुरु किंवा मनःचेतन आत्मे त्याला त्या पलिकडील भूमिकेवर ढकलण्यास मदत करीत नाहीत तोपर्यंत तो त्याच स्थितीत अडकून राहतो.

चवथी एकात सातची उपलब्धी ही दुहेरी उपलब्धी आहे कारण एकाच वेळी १) चवथ्या व पाचव्या गाठी उकलल्या जातात. २) चवथी व पाचवी घडी नाहिशी होते. ३) चवथ्या व पाचव्या मूलभूत इच्छापूर्णतः नष्ट होतात. ४) चवथे आणि पाचवे गर्द काळे रंग नाहिसे होतात. ५) चवथे व पाचवे संबंधीत मूलभूत संस्कार पुसले जातात. ६) चवथी व पाचवी द्वारे पार केली जातात. जी उजव्या व डाव्या कानांनी प्रस्तुत केल्या गेली आहेत. ७) साधक सूक्ष्म जगताच्या सर्वोच्च भूमिकेवर – चवथ्या भूमिकेवर येऊन पोहोचतो.

या पूर्वीच सांगितल्याप्रमाणे चवथी भूमिका ही आध्यात्मिक वैभवाची आणि दैवी शक्तिंची भूमिका आहे. (अनवर – ओ–तजल्लियत किंवा सिध्दी) या अवस्थेपर्यंत प्रगत झालेले साधक इतर अनेक गोष्टींप्रमाणे मृतांना देखील जिवंत करु शकतात. ते या शक्तिंचा गैरवापर करताना फार गंभीर धोका पत्करतात व त्यामुळे स्वतःवर आपत्ती ओढवून घेतात आणि फारच थोडे स्वतत्रपणे अशा प्रकारच्या भोवळ आणणाऱ्या शिखरांवर सद्‌गुरुच्या सहाय्याशिवाय सुरक्षितपणे पार करु शकतात. त्यांच्या संबंधात हाफिज म्हणतात :

''दर आस्तान–एजानॉ आस्माँ बियन्देश
कज औज–ए–सर बुलन्दी उफ्ती बेहरखाक–ए–पस्ती''

''प्रियतमाच्या उंबरठ्यावर स्वर्गांच्या प्रलोभनापासून सावध राहा, अन्यथा प्रगतीच्या व महानतेच्या शिखरावरुन अवनती व विनाशाच्या खोल दरीत स्वतःचे अधःपतन ओढवून घ्याल.''

अशा स्थितीत मनुष्याने आध्यात्मिक मार्गावर जी आध्यात्मिक प्रगती केली असेल तर तो केवळ त्यापासून वंचितच होत नाही तर त्याने देहाच्या

उत्क्रांतीद्वारा जी अवस्था प्राप्त केलेली असते त्यापासून देखील तो पाषाण अवस्थेमध्ये परत फेकल्या जातो.

अतिशय काळोख्या रात्री माहीत नसलेल्या मार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशावर ज्याप्रमाणे कोणताही प्रसंग येऊ शकतो, त्याप्रमाणे सद्‌गुरुच्या मार्गदर्शनाशिवाय चवथ्या भूमिकेतून ज्याला पार व्हावे लागते त्याचे बाबतीत काहीही घडू शकते. याच कारणामुळे चवथ्या भूमिकेतील सर्व नेत्रदिपक वैभव व शक्ती असुनही चवथ्या भूमिकेतील प्रवासाच्या कालखंडाला ख्रिश्चन रहस्यवादाच्या परिभाषेत ''आत्म्याची काळोखी रात्र''* असे म्हटले आहे.

जर प्रगत साधक, आत्म्याच्या काळोख्या रात्रीच्या प्रलोभनांचा व धोक्यांचा प्रतिकार करु शकला तर तो मनोजगतात (मनोभुवन किंवा आलम–ए–जब्रुत) पाचव्या व अंतिम दुहेरी एकात सात उपलब्धीच्या व्दारां प्रवेश करतो, जी उपलब्धी चवथ्या भूमिकेच्या धर्तीवरच घडून येते. पडद्याच्या सर्व घड्या, संबंधित गाठी, इच्छा, रंग व संस्कारांसह दूर सारल्या जातात.

सहावे व सातवे द्वार (उजव्या व डाव्या डोळ्यांनी दर्शविल्याप्रमाणे) पार केले जाते व प्रकाश आणि प्रेमाच्या पाचव्या भूमिकेची प्राप्ती होते.

जे अगदी सुरक्षितपणे पाचव्या भूमिकेवर येऊन पोहचलेत, ते वली अल्लाह (शब्दशः अर्थ ''परमेश्वराचे मित्र'') होत. त्यांची अंतर्दृष्टी किंवा तृतीय नेत्र आता पूर्णपणे विकसीत झालेला आहे व पडद्याच्या सातही घड्या जरी नाहिशा झालेल्या असल्या तरी पडदा स्वतः तेथे अजून तसाच शिल्लक आहे. त्यामुळे साधक अजुनही परमात्म्याचे समोरासमोर नसतो व तो प्रियतमाला पाहू शकत नाही.

मिथ्या अहंमची भेसळ नसलेल्या परमात्म्यावरील त्याच्या विशुद्ध

---

* (टीप– चवथ्या भूमिकेवरील शक्ती, आध्यात्मिक मार्गावरील पथिकासाठी ''सैताना'' प्रमाणे असतात. जो सैतान लोकांना वाईट मार्गाला नेतो असा सामान्य समज आहे. जर सद्‌गुरु ज्ञानेश्वरांनी महान योगी चांगदेवांना वेळीच मदत केली नसती तर तो याच भूमिकेवर दुःखात पडला असता. तव्दत फरीद गंजेशक्कर जेव्हा या भूमिकेत येऊन पोहचले तेव्हा त्यांच्याजवळ असलेल्या शक्तीने, उडणाऱ्या पक्षांना मृत करुन पुन्हा त्यांना सजीव करण्याचा मोह ते टाळू शकले नाही. त्यांना देखील पाचव्या भूमिकेवर असलेल्या एका संत स्त्रीने वेळीच सावध केले. या घटनेनंतर बाबा फरीद त्यांच्या सद्‌गुरुच्या निकट संपर्कात आले व सद्‌गुरुने त्यांना अंततः कुतुबियतकडे किंवा सद्‌गुरु अवस्थेकडे अग्रेसर केले.)

प्रेमामुळे, पांचव्या भूमिकेतील अशा साधकाची स्थिती सुरक्षित असते व त्याचे अधःपतन होण्याची मुळीच शक्यता नसते. आपल्याला कोणत्याही प्रकारची हानी न पोहचविता ते जाणतेपणी व अजाणतेपणी सूक्ष्म जगतातील व स्थूल जगतातील इतरांना भरपूर मदत करु शकतात व करतातही.

काही विरळे अपवाद सोडले तर केवळ स्वतःच्या प्रयत्नाने आता पुढील प्रगती करणे अशक्यच आहे. सद्‌गुरुच्या मदतीने किंवा कृपेने साधकाला पडदा पूर्णपणे दूर सारणे शक्य होते व त्यामुळे तो मनोभुवनाच्या सर्वोच्च सहाव्या भूमिकेवर आरुढ होतो, ही दिवत्वाकडे प्रविष्ट करणारी जी मस्तकाव्दारे दर्शविल्या गेली आहे ती दिव्यदृष्टीची भूमिका आहे. या भूमिकेवर साधक यथार्थतः परमात्म्यास आणि प्रत्येक वस्तूत तसेच परमात्म्याला समोरासमोर पाहण्यास समर्थ होतो. याला दृष्टीव्दारां प्राप्त झालेला दृढ विश्वास असे म्हटले जाते. स्थूल जगतातील ज्यांचा परमात्म्याच्या अस्तित्वावर विश्वास असतो त्यांची श्रद्धानिष्ठा (यकिन) ही त्यांच्या शुद्ध आणि सरळ विश्वासावर आधारलेली असते. हा दृढ विश्वास ’इल्म–उल–यकिन’ (बुद्धिनिष्ठ श्रद्धा) होय आणि हा विश्वास वैशिष्ट्यपूर्ण श्रद्धांपासून विभिन्न आहे.

१) अंतर्ज्ञानाने प्राप्त विश्वास (यकिन–उल–यकिन)

२) दृष्टीव्दारां प्राप्त विश्वास (ऐन–उल–यकिन)

३) प्रत्यक्ष अनुभवाद्वारां प्राप्त विश्वास (हक–उल–यकिन)[१६]

पहिल्या भूमिकेपासून पाचव्या भूमिकेवर पोहोचलेले आध्यात्मिक मार्गावरील सर्व पथिक किंवा साधक स्पष्टपणे अशा अंतर्ज्ञानाने निश्चितच (यकिन–उल–यकिन) परमात्मा असल्याचे जाणतात व त्यांची श्रद्धा अगदी खात्रीलायक ज्ञानावर आधारलेली असते. जे सहाव्या भूमिकेवर असतात ते परमात्म्याला सर्वत्र असल्याचे पाहतात. त्यांची श्रद्धा प्रत्यक्ष दृष्टीव्दारां प्राप्त विश्वासावर आधारलेली असते. जे सातव्या भूमिकेवर असतात व जे परमात्म्याशी एकरुप झालेले असतात त्यांची श्रद्धा प्रत्यक्ष अनुभवावर आधारलेली असते.

सहाव्या भूमिकेवरील अतिउन्नत साधक देखील अजुनही व्दैताच्या क्षेत्रात असतो. तो जरी परमात्म्याला समोरासमोर पहात असला तरी ’दर्शक व दृष्य’ हे उभयतामधील अगाध व खोल दरीमुळे वेगळे झालेले असतात. ती दरी

सद्गुरुच्या केवळ स्पर्शाने पार होऊ शकते. पहिल्या पाच उपलब्धी स्वतंत्रपणे मिळविणे साधकाला जरी शक्य असले तरी पाचव्या भूमिकेवरील पडदा प्रत्यक्षपणे दूर सारणे सामान्यपणे सद्गुरुच्या मार्गदर्शनाच्या कृपेमुळेच साध्य होते. सहाव्या भूमिकेच्या मायेपासून सातव्या भूमिकेच्या 'सत्या' पर्यंतची झेप तथापि स्वप्रयत्नाने अशक्य आहे व ती पूर्ण पुरुषाच्या किंवा सद्गुरुच्या प्रत्यक्ष स्पर्शावर पूर्णपणे अवलंबून आहे.

सातवी ही अनंत ज्ञान, शक्ती व परमानंदाची भूमिका आहे व या भूमिकेवर व्यक्ती परमात्म्यात सामावल्या जातो. आणि तो सर्व काळासाठी व सर्व काळाच्या पलिकडे परमात्मा होतो. पूर्ण पुरुष होतो. त्यानंतर स्थूल शरीर राहिले काय किंवा त्यागल्या गेले काय हे महत्वाचे नाही. साक्षात्कारानंतर बहुधा स्थूल शरीर थोड्याच वेळात पडते (मृत्यूपावते) परंतु काहींचे बाबतीत स्थूल-देह दीर्घकाळ पर्यंत टिकून राहतो. अशा परमात्म-साक्षात्कारी व्यक्तींना 'मज्झूब' किंवा ब्रह्मीभूत असे म्हणतात.

केवळ सद्गुरुच्या व्यक्तिगत व प्रत्यक्ष मदतीने परमेश्वराचा साक्षात्कार झालेल्या पैकी एखादा सर्व भुवनांची (स्थूल सूक्ष्म व मन) चेतना प्राप्त करुन साधारण मनुष्याच्या स्तरावर पुन्हा परत येतो, परंतु त्याच वेळेस परमात्मा असल्याची त्याची संपूर्ण चेतना कायम असते. त्याला नंतर नर-नारायण (Man-God) पुरुष, सद्गुरु किंवा कुतूब असे म्हणतात.

जेथे प्रकाश आहे तेथे अंधकार राहत नाही. जेथे ज्ञान आहे तेथे अज्ञान अनुपस्थित असते. ज्या अर्थी घड्या, पडदा व विभाजनाची दरी हे सर्वकाही अज्ञानाच्या क्षेत्रात आहेत म्हणून सर्व ज्ञानाचा ''सूर्य'' असलेले सद्गुरु निमिषार्धात त्यांना वाटेल त्याला* **आत्मसाक्षात्कार** देऊ शकतात.

परमात्मा हाच केवळ एकमेव सत्य आहे आणि ज्या अर्थी आपण सर्व नेहमीकरिता दैवी प्रियतमाच्या कुशीत राहतो त्याअर्थी आपण सारे एक आहोत.

* * *

---

* टीप- हे पहा : मेहेर बाबा ''दि फेब्रिक ऑफ दि युनिव्हर्स''

बिम्स फ्रॉम मेहेर बाबा ऑन् दि स्पिरिट्युअल पॅनोरमा पृष्ठे १३-१५

हे देखील पहा : मेहेरबाबा ''दि वेज टु दि पाथ ॲन्ड इटस् स्टेटस ॲन्ड स्टेजेस'' लिसन ह्युमॅनिटी - संपादक,

डॉन इ. स्टिव्हन (न्युयॉर्क - डॉड मिड ॲन्ड कंपनी, १९५५) पृष्ठे १६०-१६२- संपादक

# भाग ८

# परमात्म्याची परात्पर परब्रह्म अवस्था, मूळ लहर

## (प्रथम उर्मी) आणि चेतनेच्या उत्क्रांतीचे व आत्मानुवर्ती उत्क्रांतीचे चक्र

**परमात्म्याची परात्पर परब्रह्म अवस्था :**

प्रारंभाच्या आधिपासून – परात्पर (सर्वोच्च) अवस्थेपासून प्रारंभ केल्यास परमात्म्याची 'परात्पर परब्रह्म' अवस्था ही मूळ अवस्था होय. ही 'परामात्मा आहे' ची मूळ अवस्था आहे. सुफी परिभाषेत या अवस्थेला 'वरा–उल–वरा' ची अवस्था असे म्हटले जाते.

''परमात्मा आहे'' या मूळ अवस्थेत अमर्याद शुद्ध निर्वात स्थिती (पसरलेली) असते.

या शुध्द निर्वात (शून्य) स्थितीत ना तो परमात्म्याच्या चेतनेचा किंवा अचेतनेच्या अवस्थेचा कोणता अविष्कार असतो ना परमात्म्याच्या चेतनेची किंवा अचेतनेची अभिव्यक्ती असते. तेथे ना तो अमर्याद 'मी' – दिव्य अहं किंवा वैश्विक अहंकार असतो, तेथे ना तो सीमित 'मी' किंवा व्यक्तिगत अहंकार असतो. तेथे ना ते विश्वात्मक मन असते ना ते सीमित मन असते. तेथे ना ती अनिर्बंध प्राणशक्ती असते ना ती सीमित प्राणशक्ती असते. तेथे ना ते विश्वात्मक शरीर – महाकारण शरीर असते ना ते सीमित शरीर असते. तेथे ना ती चराचर सृष्टी असते ना ती भुवने असतात. तेथे ना ती चेतना–महाचैतन्याची चेतना असते ना अचेतनेची देखील चेतना असते.

परमात्म्याची ही स्थिती म्हणजे पूर्णपणे मूळची अमर्याद, शुद्ध निर्वात अवस्था आहे. ती परमात्म्याची ना ती निर्गुण निराकार अवस्था आहे, ना सगुण साकार अवस्था आहे, जेथे ''परमात्मा आहे'' आणि ''चेतना नाही''

''परमात्मा आहे'' असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा ते सृष्टीच्या आरंभाचा प्रारंभ होण्याच्या आधिच्या स्थितिचे वर्णन असते.

''परमात्मा आहे'' या स्थितीला ''परात्पर परब्रह्म'' अवस्थेतील ''परमात्म्याची अगदी प्रारंभीची दैवी महानिद्रा'' असे म्हटले जाते.

''परमात्मा आहे'' ही स्थिती अनंतत्वाची अवस्था आहे. अनंतता ही अनंत होण्याचे अधिकाराने ''सर्व काही आहे'' याचा अर्थ असा की, ''सर्वकाही'' अनंतत्वाचा मूळ स्वभाव आहे.

''सर्वकाही'' (Everything) मध्ये सर्व काही होण्याचा गुण

असल्यामुळे त्याचे अन्तर्गत ''काही नाही'' (Nothing) देखील आहे. अन्यथा ''सर्वकाही'' चा अर्थ सर्वकाही कदापि होऊ शकला नसता. हे ''काही नाही'' (Nothing) ''सर्वकाही'' (Everything) मध्ये अन्तर्हित आहे. परंतु ''काहीनाही'' हे खऱ्या अर्थाने 'काहीच नसल्यामुळे ' काही नसल्याचे स्वतः अस्तित्वही मुळीच काहीनाही आहे.

ज्याअर्थी ''काही नाही'' ''सर्वकाही'' मध्ये अंतर्हित आहे, त्यामुळे ''काहीनाही'' चे ''काहीच नसणे'' (Nothingness) ''सर्व काही'' चे अन्तर्गत अदृष्य रुपात खोल रुतलेले आहे.

अशाप्रकारे 'परमात्मा आहे' या स्थितीच्या अनंततेत जे काही अनंततेच्या प्रकृतीच्या अंतर्गत आहे ते 'सर्व काही' – 'काहीनाही' आहे म्हणून 'सर्वकाही' च्या अंतर्गत जे काही आहे, ते सर्व ''काही नाही'' चे आहे.

सारांश रुपाने अनंतत्वाच्या अनंतते शिवाय, ''सर्वकाही'' च्या ''परमात्मा आहे'' या अवस्थेत – सर्वगोष्टी अन्तर्हित आहेत– आणि जे सर्व अन्तर्हित आहे ते सर्व आपल्या ''काही नसण्याच्या'' सर्व पैलूसह'' काहीनाही चे'' आहे.

''परमात्मा आहे'' च्या अवस्थेत जेथे ''काहीनाही'' अन्तर्हित आहे तेथे आपोआपच ''काही नसण्याच्या'' प्रकृतीमुळे चेतना देखील ''काही नाही'' म्हणून अस्तित्वात असते. अशारीतीने परमात्म्याच्या 'परात्पर परब्रह्म' अवस्थेत चेतना परमात्म्यात सदासर्वकाळ सदैव अन्तर्हित असते, जो परमात्मा स्वभावतः ''सर्वकाही'' आहे. अनंत अमर्याद आणि अपार! अशाप्रकारे आपोआपच स्वभावतः सर्वकाही असल्यामुळे परमात्मा आहे च्या अवस्थेत परमात्म्याचे जवळ नंतर सदैव अनंत शक्ती, अनंत ज्ञान व अनंत आनंद असतो आणि अनंततेने तेजस्वी किंवा सौंदर्य असे जे काही सर्व आहे ते त्याचे ठायी असते.

परमात्मा सर्वकाही व अनंत असल्यामुळे 'सर्व काही' च्या विरुध्द जे 'काही नाही' आहे ते अत्यंत सीमित असलेच पाहिजे.

या कारणास्तव परमात्मा आहे च्या अवस्थेत 'काही नाही' अत्यंत सीमित स्थितीत अंतर्हित आहे किंवा 'सर्व काही' असल्याच्या परमात्म्याच्या अनंत अवस्थेत 'काही नाही' अत्यंत सीमित अवस्थेत अंतर्हित आहे.

हे केवळ स्वाभाविक आहे की, जेव्हा हे अंतर्हित असलेले अत्यंत

सीमित 'काही नाही' अभिव्यक्त होते तेव्हा ते अतिमर्यादित म्हणून अभिव्यक्त व्हावयास पाहिजे.

परंतु ही एक अत्यंत असत्य वाटणारी सत्य गोष्ट आहे की, जेव्हा हे अतिमर्यादित 'काही नाही' अभिव्यक्त होते तेव्हा त्याची अभिव्यक्ती हळूहळू अनंतपणे पसरत जाते.

जी गोष्ट अत्यंत सीमित 'काही नाही' ला अनंततत्व देते ती स्वतः परमात्म्याची अनंत शक्ती, अनंत ज्ञान व अनंत आनंद असलेली अंतर्हित त्रिगुणात्मक प्रकृती आहे, जी परमात्म्याचा मूळ स्वभाव असल्याचे गुणामुळे स्पष्टपणे परमात्मा आहे या अवस्थेच्या अनंततेत सुप्तरुपात पसरलेली असते. स्वाभाविकपणे ही त्रिगुणात्मक प्रकृती 'सर्व काही' च्या अनंततेमध्ये अंतर्हित असतांना अत्यंत सीमित 'काही नाही' ला देखील आच्छादून टाकते.

**ॐ बिंदू–**

म्हणून जेव्हा अत्यंत सीमित 'काही नाही' काही नसण्याच्या (मायेच्या) रुपात अभिव्यक्त होते तेव्हा अत्यंत सीमित 'काही नाही' ची अभिव्यक्ती परमात्म्याच्या अंतर्हित सर्वव्यापी अनंत त्रिगुणात्मक प्रकृतीच्या प्रक्षेपणाशी एकाच वेळी जोडली जाते, ती हळूहळू अंतरहित पसरत जाते व तिचे 'काही नसण्याच्या' अनंत रुपात किंवा सृष्टीच्या रुपात वरपांगी प्रकटीकरण होते. म्हणून 'काही नसण्याच्या' भ्रमात्मक विश्वाला परमात्म्याची छाया असे म्हणता येईल आणि परमात्मा अनंत असल्यामुळे त्याची छाया सुध्दा अनंत आहे.*

'सर्व काही' मध्ये अंतर्हित असलेले अत्यंत सीमित 'काही नाही' जेव्हा प्रकट होते, तेव्हा ते 'सर्व काही' मधील एका अत्यंत सीमित बिंदूतून बाहेर फेकल्या जाते तेथे 'काही नाही' हे अत्यंत सीमित असे मूर्त स्वरुप धारण करते.

---

* टीप – सर्व सृष्टी ही 'काही नाही' तून बाहेर आली आहे. 'काही नाही' तून दोन गोष्टी बाहेर आल्या एक म्हणजे उत्क्रांती व दुसरी निर्मिती. ''काही नाही'' मधून गॅस (वायुरुप) च्या सात अवस्था अस्तित्वात आल्या सातवी उत्क्रांत अवस्था ही हायड्रोजनची आहे. या सातव्या वायुरुप अवस्थेतून उत्क्रांती व निर्मिती अस्तित्वात आल्या.

सृष्टीचा मेळ उत्क्रांतीशी घालता येऊ शकतो कारण सर्व काही सात स्थितीत आहेत, उत्पत्तीच्या सात अवस्था, उत्क्रांतीच्या सात अवस्था आणि आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या सात अवस्था, म्हणून असे म्हटले जाते की ईश्वराने सात दिवसात विश्वाची रचना केली 'काही नाही' तून अत्यंत सीमित छाया आणि अनंत छाया एकाच वेळी बाहेर आल्या.

ज्या अत्यंत सीमित बिंदूतून 'काही नाही' काही नसण्याच्या रुपात बाहेर फेकल्या जाते ह्या बिंदूला निर्मितीचा बिंदू किंवा ओम बिंदू म्हटले जाते. स्वाभाविकपणे हा सृष्टी बिंदू सुध्दा सर्व काही मध्ये म्हणजेच परात्पर परब्रह्म अवस्थेतील परमात्म्यात आहे. म्हणून परमात्मा आहे च्या अवस्थेच्या अनंतत्वाच्या अनंततेतून अनंत 'सर्व काही' च्या अत्यंत सीमित सृष्टी बिंदूतून अत्यंत सीमित 'काही नाही' सृष्टीचे रुपात प्रक्षेपित होते.

थोडक्यात म्हणजे जे अत्यंत सीमित 'काही नाही' हे काही नसण्याचे (Nothingness)रुपात सृष्टीबिंदू मधून प्रकट होते. ते सुध्दा परमात्म्याच्या अनंत त्रिगुणात्मक प्रकृतीमुळे अनंततेत पसरलेले असते. परमात्म्याच्या सर्वव्यापी अनंत त्रिगुणात्मक प्रकृतीने उचलून धरलेला व त्याचेशी घनिष्ट संबंधित असलेला हा अत्यंत सीमित 'काही नसण्याचा' विस्तार हळूहळू क्रमशः अंतरहित पसरतो आणि तो स्पष्टपणे अनंत 'काही नसण्याचे' रुपात किंवा अमर्याद सृष्टीचे रुपात प्रकट होते.

**उर्मी किंवा लहर**

अनंत 'सर्व काही' मध्ये अंतर्हित असलेल्या अत्यंत सीमित 'काही नाही' ला अनंत रुपात प्रकट होण्याकरिता अग्रेसर करण्यास जे निमित्त झाले व जे मूळ कारण आहे, त्याला महाकारण (Cause)असे म्हटल्या जाते.

हे महाकारण दुसरे तिसरे काही नसून परमात्म्याची केवळ उर्मी किंवा लहर आहे. अगदी प्रारंभिच्या लहरीला परमात्म्याने उच्चारलेला प्रथम शब्द **मी कोण आहे ?** कोऽहम् असे देखील म्हटल्या जाऊ शकते. परमात्मा आहे या अवस्थेच्या अनंतत्वाने परमात्म्याला पूर्णतः स्वतंत्र केले आहे. आणि या निरंकुश स्वतंत्र असण्याच्या गुणामुळे हे अगदी स्वाभाविक आहे की, परमात्म्याला स्वतःच्या अनंत अवस्थेचा आनंद व अनुभव घेण्याकरिता आपल्या अनंत लहरीचा उपयोग करावासा वाटला. लहरीचा उपयोग करणे हे नेहमी स्वतंत्र प्रकृतीचे लक्षण आहे, कारण तो एक लहरीपणा आहे जो स्वतंत्र प्रकृतीला नेहमी सत्यतेची छटा देतो.

तीच ती मूळ अनंत लहर आहे जी 'काही नाही' च्या अंतर्हित असलेल्या सर्वस्वाला 'काही नसण्याचे' रुपात सृष्टी प्रकट होण्याकरिता कारण म्हणून जबाबदार आहे.

'काही नाही' मध्ये जे अंतर्हित असलेले सर्वस्व प्रकट होण्याकरिता

परमात्म्याने आपली मूळ अनंत लहर उपयोगात आणण्यापूर्वी पूर्णपणे स्वतंत्र असलेल्या परमात्म्याच्या परमात्मा आहे या अवस्थेच्या 'सर्व काही' च्या अनंततेमध्ये परमात्म्याची ही लहर स्वतः 'काही नाही' म्हणून अंतर्हित होतीच.

तेव्हा अंतर्हित असलेल्या अनंत मूळ लहरीला परमात्म्यात उसळून आपल्या स्वतःला व 'काही नाही' मध्ये अंतर्हित असलेल्या 'काही नाही' च्या अवस्थेतील सर्वस्वाला प्रकट करणे कसे शक्य झाले ?

लहर ही काही झाले तरी लहरच आहे. तिचा मूळ स्वभावच असा आहे की, का –कशाकरता–केव्हाला तिच्या स्वभावात स्थान मिळू शकत नाही. लहर ही कोणत्याही क्षणी येऊ शकते. ती आता येऊ शकते किंवा काही महिन्यानंतर किंवा काही वर्षानंतर येऊ शकते व कदापि येणारही पण नाही.

अशाप्रकारे ही मूळ अनंत लहर काही झाले तरी एक लहरच आहे व ती देखील परमात्म्याची अनंत अवस्थेतील लहर आहे. ही लहर कदाचित परमात्म्यात मुळीच उसळणार नाही आणि कोणत्याही क्षणी किंवा हजारो वर्षानंतर किंवा लक्षावधी कालचक्रानंतर जर ती उसळलीच तर त्याबद्दल आश्चर्य वाटण्याचे काही कारण नाही.

अशाप्रकारे परमात्म्याची मूळ अनंत लहर त्याचे अनंततेमध्ये एकदा उसळली. जो शाश्वततः अनादि आहे अशा संपूर्ण स्वतंत्र परमात्म्यात ती लहर एक उत्स्फूर्तपणे व अचानक उसळली म्हणून या एकदा उसळलेल्या महालहरीने सृष्टीतील सर्व वस्तूंच्या मुळारंभाचा एकदा प्रारंभ केला.

थोडक्यात म्हणजे ही परमात्म्याच्या अनंत अवस्थेतील, मूळ अनंत अंतर्हित असलेली लहर एकदा निरंकुशपणे स्वतंत्र असलेल्या परमात्म्यात उसळली. तिने स्वतःला प्रकट केले व स्वतःच्या प्रकटीकरणा बरोबरच तिने जे सर्व 'काही नाही' चे जे अंतर्हित होते ते सर्व ''काही नाहीच्या'' (Nothingness) रुपात अभिव्यक्त केले. अश्याप्रकारे लहरीने 'काही नाही' ला जन्म दिला.

अत्यंत सीमित सर्व काही मधून अनंत 'काही नाही' कसे बाहेर आले याचा आपण मागोवा घेऊ या.

परब्रह्म अवस्थेत परमात्मा अनंत 'सर्व काही' आहे. अनंत 'सर्व काही' ची तुलना अनंत अमर्याद महासागराशी करता येईल. म्हणून हा अमर्याद महासागर अनंत 'सर्व काही' आहे. अशा प्रकारे महासागरातील प्रत्येक थेंब

अत्यंत सीमित 'सर्व काही' आहे. थोडक्यात म्हणजे, अनंत महासागर जर अनंत 'सर्व काही' आहे तर महासागराचा प्रत्येक बिंदू हा अत्यंत सीमित 'सर्व काही' आहे.

अमर्याद महासागरात लहर उसळण्यापूर्वी व सृष्टी प्रकट होण्यापूर्वी ज्या मधून सृष्टी बाहेर पडली तो सृष्टी बिंदू (ॐ बिंदू) स्वतः अनंत 'सर्व काही' म्हणून अमर्याद महासागरातच असतो कारण असे की, लहर उसळण्यापूर्वी अमर्याद महासागरात पूर्ण प्रशांतता होती व त्याने तो व्याप्त होता. तेथे महासागराच्या थेंबाचा प्रश्नच नव्हता व तेथे विभक्ती नव्हती, तेथे अमर्याद महासागर अनंत 'सर्व काही' चे रुपात होता.

ज्या क्षणी अनंत '**सर्व काही**' मध्ये लहर उसळली त्याच क्षणी सृष्टी बिंदू किंवा ओम बिंदू अत्यंत सीमित सर्व काही म्हणून प्रकट झाला.

अनंत 'सर्व काही' मध्ये अनंत 'काही नाही' हे अंतर्हित होते परंतु जेव्हा लहर उसळली तेव्हा अनंत 'काही नाही' अत्यंत सीमित 'सर्व काही' मधून प्रकट झाले, तो आहे ॐ बिंदू

अशा प्रकारे अत्यंत सीमित 'सर्व काही' मधून अनंत 'काही नाही' हळूहळू बाहेर फेकल्या गेले व अंतरहित विस्ताराचे रुपात त्याने स्वतःला प्रकट केले.

एकाच वेळी अंतर्हित असलेल्या ''काही नाही'' (Nothing) च्या प्रक्षेपणा बरोबर आणि 'काही नसण्याच्या' प्रकटीकरणाबरोबर चेतना जी काही नाही म्हणून अस्तित्वात होती व जी **परमात्मा आहे** या अवस्थेच्या अनंततेमध्ये अंतर्हित होती, ती चेतनादेखील स्वतः हळूहळू क्रमशः परमात्म्याची चेतना म्हणून प्रक्षेपित होऊन प्रकट झाली. आणि त्या चेतनेने स्वतः परमात्म्यास सर्व चराचराचा निर्माता म्हणून अनुभव घ्यावयास लावले, जे सर्व चराचर त्याच्या ''सर्व काही'' (Everything) च्या अवस्थेतून काही नसण्याचे रुपात बाहेर पडले होते.

या नंतर हळू हळू क्रमशः पूर्ण चेतना प्राप्त करीत परमात्मा निर्मात्याच्या अवस्थेत स्वतः आपल्याच अनंत त्रिगुणात्मक प्रकृतीने पसरलेल्या व समर्थित अशा अनंत रुपात असलेल्या अत्यंत सीमित 'काही नसण्याच्या' जाळ्यात अडकून पडला.

विपर्यास्त दुर्विलास असा की परमात्म्याची अनंतताच स्वतः

परमात्म्याला 'काही नसण्याच्या' मिथ्या दर्शनी अनंततेमधून सुटका करुन घेणे अनंततेने कठीण करुन ठेवते, जे ''काही नसणे'' परमात्म्याच्या अनंत त्रिगुणात्मक प्रकृतीशी म्हणजे अनंत शक्ती , अनंत ज्ञान व अनंत आनंदाशी घनिष्ठतया संबंध ठेवून त्याव्दारे अमर्यादपणे विस्तारीत होत जाते.[१७]

परंतु ही गुंतागुंत अतिशय आवश्यक आहे. कारण परमात्मा आहे या अवस्थेतील अनंततेतील परमात्म्याला स्वतःसाठी व त्याच्या अनंत सत्यासाठी सर्व दृष्टीने परिपूर्ण चेतना प्राप्त करता यावी व अशाप्रकारे आपल्या स्वतःच्या अनंत, अनिर्बंध अनंतशक्ती,अनंत ज्ञान व अखंड आनंदाच्या स्वतःच्या अनंत, अनिर्बंध त्रिगुणात्मक प्रकृतीचा जाणीवपूर्वक अनुभव घेता यावा.

मूलभूत तथ्य हे आहे की, एकदा पूर्ण चेतना प्राप्त केल्यानंतर ती कदापिही नष्ट होऊ शकत नाही. तिचे अस्तित्व शाश्वत असते, मग संपूर्ण प्राप्त केलेली चेतना भ्रामक 'काही नसण्याच्या' रुपाला सत्य समजून अनुभव घेतल्याची असो किंवा ती चेतना प्रत्यक्ष सत्याच्या अनुभवाच्या चेतनेची असो.

शेवटी चेतनेने पूर्ण परिपक्वता प्राप्त केल्यानंतर तीच चेतना परमात्म्याला त्याच्याच सत्यतेचा अनुभव करुन देते. सत्याचा अनुभव घेण्यासाठी चेतना पूर्ण परिपक्व तेव्हाच होते की जेव्हा तीचे पोषण मिथ्याच्या वरपांगी होणाऱ्या जाणीवेव्दारां होते. चेतनेच्या उत्क्रांती बरोबर, हे मिथ्याचे भान सत्य म्हणून इतके तीव्रतेने होते की, मिथ्या भानात डुंबून गेलेली चेतना परमात्म्याला केवळ मिथ्याचीच जाणीव करुन देते व परमात्मा त्याचा सत्य म्हणूनच अनुभव घेतो. म्हणजेच परमात्मा निर्माता म्हणून 'काही नाही' चे प्रकटीकरण सत्य आणि सर्व काही असल्याचा भ्रामकपणे अनुभव  घेतो.

परमात्मा आहे या अवस्थेत परमात्म्याची अंतर्हित चेतना परमात्म्याला आपले स्वतःचे शाश्वत सत्य अनुभविणे शक्य करण्यासाठी सर्व काही मधील अंतर्हित चेतनेच्या प्रक्षेपणाला आत ओढले पाहिजे. कारण जेव्हा ती बाहेर प्रक्षेपित होते तेव्हा ती ''काही नसण्याच्या'' मिथ्या अनंततेवर केन्द्रित होते. अशाप्रकारे आत ओढण्यामुळे याच चेतनेचे केन्द्र 'सर्व काही' च्या अनंततेवर केन्द्रित होते. ज्या 'सर्व काही' पासून ती चेतना बाहेर प्रक्षेपित झाली होती व तिने 'सर्व काही' च्या अनंततेचा अनुभव घेण्या ऐवजी ती अनंत ''काही नसण्याच्या'' अनुभवाला कारणीभूत झाली.

आधीच सांगितल्याप्रमाणे जेव्हा बाहेर आलेली चेतना आत ओढली

जाते किंवा जिची परिपूर्ण आत्मानुवर्ती उत्क्रांती होते, तेव्हा जे 'काही नसणे' जे एकदा सत्य म्हणून अनुभविले होते ते आपोआपच नाहिशे होते, कारण चेतना आता पूर्णपणे परमात्म्याच्या अनंततेच्या शाश्वत सत्यावर केन्द्रित झालेली असते.

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे, शाश्वत सत्याचा अनुभव घेण्यासाठी (दुसरी एखादी ) नवीन चेतना प्राप्त करावी लागत नाही. ही तीच 'सर्व काही' मध्ये अंतर्हित असलेली चेतना जेव्हा प्रथम ती 'काही नाही' मधून बाहेर पडते तेव्हा प्रारंभी ती क्रमशः उत्क्रांत होते व 'काही नसण्याशी' साहचर्य करुन 'काही नसण्याचा' सत्य म्हणून अनुभव घेते. ज्यावेळेस या चेतनेची उत्क्रांती परिपूर्ण व समग्र होते, तेव्हा तीच चेतना परमात्म्याला भ्रामक 'काही नसण्याचा' अनुभव घेण्यासाठी भाग पाडते जे ( माया)सत्य आणि अनंत म्हणून अमर्यादपणे विस्तार पावते. परत जेव्हा तीच सर्व दृष्टीने परिपूर्ण चेतना आपल्या स्वतःच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीव्दारा सर्व दृष्टीने पूर्णपणे परिपक्व होते तेव्हा ती अनंत सत्याचा केवळ सत्य म्हणूनच अनुभव घेते व परमात्माला त्याच्या स्वतःच्या शाश्वत व अनंत अवस्थेचा अनुभव प्रदान करते.

आपल्या अनंत, अमर्याद, अनिर्बंध त्रिगुणात्मक अनंत शक्ती, अनंत ज्ञान व अनंत आनंदाच्या प्रकृतीव्दारे परमात्मा आपल्या अनंतत्वाच्या मूळ स्थितिमध्ये शाश्वतरीतीने अनंत आहे, ज्या अर्थी परमात्मा शाश्वत रीतीने आहे, त्या अर्थी परमात्म्याच्या मूळ अवस्थेत आणि परमात्म्याच्या नवीन अवस्थांमध्ये केवळ वास्तविक फरक जो तो प्राप्त करतो तो फरक प्रक्षेपित झालेल्या ''काही नसण्याच्या'' संस्काराव्दारा उत्तरोत्तर प्रगत होत जाणाऱ्या चेतनेचा असतो. परमात्मा जरी अनंत आणि शाश्वत अस्तित्वात असला तरी **परमात्मा आहे** या आपल्या मूळ अवस्थेबद्दल सचेत नसतो. तसेच तो स्वतःच्या अनंत प्रकृतीबद्दल सचेत नसतो. आपल्या स्वतःच्या अनंत मूळ लहरिमुळे परमात्मा आपल्या स्वतःच्या यथार्थतेची चेतना प्राप्त करतो व त्याच्या अनिर्बंध , अमर्याद आणि अनंत त्रिगुणात्मक प्रकृतीचा अनुभव घेण्यासाठी, त्याच्या अनंत, शाश्वत व अमर्याद स्व ची त्याला जाणीव होते.

अशाप्रकारे परमात्म्याला आता नव्याने प्राप्त केलेल्या शाश्वत चेतनेच्या अवस्थेमुळे त्याला त्याच्या ''परमात्मा आहे'' या मूळ परात्पर परब्रह्म अवस्थेचे सचेतन भान असते, जी (चेतना) तिच्या ''परमात्मा आहे'' या अवस्थेच्या

अनंतत्वाविषयी –सदासर्वदा अचेत असते. म्हणून शाश्वत व अनंत अशा परमात्म्याच्या अवस्थेचा सचेतनतः अनुभव घेणे हे अंतिम लक्ष्य असते.

या पूर्वीच वर्णन केल्याप्रमाणे परमात्म्याची मूळ अवस्था ही अनिर्बंध,परिपूर्ण पोकळीची अवस्था आहे जेथे ''परमात्मा आहे'' परंतु चेतना नाही. ही अवस्था परमात्म्याच्या मूळ दैवी महानिद्रेची अवस्था आहे जी सृष्टीच्या प्रारंभा पूर्वीच्या मूळारंभापलिकडील परमात्म्याची अवस्था आहे. परमात्म्याची मूळ अनंत लहर जी परमात्म्याची मूळ दैवी महानिद्रावस्थेचा अवधी भंग करण्याकरिता जबाबदार ठरली ती **महाकारण** म्हटल्या जाते व त्यामुळे उत्पन्न होणारा परिणाम अर्थात सृष्टी हे **महाकार्य** म्हटल्या जाते.

दैवी महानिद्रावस्था अगदी स्पष्ट आकलन होण्याचे दृष्टीने व परमात्म्यातील मूळ अनंत लहर उसळल्यानंतर (त्याला दैवी महानिद्रेतून जागृत केले असता) त्वरीत काय घडले हे अधिक जास्त स्पष्ट रीतीने समजण्याकरिता परमात्म्याच्या दैवी महानिद्रेच्या अवस्थेची तुलना मनुष्याच्या गाढ निद्रेशी करुया.

मनुष्याची ही गाढ निद्रावस्था अक्षरशः परमात्म्याची तीच मूळ दैवी महानिद्रेची अवस्था होय. ''परमात्मा आहे'' या अवस्थेत परमात्मा शाश्वतरीतीने मूळ दैवी महानिद्रावस्थेत असतो. या उलट परमात्मा मानवी अवस्थेत रोज गाढ निद्रावस्था व जागृतावस्था आळीपाळीने अनुभवतो.

''काही नाही'' हे **काही नसण्याचे** रुपात प्रकट झाल्यामुळे प्रारंभी केवळ अत्यंत सीमित संस्कारांचा जन्म झाला व त्यामुले अनंत संस्काररहित व निराकार शाश्वत परमात्म्याने तो स्वतः सिमित, मर्यादित, निर्जीव किंवा सजीव योनी किंवा रुप असल्याचा अनुभव घेतला. चेतनेच्या उत्क्रांतीमध्ये एका स्थितीत ''काही नाही'' चे संस्कार परमात्म्याला मानवी अवस्थेचे अनुभव प्रदान करतात.

''काही नाही'' चे हे संस्कार अगदी मूळच्या अत्यंत सीमित संस्कारांचीच उत्पत्ती आहेत. जो प्रथम संस्कार परमात्म्यातील चेतनेच्या अत्यंत सीमित अगदी प्रथम किरणाने उचलला व त्याच बरोबर अभिव्यक्त केला, जेव्हा अंतर्हित मूळ अनंत लहर परमात्म्याचे ठायी उसळली व जिने अत्यंत सीमित ''काही नाही'' च्या अंतर्हित असलेल्या सर्वाला ''काही नसण्याचे'' रुपात उद्‌भवित केले.

मूळ अत्यंत सीमित संस्कार, अत्यंत सीमित मूळ चेतनेच्या मंदगतीने झालेल्या उत्क्रांती बरोबर एकाच वेळी गुणांक पध्दतीने संख्येने वाढत गेले.

अशाप्रकारे निर्माण झालेले बहुविध व निरनिराळे संस्कार, विविध व निरनिराळ्या सीमित किंवा स्थूल योनींच्या माध्यमाव्दारा चेतनेच्या महत्तर उत्क्रांतीने अनुभविले होते कारण निर्माण झालेले संस्कार चेतनेने अनुभवलेच पाहिजेत, परंतु संस्कारांचा अनुभव घेण्यासाठी चेतनेला उचित माध्यमें आवश्यक होती.

अशाप्रकारे चेतनेची उत्क्रांती तुलनात्मक दृष्टीने उच्चतर व उच्चतर स्थूल योनींच्या प्रकाराशी जुळेल अशा तऱ्हेने बरहुकूम पुढे व महत्तम चेतनेत उत्क्रांत होत जाते, याचे कारण असे की, तीला मागील तुलनात्मक दृष्टीने निम्नतर स्थूल माध्यमाव्दारां संकलित केलेले संस्कार अनुभविता यावेत.

थोडक्यात म्हणजे, परमात्म्यात उसळत असणाऱ्या मूळ अनंत लहरीच्या अत्यंत सीमित प्रथम संस्काराने अचेतन अनंत परमात्म्याला अत्यंत सीमित चेतना दिली. हळूहळू विविध संस्कार गुणाकार पध्दतीने वाढले व परमात्म्यासाठी महत्तर सीमित चेतना प्राप्त केली. परिणामतः ही शेवटी चेतनेची उत्क्रांती पूर्ण झाली तेव्हा पूर्ण चेतनेच्या संस्कारांनी परमात्म्याचे मानव योनीशी तादात्म्य केले. परमात्म्याने मानव देहात आता पूर्ण चेतना प्राप्त केल्यानंतर चेतनेला उत्क्रांत करण्याकरिता अधिक एखाद्या (अधिकतर) किंवा उच्च प्रकारच्या देहाची त्यानंतर गरज रहात नाही कारण ही प्राप्त केलेली चेतना सर्व दृष्टीने परिपूर्ण व समग्र असते.

चेतनेच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेच्या दरम्यान, चेतना परमात्म्याचे विविध सीमित स्थूल निर्जीव व सजीव योनींशी जाणीवपूर्वक एकरुपता करीत असतांनाच त्याच वेळी ती चेतना अचेतनतः परमात्म्याचे तादात्म्य त्याच्या मर्यादित सूक्ष्म देहाशी व मर्यादित मनोदेहाशी देखील करीत होती. परमात्म्याच्या सीमित स्थूल-देहाशी -साहचर्य असलेल्या ह्या शरीरांनी (सूक्ष्म व मन ) चेतनेच्या उत्क्रांतीच्या संपूर्ण प्रक्रियेमधून दृढ व एकजीव अचेतन साहचर्य ''सर्वकाहीत'' अंतर्हित असलेल्या ''काही नाही'' च्या मूळ अगदी आगमनापासूनच केलेले आहे.

हे अगदी स्वाभाविक आहे की, परमात्म्याच्या महत्तर व महत्तर चेतनेच्या उत्क्रांती बरोबरच सीमित व मर्यादित सूक्ष्म व मनोदेहाची उत्क्रांती

देखील होत राहते व मानव स्थूल देह घेईपर्यंत परमात्म्याचे सीमित सूक्ष्म व मनोदेह देखील पूर्णपणे विकसित होतात.

मानव देहात परमात्म्याने जरी संपूर्ण चेतना प्राप्त केलेली असली व जरी मानव देहात मर्यादित सूक्ष्म व मनोदेह देखील पूर्णपणे विकसित झालेले असले तरी अशाप्रकारे प्राप्त केलेली पूर्ण चेतना ही केवळ स्थूलाची चेतना असते जी केवळ स्थूल जगताचाच अनुभव देते. म्हणून ही पूर्ण प्राप्त केलेली चेतना अजुनही सूक्ष्म व मनोदेहाचे बाबतीत सचेत नसते व तसेच ती जाणीवपूर्वक सूक्ष्म व मनोजगताचा अनुभव घेत नाही.

थोडक्यात म्हणजे परमात्म्याने मानवी अवस्थेत जरी परिपूर्ण चेतना प्राप्त केलेली असली तरी अजुनही त्याला ना त्याच्या सूक्ष्म देहाच्या सीमित प्राणशक्तीची ना त्याच्या मनोदेहाच्या मर्यादित मनाची जाणीव असते व यापेक्षाही कमी त्याला त्याचे भान किंवा जाणीव असते की, तो स्वतः अनिर्बंध शक्ती व अमर्याद ज्ञानसंपन्न असलेला अविभाज्य शाश्वत व अनंत परमात्मा आहे. या अवस्थेत परमात्म्याला केवळ मानवी शरीराशी असलेल्या त्याच्या एकरुपतेची व त्याच्या विविध स्थूल पैलूंची पूर्ण जाणीव असते व तो पुरुष किंवा स्त्री रुपात जगातील एक साधारण मानव म्हणून केवळ स्थूल जगताचा परिपूर्ण अनुभव घेतो.

परंतु मनुष्याची चेतना व त्याचबरोबर मनाच्या रुपात त्याचे मनोशरीर, प्राणशक्तीच्या रुपात त्याचे सूक्ष्म शरीर व देहाच्या रुपात त्याचे स्थूल शरीर हे अनंत ''काही नसण्याचे'' रुपात अत्यंत सीमित 'काही नाही' च्या अभिव्यक्ती ची सर्व निर्मिती आहे, जी ''परमात्मा आहे'' या अवस्थेत अंतर्हित होती. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे, मर्यादित मन, मर्यादित प्राणशक्ती व सीमित शरीर हे सर्व 'काही नाही' ची रुपे आहेत. तसेच मर्यादित मनाची मर्यादित प्राणशक्तीची व सीमित शरीराची चेतना देखील ''काही नाही'' चीच आहे.

मनुष्यात मन हे इच्छावासना व विचारांचे स्थान आहे. प्राणशक्ती ही बळ व उत्साहाचे स्थान आहे व शरीर हे सौख्याचे प्रतीक असून सुखाचे व दुःखाचे स्थान आहे. म्हणून या इच्छा–वासना व विचार,शक्ती व उत्साह, सुख व दुःख अनुक्रमे मनुष्याच्या सीमित मनाचे, प्राण शक्तीचे व शरीराचे सीमित पैलू होत.

जरी मनुष्याच्या त्रिगुणात्मक प्रकृतीचे मन, प्राणशक्ती व शरीर

(सौख्याचे प्रतीक) हे सीमित पायाचे सीमित पैलू आहेत तरी त्याचे कारण असे आहे की, ते अत्यंत सीमित 'काही नाही' च्या अभिव्यक्तितून उत्पन्न झालेले असतात. असे असले तरीही  हे मनाचे, प्राणशक्तीचे व शरीराचे मर्यादित पैलू अमर्यादपणे आपल्या क्षमता प्रदर्शित करतात.

याचे कारण हे आहे की, मनुष्याच्या त्रिगुणात्मक प्रकृतीच्या– प्राणशक्ती, मन व शरीर ( सौख्याचे प्रतीक) या मर्यादित पैलूं मधून प्रत्येक पैलू परमात्म्याच्या त्रिगुणात्मक प्रकृतीच्या (सत्–चित–आनंद) अनंत शक्ती,अनंत ज्ञान व अखंड आनंद यांच्या अनंत आधारांच्या प्रत्येक आधाराशी घनिष्ठपणे जोडलेला व समर्पित केलेला आहे.

वस्तुस्थिती अशी आहे की, परमात्म्याची सुप्त, अनंत त्रिगुणात्मक, प्रकृती जेव्हा सीमित ''काही नाही'' मधून क्रमशः बाहेर पडते व हळूहळू अभिव्यक्त होते आणि जेव्हा ती एकाच वेळी ''काही नसण्याचे'' रुपात सीमित ''काही नाही'' च्या प्रक्षेपणाला बाहेर आणते तेव्हा ती अंतरहित प्रकट होते. ही तीच परमात्म्याची अनंत त्रिगुणात्मक प्रकृती या प्रकटीकरणाच्या स्थितीत ''काही नसण्याच्या'' दर्शनी व मिथ्या अनंततेमध्ये अडकून पडते व अशा तऱ्हेने मनुष्याचे सीमित त्रिगुणात्मक प्रकृतीचे रुपात आपल्याला अभिव्यक्त करते व सामर्थ्याने अंतरहित प्रदर्शित करते.

१) मन २) प्राणशक्ती व ३) शरीर या मनुष्याच्या त्रिगुणात्मक प्रकृती म्हणून आपल्या क्षमता अमर्यादपणे मायेच्या भ्रमात कशा काय प्रदर्शित करु शकतात हे ज्यांच्याव्दारे स्पष्टपणे अनुभविले जाते त्या बाबी अशा :– १) वैज्ञानिकांचे संशोधक मन – ज्या वैज्ञानिकाला संशोधनाचा  व मूलभूत संशोधनाचा अंत सापडत नाही, २) मायेतील मुक्त केलेल्या आण्विक शक्तीव्दारा जी शक्ती अशा स्थितीला पोहोचलेली असते की, जी आपल्याच स्वतःच्या भ्रमाच्या ( मायेच्या) सामर्थ्याने काही नसण्याच्या त्याच स्वरुपाला ज्यातून ती अशा प्रचंड शक्तीनिशी उद्‌भवित व उत्क्रांत झाली– नष्ट करण्याची धास्ती निर्माण करते, ३) शरीराव्दारा ( जे सौख्याचे प्रतीक आहे) जे आता ''काही नाही'' च्या उत्क्रांतीच्या प्रगत स्वरुपाच्या प्रगती बरोबर प्रगती करीत आहे व जे अधिकतर व अधिकतर सौख्य शोधण्याकरिता अनंतपणे त्या मर्यादेपर्यंत प्रेरित होते की, ते सौख्यच प्रत्यक्षात मायेच्या जीवनाचा आधर बनून राहिले आहे.

''काही नसण्याच्या'' ( जी माया आहे) क्षेत्रात अशा अनंत प्रत्यक्ष प्रदर्शनाचे एकमेव कारण हे आहे की, मनुष्याच्या मूलभूत सीमित त्रिगुणात्मक प्रकृतीला म्हणजे ''काही नसण्याच्या'' प्राणशक्ती, मन व सौख्याला आपला आधार व अंतरहित विस्तार केवल परमात्म्याच्या मूळ त्रिगुणात्मक प्रकृतीच्या अर्थात ''सर्व काही'' च्या अनंत शक्ती अनंत ज्ञान व अनंत आनंदाकडून प्राप्त होते.

अनंत शक्ती ही अमर्याद आहे व ती कधीच कमी होत नाही किंवा संपुष्टात येत नाही याउलट सीमित शक्ती अनंत शक्तीशी संलग्न असली तरी ती कमी होते व संपुष्टातही येते, कारण ती केवळ काही नाही तून जन्माला आलेली आहे जी ''काही नसण्याचे'' रुपात सिमित प्राणशक्ती म्हणून प्रकट झाली आहे.

अनंत ज्ञान हे शाश्वत, कधीही न बदलणारे व सर्वव्यापी आहे व म्हणून त्याच्या अखंडपणात कोणताही खंड नाही. तथापि मर्यादित मन जरी ते अनंत ज्ञानाशी संलग्न असले तरी ते नष्ट केल्या जाते व सरते शेवटी नाहीसे केल्या जाते. कारण ते ''काही नाही'' ची निर्मिती असून ते ''काही नसण्याचे'' रुपात मर्यादित मन म्हणून प्रकट झालेले असते. अनंत आनंद हा शाश्वत व निरंतर आनंद आहे कारण तो चिरस्थायी असल्यामुळे त्याला परस्पर विरोधी पैलू नाहीत. सौख्य उलटपक्षी जरी अनंत परमानंदाशी संलग्न असले तरी ते निरंतर नाही आणि त्यामुळे त्याला या दुःखाचा विरुध्द पैलू आहे. हे सीमित सौख्य जरी ते मानवी प्राण्याच्या जीवनाचा मूळ आधार असले तरी त्याचा लोप होतो कारण जीवन स्वतःच क्षणभंगू आहे. ज्या अर्थी भ्रमात्मक जीवन हे ''काही नाही'' चे जीवन म्हणून ''काही नसण्यातून'' अभिव्यक्त झाले त्या अर्थी ते जीवन नष्ट झालेच पाहिजे.

अशी एक स्थिती येते की, परमात्म्याचा साक्षात्कार प्राप्त करण्याच्या कठीण परिश्रमात मनुष्य स्वतःची मूलभूत सीमित त्रिगुणात्मक प्रकृती, म्हणजेच शरीर ( सौख्याचे प्रतीक) प्राणशक्ती व मन हरवून बसतो व परमानंद, शक्ती व ज्ञानाच्या मूलभूत अनंत त्रिगुणात्मक प्रकृतीचा अनुभव घेतो. ह्या अवस्थे मध्ये मनुष्य असा अनुभव घेतो की, त्याची प्रकृती (Nature) हे केवळ सीमित शरीर (सौख्याचे प्रतीक) नव्हे तर अनंत आनंद आहे, सीमित प्राणशक्ती नव्हे तर अनंत शक्ती आहे व सीमित मन नव्हे तर अनंत ज्ञान आहे. अशाप्रकारे मनुष्य त्याची मूलभूत सीमित त्रिगुणात्मक प्रकृती गमवितो व त्याची प्रकृती ही

परमात्म्याची मूलभूत त्रिगुणात्मक प्रकृती असल्याचा अनुभव घेतो. याचा अर्थ असा आहे की, मनुष्याची मूलभूत सीमित त्रिगुणात्मक प्रकृती जिला परमात्म्याच्या मूलभूत अनंत त्रिगुणात्मक प्रकृतीने आधार दिला होता ती परमात्म्याच्या मूलभूत त्रिगुणात्मक प्रकृतीपासून वेगळी होऊन अलग पडली.

मनुष्य जरी आपली मूलभूत त्रिगुणात्मक प्रकृती हरवून बसतो तरी त्याने त्याच्या परिश्रमात मिळविलेली परिपूर्ण चेतना त्याने हरविलेली नसते. याचे कारण असे की एकदा प्राप्त केलेली चेतना कधिही नष्ट होत नाही. याला फक्त अपवाद म्हणजे चवथ्या भूमिकेच्या शक्तीचा अतिशय गैरवापर केल्यास , ज्याचे वर्णन पूर्वी आलेलेच आहे.

या अवस्थेमध्ये चेतना जशीच्या तशी व परिपूर्ण असतांना, मर्यादित व सीमित शरीर ( सौख्याचे प्रतीक) मर्यादित व सीमित प्राणशक्ती व मर्यादित व सीमित मन हे सर्व अनुक्रमे अमर्याद व अनंत आनंद, शक्ती व ज्ञानापासून पूर्णतः वेगळे होतात.

ही ती स्थिती आहे की, ज्यामुळे मनुष्य पूर्णपणे सचेत असतो व तो त्यानंतर भ्रामक सीमित ''काही नसण्याचा'' यथार्थ व अनंत सत्य म्हणून अनुभव घेत नाही. शरीर जे (सौख्याचे प्रतीक आहे) प्राणशक्ती व मन जे ''काही नसण्याचा'' अनुभव देण्यासाठी कारणीभूत झाले होते ते मनुष्याच्या चेतनेला आता सीमित संस्काराने घट्ट पकडून ठेवू शकत नाहीत. त्यांची शृंखला आता निखळून पडते व चेतनेच्या एकाग्र जाणीवेतून ते अगदी सहज लुप्त होतात. ते लुप्त झालेच पाहिजेत कारण स्वभावतः ते सीमित ''काही नाही'' चे होते. ज्याचा अक्षरशः अर्थ निव्वळ ''काही नाही'' म्हणजे शुन्य असा आहे.

परंतु, शरीर, प्राणशक्ती व मन यांची सरते शेवटी मनुष्याच्या चेतनेवरील पकड गमविण्यापूर्वी तेथे एक प्रबळ अनुभव शिल्लक असतो, दैनंदिन जीवनातील निद्रेचा आणि जागृतीचा. सामान्य मनुष्याचा हा मूलभूत अनुभव त्याच्या दैनंदिन जीवनात तीन प्रारंभिक अवस्था निर्माण करतो.

पहिली अवस्था ही गाढ निद्रावस्था अथवा मनुष्याची स्वतःचे पूर्णपणे भान नसलेली अवस्था आहे. दुसरी अवस्था ही स्वप्न अवस्था किंवा अर्धचेतन अवस्था किंवा अर्धजागृतावस्था आहे. तिसरी अवस्था ही पूर्ण जागृतावस्था किंवा मानव म्हणून मनुष्यातील 'स्वतःची' पूर्ण सचेत अवस्था आहे.

आता मनुष्याची ओळख म्हणजे मनुष्यातील सजीवता (life) आहे, मनुष्याच्या जीवनाची ओळख त्याच्या आचरणावरुन होते. आचरण हे

माणसाच्या संस्कारातून प्रेरित होते आणि याउलट कृतीतून संस्कार तयार होतात. कर्मामुळे मनुष्याचे हे संस्कार एकत्र केले जातात व मनावर त्याचे ठसे उमटतात. अशा प्रकारे संस्कार व कर्म (कृती) एकमेकावर अवलंबून असतात, याचे कारण असे की, संस्काराचे पोषण कर्मामुळे होते व कर्मांना संस्कारामुळे प्रेरणा मिळते.

पूर्वीच सांगितल्याप्रमाणे संस्कारांचे उगमस्थान बरेच पाठीमागे जाऊन शोध घेतल्यास ते ''सर्व काही'' म्हणजे ''परमात्मा आहे'' या अवस्थेतील परमात्म्यामध्ये अंतर्हित असलेल्या ''काही नाही'' च्या ठिकाणी आढळते. ''काही नाही'' जेव्हा प्रथम ''काही नसण्याचे'' म्हणून सृष्टीचे रुपात साकार झाले तेव्हा परमात्म्याच्या ठायी चेतनेच्या प्रारंभिच्या लवलेशास ''काही नाही'' च्या प्रथम अविष्काराने जन्म दिला व या नंतर लगेच ''काही नसण्याचा'' प्रथम संस्कार प्रकट झाला. या प्रारंभिच्या संस्काराने चेतनेच्या उत्क्रांतीसह संस्कारांचे प्रजनन केले.

त्यामुळे सर्व संस्कार हे ''काही नाही'' चे आहेत आणि ज्याअर्थी ''काही नाही'' चा अक्षरशः अर्थ ''शुन्य'' असा आहे, त्याअर्थी हे सर्व संस्कार स्वाभाविकपणे काहीच नसून केवळ संस्कारच आहेत. परंतु ''काही नाही'' च्या केवळ याच संस्कारांव्दारां मानवात चेतना पूर्णपणे शेवटपर्यंत उत्क्रांत झाली, म्हणून मानवाची चेतना या ''काही नाही'' च्या संस्काराशी अगदी घनिष्ठपणे संलग्न झालेली आहे आणि तीच चेतना मनुष्यास या भ्रमात्मक ''काही नाही'' ला ''सर्व काही'' व सत्य म्हणून असल्याचा जाणीवपूर्वक अनुभव घ्यावयास लावते.

संस्कार जोपर्यंत ते पूर्णपणे नष्ट होत नाहीत व ते चेतनेला मिथ्या ''काही नाही'' पासून ''सर्व अस्तित्वाचा'' व सत्याचा अनुभव करण्यास मुक्त व स्वतंत्र करीत नाहीत तोपर्यंत संस्कार वस्तुतः मानवाच्या जीवनात फार महत्वाची भूमिका पार पाडतात. चेतना जेव्हा सर्व संस्कारापासून मुक्त होते त्यानंतर मात्र ती मिथ्या ''काही नाही'' चा सत्य म्हणून अनुभव घेणार नाही, तर ती अमर्याद ''स्व'' चा (परमात्म्याचा) सत्य म्हणून अनुभव घेईल.

जोपर्यंत हे संस्कार मनुष्याच्या चेतनेवर चिकटून राहतात व ठसे उमटवित राहतात तो पर्यंत मानवाच्या प्राणशक्तीने प्रेरित व क्रियाशील झालेले हे संस्कार मानवाच्या मनावर सतत छाप पाडत असतात व त्याच्या अर्धचेतनेत ते गोळा होत राहताता किंवा साठविले जातात.

या संस्कारापैकी काही संस्कार मनुष्याच्या अर्धचेतनेत काही तासपर्यंत किंवा काही दिवस किंवा काही वर्षे आणि कधी कधी तर जन्मभर निष्क्रिय बनुन राहतात, परंतु त्यांच्यापैकी बरेचसे संस्कार मनुष्याच्या आंतरचेतनेद्वारां त्याच्या जीवनात प्रत्येकक्षणी तो अर्धचेतन किंवा पूर्णचेतन अवस्थेत असतांना क्रमाने स्वप्नांचा व जागृत अवस्थेचा अनुभव घेतो तेव्हा वर उफाळून येत असतात.

जेव्हा हे संस्कार पूर्णपणे मृतवत असतात तेव्हा मनुष्य गाढ निद्रेच्या अवस्थेत असतो. मानवाच्या अर्धचेतन अवस्थेतून जेव्हा हे संस्कार उफाळून वर येतात तेव्हा ते ''काही नसण्या'' पासून विविध अर्ध सूक्ष्म स्वरुपात घडविले गेले असल्यामुळे त्यांच्या प्रारंभिच्या अवस्थेत ते अस्पष्ट असतात आणि तेव्हा तो मानव अर्धचेतन अवस्थेत अर्धचेतनेव्दारा स्वप्नांचा अनुभव घेत आहे असे म्हटले जाते. जेव्हा हे अस्पष्ट संस्कार उफाळून वर येण्याच्या त्यांच्या अखेरच्या परिपक्व अवस्थेत अधिक स्पष्ट होतात तेव्हा अर्ध सूक्ष्म आकार धारण केलेली ''काही नसण्याची'' स्थूल रुपे म्हणून त्यांचा अनुभव घेतल्या जातो तेव्हा तो मनुष्य पूर्ण जागृत स्थितीत त्याच्या पूर्ण चेतनेव्दारे या स्थूल जगताचा अनुभव घेत असतांना, तो पूर्णपणे सचेत किंवा जागृत अवस्थेत आहे, असे म्हटले जाते.

मनुष्य जेव्हा जागा होतो तेव्हा ''काही नाही'' च्या संस्काराचे वर उसळून येणे ''काही नसण्याचे'' तेच स्वप्न जास्त शक्तीने व वास्तवरुपाने अभिव्यक्त करतो. वेगळ्या शब्दात सांगायचे म्हणजे, मनुष्याच्या जागृत अवस्थे मध्ये तेच स्वप्न आता सर्वोच्च अवस्थेत आहे, असे म्हटले जाते म्हणून मनुष्याची ती जागृत अवस्था म्हणजे स्वप्नाच्या त्याच अस्पष्ट स्थितीचा अनुभव घेणे होय. फक्त आता ती स्वप्ने उच्च आणि त्यांच्या पूर्णपणे परिपक्व आणि अंतिम अवस्थेत असल्यामुळे त्यांचा अनुभव आता जास्त स्पष्टपणे घेतल्या जातो.

मनुष्याचे स्वप्न हे एक नाट्यच आहे, जे मनुष्याच्या स्वतःच्या सुप्त संस्कारांच्या उफाळण्याने वठविले जाते. हे संस्कार जेव्हा मनुष्याच्या अर्धचेतनेद्वारां उफाळून वर येतात तेव्हा ते अर्धसूक्ष्म स्वरुपात स्वप्नातील वस्तू व प्राणी निर्माण करतात.

स्वप्न अवस्थेमध्ये मनुष्य केवळ स्वतःच्या स्वप्नातील नाट्यातच फसत नाही तर तो त्या स्वप्नांचा नाटककार व नायक म्हणून ह्या दोन्ही भूमिका

वठवितो. एवढेच नव्हे तर, या नाटकात मनुष्य अर्धसूक्ष्म रुपातील वस्तूंशी व प्राण्यांशी घनिष्ट साहचर्य देखील करतो, जे वास्तविक पाहाता त्यानेच स्वप्नावस्थेत निर्माण केले होते. अर्धसूक्ष्म रुपांची ही सृष्टी म्हणजे मनुष्याच्या गत व वर्तमानकालीन संस्कारांच्या अभिव्यक्तीचा सर्वतोपरी परिणाम होय. अशा प्रकारे मनुष्य आपल्या स्वप्नावस्थेमध्ये अर्धसूक्ष्म अवस्थेत असलेल्या रुपांशी अर्धचेतनेने साहचर्य करतो.

मनुष्याला जेव्हा जागृतावस्थेत पुन्हा आठवते की, हीच ती रुपे जी त्याने स्वप्नावस्थेत पाहिली होती  त्यांच्याशी साहचर्य केले होते याची त्याला वर्तमानातील दैनंदिनी जीवनात अगदी त्याच स्थूल रुपातील वस्तू, मानवप्राणी व सजीव रुपांच्या बरोबर जाणीवपूर्वक साहचर्य करीत असताना स्मरण करुन देतात व अगदी जवळच्या भूतकाळात व कधी बऱ्याच आधीच्या भूतकाळातील जीवनातील त्याच्या प्रस्थापित संबंधाशी व संपर्काशी ती रुपे संबंध जोडतात.

परंतु बहुधा मनुष्याला त्याच्या सचेत जागृत अवस्थेत हे देखील आठवते की, विशिष्ट वस्तूचे, मनुष्यप्राण्याचे किंवा सजीव प्राण्याचे स्थूलरुप ज्याच्याशी तो घनिष्ट साहचर्य करतो व ज्याला तो प्रत्यक्षात मिळवितो, ते त्याला स्मरण करुन देते की तीच आकृती त्याने स्वप्नात केव्हातरी भूतकाळात काही दिवसापूर्वी किंवा महिन्यापूर्वी किंवा वर्षापूर्वी पाहिलेली असते.

अशा प्रकारे हे प्रत्यक्षात असे घडते की, भविष्यातील एखादे रुप, जे त्याने कधी गतकाळातील स्वप्नात पाहिले होते, तर ते परत मनुष्याचे समोर त्याचे वर्तमान जीवनाचे साहचर्यात एक स्थूल स्वरुप म्हणून पहावयास मिळते.

काही काळ लोटल्यानंतर तीच वस्तू मनुष्याला आपल्या आयुष्यात पूर्वी कधी पाहिल्याचे किंवा ज्याच्याशी संपर्क साधल्याचे मुळीच ज्ञान नसते, (आता जागृतावस्थेत) परत ती वस्तू तंतोतंत तशीच दिसते जशी त्याने यापूर्वी स्वप्नात पाहिली होती.

अशाच प्रकारच्या अनुभवांच्या नोंदी झालेल्या आहेत की, मनुष्य काही विशेष घटना प्रत्यक्ष घडण्यापूर्वीच बरेच वर्षे आधी स्वप्नात पाहतो.

मनुष्याला त्याच्या स्वप्ननाट्यात भविष्यातील अशी रुपें व घटना, आधीच पाहणे कसे काय शक्य आहे, जेव्हा हे स्वप्ननाट्य त्याच्या भूतकालातील व वर्तमान काळातील दैनंदिन जीवनातील संस्कारांची केवळ निर्मिती आहे.

एखादी वस्तू किंवा घटना जी पूर्णतः भविष्याची आहे, एखाद्याला

आपल्या वर्तमानातील स्वप्नात संपर्कात येणे व दिसणे व त्यांच्याशी आधीच भविष्यातील साहचर्य प्रस्थापित करणे, हे खरोखर शक्य आहे काय ? असे असतानाही शेवटी बऱ्याच काळानंतर भविष्यात एकेदिवशी तो जागृतावस्थेत जाणीवपूर्वक त्या वस्तूंशी संपर्क व साहचर्य करे पर्यंत, दरम्यानच्या काळात त्या गोष्टींबद्दल अनभिज्ञ असतो.

खरोखरच अशी घटना जर शक्य असेल आणि मनुष्याने स्वप्नात भविष्य निर्हेतूकपणे चाचपडले तर भविष्य हे मनुष्याचे वर्तमानात कोठून झेप घेते ?

वर्तमानात राहणारा मनुष्य आपल्या स्वतःच्या गतकाळातील संस्काराद्वारां स्वप्नावस्थेत देखील भविष्याची कशी काय पकड घेऊ शकतो आणि भविष्यात घडणाऱ्या घटना व वस्तूंच्या संस्कारांशी आधीच साहचर्य कसे काय करु शकतो ? अशी कोणती गोष्ट आहे की जी मनुष्याला पूर्वज्ञानाची (prescience) क्षमता प्रदान करते ?

मनुष्याने भविष्यातील वस्तूंशी व घटनांशी असलेली हीच साहचर्ये निर्हेतुकपणे व अजाणतेपणी जरी वर्तमान काळात अनुभविली तरी ती आपोआपच विकसित होतात व मनुष्य स्वप्नावस्थेतील नाट्यमय घटनांचा निर्माता असल्यामुळे ती अनिवार्यतः तेथे उपस्थित असतातच.

मनुष्य त्याच्या सुप्तसंस्कारांच्या प्रक्षेपणांचे व्दारां ज्या क्षणी त्याच्या स्वप्नावस्थेतील नाटकाचा निर्माता होतो त्याच क्षणी त्याच्या स्वतःच्या सुप्त संस्कारांचे तेच प्रक्षेपण त्याचा भूतकाळ जणू खरोखरच वर्तमान काळ आहे असे प्रतिबिंबित करते व मनुष्य या नाट्यात स्वतःला गुंतलेला पाहून, भूतकाळालाच आताही वर्तमानकाळ बनवून तो आपल्या भूतकाळात निमग्न होतो.

मनुष्य सदासर्वकाळ वर्तमान राहून देखील अशा तऱ्हेने निर्हेतुकपणे व अजाणतेपणी भूतकाळ हा वर्तमानकाळ आहे असे टिकवून ठेवत असताना भूतकाळाला सुरक्षित ठेवतो. परंतु मनुष्य जेव्हा गतकाळाचे पालन करणे सुरुच ठेवतो, तेव्हा तो (त्याचवेळी तो निर्माता असल्यामुळे) त्या बरोबरच त्याच्या स्वप्नावस्थेच्या नाट्यातील वस्तूंच्या उत्स्फूर्त साहचर्याव्दारां स्वतःच्या निर्मितीचा पालनकर्ता देखील होतो. हीच ती साहचर्ये जरी निर्हेतुकपणे प्रस्थापित झाली असली तरी नाटकाच्या सातत्यास टिकवून ठेवतात आणि निर्मात्यास पालन कर्त्याची भूमिकाही प्रदान करतात.

गतकाळात जे काही घडून गेले आहे, त्या सर्वांचे रक्षण करण्याच्या

लहानसहान कृतीमध्ये, मनुष्य आपल्या वर्तमानात त्याच्या गतकाळाचा पालनकर्ता म्हणून, निर्हेतुकपणे व अजाणतेपणी गतकाळाचे वर्तमान म्हणून रक्षणकरण्याच्या त्याच्या कृतीने, भविष्याला देखील तो एकाच वेळी प्रस्थापित करतो, जो वर्तमानकाळ सदैवच भूतकाळचा भविष्यकाळ म्हणून राहिलेला असतो.

उदाहरणार्थ, मनुष्य आजच्या वर्तमानात राहणारा म्हणून स्वतःकडे पाहतो व कालच्या दिवसाला त्याचा सर्व भूतकाळ व उद्याच्या दिवसाला त्याचा सर्व भविष्यकाळ समजतो.

मनुष्य आता ज्याक्षणी प्रतिपादित करतो की, तो आजच्या वर्तमानकाळात जगत आहे त्याचक्षणी त्याने निर्हेतुकपणे व अजाणतेपणी कालच्या भूकाळाला न केवळ आजचा वर्तमानकाळ म्हणून सुरक्षित केले परंतु उद्याचा भविष्यकाळ म्हणून देखील सुरक्षित केलेले आहे. आजच्या वर्तमानकाळात जगत असल्याचे मान्य करीत असतानाच मनुष्य कालचा गतकाळ पालन करण्याच्या लहानसहान कृतीमध्ये तो निर्हेतुकपणे व अजाणतेपणी आपल्या आजच्या वर्तमानात ह्या आजला कालचा भविष्यकाळ म्हणून प्रस्थापित करतो.

तेव्हा जरी भूतकाळाला व भविष्यकाळाला आपापली स्थिती असली तरी ह्या दोन्हींचे सातत्याने एकाचवेळी केवळ वर्तमानातच पालन केले जाते. केवळ वर्तमानामुळेच भूत व भविष्य या दोन्हींचा संयोगबिंदू वर्तमानातच चिरंतनपणे प्राप्त होतो.

अस्तित्वाच्या शाश्वतेत ''वेळ''* नावाची गोष्ट नाही. तिथे ना भूतकाळा ना भविष्यकाळ केवळ चिरंतन वर्तमानकाळच आहे. म्हणून शाश्वतेत काहीच कधी घडले नाही व काहीच कधी घडणार नाही. सर्व जे काही घडत आहे ते अनंत वर्तमानात घडत आहे, जर काही घडतच असेल तर त्याचे कारण असे

* (टीप–स्थूल, सूक्ष्म आणि मनोभुवनांचे आस्तित्व केवळ कल्पनेत आहे आणि म्हणून काळ व (स्थळ) अवकाश यांचे अस्तित्व देखील केवळ कल्पनेत आहे, म्हणून काळाला निरपेक्ष मूल्य नाही व या तीन पैकी प्रत्येक भुवनात त्याला सापेक्ष महत्व आहे व ते एकमेकांपासून पूर्णपणे स्वतंत्र आहेत व त्यामुळे स्थूल जगतातील काळ हा सूक्ष्म व मनोभुवनातील काळापेक्षा स्वतंत्र आहे. सूक्ष्म भुवनातील काळ हा स्थूल व मनोभुवनातील काळापेक्षा स्वतंत्र आहे. स्वप्न हे सूक्ष्म इंद्रियांव्दारा स्थूल वस्तूंच्या अनुभवाव्यतिरिक्त काही नाही व आपल्या सर्वांना असे सांगितल्या गेले आहे की, गुंतागुतीचे दीर्घकालीन स्वप्न त्या कल्पनेच्या काळात किती अशक्य वाटणाऱ्या अल्प वेळात घडते की, जी वेळ मनगटावरील घड्याळाच्या काट्यांच्या हालचालीनी मोजली जाते.)

की, जे काही सर्व घडले आहे असे दिसते व जे काही घडत आहे असे दिसते व जे काही कधी मायावी सार्वभौमिक विश्वात घडावयाचे असेल असे दिसते ते सर्व परमात्म्याने त्याच क्षणी दिव्य स्वप्नात पाहिले होते की, ज्यावेळी त्याची स्वतःची ''मी कोण आहे?'' ची मूळ अनंत लहर उसळली होती, म्हणून खरे पाहाता काहीच घडले नाही व काहीच कधी घडणार नाही.

मनुष्य जेव्हा आपल्या स्वप्नावस्थेत भूत, वर्तमान व भविष्यकाळाच्या रुपांशी देखील साहचर्य करतो तेव्हा तो ते साहचर्य निर्माण करणे व नंतर ते साहचर्य राखून ठेवणे व सरतेशेवटी ते साहचर्य नष्ट करण्याची तो केवळ भूमिका वठवितो व तो हे सतत प्रस्थापित करतो की, तो त्याच्या स्वप्नावस्थेतच्या वर्तमानात या सर्व घटनांचा साक्षिदार आहे.

सर्व वस्तू, मानव प्राणी व इतर सजीव प्राणी यांच्या सर्व निर्मितीच्या व रक्षणाच्या आधारावरच – मग ते स्वप्नावस्थेत असो की, जागृतावस्थेत असो वर्तमानातील प्रत्येक पावलागणिक एक अनिवार्य विनाश निर्मित व रक्षित सर्व वस्तूंच्या भविष्याचे रुपात झुलत आहे.

ज्या कोणत्याही वस्तूला प्रारंभ आहे अनिवार्यतः त्याला अन्त असलाच पाहिजे. निर्माण झालेल्या सर्व वस्तू मग त्या कशाही पोषण केलेल्या असल्यातरी सहेतुकपणे किंवा निर्हेतुकपणे भविष्यकाळाची अपेक्षा विनाशाचे रुपात करीत असताना अनिवार्यतः नष्ट झाल्याच पाहिजेत. पोषण करण्याच्या कृतीतच वर्तमानकाळातील मानव त्याने भूतकालात निर्माण केलेल्या वस्तूंचा आपोआपच पोषणकर्ता बनतो ज्याची निर्मिती त्याने भूतकाळात केली होती. भविष्याचे ज्ञान असल्यामुळे मनुष्य पोषणकर्ता होतो, जे निश्चित विनाशाचे रुपात न चुकता त्याचे समोर राहते आणि जो विनाश भविष्यकाळाचे रुपात आपली निश्चित पाळी येण्याची प्रतिक्षा करतो. अर्थात मनुष्याला हे खरोखरच भान नसते की, त्याला भविष्याची जाणीव आहे, परंतु तो पोषणकर्ता आहे ही वस्तुस्थितीच दर्शविते की, तो विनाशाची अपेक्षा करीत असलाच पाहिजे आणि विनाश हा भविष्याच्या क्षेत्राशी संबंधीत असल्यामुळे मनुष्याला जरी त्याला भविष्य ज्ञात आहे याचे भान नसले तरी त्याला तो वर्तमानकाळात पोषणकर्त्याची भूमिका वठविण्यात व्यस्त असतो याची त्याला सदैव जाणीव असते.

निर्माता होण्याच्या कृतीतच, निर्मित सर्व वस्तूंचे पोषण हे ओघाने

येतेच व निर्मार्त्याला एकाच वेळी पोषणकर्त्याची भूमिका पार पाडणे आवश्यक ठरते. त्याबरोबर पोषण करण्याच्या कृतीतच पोषण केलेल्या सर्व वस्तूंचा विनाश अपेक्षित केल्या जातो. म्हणून सर्व वस्तू जाणतेपणी व अजाणतेपणी पोसल्या जातात आणि तो पोषणकर्ता म्हणून निर्मित व पोषित सर्व वस्तूंचे भवितव्य अनिवार्यतः विनाशाची अपेक्षा करुन वर्तमानात प्रस्थापित करतो.

परमात्मा आपल्या मूळ अनंत दैवी स्वप्नावस्थेत निर्माता (कर्ता) रक्षक (धर्ता) व विनाशकर्ता (हर्ता) म्हणून ह्या तीनही भूमिका शाश्वतपणे एकाचवेळी वठवितो.

परमात्मा जेव्हा आपल्या स्वतःच्या अनंत सृष्टीच्या पोषणाच्या प्रक्रियेत असतो, तो त्याचवेळी आधीपासूनच भविष्यात असतो व त्याने निर्मित केलेल्या निर्मितीला पोसल्यानंतर जे निर्मित होऊन गेलेले आहे भविष्य निश्चितपणे त्याचे समक्ष त्याच्या शाश्वत वर्तमानात देखील प्रस्थापित होते जे भविष्य त्याने भूतकाळात जे निर्माण केले व वर्तमानात ज्याचे पोषण केले त्या सर्व सृष्टीचा (ते भविष्य) विनाश करेल म्हणून परमात्म्याला तो सर्वज्ञ व शाश्वतरित्या वर्तमानात असल्यामुळे, भूतकाळाचे त्याला ज्ञान असते व गतकाळ वर्तमान म्हणून शाश्वतरीतीने तो पोसतो व त्याचवेळी जे सर्वकाही भविष्याचे आहे त्याचा आधीपासून शाश्वत वर्तमानात सुद्धा सतत अनुभव घेतो.

अशाप्रकारे परमात्मा मनुष्य अवस्थेत मनुष्य म्हणून आपल्या स्वप्नावस्थेत सदैव निर्हेतुकपणे पाहतो, जे त्याला भविष्यात त्याच्या जागृतावस्थेत देखील अनुभवायचे असते, म्हणून मनुष्याला याप्रमाणे असे दिसून येते की, काही कालवधीनंतर ज्या काही गोष्टी घडतात त्याचे त्याला कधी कधी पूर्वज्ञान असते.

सारांश असा आहे की, निर्मितीच्या कृतीतच पोषणाच्या व विनाश करण्याच्या क्रिया सुध्दा उपस्थित असतात म्हणून माया (भ्रम) निर्माण करीत असतानाच परमात्मा जणू त्याचवेळी तिचे पोषण व विनाश करीत असतो.

म्हणून खरे पाहता, ज्याचे पोषण करायवयाचे असते व ज्याचा विनाश करावयाचा असतो, असे काहीच निर्माण केले जात नाही. याचे कारण असे की निर्मित सृष्टी ''काही नाही'' पासून आहे व हे ''काही नाही'' प्रत्यक्षात सर्व दृष्टीने पुर्णतः शून्यच आहे.

हे ''काही नाही'' जरी खरोखरच शून्यच आहे, तरी जेव्हा हे ''काही

नाही'' ब्रह्माने निर्माण केले विष्णूने पोसले व महेश किंवा शिवाकडून नष्ट केले गेले असे म्हटले जाते, तेव्हा हे केवळ अनंत मायेच्या (illusion) परिभाषेत म्हटले गेले आहे म्हणजे परमात्म्याच्या अनंत दैवी स्वप्नावस्थेच्या परिभाषेत म्हटले गेले ज्याचा संबंध मायेच्या विश्वाशी म्हणजे ब्रह्मांडाशी* आहे.

सत्याच्या शाश्वतात निर्मिती, पोषण किंवा संहार अशाप्रकारची कोणतीही गोष्ट मुळीच नाही. ना तेथे अवकाश (स्थळ) ना तेथे सापेक्षतेला काही वाव व त्याही पेक्षा अत्यंत कमी म्हणजे भूत, वर्तमान आणि भविष्य म्हणून परस्पर संबंधीत कालखंडाचे कोणतेही अस्तित्व कधी असू शकत नाही.

'सत्याच्या' शाश्वततेत एकमेव, अनंत, शाश्वत, सर्वव्यापक अस्तित्व आहे.

थोडक्यात म्हणजे – जेव्हा मनुष्याची चेतना त्याला अर्धचेतनेने ''काही नाही'' चे संस्कार अनुभवावयास लावते तेव्हा मनुष्य स्वप्न पाहात आहे असे म्हटले जाते. जेव्हा मनुष्याची चेतना, संपूर्ण जाणीवेने त्याच ''काही नाही'' च्या संस्कारांचा यथार्थपणे अनुभव घेण्यास कारणीभूत होते तेव्हा मनुष्य स्वप्नात अजून एक दुसरे स्वप्न पाहतो असे म्हटलेजाते किंवा असे म्हटले जाते की, तो ''काहीच नाही'' त ''काही नाही'' चा अनुभव घेत स्वप्नात अर्थशून्य स्वप्न पाहतो. त्यामुळे हे अगदीच समर्पक शब्दात म्हटले आहे की, जगत व जगतातील व्यवहार हे ''काही नाहीत'' ''काही नाही'' आहेत – स्वप्नातील स्वप्न आहेत. याचा अर्थ असा आहे की, परमात्मा मनुष्याच्या अवस्थेत मनुष्याचे जीवनाचा दैवी स्वप्नात म्हणजे सृष्टीचा रिक्त स्वप्न म्हणून अनुभव घेतो किंवा दुसऱ्या शब्दात मनुष्याचे जीवन हे परमात्म्याचे त्याच्या दैवी स्वप्नाच्या किंवा सृष्टीच्या अनुभवातील अजून एक स्वप्न आहे.

परमात्म्याने मानवावस्थेत संपूर्ण चेतना प्राप्त केलेली असली तरी व भ्रामकरीतीने स्थूल जगताचा सत्य म्हणून ''काही नसण्याच्या'' भ्रामक अनंततेच्या विविध प्रकारच्या संस्कारांचा अनुभव घेतला तरी ही परिपूर्ण चेतना आणि हे असंख्य संस्कार, हे सर्व परमात्मा मानवाच्या स्थितीत ज्यावेळेस गाढ निद्रेच्या अवस्थेत जातो तेव्हा पूर्ण आत्मसात केल्या जातात किंवा लुप्त होतात.

* (टीप–ह्या तीन पैलूं पैकी – निर्माता, पोषणकर्ता व संहारक, पोषणकर्ता सर्वात महत्वाचा आहे. कारण वर्तमान जे भूत व भविष्याला आधारभूत आहे ते सर्वात महत्वाचे आहे. म्हणून परवरदिगार (विष्णू) पोषणकर्ता परमात्म्याचा सर्वात महत्वाचा पैलू होय.)

मानवाची  गाढनिद्रा ही परमात्म्याची दैवी महानिद्रेची मूळ दैवी अवस्था असल्याचे अप्रत्यक्षपणे प्रतिपादित करते. परमात्मा जेव्हा मानवाच्या स्थितीत त्याच्या गाढ निद्रेतून दररोज पूर्णपणे जागा होतो तेव्हा गाढनिद्रेत सुप्त असलेली ती परिपूर्ण चेतना आणि गाढ निद्रेत लुप्त झाले असंख्य संस्कार (जे दृष्टीच्या आणि अनुभवाच्या कक्षेतून नष्ट झाले होते.) आता ते सर्वच्या सर्व उफाळून बाहेर येतात व पुन्हा एकदा सीमित ''काही नाही'' चे भ्रामक अनुभव निर्माण करुन त्यांना यथार्थ व अनंत ''काही नसल्याचे'' रुपात आभिव्यक्त करतात.

पुनर्जन्माच्या आणि आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या प्रक्रियेतील परस्पर विरोधी संस्कारांचा अनुभव घेऊन, त्या अनुभवांव्दारां शेवटी जोपर्यत सर्व संस्कार घालविले जात नाहीत किंवा स्वच्छ पुसले जात नाहीत तोपर्यंत गाढनिद्रा आणि जागृती यांच्या एकामागून एक येणाऱ्या अवस्थात चेतनेची आणि संस्कारांची एकामागून एक भोगून संपविण्याची आणि प्रकट होण्याची ही नसंपणारी श्रृंखला सुरुच राहते. तेव्हा अशाप्रकारे एकमेव संस्कारविरहित चेतना परमात्म्याला त्याच्या मूळ, शाश्वत, अनंत व सत्य परमात्म-स्थितीचा चेतनायुक्त अनुभव देण्याकरिता शिल्लक राहते.

मानव देहाव्हारां अनिवार्यतः परिपूर्ण व संस्कार विरहित चेतना परमात्मा प्राप्त करतो त्याअर्थी परमात्म्याच्या निरनिराळ्या अवस्थांची तुलना करण्याकरिता मनुष्याच्या निरनिराळ्या अवस्था उदारहणे म्हणून घेता येतील.

मनुष्याच्या अवस्थेतील परमात्म्याची गाढ निद्रावस्था न केवळ परमात्म्याच्या दैवी महानिद्रे सारखी दिसते परंतु अक्षरशः ती ''परमात्मा आहे'' या स्थितितील परमातम्याच्या 'परात्पर परब्रह्म' अवस्थेतील परमात्म्याची तीच मूळ महानिद्रवस्था आहे जेथे अमर्याद निरंकुश पोकळी व्याप्त असते.*

मनुष्य जेव्हा गाढ निद्रेच्या अवस्थेत जातो त्यावेळी निरवकाश

* (टीप- परमात्म्याचा साक्षात्कार आणि गाढ निद्रेमध्ये गहन आणि अगदी यथार्थ नाते आहे. आत्म्याची शाश्वत इच्छा परमात्म्याशी एकरुप होण्याची असते. परंतु चेतना स्वतः स्थूलांशी चिकटून राहत असल्यामुळे आत्मा केवळ स्थूलाशीच एकरुप होताना दिसतो. उदाहरणार्थ, पाषाण अवस्थेत स्थूल चेतना आत्म्याला पाषाणाची एकरुप व्हावयास लावते, परंतु खरे पाहिले असता आत्मा हा नेहमीच परमात्म्याशी एकरुप असतो हा मुद्दा अधिक स्पष्ट करण्याचे दृष्टीने आपण असे समजू की, तुम्ही अफू किंवा एखादे मादक पेय घेतले व त्यामुळे शरीरात जो कोणताच आमूलाग्र बदल होत नाही व चेतनाच तेवढी ग्रस्त होते व तुमच्या  संवेदनांना उत्तेजित करते व तुम्हाला अतिउत्साही किंवा निरुत्साही वाटते. अशाप्रकारे जरी तुम्ही केवळ स्थूल चेतन असल्याचे तुम्हाला जाणवत असले तरी व्यक्तिगत आत्मा म्हणून तुम्ही परमात्म्यात परमात्म्याशी चोवीस तास एकरुप असता. (टीप पुढील पानावर)

शून्यावस्था (रिक्तता) असते व चेतना नसते. मनुष्यातील ''स्व'' जरी सामान्यपणे शासोच्छवास करीत असला तरी मनुष्याला त्याच्या ''स्व'' मध्ये ना त्याच्या मर्यादित ''मी'' ची किंवा अहंची चेतना असते, ना मर्यादित, मन, प्राणशक्ती, शरीर किंवा जगताची चेतना असते. मनुष्यातील ''स्व'' ला स्वतःच्या अस्तित्वाची देखील चेतना नसते. थोडक्यात, मनुष्याच्या गाढ निद्रेच्या अवस्थेत ''स्व'' असतो व ''चेतना नसते''.

मनुष्य जेव्हा रोज आपल्या गाढ निद्रेतून जागा होतो, तेव्हा सामान्यपणे तो काहीच कारण नसताना जागा होत नाही तर त्याच्या स्वतःच्या संस्कारांची सुप्त चेतना त्याच्या आंतरचेतनेला चेतनेच्या बाहेर निघण्यासाठी व गाढ निद्रेत वरपांगी नाहिसे झालेल्या सुप्त संस्कारांचा अनुभव घेण्यासाठी आंतरसूक्ष्म चेतनेला पुढे लोटते (urges) किंवा उत्तेजित करते. यामुळे मनुष्य जागा झाल्याबरोबर अनिवार्यतः त्याला सर्वात आधी त्याच्या सभोवतालची चेतना प्राप्त होते व नंतर क्रमशः त्याला स्वतःची त्याच्या मर्यादित ''मी'' च्या लवाजम्यासह–मन, प्राणशक्ती, शरीर आणि जगताची चेतना प्राप्त होते.

त्याप्रमाणे, मूळदैवी गाढनिद्रावस्थेत असलेल्या परमात्म्याला त्याच्या अमर्याद मूळ पूर्ण शून्यातून जागे होण्यासाठी, बंधनरहित स्वतंत्र असलेल्या परमात्म्याची मूळ अनंत लहरच प्रत्यक्ष महाकारण–मूळ कारण होते व त्याशिवाय दुसरा अर्थ, हेतू (Rhyme) किंवा कारण (reason) नव्हते.

ज्याप्रमाणे मनुष्याला जो आपल्या गाढनिद्रेतून जागा झाल्यावर* स्वप्नाच्या अर्धचेतन अवस्थेमधून पूर्ण चेतना प्राप्त करीत असताना (जे स्वप्न फार जास्त काळा टिकू शकेल किंवा अगदी क्षणभंगूर असेल) त्याला अनिवार्यतः प्रथम स्वप्नावस्थेतून जावे लागते व नंतर तो पूर्णपणे जागृत होतो, अगदी याचप्रमाणे परमात्म्याचे बाबतीतही ''परमात्मा आहे'' या अवस्थेत

---

पुन्हा आपण असे समजू की, तुम्हाला थकलेले व अस्वस्थ वाटते व त्यामुळे तुम्ही झोपी जाता. तुम्ही हे काय करण्याचा प्रयत्न करीत आहात ? हे दुसरे काहीच नसून तुम्ही परमात्म्यात आश्रय घेण्याचा प्रयत्न करता, जी तुमची स्वाभाविक व मूळची अवस्था आहे. म्हणून समग्र सृष्टीची परमात्म्यात – सर्वोच्च आत्म्यात (over-soul) काही काळापर्यंत गाढ निद्रावस्थेत प्रवेश करुन आश्रय घेण्याची ही सचेतन किंवा अचेतन प्रवृत्ती असते.

(*यथार्थ जागृती हे रेखाचित्र पहावे)

असेच घडते. परमात्मा आपल्या मूळ दैवी महा–निद्रवस्थेतून पूर्णपणे जागे होण्यापूर्वी, दैवीअर्धचेतनावस्था जी दैवीस्वप्नावस्था किंवा निर्मात्याची अवस्था आहे, ती अनिवार्यतः अनुभवितो.

मूळ अनंत लहरीने 'महाकारण' म्हणून परमात्म्यात प्रथम थेंबाथेंबाच्या गळतीने अत्यंत प्रथम सीमित चेतनेला प्रकट केले. आता अर्धचेतनावस्थेत असलेल्या परमात्म्याला, अत्यंत सीमित चेतनेने, आंतरचेतनेव्दारां अंतर्हित ''काही नाही'' चे अत्यंत सीमित संस्कार, जे देखील ''काही नसण्याचे'' रुपात अभिव्यक्त झाले होते, ते अनुभविने भाग पडले. ''काही नसण्याच्या'' अत्यंत सीमित अगदी आद्यसंस्काराच्या अनुभवाने ''दैवी स्वप्नाला'' विश्व निर्मितीला प्रारंभ केला.

अशा प्रकारे ''परमात्मा आहे'' या अवस्थेतील चेतनेच्या प्रथम थेंबाने परमात्म्यात दैवी आंतरचेतना बिंबविली ज्या चेतनेने, दैवी गाढनिद्रेत असलेल्या परमात्म्याला दैवी अर्धचेतनेची अवस्था बहाल केली. या दैवी अर्धचेतन अवस्थेत परमात्मा दिव्यत्वाने स्वप्न पाहतो व दैवी स्वप्नाचा किंवा सृष्टीचा अनुभव खऱ्या दैवी जागृतावस्थेच्या बरेच आधी घेतो जी अवस्था त्याला पूर्णपणे जागृत करुन त्याला परमात्म्याचा अनुभव प्रदान करेल, जो आपल्या अनंत, अनिर्बंध व अमर्याद दैवी प्रकृतीच्या पूर्ण चेतनेने संपन्न असेल.

परमात्म्याची ही दैवी आंतरचेतना देखील ''काही नाही'' तून बाहेर आली, जी ''सर्वकाहीच्या'' ''परमात्मा'' या अवस्थेत अंतर्हित होती व जी ''सर्वकाहीच्या'' मूळ पूर्ण रिक्त अवस्थेत अनिवार्यतः सृष्टीबिंदू किंवा ॐ बिंदूतून प्रक्षेपित केली गेली.

मूळ पूर्णरिक्ततेमध्ये, सृष्टीबिंदूतून निघालेल्या परमात्म्याच्या दैवी आंतरचेतनेच्या प्रक्षेपणाच्या कंपनांनी (तरंगांनी) परमात्म्याच्या दैवी गाढनिद्रावस्थेला जागविले व परमात्म्याच्या मूळ श्वासाला किंवा मूळ शब्दाला दैवीनादाला, अवकाश, काळ आणि विश्वव्यापी सृष्टीसह त्याच्या सर्व मर्यादित सीमित अहं, मन, प्राणशक्ती तसेच व्यक्तिगत व विविध योनींच्या लवाजम्यासह अभिव्यक्त केले.

दैवीस्वप्नावस्थेत असलेल्या परमात्म्याच्या अनंद दैवी आंतरचेतनेच्या प्रक्षेपणाला जेव्हा चालना मिळते तेव्हा दैवीस्वप्नाची किंवा सृष्टीच्या उत्क्रांतीचा

प्रारंभ होतो तेव्हा परमात्मा दैवीअर्धचेतन अवस्थेत न केवळ दैवीस्वप्नाचा अनुभव घेण्यास प्रारंभ करतो तर त्यावेळी वैश्विक उत्क्रांतीच्या क्षेत्रातील ज्याचा तो अनुभव घेतो त्या सर्व वस्तूंशी एकरुपता व साहचर्य करीत असताना त्याच्या दैवी स्वप्नात गुंतून पडतो.

परमात्म्याची अनंत दैवी आंतरचेतना जेव्हा निरंकुश रिक्ततेत सृष्टीबिंदूतून अनंततेने प्रक्षेपित होते तेव्हा समग्र सृष्टी हळूहळू पुढे उद्‌भवित होते व आकाराने, रुपाने, रंगाने, व इत्यादी प्रकारे दैवी आंतरचेतनेच्या प्रक्षेपणाच्या तीव्रतेच्या प्रमाणात उत्क्रांत होते.

या स्थितीत, दैवीमहानिद्रेत असलेल्या परत्पर परब्रह्म अवस्थेतील परमात्म्यात सुप्त असलेली दैवी अनंत आंतरचेतना पूर्णपणे प्रकट झाली असली तरी तत्क्षणीच परमात्मा दैवी गाढनिद्रेतून पूर्णतया नव्हे तर अर्धचेतनतया जागा होतो.

परमात्मा आता दैवी अर्धचेतन अवस्थेत अधिक जास्त उत्क्रांत झाल्यामुळे, दैवी स्वप्नाचा अधिक तीव्रतेने अनुभव घेतो व स्वतःच्या त्याच सृष्टीशी अधिक तीव्रतने एकरुपता व साहचर्य करतो.

वैश्विक उत्क्रांतीमध्ये आपण स्वतः सर्वकाही असल्याचा परमात्मा क्रमशः अधिक प्रबळतने अनुभव घेतो आणि विश्वांशी, वायुशी, जडांशी व सजीव प्राण्याशी आपली एकरुपता करतो जसे–पाषाण, धातू, वनस्पती, पक्षी, कृमीकिटक, मासे, प्राणी आणि मानवप्राणी.

अशाप्रकारे परमात्म्याला त्याच्या आरंभिच्या ''मी कोण आहे'' या शब्दांना वरपांगी सत्य परंतु यथार्थपणे खोटी उत्तरे मिळतात – जसे, ''मी पाषाण आहे, मी धातू आहे'' अशी उत्तरे प्राप्त करीत अंततः ''मी पुरुष आहे, मी स्त्री आहे'' असे उत्तर प्राप्त करतो.

परमात्मा स्वतःची एकरुपता मानव प्राण्यांशी करतो तेव्हा तो अर्धचेतन राहत नाही, त्याचे कारण असे की, या स्थितीत, दैवी स्वप्नाचे अवस्थेत मानवयोनीशी स्वतःची एकरुपता साधताच त्याला परिपूर्ण चेतना प्राप्त होते.

आता पूर्णचेतना प्राप्त केल्यानंतर या चेतनेने सर्व स्वप्नांना दूर फेकले पाहिजे व परमात्म्याला खऱ्या जागृतावस्थेचा अनुभव देण्यास ती कारण झाली पाहिजे म्हणजे ''तो परमात्मा आहे'' हा साक्षात्कार तिने करुन दिला पाहिजे.

या स्थितीत परमात्मा जरी मानव प्राण्याशी एकरुपता करीत असला व परमात्मा जरी आता महत्तर सतर्कतेच्या* भानासह सचेत असला तरी त्याने अजून त्याच्या सत्य दैवी जागृतावस्थेला जाणले नाही. याचे कारण असे की, आतापर्यंत संपूर्ण प्राप्त केलेली चेतना ही ''काही नाही'' च्या ''काही नसण्याची'' होती व जी अंतर्हित होती व जी आता वरपांगी ''सर्वकाही'' म्हणून त्याच्या स्वतःच्या दैवी अनंत आंतरचेतनेतून प्रकट झाली. ही स्थिती परमात्म्याला आपल्या यथार्थ ''सर्व काही'' असल्याचे व स्वतः परमात्मा असल्याचे ज्ञान प्रदान करण्याऐवजी त्याला स्वतःला त्याने प्रक्षेपित केलेल्या सृष्टीशी युक्त करण्याकरिता प्रवृत्त करते.

थोडक्यात म्हणजे, हीच स्थिती आहे की, ज्यामध्ये परमात्मा मानवप्राण्यांशी संपूर्ण चेतनेसह एकरुपता करुनही त्याला स्वतःच्या सत्य व मूळ ''परमात्मा आहे'' या अवस्थेचा पूर्णपणे विसर पडलेला असतो.

या संपूर्ण चेतनेच्या अवस्थेत देखील परमात्मा अजुनही त्याने स्वतःच निर्माण केलेल्या जगताचा अनुभव घेणे सुरुच ठेवतो व महत्तम भानासाह त्याच वेळेस मानवप्राण्यांशी एकरुपता करणे चालू ठेवतो. अशाप्रकारे परस्पराविरोधी संस्कारांच्या प्राबल्यानुसार स्वतःकधी पुरुष म्हणून तर कधी स्त्री म्हणून अनुभव घेतो. दुसऱ्या शब्दात, परमात्मा मनुष्याच्या अवस्थेत जरी पूर्ण सचेत व पूर्णतः भानावर असला तरी स्वतः ''परमात्मा आहे'' या अवस्थेत परमात्मा म्हणून अनुभव न घेता, तो मानवी अवस्थेत मनुष्य म्हणून अनुभव घेतो, अनंत म्हणून नव्हे तर सीमित म्हणून अनुभव घेतो.

विरोधाभासयुक्त दुर्विलास असा की, स्वतःची सत्यता मायेत (illusion) गमवून व स्वतःची सत्यताच सत्याचा अनुभव घेण्याचे मार्गात अडथळा बनवून, परमात्मा जो सत्य आहे तो आता भ्रमात्मक सृष्टीलाच सत्य समजतो.

मनुष्यातील परमात्म्याने सत्यातील परमात्मा म्हणून अनुभव घेण्यासाटी, परमात्म्याच्या संपूर्ण चेतनेचे प्रक्षेपण जे आता मनुष्यावर केन्द्रित

---

* (टीप–मानवयोनी मिळेपर्यंत चेतना असते परंतु भान (Awareness) नसते. गाढनिद्रेत ना चेतना असते ना भान असते. सहाव्या भूमिकेपर्यंत भान असते, सातव्या भूमिकेत केवळ चेतनाच असते.)

झाले आहे व तीच परिपूर्ण चेतना जेव्हा बाहेर प्रक्षेपित झाली होती तेव्हा ही परमात्म्याला – मनुष्याचे रुपात पाहत होती आता त्या चेतनेच्या प्रक्षेपणाला असे आत वळविले पाहिजे की, तिने त्याला त्याच्या यथार्थ रुपात पहायला पाहिजे. हा आहे ''परमात्मा या अवस्थेचा'' साक्षात्कार व हाच साक्षात्कार दैवी अंतिम लक्ष्य होय, जे केवळ दैवी स्वप्नाचा अंत करु शकते.

दैवी अंतिम लक्ष्य, प्राप्तीचा अर्थ असा होईल की, या स्थितीत मानवातील परमात्म्याने चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या क्रमबद्ध प्रक्रियेव्दारा, परिपूर्ण चेतनेचा मिळविलेला वारसा तसाच ठेवून, निरंकुश रिक्ततेच्या मूळ दैवी महानिद्रावस्थेत जाण्याचा सरतेशेवटी अनुभव घेतला पाहिजे.

अशाप्रकारे परमात्मा ''मी परमात्मा आहे'' या त्याच्या शाश्वत अवस्थेचा जाणीवपूर्वक अनुभव घेऊ शकेल. त्याने त्याची मूळ अवस्था जाणीवपूर्वक प्राप्त केल्यानंतर परमात्मा त्याच्या स्वतःच्या दैवी शाश्वत अस्तित्वाचा अनुभव घेईल व जे ''सर्वकाही'' अनंत आणि सत्य आहे या त्याच्या दैवी प्रकृतीचा अनुभव घेईल. अशाप्रकारे, अगदी शेवटी त्याला 'मी कोण आहे?' या त्याच्या आद्य शब्दाला किंवा प्रश्नाला ''मी परमात्मा आहे'' हे उत्तर मिळू शकेल.

जास्त स्पष्ट करण्याचे दृष्टीने असे सांगता येईल की, दैवी अंतिम लक्ष्य प्राप्त करण्याकरिता मानवचेतन परमात्म्याच्या उत्क्रांत झालेल्या पूर्ण चेतनेने पूनर्जन्माच्या प्रक्रियेव्दारां अजून अधिक अनुभव घेऊन ती चेतना तो स्वतःकडे आत ओढण्याचा प्रयत्न करतो. जी चेतना त्याने आपल्या दैवीस्वप्नात (सृष्टीत) अगदी प्रथम मानवदेहाशी एकरुपता साधताना त्वरित प्राप्त करुन प्रकट केली होती.

दैवी स्वप्नाचा शेवट होण्याच्या आरंभिची ही स्थिती जशी जवळ येते, तशी परमात्म्याची पूर्ण चेतना जी मानवरुपात मिथ्या जागृतीचा अनुभव घेत असते ती परिपूर्ण उत्क्रांत चेतना परमात्म्याकडे अंतर्मुख होण्याऐवजी बाहेर विश्वव्यापी सृष्टीतील सर्व वस्तूंकडे आकर्षीत होते, ती आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या प्रक्रियेव्दारां आता परमात्म्याकडे ओढण्यासाठी अटोकाट प्रयत्न करते.

ज्या स्थितीमुळे परमात्म्याची त्याच्या मूळ महा–निद्रावस्थेतील संपूर्ण

अचेतना, चेतनेच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेव्दारा क्रमशः परिपूर्ण चेतनेत प्रकट झाली व ही उद्‌भवित चेतना सरतेशेवटी चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या प्रक्रियेव्दारां, अनेक पुनर्जन्मानंतर ''मी परमात्मा आहे'' या सत्य दैवी जागृतावस्थेचा प्रत्यक्षात अनुभव घेण्यापूर्वी कशी आत ओढले गेली, ह्या विविध स्थितींचे वर्णन करण्यासाठी, ह्या निरनिराळ्या अवस्था पायरीपायरीने पाहुया, जो मनुष्य आधी गाढनिद्रेत आहे व जो नंतर दररोज सरतेशेवटी जागृतावस्थेचा अनुभव घेण्यासाठी पुरेशी चेतना प्राप्त करतो, अशा सामान्य मनुष्याच्या संबंधित अवस्थांशी, परमात्म्याच्या चेतनेतील हळूहळू उपलब्धीची प्रत्येक अवस्था तुलनात्मक दृष्टीने पाहू.

**प्रथम – अवस्था**

डोळे पूर्णपणे बंद असलेल्या गाढ निद्रेतील एका मनुष्याची कल्पना करा. हा मनुष्य पूर्णतः अचेत असून त्याला त्याच्या सभोवतालच्या सर्वांची विस्मृती असते. याचवेळी आता परमात्म्याच्या मूळ महानिद्रावस्थेची कल्पना करा की, जो ''परमात्मा आहे'' या मूळ निरवकाश 'रिक्त' अवस्थेत आहे. या दोन्हीही उदाहरणात म्हणजेच उभयता परमात्म्याच्या निराकार अवस्थेत व परमात्म्याच्या पुरुष किंवा स्त्री म्हणून मानवदेहातील अवस्थेत चेतना पूर्णपणे अनुपस्थित असते आणि या दोन्हीही बाबतीत निरवकाश पोकळी पसरलेली असते. त्याच वेळेस – दोन्हीही उदाहरणात चेतनेच्या पूर्ण अनुपस्थितीची कल्पना, डोळे पूर्णपणे बंद असलेल्या गाढनिद्रावस्थेतील मनुष्याशी तुलनेच्या रुपात करा.

**दुसरी अवस्था**

त्या मनुष्याच्या दुसऱ्या स्थितीची कल्पना करा की, तो अजुनही निद्रेत आहे परंतु त्याने आपले नेत्र अगदी हळूहळू किलकिले करीत उघडायला सुरुवात केली आहे. याचे कारण असे की, त्याच्या गाढ निद्रेच्या अवस्थेत थोडी हालचाल निर्माण झाली व परिपूर्ण रिक्ततेची शांती सुप्त संस्कारांच्या बाहेर येण्यामुळे भंग झाली आहे, ज्याचा प्रारंभ मनुष्याच्या आंतरचेतनेच्या उद्‌भवातून झालेला आहे व जी चेतना त्याच्या गाढ निद्रेच्या अवस्थेत देखील सुप्त होतीच. या मनुष्याच्या आंतरचेतनेमधून विविध संस्कारांच्या उद्‌भवामुळे तो गाढनिद्रेत नसला तरी, तो आता अजुन झोपेत असताना, स्वप्नांचा अनुभव घेण्यास प्रारंभ

करतो, कारण त्यानंतर निरंकुश रिक्तता मुळीच उपस्थित राहत नाही. मनुष्याचे बाबतीत स्वप्नांचा अनुभव घेण्याचा प्रारंभ म्हणजे अर्धचेतन अवस्थेच्या आरंभिच्या स्थितीत त्याच्या आंतर चेतनेतून आंतरसूक्ष्म (Sub subtle) रुपातील 'काहीच नसण्याच्या' सुप्तसंस्कारांचा अनुभव घेणे तो सुरु करतो. हा मनुष्य आता न केवळ अर्धचेतन अवस्थेच्या आरंभीच्या स्थितीत असतो आणि न केवळ स्वप्नांचा अनुभव घेण्यास प्रारंभ करतो तर तो आपण स्वतःच निर्माण केलेल्या अर्धसूक्ष्म रुपातील मनुष्यप्राणी किंवा प्राण्यांशी साहचर्य करण्यास प्रारंभ करुन स्वप्नात अडकून पडण्यास सुरुवात करतो.

अशा प्रकारे संस्कारांचा उद्‌भव जो मनुष्याच्या अर्धचेतनेमध्ये सुप्त होता तो त्याला त्याच्या स्वप्नातील नाटकात नायकाची किंवा निर्मात्याची भूमिका वठविण्यास भाग पाडतो. कारण ह्या मनुष्याच्या स्वप्नात नुकतीच त्याच्या गाढनिद्रेत हालचाल निर्माण झाली आहे व त्याने अर्धचेतन अवस्था नुकतीच प्राप्त केलेली आहे. या माणसाची कल्पना करा की तो स्वप्नाचा अनुभव घेत आहे व आता आपले नेत्र अगदी हळूहळू किलकिले करुन उघडण्यास सुरुवात करीत आहे. त्याचे डोळे उघडण्याचा आरंभ चेतनेच्या प्रथम चिन्हांच्या आगमनाशी मिळताजुळता आहे, जी मनुष्यात अर्धचेतना म्हणून प्रकट झालेली आहे.

तुलनेच्या रुपात मनुष्याच्या या अवस्थेची कल्पना करीत असताना, परमात्म्याचे देखील त्याच अवस्थेत असल्याचे चित्र डोळ्यासमोर आणा ज्यामध्ये त्याच्या मूळ दैवी महानिद्रावस्थेत नुकतीच हालचाल उत्पन्न झाली आहे. परमात्मा आता त्याच्या दैवी अर्धचेतनेतून ''काही नसण्याचा'' प्रथम अगदी सीमित संस्कार बाहेर आल्याबरोबर केवळ दैवी स्वप्नावस्था किंवा निर्मात्याची (विधात्याची) अवस्था अनुभविणे आरंभ करतो. म्हणजेच ''काही नसण्याची'' व परमात्म्याची दैवी अर्धचेतना ह्या दोन्ही अवस्थेत ''सर्वकाही'' म्हणून असलेल्या मूळ परमात्म्याच्या अवस्थेत ''काही नाही'' म्हणून अंतार्हित होत्याच. परमात्मा आता दैवी अर्धचेतन अवस्थेच्या प्राथमिक स्थितीत अनंत दिव्य अर्धचेतनेतून त्याच्या निर्मितीच्या (त्याच्या स्वतःच्या दैवीस्वप्नाच्या) प्राण्यांशी स्वतः एकरुप होण्यास नुकताच आरंभ करतो. त्याची अनंत दिव्य अर्धचेतना याचवेळी निर्मितीस (सृष्टी) म्हणजे ''काही नसण्याच्या'' संस्कारास बाहेर पडण्यास नुकतीच सुरुवात करीत असते.

**तृतीय अवस्था**

त्या मनुष्याच्या तिसऱ्या स्थितीची कल्पना करा की, तो अजून झोपलेला आहे, परंतु 'अर्धोन्मिलित नेत्रांनी' कारण मनुष्य या स्थितीत आता अर्धचेतन अवस्था पूर्णतः अनुभवितो. अजून झोपेत असलेल्या मनुष्याच्या पूर्ण अर्धचेतन अवस्थेची कल्पना येण्याचे दृष्टीने डोळे अगदीच किलकिले उघडे असल्याची कल्पना करणे चालू ठेवा. जी अवस्था प्रारंभिक अर्धचेतन स्थितिचे प्रातिनिधीक स्वरुप आहे. या स्थितीत वर सांगितल्याप्रमाणे, तो मिथ्या–भ्रमात्मक संस्कारांमुळे स्वप्नांचा अनुभव घेणे सुरु करतो जे संस्कार आंतरचेतनेने संकलित केले होते व जे आता आंतरचेतनेच्या उद्‌भवाव्दारां मनुष्याच्या स्वप्नावस्थेच्या प्रारंभाला कारण बनून बाहेर आले आहेत. परंतु स्वप्ने जशी चालू राहतात व जसे ती माणसाच्या आंतरचेतनेतून बहुमुखी विविध सुप्त संस्कारांच्या उद्‌भवाच्या तीव्रतेमुळे गतिशिलता प्राप्त करतात तसतसा तो अधिकाधिक आंतरचेतनेने त्यात गुरफटल्या जातो. याचा परिणाम असा होतो की, तो आता स्वप्नातील त्याच्या स्वतःच्याच निर्मित प्राण्यांशी दृढपणे साहयर्च करतो आणि तो पूर्णतः अर्धचेतन अवस्थेत असतो. ही मनुष्याची अर्धचेतन अवस्था ती स्थिती दर्शविते की, जी ना ती चेतनाविरहित पूर्ण गढनिद्रवस्था आहे व ना ती पूर्णचेतनेसह पूर्ण जागृतावस्था आहे. समजून घ्यावयाचे झाल्यास ही स्थिती अर्धजागृतावस्था आहे. आता कल्पना करा की, मनुष्याची ही तिसरी अवस्था असून तो अर्धचेतनावस्थेत आहे व डोळे अर्धोन्मिलित असल्याचे दिसतात व ज्यामध्ये मनुष्यस्वप्नाचा अनुभव जास्त प्रखरतेने व अधिक एकाग्रतेने करीत आहे.

मनुष्याच्या या अवस्थेची कल्पना करीत असताना तुलनेच्या रुपात दैवी स्वप्नात असलेल्या परमात्म्याच्या त्या अवस्थेची कल्पन करा की, ज्यामध्ये परमात्मा एका अर्धचेतन अवस्थेचा अनुभव करीत आहे. या स्थितीत परमात्मा सृष्टीचा विधाता म्हणून निर्मात्याची अवस्था अनंत दैवी अर्धचेतनावस्थेतून अनुभवितो. येथे अनंत दैवी आंतरचेतना सृष्टीचा तीव्रतेने व्यक्त स्वरुपात उद्‌भव करीत परमात्म्याने स्वतःच निर्माण केलेल्या सृष्टीतील प्राण्याशी परमात्म्याच्या एकरुपतेची निरंतर पुष्टी करते. परमात्मा जेव्हा स्वतःला प्रत्यक्षात त्याच्याच सृष्टीतील अनेक प्राणी म्हणून अनुभवितो तेव्हा परमात्म्याच्या दैवी स्वप्नात अधिक प्रबळ स्वरुपाचे अनंत अनुभव उत्पन्न होतात.

**चतुर्थ स्थिती**

मनुष्याच्या चवथ्या स्थितीची कल्पन करा की, ज्यामध्ये तो अजुनही झोपलेला आहे. परंतु तो अजुनही स्वप्नावस्थेत असून आंतरचेतनेच्या माध्यमातून अधिकाधिक संस्कारांच्या अधिकतर व अधिकतर तीव्र प्रक्षेपणाच्या प्रमाणात, आधीच अर्धोन्मिलित असलेले नेत्र तो अधिक उघडे करण्याचा प्रयत्न करतो, येथे मनुष्य अर्धचेतनावस्थेतच नाही तर तो परिपूर्ण चेतनेच्या किनाऱ्यावर येत आहे व तो जागृतावस्था अनुभविण्याच्या बेतात आहे.

आता याला समांतर अशा परमात्म्याच्या त्या स्थितीची सुद्धा कल्पना करा की ज्यामुळे तो आपल्या दैवीस्वप्न अवस्थेच्या चौथ्या स्थितीत आहे. अर्धचेतन अवस्थेतील मनुष्याच्या चवथ्या स्थितीचा परमात्म्याच्या दैवी स्वप्नावस्थेच्या अतिनाजूक स्थितीशी तुलना करा. येथे परमात्म्याच्या अनंत दैवी आंतरचेतनेव्दारां अनंत संस्कारांचे प्रक्षेपण परमात्म्याच्या चेतनेच्या वैश्विक, उत्क्रांतीच्या दरम्यान इतके तीव्र होते की, हे प्रक्षेपण काही नसण्याच्या अनंततेवर पूर्णतः दृढ होण्याच्या बेतात असते किंवा परिपूर्णतया केन्द्रीत होण्याच्या जवळ असते की, ज्यामुळे परमात्मा स्वतःच्या अत्यंत परिपूर्ण प्रतिमेशी आपल्या निर्मितीच्या दैवी स्वप्नात एकरुपता साधण्याच्या जवळ येतो. अशाप्रकारे, दैवी स्वप्नावस्थेच्या या स्थितीत निर्माता परमात्मा त्याच्या स्वतःच्या सृष्टीतील जड व सजीव अशा सर्व वस्तूंशी, प्रत्येकाशी व सर्वांशी असंख्य वेळा साहचर्य केल्यानंतर मानवयोनीशी एकरुपता करण्याच्या बेतात असतो. दैव अनंत अर्धचेतन अवस्थेत असलेला परमात्मा आता मानव योनीशी एकरुपता प्रस्थापित करण्याबरोबरच संपूर्ण चेतना प्राप्त करण्याच्या अगदी जवळ पोहचत असतो.

**पाचवी स्थिती**

मनुष्याच्या पाचव्या स्थितीची कल्पना करा की, जो अजुनही निद्रित अवस्थेत आहे परंतु डोळे मात्र अर्धोन्मिलित आहेत. या अजुनही अर्धचेतन वा अर्धजागृतावस्थेत असलेला मनुष्य स्वप्नांचा अनुभव त्यांच्या अंतिम स्थितीत त्यांच्या चरमसीमेवर करीत असून, त्या स्थितीत त्याच्या आंतरचेतनेव्दारां संस्कारांचे प्रक्षेपण महत्तर तिव्रतेने होत असते. वास्तवतेच्या अधिकतर मात्रात अथवा जवळपास स्पष्ट स्वरुपात संस्कारंच्या तीव्र प्रक्षेपणाव्दारां आणि परिपक्वावस्थेत किंवा स्पष्टतेच्या अधिकतर मात्रेत अनुभवल्या जाणाऱ्या

अर्धपूर्ण स्वप्नाकडून, अत्युच्च शिखर गाठले जाते. स्वप्नातील ही ती स्थिती आहे की, जेव्हा 'काही नसण्याची' अर्धसूक्ष्मरुपे शिखरावर पोहचलीत व ती अधिक स्पष्ट दिसू लागली. कळसावर पोहचलेली ही स्वप्ने आता थांबलीच पाहिजेत, कारण असे की मनुष्याच्या अर्धचेतनेतून होणाऱ्या संस्कारांच्या प्रक्षेपणाव्दारां गाठल्या गेलेले अत्युच्च शिखर, या बिंदूचे ठिकाणी कोणत्याही क्षणी पूर्ण चेतनेच्या अभिव्यक्ती करिता किंवा वर येण्या करिता उद्युक्त किंवा उत्तेजित करण्यासाठी पुरेसे असते. या अवस्थेत जवळजवळ पूर्ण सचेत असलेल्या मनुष्याची कल्पना करु शकता की, तो अजुनही निद्रिस्थ असून त्याचे नेत्र पूर्णपणे उघडलेले असतील. ही तीच स्थिती आहे की, ज्यात मनुष्य स्वप्नातून बाहेर येण्यापूर्वीच निमिषार्धात पूर्णपणे जागृत होतो. ही आंतरिक चेतनेची पूर्णतया परिपक्व अर्धचेतन अवस्था होय.

मनुष्याच्या पाचव्या स्थितीची कल्पना करताना, त्याबरोबरच, आपल्या दिव्य स्वप्न अवस्थेत मग्न असलेल्या परमात्म्याच्या त्या अवस्थेची कल्पना करा की जेथे परमात्मा दिव्य अनंत अर्धचेतन अवस्थेच्या पूर्णपणे परिपक्व अवस्थेचा अनुभव घेत आहे व तो पूर्ण चेतना प्राप्त करण्याच्या बेतात आहे. या अवस्थेत सर्वोच्च शिखरावरील अनंत संस्कारांच्या प्रक्षेपणाच्या तीव्रतेनेच परमात्म्याच्या दैवी अनंत आंतरचेतनेव्दारां, अर्धचेतनेने परमात्म्याचे, तादात्म्य सृष्टीच्या व रुपांच्या वैश्विक उत्क्रांतीतील अंतिम प्राण्याशी करणे जवळ जवळ थांबविलेले आहे. दैवी अनंत आंतरचेतनेसह, परमात्मा आपल्या दैवी अनंत अर्धचेतन अवस्थेत असतो व जेव्हा ती चेतना जवळ जवळ परिपक्व होते तेव्हा ती परमात्म्याची एकरुपता प्राणी योनीच्या अनंत संस्कारांशी करते. परंतु आता दैवी स्वप्नावस्थेच्या पाचव्या स्थितीत जेथे परमात्मा पूर्णतः परिपक्व, दैवी अनंत अर्धचेतन अवस्थेत आहे तेव्हा परमात्म्याला प्राणीयोनीच्या संस्कारांशी आता अधिक काळपर्यंत एकरुप राहता येत नाही, जरी ते (संस्कार) त्यांच्या दैवी अनंत आंतरचेतनेव्दारां तीव्रतेने व अनंततेने प्रक्षेपित झालेले असतात. या ठिकाणी दैवी स्वप्नावस्थेत अशी एक स्थिती येते की, जेथे संस्काराच्या अनंततेत प्रक्षेपणासह जे संस्कार परमात्म्याला आपल्या सर्वोच्च शिखरावर पोहचलेल्या दिव्य-अनंत आंतरचेतनेव्दारां अनंततेने प्रक्षेपित होतात, या संस्कारांच्या या अनंत प्रक्षेपणाने प्रायः परमात्म्याची एकरुपता मानव रुपाशी केली व परमात्मा जवळ जवळ पूर्ण सचेत झाला आहे.

**सहावी स्थिती**

त्या मनुष्याच्या साहव्या स्थितीची कल्पना करा की, जो आपल्या झोपेतून पूर्णपणे जागा झालेला असून त्याचे डोळे पूर्णपणे उघडलेले आहेत. या स्थितीत मनुष्य त्यानंतर अर्धचेतन अवस्थेत नसतो, ज्यामध्ये तो स्वप्न पहात होता जे स्वप्न अन्य काही नसून फक्त ''काही नाहीच्या'' सुप्त संस्कारांचे पुसट प्रक्षेपण होते. हे संस्कार अगोदरच मनुष्याच्या आंतरचेतनेत साठविलेले असतात आणि ज्यांचा 'काही नाहीच्या' उपसूक्ष्मरुपात आंतरचेतनेव्दारां अनुभव घेतलेला असतो. मनुष्याचे अवस्थेतील ही ती स्थिती आहे की, जेथे तो नुकताच पूर्णपणे जागा झालेला आहे. परंतु तो जरी पूर्णपणेसचेत असला तरी त्याला अजुनही त्याच्या ''स्व'' ची चेतना नसते. तो मनुष्य आता आपल्या गाढनिद्रेत किंवा अर्धचेतन अवस्थेत नसतो व पूर्णचेतना प्राप्त केल्यावर आता त्याची कल्पना त्याचे डोळे पूर्णपणे उघडलेले आहेत अशी केली जाते. याचा अर्थ असा की, अस्पष्ट आणि पुसट उपसूक्ष्म रुपांच्या स्वरुपात अपक्व स्थितीतील ''काही नसण्याच्या'' रुपात प्रकट झालेल्या गुप्त किंवा सुप्त ''काही नाही'' चा त्याने अनुभव घेतला, येथे मनुष्याच्य मिथ्या स्थितीचा शेवट अथवा स्वप्नाचा अंत झाला. मनुष्य आता जागृतावस्थेत ''काही नाहीचा'' काहीतरी अंधुक किंवा पुसट म्हणून अनुभव घेत नाही किंवा पाहत नाही, जसे तो त्याचे स्वप्नावस्थेत पहात असे. त्याचे डोळे नुकतेच अगदी पूर्णतः उघडल्यानंतर तो गोंधळतो व निरर्थकपणे व अधिक यथार्थपणे त्याच्या डोळ्यासमोर दिसणाऱ्या वस्तूंकडे एकसारखे पाहतो, मनुष्य आता दृष्टीसमोरील वस्तूंचे असे निरिक्षण करतो की, जणू तो ''काही नाहीच्या'' ज्या वस्तू त्याने अपरिपक्व फिकट व पुसट म्हणून स्वप्नात पाहिल्या होत्या, त्या वस्तू त्याच ''काही नाहीच्या'' परिपक्व स्पष्ट व पूर्ण विकसित रुपात तो पाहत आहे. या स्थितीत मनुष्य जणू काही अजून दुसरे स्वप्न पाहतो परंतु ते तो अधिक यथार्थपणे पाहतो (पूर्वीच्या) स्वप्नापेक्षा ज्यातून तो निमिषार्धापूर्वीच जागा झाल होता.

मनुष्याच्या अवस्थेतील ही त्याची सहावी स्थिती ज्यामध्ये तो गोंधळलेल्या अवस्थेत होता व तो फक्त वस्तूंना पाहण्याचे दृष्य वास्तविक स्वरुपात अनुभवितो परंतु अजुनही तो ते जणू एक केवळ रिक्त स्वप्न म्हणूनच पाहतो. म्हणजेच हा मनुष्य अधिक प्रबळतेने व अधिक वास्तविकपणे, परंतु अजुनही शुन्य मनाने आपल्या स्वप्नावस्थेचे स्वप्न पाहतो, जे त्याच्या

स्वप्नावस्थेतील स्वप्नात त्याला अजुनही एका अन्य स्वप्नाची जाणीव करुन देते.

ही अवस्था त्या अवस्थेशी जुळतीमिळती आहे की, ज्यामध्ये मनुष्य जागा झाल्यानंतर काही क्षणानंतर तो सर्वात आधी स्वतःच्या 'स्व' कडे न पाहता त्याच्या दृष्टीच्या टप्प्यात येणाऱ्या वस्तूंनाच प्रथम पाहतो. याचे कारण असे की, निद्रावस्थेनंतर त्याचे बराच वेळपर्यंत बंद असलेले डोळे सहज उघडताच, त्याच्यामध्ये एक प्रकारची गोंधळलेली अवस्था निर्माण होते व तो जरी जागा झालेला असला व पूर्ण सचेत असला तरी तो त्याच्या ''स्व'' बद्दल अजुनही भानावर नसतो किंवा त्याला आपल्या स्वतःच्या अवतीभोवती असलेल्या वस्तूंच्या संबंधात आपल्या स्थितीचे भान नसते. ज्या वस्तूंवर त्याची दृष्टी पडते त्यांच्याकडे तो केवळ टक लावून पाहतो.

या मनुष्याच्या सहाव्या अवस्थेची कल्पना करताना, त्याच्या समांतर अशी परमात्म्याच्या त्या क्षणाच्या अवस्थेची कल्पना याचप्रमाणे करा की, जेव्हा परमात्म्याने त्याची एकरुपता नुकतीच मानवरुपाशी केली आहे व त्याने पूर्णचेतना नुकतीच प्राप्त केली आहे. त्याक्षणी परमात्मा तद्नंतर दैवी अनंत अर्धचेतन अवस्थेत नसतो, ज्यामध्ये तो मूळ दिव्य स्वप्न पाहत होता जे सुप्त ''काही नाही'' चे प्रक्षेपण होते व जे सृष्टीचे रुपात किंवा पूर्णपणे उत्क्रांत 'काही नसण्याच्या' रुपात दैवी अनंत आन्तरचेतनेने मुक्त केले होते.

परमात्मा आता या सहाव्या अवस्थेत आपल्या मूळ महानिद्रेतून आपल्या दैवी अनंत अर्धचेतन अवस्थांच्या बाहेर आलेला आहे, कारण त्याला आता पूर्ण चेतना प्राप्त झालेली आहे या ठिकाणी परमात्मा ना त्याच्या अमर्याद 'स्व' बद्दल सचेत आहे ना त्याच्या अनंत शक्ती, ज्ञान व आनंदाच्या अनंत अनिर्बंध तसेच अमर्याद त्रिगुणात्मक प्रकृतीबद्दल सचेत आहे. परंतु परमात्मा आता पूर्णपणे सचेत झालेला आहे. परमात्मा पूर्णपणे सचेत आहे ते या अर्थाने की, तो आता जाणीवपूर्वक ''काही नसण्यात'' निमग्न आहे, जी आता त्याच्या परिपूर्ण चेतनेव्दारां स्पष्ट, सुनिश्चित व वास्तविक स्थूल अवस्था म्हणून प्रत्यक्षपणे त्याच्या (अवस्थांच्या) अनंत पैलूंना अमर्यादपणे प्रदर्शित करीत अभिव्यक्त होते.

**सातवी स्थिती**

त्या मनुष्याच्या सातव्या अवस्थेची कल्पना करा, की त्या अवस्थेत

त्याचे डोळे पूर्णपणे उघडे आहेत व तो पूर्णतः व परिपूर्ण जागा आहे. याचा अर्थ असा आहे की, तो आता आपल्या मानवीरुपाविषयी किंवा स्थूल शरीराबाबत तसेच आपल्या सभोवतालच्या स्थिती बाबत व स्थूल जगताबद्दल सचेत असून तो आता त्याचा सीमित ''मी'' किंवा ''अहं'' ठासून प्रतिपादीत करतो. हा मनुष्य जरी स्थूलाबाबत परिपूर्ण सचेत असला व पूर्णतः भानावर राहून, स्थूल जगताचा परिपूर्ण अनुभव घेत असला तरी त्याला अजुनही मर्यादित प्राणशक्ती व मनाचे भान नाही, ज्याचा उपयोग तो अप्रत्यक्षपणे व अजाणतेपणे करीत असतो कारण त्यांच्या पैलूंबाबत त्याला केवळ स्थूल शरीराच्या मर्यादेतूनच जाणीव असते. या अवस्थेत मनुष्य पूर्णपणे सचेत असतो परंतु स्थूल चेतनेत व त्याचे सभोवतालच्या जगतात तो एक मनुष्य म्हणून स्वतः पूर्णपणे भानावर असतो.

मनुष्याला न केवळ स्थूल जगताविषयी व त्याच्या दृष्टीसमोर येणाऱ्या जगतातील सर्व वस्तूंविषयी भान असते परंतु तो आपल्या सीमित ''स्व'' ची पूर्ण सचेत अवस्था किंवा पूर्ण भानावस्था त्यामध्ये समाविष्ट करीत त्याचा अनुभव देखील घेतो. तो आता स्थूल जगतातील वस्तूंना आपल्या पाच प्रबळ स्थूल इंद्रियांव्दारां ओळखतो व एकापासून दुसऱ्याचा फरक जाणतो. तो आता पूर्णपणे विकसित प्राणशक्ती व मनाचा विवेकपूर्वक किंवा अविवेकपूर्वक आपोआप व अप्रत्यक्षपणे उपयोग करीत, त्यांची संबंधित उपयुक्तता त्यांना जोडत जसे व जेव्हा त्याचा सीमित ''स्व'' पुन्हा एकदा गाढनिद्रेत जाण्यापूर्वी जागृतावस्थेत प्रतिपादित करतो. *

त्या मनुष्याच्या सातव्या अवस्थेची कल्पना करीत असताना परमात्म्याच्या त्या अवस्थेची कल्पना करा की जेथे परमात्मा स्वतःची एकरुपता पूर्णपणे मानवरुपाशी करतो व परिपूर्ण व भरपूर चेतना प्राप्त करतो. परमात्मा आता यानंतर मूळ दैवी स्वप्न दिव्यत्वाने पाहात नाही. परंतु तो आता परिपूर्ण चेतनेसह पूर्ण भान असल्याचा मिथ्या अनुभव घेतो. हे भान परमात्म्याला त्याच्या स्वतःच्या अनंततेच्या अवस्थेत असलेल्या त्या मूळ अंतर्हित ''काही

* (टीप–जागृतावस्थेत ते मन आहे की, जे स्थूल नेत्रांनी पाहते, स्थूल कानांनी ऐकते, स्थूल नाकाने वास घेते, स्थूल मुखाने खाते व स्थूल इंद्रियांनी कार्य करते.

स्वप्नावस्थेत (आंतरचेतनेच्या अवस्थेत) ते मन आहे की, जे आंतर सूक्ष्म डोळ्यांनी पाहते, आंतरसूक्ष्म कानांनी ऐकते, इत्यादी, गाढनिद्रावस्थेत तेच मन आहे की, जे शांत असते व स्तब्ध असते.)

नाही'' चे मिथ्या भान करविते व ते ''काही नाही'' त्याने सांप्रत प्राप्त केलेल्या चेतनेसह परमात्म्याला त्या ''काही नाही'' ला अनंत सत्य ''सर्व काही'' म्हणून वास्तवतेने अनुभव घ्यावयास लावते. दुसऱ्या शब्दात, परमात्मा जेव्हा दैवी अनंत अर्धचेतन अवस्थेत होता तेव्हा तो ''काही नसण्याच्या'' रुपात अभिव्यक्त झालेल्या अतर्हित ''काही नाही'' चा आपले दिव्य स्वप्न म्हणून अनुभव घेत होता. परंतु आता परमात्मा जेव्हा संपूर्ण सचेत अवस्थेत, तो प्रत्यक्षात त्या ''काही नाही'' चा ''काही नसण्याचे'' दैवीस्वप्न म्हणून अनुभव घेत नाही तर या ''काही नाही'' च्या भानाचा खरोखर असा अनुभव घेतो की, ते ''सर्व काही'' (अनंत ज्ञान) आहे.

या स्थितीत जाणीव प्राप्त झाल्यानंतर परमात्म्याने जरी निर्मात्याच्या (विधात्याच्या) अवस्थेत मूळ दैवीस्वप्न दिव्यत्वाने पाहण्याचे थांबविले असले तरी त्याने परिपूर्ण चेतना व पूर्ण भान प्राप्त केल्यामुळे परमात्म्याला आता मूळ दैवी स्वप्नाची स्वप्न म्हणून नव्हे तर काही तरी यथार्थ म्हणून, भ्रम म्हणून नव्हे तर सत्य म्हणून ''काहीच नाही'' म्हणून नव्हे तर ''सर्व काही'' म्हणून, पूर्ण जाणीव होते व अशाप्रकारे त्यानेच निर्माण केलेल्या मायेचे तो पोषण करीत असतो. याप्रमाणे ते असे आहे की, परमात्म्याने विधात्याच्या अवस्थेत जरी पूर्ण चेतना प्राप्त केली होती व पूर्ण जाणीवेने अनुभव घेतला असला तरी निर्मात्या परमात्म्याची ही जाणीवच एक फसवणूक म्हणून सिद्ध होते आणि आता स्वतः मानवीप्राण्याशी एकरुपता करीत असताना परमात्म्याला त्याच्या ''काही नाही'' च्या दैवी स्वप्नाचा (किंवा सृष्टीचा) सत्य म्हणून अनुभव घेण्यास भाग पाडते.

थोडक्यात म्हणजे, मनुष्यातील परमात्मा म्हणून निर्माता परमात्मा आता जरी संपूर्ण सचेत व पूर्णपणे भानावर असला आणि आपल्या मूळ दैवी स्वप्नावस्थेच्या बाहेर आलेला असला तरी तो स्वतःला परमात्मा म्हणून नव्हे तर संपूर्ण स्थूल चेतनेसह मनुष्य म्हणून तो आपल्या मूळ दैवीस्वप्नावस्थेतील सृष्टीचा सत्य म्हणून अनुभव घेतो. या ठिकाणी असे म्हटले पाहिजे की, मनुष्यातील परमात्मा जागृतावस्थेत मिथ्या–सत्याच्या भानावर रिक्त दिव्यस्वप्नाचा त्या मूळ दैवी स्वप्नाचे अंतर्गत अजुनही परमात्म्याचे एक स्वप्न म्हणून अनुभ घेणे सुरुच ठेवतो.

संपूर्ण चेतना प्राप्त केल्यानंतर ही परमात्म्याच्या अवस्थेतील अत्यंत

भुरळ पाडणारी स्थिती आहे की, परमात्मा प्राप्त केलेल्य मिथ्या भानाचेव्दारा, वेगळ्याच मार्गावर भटकतो व आपली एकरुपता अमर्याद व अनंत ''स्व'' शी न करता, त्याच्या अत्यंत परिपूर्ण प्रतिमेत असलेल्या मानवी प्राण्याच्या रुपाशी एकरुपता करण्यासाठी, परमात्मा रिक्तदिव्य स्वप्नाचा अनुभव घेणे चालूच ठेवतो.

ही जरी अत्यंत अवास्तव कल्पना वाटली तरी ही एक वस्तुस्थिती आहे की, मनुष्याचे प्रत्यक्ष जीवनच एक पडदा आहे, की जो परमात्म्याच्या शाश्वत अस्तित्वाच्या सत्याला झाकतो.

हा परमात्म्याचा दिव्य दैवदुर्विलास आहे की, परमात्मा आपल्या स्वतःला शोधण्यासाठी मनुष्यात स्वतःला हरवून बसतो आणि ज्याक्षणी मनुष्य स्वतःला परमात्म्यात हरवून बसतो तेव्हा परमात्म्याला आपल्या स्वतःच्या सत्याचा शाश्वत, अनंत अस्तित्व म्हणून साक्षात्कार होतो.

दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे अनंत परमात्मा अनंतपणे आपल्या स्वतःच्या अनंततेने परिपूर्ण प्रतिमेत (मानवरुप) आपल्या अनंततेचा हेतुपुरःसर शोध घेत निमग्न होतो व त्याव्दारां परमात्मा जरीपूर्ण चेतना प्राप्त करीत असला तरी त्याला आपल्या स्वतःच्या शाश्वत, अनंत अस्तित्वाच्या सत्यतेचा साक्षात्कार होत नाही. परंतु ज्या क्षणी अशाप्रकारे प्राप्त केलेली परिपूर्ण चेतना व परमात्म्याची एकरुपता त्याच्या अनंततेने परिपूर्ण प्रतिमेच्या अनंत प्रतिबिंबाशी करणे थांबवितो, त्याच क्षणी ही प्रतिमा परमात्म्याच्या चेतनेमधून नाहिशी होते आणि परमात्मा उत्स्फूर्तपणे व आपोआप चेतनेसह आपले स्वतःचे परमात्मा म्हणून अनंत अस्तित्व असलेले एकरुपत्व अनुभवितो व त्याला असे आढळते की, तोच केवळ एकमेव सदैव होता, सदैव आहे व शाश्वतरित्या 'केवळ सत्य' म्हणून राहिल.

अशाप्रकारे मनुष्य अवस्थेतील परमात्म्याने मनुष्य म्हणून स्वतःला सर्वप्रथम अनुभवित आपल्या स्वतःच्या मर्यादित ''स्व'' व्दारां अथवा मर्यादित अहंव्दारां, मर्यादित मन, मर्यादित प्राणशक्ती व मर्यादित स्थूल शरीराव्दारां मर्यादित पैलू प्रतिपादित केले. नंतर शेवटी परिणामतः स्वतःला परमात्मा म्हणून, अनुभवित आपल्या अमर्याद दैवी ''स्व'' व्दारां तो अनंतज्ञान, अनंतशक्ती व अनंतआनंदाची आपली अमर्याद, अनिर्बंध व अनंत त्रिगुणात्मक प्रकृती प्रकट करतो.

परमात्म्याच्या मूळ अचेतन दैवी महानिद्रावस्थेतील अंतर्हित चेतनेची उघड होण्याची प्रक्रिया सात निरनिराळ्या प्रारंभिक स्थितींच्याव्दारां चित्रित करीत असताना, ज्यांची तुलना मनुष्य आपल्या अचेतन गाढनिद्रावस्थेपासून तो त्या अवस्थेपर्यंत जेथे तो पूर्णचेतना प्राप्त करतो व पूर्णतः उघड्या डोळ्यांनी पूर्णपणे जागा होई पर्यंतच्या सात निरनिराळ्या प्रारंभिच्या अवस्थांशी केली असता असे निदर्शनास आले की, हीच परमात्म्याच्या चेतनेच्या उत्क्रांतीची प्रक्रिया होय जी परिणामतः परमात्म्याची एकरुपता सृष्टीच्या दैवी स्वप्नाचे नाटकात सर्व व प्रत्येक जड व सजीवांशी केल्यानंतर शेवटी पूर्णपणे सचेत परमात्म्याची एकरुपता पूर्णपणे सचेत मनुष्याशी करते.[१८]

अगदी थेट अचेतन अवस्थेपासून दैवी महानिद्रावस्थेशी तुलना केली असताना तो मानवावस्थेत परिपूर्ण चेतना प्राप्त करेपर्यंत (डोळे पूर्णपणे उघडे ठेवून स्थूल जगताचा अनुभव घेणाऱ्या, मनुष्याची तुलना केली असताना) तो परमात्मा एक अखंड अविभाज्य, अनंत, निराकार आणि शाश्वतरीतीने सर्वव्यापी असतो. परंतु परमात्म्याची ती सर्वव्यापी व अनंत प्रकृती आहे की, जी जाणीवपूर्वक व अजाणतेपणी त्याचे शाश्वत दैवी अस्तित्व प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे एकूण एक सर्व अवस्थात व सर्व रुपात त्याच्याच रुपांच्या अभिव्यक्तीव्दारां व्यक्त करते.

जी लहर अचेतन परमात्म्यात त्याच्या शाश्वत व अनंत अस्तित्वा संबंधी सचेत होण्यासाठी उसळत होती, त्या मूळ अनंत लहरीची उत्क्रांतीची समग्र प्रक्रिया ही निरपवादपणे उत्स्फूर्त फलनिष्पत्ती होय आणि जसे विरोधाभासात्मक वाटू शकते की, उत्क्रांतीच्या प्रक्रियेत परमात्म्याच्या अचेतनेने परमात्म्याच्या अंतर्हित चेतनेला क्रमशः व्यक्त होण्यासाठी उद्युक्त केले, जी चेतना विविध व असंख्य स्थूल रुपांशी एकरुपता करीत विविध व असंख्य संस्कारांच्या क्रमाक्रमाने पद्धतशीर व विकसनशील संकलन व अनुभवांच्या प्रक्रियांव्दांरा अधिकतर आणि अधिकतर वृध्दिंगत होत गेली.

तेव्हा हे असे आहे की, परमात्म्याची उत्क्रांत होणारी चेतना परमात्म्याच्या उच्चतर व उच्चतर प्रकारच्या रुपांच्या व रुपांच्या अवस्थांच्या बरोबर परमात्म्याची एकरुपता होण्याकरिता कारण बनते. परमात्म्याचे हे एकरुपत्व आळीपाळीने साहचर्याच्या व असाहचर्याच्या बाह्यता अनंत शृंखलेला किंवा तथाकथित रुपांच्या व प्राण्यांच्या जन्म व मृत्यूंचे कारण बनते व जी रुपे व

प्राणी ''काही नसण्याच्या'' सृष्टीत घडणे, आपले प्रतिपादन करणे व नष्ट होणे व तसेच आपल्या मागे संस्कारांचा वारसा सोडणे हे चालूच ठेवतात. जे संस्कार परत उत्क्रांत होणाऱ्या परमात्म्याच्या चेतनेला अजून दुसऱ्या रुपाशी एकरुपता करण्यासाठी अग्रेसर करतात – जे दुसरे रुप, नष्ट झालेल्या रुपाने पाठीमागे सोडलेल्या संस्कारामुळे आकारास आलेले असते.

अचेतन परमात्म्याने उत्क्रांतीच्या प्रक्रियेव्दारां अंततः पूर्ण चेतना प्राप्त केलेली होतीच, जेव्हा परमात्म्याच्या उत्क्रांत चेतनेने परमात्म्याचे मानवरुपाशी अखेर एकरुपत्व केले होते. परंतु प्राप्त केलेली ही पूर्ण चेतना संस्कारित चेतना होती व त्यामुळे ती परमात्म्याला त्याचा मूळ अनंत अवस्थेचा अनुभव देऊ शकली नाही. उलटपक्षी परमात्म्याला तो मनुष्य असल्याचा अनुभव आला, अशाप्रकारे परमात्म्याला आपल्या प्रथम शब्दाची 'मी कोण आहे?' ही मूळ लहर आल्यानंतरच्या अवस्थेत त्याला स्वतःला तो मनुष्य असल्याचे आढळून येते व तो स्थूल जगताचा अनुभव घेतो व तो स्थूल जगतात बाह्यतः मनुष्य म्हणून निवास करीत असताना, जोपर्यंत परमात्म्याला त्याच्या प्रथम शब्दाला 'मी कोण आहे?' याचे 'मी परमात्मा आहे' हे यथार्थ उत्तर मिळत नाही तोपर्यंत त्याला आपल्या अनंत आणि शाश्वत अस्तित्वाचा विसर पडलेला असतो.

तेव्हा हे असे आहे की, मूळ लहरीने ''काही नाहीची'' निर्मिती केली आणि संस्कारांनी त्या ''काही नाहीचे'' ''काही नसण्याचे'' रुपात पोषण केले. याचा अर्थ असा की, सृष्टी व सृष्टीतील प्राण्यांच्या रुपात पोषण केले. अंततः परस्पर विरोधी संस्कार, ह्या संस्कारांना मूळापासून उखडून फेकतील व सत्याचा साक्षात्कार देण्यासाठी या ''काही नसण्याच्या'' रुपाला नष्ट करतील.

परमात्म्याच्या या मूळ लहरिने परमस्वतंत्र असणाऱ्या परमात्म्यात ईश्वर हा निर्माता, ईश्वर हा पोषणकर्ता व ईश्वर हा संहारक म्हणून (म्हणजे ब्रह्मा, विष्णू व महेश) या तीन अनंत विशेष गुणांचा अंतर्भाव केला. परमात्म्याची ती मूळ लहरच स्वतः हे अनंत गुणधर्म म्हणजे निर्माता, पोषणकर्ता व संहारक, परमात्म्याला प्रदान करण्यास जबाबदार आहे.

परमात्म्याचे हे अनंत त्रिगुण अस्तित्वात असलेल्या सर्व वस्तूंची व प्राण्यांची सतत निर्मिती, पोषण व संहार याव्दारां सातत्याने व तीव्रतेने प्रतिपाळ करतात. मनुष्याच्या आणि सृष्टीतील सर्व प्राणीमात्रांच्या दैनंदिन जीवनात देखील परमात्म्याचा हा अनंत त्रिगुणात्मक पैलू सातत्याने सतत होणाऱ्या

जन्मांव्दारां प्रजननांव्दारां (पोषणाची प्रक्रिया कायम ठेवून) व मृत्यूंव्दारां सतत आपला अधिकार गाजवताना दिसतो.

अंतर्हित असलेल्या ''काही नाही'' तून निर्माण झालेल्या परमात्म्याच्या मूळ लहरीने उत्पन्न केलेल्या मूळ प्रथम शब्दाने ''मी कोण आहे?'' चा अंतर्हित मूळ प्रथम संस्कार निर्माण केला व या मूळ प्रथम संस्काराने अंतर्हित ''काही नसण्याला'' या मूळ सृष्टीचे रुपात प्रसविले. जोपर्यंत अंततः ''काही नसणे'' हे पुनर्जन्म व आत्मानुवर्ती प्रक्रियेच्या माध्यमातून विरुद्ध संस्कारांचेव्दारां नष्ट केल्या जात नाही व ''मी कोण आहे?'' या प्रथम शब्दाचे अंतिम उत्तर ''मी परमात्मा आहे'' हे प्राप्त होत नाही तोपर्यंत ''काही नसण्याचे'' प्रजनन हे आपल्या पाळीने संस्काराची निर्मिती करते व ते संस्कार ''काही नसण्याला'' मूळ सृष्टीचे रुपात सतत सुरक्षित ठेवण्याचे काम करतात.

जड व सजीव रुपांच्या व प्राण्यांच्या विविध व्यक्तिगत सचेत प्रतिपादनामुळे उत्पन्न झालेल्या संस्काराप्रमाणे माया स्वतःची बाह्यतः दिसणारी अनंत व विविध स्थिती कायम ठेवते. विविध व्यक्तिगत निर्मिलेल्या संस्कारांच्या वरपांगी अचुक व अनंत शृंखलेमुळे, परमात्म्याच्या मूळ महालहरीतून उत्पन्न झालेली मूळसृष्टी सातत्याने पोसल्या जाते. आणि याबरोबरच ती (मूळसृष्टी) उत्क्रांत होत असल्यामुळे परिणामी अस्तित्वात असलेल्या प्रत्येक व्यक्तिगत रुपाने व प्राण्याने, प्रारंभिचा शब्द ''मी कोण आहे?'' च्या उत्तराचा अनुभव जाणीवपूर्वक घ्यावा की ''मी जड वस्तू आहे, मी सजीव प्राणी आहे, मी एक विवेकशील प्राणी आहे, मी एक पुरुष आहे व मी एक स्त्री आहे.''

ती गोष्ट म्हणजे, मनुष्याचे स्वतःचे सुप्त संस्कार आहेत जे त्याने चेतनेच्या उत्क्रांतीच्या दरम्यान व पुनर्जन्माच्या प्रक्रियेत संकलित केले होते. तेच संस्कार जे त्याच्या सुप्त चेतनेला गाढनिद्रेच्या दरम्यान अजाणतेपणी जागे करण्यासाठी दररोज उत्तेजित करीत असतात की, ज्यामुळे मनुष्याला जागृावस्थेत सचेत अनुभवांव्दारां स्वतःच्या सुप्त संस्कारांना खर्च करण्यासाठी आवश्यक वाव प्राप्त व्हावा. अशा तऱ्हेने मनुष्याचे सुप्तावस्थेतील स्वतःचे संस्कार मनुष्याकरिता दररोज त्याची स्वतःची प्रभात व त्याचे स्वतःचे विश्व निर्माण करतात. जरी मनुष्याची रोजची प्रभात व विश्व दोन्हीही एकाचवेळी

त्याचे साठी त्याच्या स्वतःच्या सुप्तसंस्कारांनी निर्माण केलेले होते तरी ते दोन्हीही आधीच त्याच्याकरिता रोजच्या जागृतावस्थेतील जीवनातील त्याच्या स्वतःच्या संस्कारामुळे ते सुरक्षित होते व जे दैनंदिन जीवनात आधीच अस्तित्वात असलेल्या मायेने किंवा परमात्म्याच्या मूळ महा लहरीने उत्पन्न झालेल्या मूळ सृष्टीच्या गडद व सखोल संस्काराव्दारां देखील ते सोईस्करपणे पोषण करण्यात आले होते. अंततः त्या मनुष्याची प्रभात (किंवा दिवस) आणि विश्व या दोन्हीचा निद्रावस्थेत घेतलेल्या परस्परविरोधी संस्कारानुभवामुळे नाश होतो, जे संस्कार जागृतावस्थेतील संस्कारांच्या अगदीच पूर्णपणे विरुद्ध असतात.

म्हणून मानव अवस्थेत परमात्मा मनुष्य म्हणून नियमित अचूक क्रमाने मनुष्याच्या सुप्त संस्काराव्दारां त्याच्या स्वतःच्या सृष्टीचा निर्माता म्हणून स्वतःला सातत्याने प्रतिपादित करतो, परमात्मा मानव म्हणून जागृत अवस्थेत दैनंदिन जीवन व्यतीत करीत असताना व सृष्टीच्या संस्कारांना निर्माण करीत असताना आपल्याच सृष्टीचा संवर्धक म्हणून सातत्याने आपल्या स्वतःला प्रतिपादित करतो आणि मनुष्याचे विपरित संस्काराव्दारां जेव्हा तो झोपी जातो व अंततः गाढ निद्रेत जातो तेव्हा स्वतःच आपल्या सृष्टीचा संहारक म्हणून स्वतःला सातत्याने प्रतिपादीत करतो. दररोज मनुष्य आपल्या चेतनेमुळे व्यक्तिगत झालेल्या सृष्टीला अंतिमतः नष्ट करीत, संस्कारांच्या लिलेद्वारां पुन्हा एकदा सर्वसृष्टी निर्माण करतो, संवर्धन करतो व नष्ट करतो. प्रत्येक वस्तुच्या व प्रत्येक प्राण्याच्या अस्तित्वाव्दारा देखील परमात्मा आपली अनंत त्रिगुणात्मक प्रकृती – निर्माता, संवर्धक व संहारक म्हणून प्रतिपादित करीत असतो.

ज्या प्रमाणे मानवास्थेच्या प्रकृतीमध्ये असतात त्याचप्रमाणे परमात्म्याच्या प्रत्येक अवस्थेच्या प्रकृतीमध्ये देखील परमात्मा प्रत्यक्षपणे, वरपांगी व यथार्थतः आपल्या अनंत निर्मात्याचे संवर्धकाचे व संहारकाचे त्रिगुण एकाचवेळी प्रतिपादित करतो. हृदयाच्या स्पंदनात व फुफ्फूसाच्या क्रियेत देखील अनंत त्रिगुणांचे तीन पैलू आपल्या प्रतिपादनात कधीच चुकत नाहीत. हृदयाच्या प्रत्येक स्पंदनाबरोबर, हृदय विस्तारित होते, शिथिल होते. (या मधल्या अवधित) व आकुंचन पावते व त्याचवेळी ते एकाबाजुने प्राण्याच्या जन्माची आगाऊ सूचना देते व दुसऱ्याबाजुने त्या प्राण्याच्या जीवनाचे पोषण करते व शेवटी महत्त्वपूर्ण व अंतिम आकुंचनाबरोबर त्या प्राण्याचा भौतिक मृत्यू घडविते.

अशाप्रकारे ईश्वर निर्मता, ईश्वर संवर्धक व ईश्वर संहारक (ब्रह्मा, विष्णू, महेश किंवा शिव) म्हणून हे जे परमात्म्याचे त्रिगुण विशेष आहेत, ते स्वतंत्रपणे तद्वतच एकाचवेळी सर्व वस्तूत, प्रत्येक मनुष्यप्राण्यात किंवा प्राण्यात व सर्व जीवात्म्यात, चेतनेच्या उत्क्रांतीच्या क्रमविकासात प्रत्येक पायरीवर व परमात्म्याच्या प्रत्येक अवस्थेत व चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या प्रत्येक भूमिकेवर प्रतिपादन करतात. हे प्रतिपादन, जोपर्यंत अगदी शेवटी मूळ वैश्विक सृष्टी (निर्मिती), अनेक युगे, कालचक्रें व कालखंडात पोषण केली गेल्यानंतर व वैश्विक संस्कारांच्या लिलाव्दारा रक्षण केली गेल्यानंतर अंततः परमात्म्याच्या वैश्विक विरोधी संस्कारांव्दारां नष्ट होत नाही तो पर्यंत सुरु राहते, सृष्टीच्या अंतिम संहाराला सामान्यतः 'महाप्रलय' असे म्हटले जाते. याचा अर्थ आहे ''लय होण्याची महानातील महान घटना'', जेव्हा ''काही नसल्याच्या'' रुपात असलेली वैश्विक सृष्टी ''सर्वकाही'' आपल्यामध्ये अनंतपणे आत्मसात करते.

अचेतन परमात्म्याने उत्क्रांतीच्या प्रक्रियेत परिपूर्ण चेतना प्राप्त केली होतीच, परंतु ती चेतना त्याच्या मूळ अनंत अवस्थेची नव्हती तर ती स्थूल व सीमित अवस्थेची होती. उत्क्रांतीच्या दरम्यान सर्व संघर्षानंतर परिणामतः परमात्म्याला पूर्ण चेतना प्राप्त करुन दिली खरी परंतु निसंदेह ती किती मोल देऊन लाभली होती ? तिचे मोल होते स्थूल रुपात संकलित झालेल्या संस्कारांच्या वारसाच्या ओझ्याचे, जे स्थूलरुप परमात्म्याच्या उत्क्रांत होणाऱ्या चेतनेच्या साहचर्याचे शेवटचे माध्यम होते. ज्या व्दारां परिपूर्ण चेतना उत्क्रमित झाली, त्याचक्षणी परमात्म्याने आपले मानवरुपाशी तादात्म्य केले. म्हणून मनुष्य अवस्थेत असलेला परमात्मा अजुनही पूर्ण चेतना प्राप्त करुनही त्याच्या मूळ अवस्थेबद्दल अनभिज्ञ आहे. हे अज्ञान, (unwareness) प्राप्त केलेल्या पूर्ण चेतनेला अजुनही चिकटून असलेल्या, नको असलेल्या (यद्दपि आवश्यक) स्थूल संस्कारांच्या ओझ्यामुळे असते. ज्या प्रक्रियेव्दारां हे सीमित संस्कारांचे ओझे, काढून फेकण्याकरिता मानव अवस्थेत असलेला परमात्मा संघर्ष करतो, ती प्रक्रिया विरोधी संस्कारांच्या माध्यमातून घडते व तिला पुनर्जन्माची[११] प्रक्रिया असे म्हटले जाते. सीमित संस्कारामुळे चेतनेवर आलेले ओझे उतरविण्यासाठी करीत असलेल्या प्रयत्नात परमात्म्याच्या स्थूल चेतनेला हे संस्कार अनुभविणे व ते असंख्य विरोधी अनुभवांच्या सहाय्याने पुनर्जन्माच्या मालिकांतून भोगून संपविणे आवश्यक असते. स्वभावतः विरुद्ध अनुभव संस्कारांना संपविण्यासाठी अत्यावश्यक असतात, कारण विरोधी अनुभवच

केवळ खोल गेलेल्या किंवा घट्टपणे प्रस्थापित झालेल्या विविध संस्कारांची मुळे हालवून खिळखिळी करु शकतात.

मनुष्यातील पूर्ण स्थूलचेतन परमात्मा जो पूर्णपणे विकसित सूक्ष्म व मनोदेहाने युक्त असतो, ज्या देहाचा उपयोग तो सातत्याने पण अजाणतेपणी करतो, जे अनुभव स्वभावतः विरुद्ध असतात अशा विविध असंख्य अनुभवांच्या अनंत मालिकांचा अनुभव अनिवार्यतः तो परस्पर विरोधी संस्कार संपविण्याचे दृष्टीने घेतो. हे संस्कार मनुष्याच्या मनावर किंवा मनोदेहावर सतत उमटत राहतात किंवा मन अथवा मनोदेह ते गोळा करते, व मनुष्याच्या आंतरचेतनेव्दारा ते राखून ठेवले जातात किंवा मुक्त केले जातात. जेव्हा ते संस्कार मनुष्यातील परमात्म्याचा मनुष्य म्हणून त्याच्या आंतरचेतनेव्दारां व पूर्ण चेतनेव्दारां मोकळे केले जातात तेव्हा त्याला मुक्त झालेल्या संस्कारांच्या तीव्रतेनुसार व विविधतेनुसार विविध प्रकारचे अनुभव प्राप्त होतात.

हे लक्षात घेता, मनुष्याचे सूक्ष्मशरीर जे प्राणशक्तीचे केंद्र आहे, ते या संस्कारांना, मनुष्याला त्याच्या दैनंदिन जीवनात किंवा स्वप्नात (परिस्थिती जशी असेल त्यानुसार) क्रियाशील करण्यासाठी शक्ती देते, त्या क्रिया देखील स्वभावतः विविध प्रकारे संबंधित असलेल्या विरुद्ध संस्कारांच्या विपरित असतात.

अशाप्रकारे स्थूल भूमिकेवरील मानवाच्या अवस्थेत, जरी प्राणशक्ती व मन पूर्णपणे विकसित झालेले असले, आणि सातत्याने व सुसंगतपणे त्याचा उपयोग केला जात असला तरी त्याची उपयोगिता ही अप्रत्यक्षपणे व अजाणतेपणे झालेली असते. प्राणशक्तीच्या भूमिकांवर (म्हणजे सूक्ष्म भूमिकांवर) जेंव्हा या प्राणशक्तीचा वापर दिव्यत्वाने व जाणीवपूर्वक केला जातो तेव्हा सूक्ष्म भूमिकांवर मनाचा मात्र अप्रत्यक्षपणे व अजाणतेपणे उपयोग केला जातो. मनोभूमिकेवर जेव्हा मनाचा उपयोग दिव्यत्वाने व जाणतेपणी केला जातो तेव्हा प्राणशक्तीचा उपयोग मात्र अप्रत्यक्षपणे व अजाणतेपणी केला जातो.*

यावरुन अनिवार्यतः असा निष्कर्ष निघतो की, मानवाच्या अवस्थेत असलेल्या स्थूलसचेत परमात्मा स्थूल जगतात परस्पर विरोधांचा अनुभव घेतो,

* (टीप–हे देखील पहा – मेहेरबाबा – ''कंट्रोल ऑफ माईन्ड ओव्हर एनर्जी अँड मॅटर, लाईफ ॲट इटस् बेस्ट, – ईव्हीओ ड्यूसव्दारां संपादित (सनफ्रान्सिस्को : सुफिझम रिओरिएन्टेड इंक १९५७) पृष्ट ३८))

जेंव्हा तो कधी पुरुष म्हणून तर कधी स्त्री म्हणून, विविध जातीत, संप्रदायात, राष्ट्रीयत्वात, वर्णात आणि विविध निरनिराळ्या ठिकाणी आणि खंडात तो अनेकवेळा पुनर्जन्म घेऊन विविध स्परस्परविरोधी संस्कारांचे नेहमी पुनरावलोकन करीत, परस्परविरोधांचा अनुभव घेऊन त्या परस्पर विरोधी संस्कारांना नष्ट करतो.

या परस्परविरोधी संस्कारांव्दारां आणि क्रमशः त्याच्या विपरित अनुभवांव्दारां धरतीवरील मनुष्य अवस्थेतील स्थूलचेतन परमात्म्याला लक्षावधी पुनर्जन्मानंतर हे घट्टपणे रुतलेले संस्कार एखादे दिवशी क्षीण करणे शक्य होते. मानवयोनीतील तथाकथित जन्म-मृत्यूच्या श्रृंखलेची ही प्रक्रियाच अंततः मनुष्य अवस्थेतील स्थूल सचेत परमात्म्याच्या चेतनेला आत्मानुवर्ती उत्क्रांतीसाठी उद्युक्त करते. जेव्हा स्थूल संस्कार क्रमशः क्षीण व विरळ होत जातात तेव्हा चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीची प्रक्रिया क्रमशः आकारास येते.

ज्यावेळेस परस्परविरोधी संस्कार प्रदीर्घ प्रक्रियेनंतर पुनर्जन्माच्या अनिवार्यतः होणाऱ्या प्रक्रियेव्दारां क्रमशः क्षीण होतात, जी प्रक्रिया (पुनर्जन्माच्या) स्थूल संस्कारांच्या अंतिम विनाशाच्या मर्यादेपर्यंत अग्रेसर होते, तेव्हांच कुठे मनुष्य अवस्थेत असलेल्या परमात्म्याच्या चेतनेची आत्मानुवर्ती उत्क्रांती शक्य होते.

स्थूल संस्कारांची जेंव्हा परिसिमी गाठली जाते तेव्हा ती स्थिती प्राप्त होते की, ज्या ठिकाणी मनुष्य अवस्थेतील स्थूलसचेत परमात्म्याची जशी चेतनेची आत्मानुवर्ती उत्क्रांती चेतनेला अंतर्मुख करु लागते तेव्हा तो स्थूल जगतापासून आपले क्रमशः साहचर्य सोडतो. याचबरोबर चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीला प्रारंभ होताच मनुष्य अवस्थेतील परमात्मा, स्थूलजगतातील परस्परविरोधी संस्कारांचा अनुभव घेणे क्रमशः बंद करतो.

चेतनेच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेव्दारां परमात्म्याने परिपूर्ण चेतना प्राप्त केली होती, हे आपण पाहिले परंतु प्राप्त केलेली ही परिपूर्ण चेतना संस्कारीत होती. या प्राप्त केलेल्या परिपूर्ण चेतनेचे संस्कार पुसून टाकण्याकरिता पुनर्जन्माच्या प्रक्रियेतून व चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या प्रक्रियेतून जाणे अत्यावश्यक असते.

परमात्म्याच्या चेतनेच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेची तुलना मनुष्याचे नेत्र हळूहळू उघडण्याशी केलेली होती. मनुष्याने जेव्हा त्याचे नेत्र पूर्णपणे उघडले होते तेव्हा त्याची तुलना चेतनेच्या उत्क्रांतीच्या शेवटच्या अवस्थेशी केलेली होती कारण परमात्म्याने त्यानंतर पूर्ण चेतना प्राप्त केली होती.

मानव अवस्थेत असलेल्या परमातम्याच्या पुनर्जन्माच्या प्रक्रियेची तुलना पूर्ण जागृत असलेल्या मनुष्याशी करता येईल. ज्याला पूर्ण जाणीव असून त्याचे नेत्र पूणपणे उघडे आहेत, व जे संस्कार त्याने जीवनकाळातील अनेक वर्षात संकलित केलेहोते, त्या संस्कारांच्या विरुध्द विविध अनुभव प्राप्त करीत तो आता या जीवनकाळात आपली अनेकविध कामे कार्यान्वित करीत असताना आपल्या ''स्व'' ला विसरुन त्या संस्कारांचा प्रत्यक्षपणे अनुभव घेतो.

आता मनुष्य अवस्थेतील परमात्म्याच्या चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या उर्मिची तुलना अशा एका मनुष्याशी करता येईल की, जो पूर्ण दिवस कामात व्यस्त राहिल्यानंतर अखेर जेव्हा त्याचे दिवसाचे काम प्रत्यक्षात पूर्ण झाल्यानंतर त्याला त्याच्या उद्योगापेक्षा आपल्या स्वतःकडे लक्ष देण्याकरिता शेवटी वेळ मिळतो. अशा तऱ्हेने उद्युक्त झाल्यानंतर मनुष्याचे लक्ष आपोआपच त्याच्या बाह्य उद्योगावरुन आपल्या स्वतःकडे उचित प्रकारे ओढले जाते.

पूर्ण चेतना ज्याप्रमाणे सात विभिन्न अवस्थेत उत्क्रांत झाली त्याचप्रमाणे पूर्ण उत्क्रांत झालेली चेतनासुद्धा आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या सात विभिन्न प्रक्रियांचे द्वारा पूर्णतः आत्मनुवर्ती उत्क्रांत झाली. ह्या चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या अवस्थांना ''चेतनेच्या सात भूमिका'' असे म्हटले जाते.

चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या प्रक्रियेतील सातवी भूमिका ही सातवी आणि शेवटची अवस्था होय. ज्या ठिकाणी चेतना परिपूर्णतेने उत्क्रांत झालेली असते आणि परमात्मा त्याच्या शाश्वत अनंत अस्तित्वाचा जाणीवपूर्वक अनुभव घेतो म्हणजे परमात्मा जो मूलतः होता त्याला आता स्वतःच्या विस्मृतीची ही विस्मृती होते.

मनुष्य अवस्थेतील परमात्म्याच्या चेतनेच्या क्रमशः होणाऱ्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या ह्या सात स्थितींची तुलना मनुष्याच्या पूर्ण डोळे उघडलेल्या अवस्थेशी करता येईल. जेव्हा तो सर्वप्रथम आपल्यासमोर सरळ व स्वतःपासून लांब टक लावून पाहतो. त्यानंतर आपल्या स्वतःला पाहण्याच्या प्रयत्नात तो आपले डोळे सात स्थितीत हळूहळू खाली करतो, जोपर्यंत त्याच्या दृष्टीच्या कक्षात तो स्वतःला पाहात नाही.

असंख्य अटळ पुनर्जन्माच्या माध्यमातून जेथे स्थूल अनुभवांच्या संदर्भात अगदी शेवटची मर्यादा गाठली जाते व जेव्हा स्थूल संस्कार क्षीण होतात

व बहुतांश निष्क्रिय होतात तेव्हा मनुष्य अवस्थेत असलेल्या स्थूल सचेत परमात्म्याच्या स्थूल चेतनेची क्रमशः आत्मानुवर्ती उत्क्रांती सुरु होते आणि मनुष्य अवस्थेत असलेल्या परमात्म्याला चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या प्रक्रियेत प्रवेश मिळतो.

या स्थितीत मनुष्य अवस्थेत असलेल्या परमात्म्याच्या आधीच पूर्ण विकसित झालेल्या सूक्ष्मदेहाच्या माध्यमाव्दारां सूक्ष्मजगताच्या पहिल्या अवस्थेचा किंवा भूमिकेचा आत्मानवर्ती उत्क्रमित होणारी स्थूल चेतना अंशतः अनुभव घेते. पहिल्या भूमिकेपूर्वीची ही सुरुवातीची अवस्था होय की, जेथे मनुष्य अवस्थेतील स्थूल सचेत परमात्म्याची आत्मानुवर्ती उत्क्रमित स्थूलचेतना सूक्ष्मजगताच्या प्रथम भूमिकेची प्रथम ओझरती दृश्ये प्राप्त करते आणि अंशतः स्थूल शरीराव्दारा व अंशतः सूक्ष्मदेहाव्दारा त्यांच्या संस्कारांचा अनुभव घेते. या अवस्थेत स्थूल व सूक्ष्म या दोन्हीही इंद्रियांचा एकाचवेळी उपयोग करण्यात येतो.

ही तीच स्थिती आहे की, ज्या ठिकाणी मनुष्य अवस्थेत असलेला परमात्मा जणू सीमारेषेवर उभा आहे, जी स्थूल जगताची सूक्ष्म जगतापासून सीमा ठरवून देते व जेथे मनुष्य अवस्थेत असलेल्या परमात्म्याची चेतना विलक्षण गोष्टींचे अनुभव घेते. तो त्याच्या स्थूल डोळ्यांनी सूक्ष्मभूमिकेची दृश्ये पाहतो, त्याच्या स्थूल कानांनी सूक्ष्म भूमिकांचे दिव्य संगीत ऐकतो, त्याच्या स्थूल नाकाने सूक्ष्म सुगंधाचा आनंद घेतो. थोडक्यात म्हणजे सूक्ष्म जगताच्या अंशतः पहिल्या भूमिकेवर असलेला मनुष्य अवस्थेतील स्थूलसचेत परमात्मा स्थूल इंद्रियांव्दाराच सूक्ष्मसंस्कारांचा अनुभव घेतो.

स्थूलसचेत परमात्मा स्थूलचेतनेच्या पुढील आत्मानुवर्ती उत्क्रांतीत सूक्ष्मजगताच्या प्रथम भूमिकेचा पूर्णतः क्रमशः अनुभव घेतो. आता मानव अवस्थेतील परमात्म्याची स्थूलचेतना ही स्थूलचेतना न राहता ती सूक्ष्मचेतना असते.

जसजशी चेतना उत्तरोत्तर अंतर्मुख होऊन आत्मानुवर्ती उत्क्रांती पुढे पुढे प्रगत होत जाते, त्याप्रमाणे मनुष्य अवस्थेतील सूक्ष्मचेतन परमात्मा सूक्ष्मजगताच्या दुसऱ्या भूमिकेविषयी क्रमशः सचेत होतो.

हे सूक्ष्मजगत अनंत प्राणशक्तीचे कार्यक्षेत्र आहे. परमात्म्याच्या अनंत त्रिगुणात्मक प्रकृतीचा एक पैलू असलेली अनंत व अमर्याद शक्ती जेव्हा अमर्याद अनंतातून मायेच्या सीमित जगतात उत्सर्जित होते तेव्हा ती सीमिततेत परिवर्तीत होते व सूक्ष्म जगतातील अनंत प्राणशक्तीच्या स्वरुपात सूक्ष्म

जगताच्या, क्षेत्रात प्रगट होते.

अशा प्रकारे मानवदेहातील परमात्मा दुसऱ्या भूमिकेत सूक्ष्मसचेत असतो आणि त्यामुळे त्याला स्थूल देहाची व मनोदेहाची – मनाची चेतना नसते. असे असले तरी मानवदेहातील परमात्मा प्रत्यक्षपणे नसले तरी सूक्ष्मभूमिकेवर व सूक्ष्मभूमिकेपासून स्थूल शरीरांव्दारा व मनाव्दारा (मनोदेहाव्दारा) कार्य करतोच.

म्हणून मानव अवस्थेतील सूक्ष्मचेतन परमात्मा स्थूल शरीराबद्दल व मनोदेहाबद्दल जरी अचेत असला व स्थूल व मनोजगताचा प्रत्यक्ष अनुभव घेत नसला तरी मनुष्य अवस्थेतील परमात्मा स्थूल शरीराच्या स्थूलाच्या विविध पैलूंव्दारां (प्रत्यक्षपणे नसला तरी सूक्ष्मभूमिकेतून) वापर करतोच व त्यामुळे बाह्य स्वरुपावरुन एक सामान्य स्थूल सचेत मानवाप्रमाणे दिसतो, जो खातो, पितो, झोपतो, पाहतो, स्पर्शानुभव घेतो, ऐकतो इत्यादी. याचप्रमाणे मनुष्यअवस्थेतील परमात्मा जेव्हा सूक्ष्मजगताच्या दुसऱ्या भूमिकेबद्दल सचेत असतो तेव्हा तो मनोदेहाचा (म्हणजे मनाचा) प्रत्यक्षपणे नसला तरी विविध पैलूंव्दारां उपयोग करतोच ज्यामुळे तो बाह्यता सामान्य स्थूल सचेत मनुष्याप्रमाणे इच्छा, वासना व भावना असल्याप्रमाणे दिसतो.

या स्थितीत मनुष्याच्या अवस्थेत असलेला दुसऱ्या भूमिकेतील सूक्ष्मचेतन परमात्मा चेतनेच्या अधिकतर आत्मानुवर्ती उत्क्रांतीमुळे, या सूक्ष्म जगताच्या अनंत प्राणशक्तीचे अधिकतर भान प्राप्त करतो व या प्राणशक्तीच्या विमोचनाद्वारां अगदी खालच्या दर्जाचे लहान–सहान चमत्कार करतो. जसे वाळलेला वृक्ष हिरवा करणे किंवा हिरवा वृक्ष वाळविणे, रेल्वे गाड्या व मोटारगाड्या थांबविणे, कोरड्या विहिरीत पाणी भरणे इत्यादी प्रकारे शक्तीचे प्रदर्शन करण्यास समर्थ बनतो.

दुसऱ्या भूमिकेवरील मनुष्य अवस्थेतील हा सूक्ष्मचेतन परमात्मा आपल्या सूक्ष्मदेहाच्या सूक्ष्मइंद्रियांच्या सहाय्याने सूक्ष्मजगताचा अनुभव घेतो तो आता स्थूल जगताविषयी पूर्णपणे अचेतन असतो. तो सर्व बाह्य देखाव्यावरुन जरी एखाद्या सामान्य मनुष्यासारखा राहत व वागत असला व सामान्यासारखे खाणे, पिणे, झोपणे, सुख दुःखाच्या भावनेचा अनुभव घेणे इत्यादी कामे करीत असला तरी प्रत्यक्षात त्याची आत्मानुवर्ती उत्क्रमित चेतना स्थूलाचा अनुभव न घेता सूक्ष्म जगताचा अनुभव घेते व त्याच्या सूक्ष्म इंद्रियांव्दारा नवीन सूक्ष्मसंस्कार निर्माण करते, जी इंद्रिये फक्त तीन असून ज्यांना केवळ पाहण्याची, वास घेण्याची व ऐकण्याची आंतरिक शक्ती असते.

मनुष्य अवस्थेतील परमात्म्याला चेतनेची अधिक पुढील आत्मानुवर्ती उत्क्रांती तिसऱ्या भूमिकेतील सूक्ष्म जगताचा अनुभव घेणे शक्य करते. या ठिकाणी सूक्ष्म चेतना सूक्ष्म जगताच्या अनंत प्राणशक्तीचे अधिकतर भान प्राप्त करते व मनुष्य अवस्थेतील परमात्मा अधिकतर सीमित शक्तीचा अनुभव घेतो. या स्थितीत तो महान चमत्कार करण्यास समर्थ होतो. जसे आंधळ्याला दृष्टी देणे, अपंगाला अवयव देणे व कधीकधी मृतांना* जीवत करणे या स्थितीत मनुष्य अवस्थेतील सूक्ष्म चेतन परमात्मा सूक्ष्म भावनेच्या विविध भूमिकांचा व जगतांचा अनुभव घेण्यास देखील समर्थ होतो, ज्याप्रमाणे स्थूल सचेत मानवदेह जवळ असलेल्या स्थूल वाहनांचा वापर करुन एका खंडातून दुसऱ्या खंडात प्रवास करण्याची क्षमता बाळगतो.

केवळ सूक्ष्म जगताच्या क्षेत्रात असलेल्या, दुसऱ्या व तिसऱ्या भूमिका ह्या सूक्ष्म जगताच्या प्रमुख भूमिका आहेत. पहिली भूमिका ही अंशतः सूक्ष्म जगताच्या क्षेत्रात अंशतः स्थूलजगताच्या क्षेत्रात आहे. त्याचप्रमाणे चवथी भूमिका ही अंशतः सूक्ष्म जगतात आहे व अंशतः मनोजगतात आहे. याच कारणामुळे चवथ्या भूमिकेला मनोजगताचा उंबरठा म्हटले आहे.

आता मानव अवस्थेतील सूक्ष्मसचेत परमात्म्याच्या चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या प्रगतीत क्रमशः उत्तरोत्तर भर पडल्यामुळे परमात्म्याची चेतना या दोन्ही सूक्ष्म व मनोभूमिकेत असलेल्या चवथ्या भूमिकेचा अनुभव घेते.

मनुष्य अवस्थेत असलेल्या या परमात्म्याला चवथ्या भूमिकेत असतांना सूक्ष्मशरीराची पूर्ण चेतना असते व तो सूक्ष्मभुवनाचा पूर्णपणे अनुभव घेतो व त्यामुळे सूक्ष्मभुवनाच्या सूक्ष्मप्रकृतीची जी अनंत प्राणशक्ती आहे तिचे त्याला पूर्णतः भान असते. ही तिच अनंत प्राणशक्ती आहे जी परमात्म्याच्या त्या अनंत व अनिर्बंध शक्तीचे ''काही नाहीचे'' सीमित अंग आहे, जी परमात्म्याच्या ''सर्वकाही'' च्या अवस्थेत सुप्त होती.

चवथ्या भूमिकेत मनुष्य अवस्थेतील परमात्मा अनंत प्राणशक्तीने पूर्णपणे सुसज्ज असतो आणि त्यामुळे त्याला आता मृताला जीवंत करण्याची व नवीन जगतात नवीन सजीवयोनींना निर्माण करण्याची देखील क्षमता असते व चवथ्या भूमिकेतील मानव अवस्थेतील सूक्ष्मसचेत परमात्मा यथार्थतः अनंत

* (टीप–जे चेतनेच्या तिसऱ्या भूमिकेवर असतात ते केवळ मानवपूर्व योनीतील मृतांना जीवंत करु शकतात.)

प्राणशक्तीचे मूर्तिमंत व्यक्तिमत्व असतो.

सूक्ष्म तसेच मनोजगतात असलेल्या चवथ्या भूमिकेची ही अनंत प्राणशक्ती काही स्थूल जगतातील तथाकथित सामान्य शक्ती नाही ही ती अनंत प्राणशक्ती आहे, जिला ''समग्र जीवनाचा ''श्वास'' किंवा ''प्राण'' असे म्हटले जाते आणि जी सर्वांना सजीव करण्यास कारणीभूत होऊ शकते. ही तीच प्राणशक्ती आहे की, जेव्हा ती अनंत होते तेव्हा ती धूळीतून सजीववस्तूंना निर्माण करु शकते.

ही प्राणशक्ती जरी अनंत असली तरी ही परमात्म्याच्या त्या अनंत शक्तीची कोणत्याच प्रकारे यथार्थाने बरोबरी करीत नाही. ही परमात्म्याची अनंत शक्ती जेव्हा मायेच्या शक्तीत (illusion) रुपांतरीत होते तेव्हा ती सूक्ष्म तसेच मनोजगतात असलेल्या चवथ्या भूमिकेच्या अनंत प्राणशक्तीचा सीमित पैलू बनते.

ज्याचेजवळ चवथ्या भूमिकेच्या अनंत प्राणशक्तीच्या कोठाराची चावी आहे असा मनुष्य अवस्थेतील सूक्ष्मचेतन परमात्मा आता मनोजगताच्या उंबरठ्यावर दृढपणे प्रस्थापित झालेला आहे. आणि त्याला आता तीव्र इच्छा, भावना व विचारांच्या प्रचंड तुफानाला तोंड द्यावे लागते. ज्या (इच्छा, भावना) मनोजगताच्या मनाच्या पैलू आहेत. यद्यपि चवथीभूमिका ही चेतनेची उच्च अवस्था आहे. जेथे मनुष्य अवस्थेतील परमात्मा जीणीवपूर्वक अनुभवतो की, तो स्वतः अनंत प्राणशक्तीचे मूर्तीमंत रुप आहे, असे असले तरी ती तथाकथित ''काळ्याकुट्ट रात्रीच्या'' अनुभवांची अवस्था आहे. कारण या ठिकाणी मनुष्य अवस्थेतील परमात्म्याचीचेतना जणू ''इकडे सैतान तिकडे विहिर'' अशा अवस्थेत सापडल्याच्या अनुभवातून जाते. तीव्र इच्छा व भावनांनी सतत पेटलेल्या अवस्थेत परमात्म्याला त्याच्या अधिकारात असलेल्या अनंत शक्तीचा प्रयोग करण्याचे प्रबळ उत्तेजन व प्रलोभन या पेचप्रसंगी एक धोकेबाज शत्रू म्हणून सिद्ध होते. ज्यावेळेस मनुष्य अवस्थेतील स्थित असलेल्या सूक्ष्मचेतन परमात्म्याची चेतना आत्मानुवर्ती उत्क्रांतीत अचूक व जलद गतीने मनोजगताकडे अग्रेसर होते, तेव्हा त्या ठिकाणी ती (चेतना) सर्व इच्छा, भावना व विचारांवर प्रभुत्व मिळविल.

चवथ्या भूमिकेतील मनुष्यअवस्थेतील परमात्म्याच्या चेतनेच्या

मनोभूमिकेकडून विमुक्त केलेल्या आपल्या शिखरावर पोहचलेल्या इच्छा जर समोर आल्या तर त्या परमात्म्यावर (मनुष्य अवस्थेतील चवथ्या भूमिकेतील) मात करतात व त्याचे अधिकारात असलेल्या अनंत प्राणशक्तीपासून निर्मिलेल्या शक्ती त्याने जर मुक्त केल्या तर अशा पेचप्रसंगी अनंत प्राणशक्तीच्या विमोचनाचा अनुभव बहुतेक वेळा प्राणघातक (नाशकारी) सिद्ध होतो. विशेषतः जेव्हा तो अनंत प्राणशक्तीने विमुक्त केलेल्या शक्तिंची पर्वा न करता स्वार्थ हेतू साध्य करण्यासाठी अतिनिंद्य गैर वापर करतो तेव्हाच असे घडते.

अशा पेचप्रसंगी चवथ्या भूमिकेवर सूक्ष्म जगताच्या अनंत प्राणशक्तीच्या शक्तीचे जर अविवेकपूर्ण विमोचन केले तर त्या प्राणशक्तीच्या संपूर्ण विमोचनाचा परिणाम स्थूलचेतनेला अगदी कल्पनातीत आहे. तथापि अणूशक्ति जी सूक्ष्मजगताच्या अनंत प्राणशक्तीच्या स्थूल पैलूंपैकी केवळ एक पैलू आहे, तिच्या विमोचनाच्या विलक्षण अनुभवांपासून आपल्याला त्या परिणामाची कल्पना करता येईल.

अशा प्रकारे मनुष्यअवस्थेत असलेल्या परमात्म्याची आत्मानुवर्ती उत्क्रमित चेतना जर चेतनेच्या चवथ्या भूमिकेतील अनंत प्राणशक्तीच्या पूर्ण विमोचनानुभवाच्या प्रलोभनाला बळी पडली तर अनिवार्यतः येणारा अनुभव इतका गंभीर असतो की, त्याने प्राप्त केलेली संपूर्ण चेतना व अनुभवलेली सूक्ष्मचेतना पूर्णतः अत्यंत सीमितचेतनेच्या रुपात छिन्नभिन्न होतात व परमात्म्याची एकरुपता पुन्हा एकदा पाषाणाच्या अत्यंत सीमित स्थूल रुपात केल्या जाते. यास्तव पाषाणाची चेतना असलेल्या परमात्म्याच्या चेतनेला आपले तादात्म्य स्थूलरुपाशी करुन पुन्हा चेतनेच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेतून जावेच लागते व मनुष्याशी तादात्म्य करुन संपूर्ण चेतना प्राप्त करावी लागते. ही एक सत्य गोष्ट आहे की, एकदा चेतना प्राप्त केली की, त्यापासून कधीच वंचित होऊ शकत नाही परंतु चवथ्या भूमिकेवरील चेतनेचे खंडित होणे हे या नियमाला एकमेव अपवाद आहे. चेतनेचे हे खंडीत होणे हे केवळ चवथ्या भूमिकेच्या चेतनेच्या संबंधातच घडते आणि तेही अत्यंत क्वचितच घडते, जेव्हा तो त्या भूमिकेच्या शक्तीचा दुरुपयोग करण्याच्या मोहाला बळी पडतो.

चवथ्या भूमिकेतील मनुष्य अवस्थेत असलेल्या परमात्म्याने

जर अनंत प्राणशक्तीच्या शक्तीचा दुरुपयोग न करता व आपल्या इच्छा वासनांनी* प्रभावित न होता विवेक सांभाळून वापर केला तर चेतनेच्या पुढील आत्मानुवर्ती उत्क्रांती सह मनुष्य अवस्थेतील सूक्ष्मचेतन परमात्मा, मनोजगताच्या पाचव्याभूमिकेचा अनुभव टाळून सरळ मनोजगताच्या सहाव्याभूमिकेचा अनुभव घेतो.

परंतु चवथ्या भूमिकेतील मनुष्यअवस्थेत असलेल्या परमात्म्याने जर अनंत प्राणशक्तीच्या शक्तीचा ना उपयोग केला ना दुरुपयोग केला तर क्रमशः चेतनेच्या पुढील आत्मानुवर्ती उत्क्रांतीत हा मनुष्य अवस्थेतील चवथ्याभूमिकेची चेतना असलेला सूक्ष्मचेतन परमात्मा मनोजगताचा उंबरठा ओलांडुन चेतनेच्या पाचव्याभूमिकेचा अनुभव घेणे सुरु करतो.

चेतनेच्या पाचव्या व सहाव्या भूमिका मूलतः मनाच्या मनोजगताच्या भूमिका आहेत. मनुष्य अवस्थेतील मनःचेतन परमात्मा मनोजगतात आपल्या मनाचा स्वामी असतो. या उलट स्थूल व सूक्ष्म जगतात जेव्हा त्याला स्थूल व सूक्ष्म चेतना होती तेव्हा तो मनाचा गुलाम होता.

मानव अवस्थेतील असलेल्या सूक्ष्म सचेत परमात्म्याच्या चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या प्रगती बरोबर मनोजगताच्या पाचव्या भूमिकेचे अनुभव मनोद्रियांव्दारा अनुभविले जातात व ते मनोद्रिंय केवळ (पाहण्याचे) दृष्टीचे असते.

परमात्मा मानवअवस्थेत जेव्हा मनःसचेत असतो तेव्हा त्याला स्थूल किंवा सूक्ष्म शरीराचे भान नसते परंतु तो प्रत्यक्षपणे नसला तरी मनोभूमिकेवर मनोभूमिके पासून स्थूल देहाच्या व सूक्ष्म देहाच्याव्दारां कार्य करतोच. अशाप्रकारे मानव अवस्थेतील मनःसचेत परमात्म्याला जरी स्थूल व सूक्ष्म

* (टीप–इच्छा – वासना जाणीवपूर्वक पुसून टाकल्या पाहिजेत कारण त्या नवीन संस्कार निर्माण करु शकतात व आपल्या पाळीने अधिक इच्छा निर्मितात ज्या अधिक बंधनकारी कर्माकडे अग्रेसर करु शकतात. चेतना सत्य ''स्व'' मध्ये व्यापून राहण्याऐवजी अशा संस्कारांनी व त्यांच्या शारीरिक अभिव्यक्तिंनी व्यापलेली असते. जर हे संस्कार जाणीवपूर्वक नष्ट केल्या गेलेत तर आत्मा 'सत्य' पाहण्यास प्रारंभ करील व भौतिक वासनांच्या छळापासून मुक्त व्हावयास प्रारंभ करील. व्यक्ती (जीवात्मा) उणे जीवन (वासनामय) म्हणजे आत्मा व तो सतत अचेतन सर्वशक्तिमान (परमात्मा) असतो. आपण जगत असतानाच ते जीवन त्यागले पाहिजे. अचेतनेची चेतना राखून ठेवत असतानाच भौतिक इच्छा–वासनांचा त्याग करणे हेच जीवनाचे लक्ष्य आहे– संपादक)

शरीराचे भान नसले व त्यामुळे त्याला स्थूल आणि सूक्ष्म जगताच्या अनुभवांची जाणीव नसली तरी तो स्थूलाच्या विविध पैलूंव्दारां स्थूल शरीराचा अजाणतेपणी उपयोग करु शकतो. अशा प्रकारे जसे साधारण स्थूलसचेत मानव देहात एखादा खातांना, पितांना, झोपतांना, पाहतांना, ऐकतांना व स्पर्शानुभव घेतांना दिसत असला तरी तो सदासर्वकाळ केवळ मनोदेहाबद्दलच केवळ 'पाहण्याच्या' मनोंद्रियाबाबत सचेत असतो. त्याचप्रमाणे तो अजाणतेपणी अनंत प्राणशक्तीच्या विविध पैलूंव्दारा त्यांच्या सूक्ष्म शरीराचा ऊपयोग करु शकतो व या प्रकारे असे आढळून येते की, तो सक्रियपणे इकडे–तिकडे फिरत असताना व आपली कामे करीत असताना दिसत असला तरी तो सदासर्वकाळ आपल्या केवळ मनोदेहाबाबत–मनाबाबत सचेत असतो व तो मनोंद्रियाव्दाराच केवळ मनोजगताचा जाणतेपणी अनुभव घेतो. मनोजगतात मनुष्य अवस्थेतील मनःसचेत परमात्म्याला आता फक्त एकाच इंद्रियाचे ज्ञान असते व ते असते ''दृष्टीचे'' चेतनेच्या पाचव्या भूमिकेत मन पहिल्यापासून शेवटपर्यंत टिकून राहते. चेतनेच्या सहाव्या भूमिकेत मन स्वतःच 'अंतर्चक्षू' बनते व ते परमात्म्याला पाहते. चेतनेच्या सातव्या भूमिकेत मनाचा नाश होतो.

यामुळे पाचव्याभूमिकेत असलेला मनःसचेत परमात्मा मनुष्यअवस्थेत त्या संस्कारांचा अनुभव घेतो की, जे त्याच्या ''पाहण्याचा'' मानस इंद्रियांव्दारा निर्मिल्या गेले होते आणि त्यामुळे तो मनोदेहाव्दांरा (मनाव्दारा) मनोजगताचा अनुभव घेतो. तो आता केवळ मनाबद्दल सचेत असतो. या स्थितीत मनुष्य अवस्थेतील परमात्मा सूक्ष्मसचेत व स्थूलसचेत मानव देहात असलेल्या परमात्म्याच्या स्थूलसचेत व सूक्ष्मसचेत अवस्थांच्या मनावर नियंत्रण करण्याची क्षमता ठेवतो.

परंतु पाचव्या भूमिकेतील मानवास्थेतील मनःसचेत परमात्मा कसलाही चमत्कार करण्यास पूर्णतः असमर्थ असतो कारण तो आता मनोभुवनात असतो व अनंत प्राणशक्तीच्या सूक्ष्म भुवनात नसतो, जी अनंत शक्ती विमुक्त झाली असता चमत्कारी शक्तींच्या रुपात फलित होते. असे असतानाही तो मनःसचेत असल्यामुळे व मूर्तिमंत ''मन'' होण्याच्या बेतात असल्यामुळे तो परमात्म्याच्या सूक्ष्मचेतन अवस्थेची मने नियंत्रित करतो व ते (मन) सूक्ष्म चेतनेच्या अवस्थेत असलेल्यांना चमत्कार करण्यास उत्तेजन

देणारा स्त्रोत बनतो. तो एकमेव असा आहे की, मनःसचेत अवस्थेत जरी तो कोणताही चमत्कार करण्यास असमर्थ असला तरी तो मनाच्या व इच्छेच्या बळानुसार सूक्ष्मसचेत भूमिकांवर असणाऱ्यांची मने चमत्कार करण्यासाठी किंवा न करण्यासाठी, रोखण्यासाठी, नियंत्रित करण्यासाठी किंवा त्यांना मार्गदर्शन करण्याची क्षमता बाळगतो

मनुष्य अवस्थेतील मनःसचेत परमात्मा स्थूल व सूक्ष्मसचेत अवस्थेतील सर्व मनांचे विचार, इच्छा व भावनांची निर्मिती व नियंत्रण करण्यास समर्थ असतो. पाचव्या भूमिकेच्या अवस्थेचा अनुभव प्राप्त  झाल्याबरोबर तो स्वतः स्थिर होतो, कारण त्या अवस्थेपासून तो येथवर त्याची आत्मानुवर्ती उत्क्रमित झालेली चेतना कधीच अधःपतित वा छिन्नभिन्न होऊ शकत नाही.

मनुष्य अवस्थेतील मनःचेतन, परमात्म्याच्या  चेतनेची जसजशी आत्मानुवर्ती उत्क्रंतीची प्रगती क्रमशः अधिकाधिक गाढ होत जाते तसतसा तोत्याच्या मनावरील स्वामित्वाचा अनुभव घेतो आणि अशा मनःचेतन परमात्म्याच्या चेतनेला मूर्तिमंत मन म्हटले जाते. अशा प्रकारे मनुष्य अवस्थेतील परमात्मा आता मनाविषयी किंवा मनोदेहाविषयी पूर्णपणे सचेत होतो आणि तो मनःचेतनेच्या  सहाव्याभूमिकेत समग्र मनोजगताचा किंवा मनोभूवनाचा अनुभव घेतो हा अनुभव परमात्म्याला त्याच्या मूळ अवस्थेत अगदी समोरासमोर ''पाहण्याचा'' असतो. हे ''पाहणे'' म्हणजे पाहण्याच्या मनोद्रिंयाने मनःचेतना पाहणे होय. दुसऱ्या शब्दात मनुष्य अवस्थेतील परमात्मा प्रत्येक ठिकाणी व प्रत्येक वस्तूत सर्वत्र परमातम्यालाच पाहतो.

जसजशी परमात्म्याची चेतना बहुमुखी व विविध परस्पर विरोधी संस्कारांच्या अधिक कमी व अधिक दुर्लभ अनुभवातून संस्कार क्रमाक्रमाने पुसट करीत गेली तसतशी अगदी प्रथम भूमिकेपासून तो सहाव्या भूमिकेपर्यंत चेतनेची आत्मानुवर्ती उत्क्रांती क्रमशः व सातत्याने प्रगत होत गेली, त्यामुळे परमात्म्याच्या चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या प्रगतीच्या दरम्यान विविध विरोधी संस्कार क्रमशः कमी होत गेले व पुसट होत गेले व तोपर्यंत परमात्म्याची सहाव्या भूमिकेवतील आत्मानुवर्ती उत्क्रांत चेतना मनोदेहाबाबत संपूर्ण सचेत झाली व फक्त विरोधी संस्कारांचा शेवटचा पुसट उर्वरीत लवलेश अपवाद म्हणून सोडल्यास व्यवहार्यतः मुळीच संस्कार शिल्लक नसताना तिने

मनोजगताचा संपूर्ण अनुभव घेणे सुरु केले. अन्य शब्दात, आत्मानुवर्ती उत्क्रांत चेतना मनाशी पूर्णपणे एकरुपता साधते व परमात्मा आपण मन असल्याचा अनुभव घेण्यासाठी प्रवृत्त होतो. आता मनुष्य अवस्थेतील परमात्मा मनाचे स्वरुपात अगदी शेवटचा सीमित संस्कार बाळगतो व तो स्वतःला मन म्हणून आपल्या स्वतःला (''स्व'' मध्ये) सोडून बाकी सर्वात परमात्म्याला समोरासमोर पाहतो. परमात्म्याच्या मानवअवस्थेतील चेतनेच्या सहाव्या भूमिकेची ही अवस्था होय.

हा सहाव्या भूमिकेच्या अवस्थेतील मनोचेतन परमात्मा या ठिकाणी प्रत्यक्षात सर्व संस्काररहित असतो व त्याला केवळ मनाची चेतना असते व आता परमात्मा स्वतः त्याचे समोर असतो व तो त्याला समोरासमोर पाहतो व त्याला सर्वात देखील पहातो. असे असले तरी तो स्वतःला मात्र परमात्म्यात पाहात नाही कारण तो अजुनही मनाच्या चेतनेने संस्कारीत असतो व स्वतःला मन म्हणूनच समजतो.

हा मनुष्य अवस्थेतील मनःचेतन परमात्मा मनाशी साहचर्य करीत असतांना तो स्वतःबद्दल मन म्हणून सचेत असल्यामुळे अजुनही परमात्म्यापेक्षा काही वेगळा असल्याचा अनुभव घेतो, कारण तो आपल्या मनःचेतनेव्दारा परमात्म्याला प्रत्यक्षपणे समोरसमोर पाहातो. त्यानंतर सुद्धा तो परमात्म्याला अधिक जास्त स्पष्टपणे व तीव्रतेने पाहतो की, जितके परमात्म्याच्या स्थूल अथवा सूक्ष्म अवस्थेमध्ये तो स्थूल व सूक्ष्म जगतांच्या स्थूल तसेच सूक्ष्म पदार्थांना पाहू शकत होता.

विविध व असंख्य विरोधी संस्कारांचा अनुभव घेतलेली परमात्म्याची चेतना आता या स्थितीत विरोधी संस्कारांच्या अगदी शेवटच्या द्वैताच्या लवलेशाचा अनुभव घेते. म्हणून सहाव्या भूमिकेतील मनुष्य अवस्थेतील मनःचेतन परमात्म्याला अजुनही द्वैताचे भान असते म्हणजेच तो स्वतः मनाशी एकरुप होतो व स्वतः परमात्म्यापासून वेगळा असल्याचे समजतो.

मनोभुवनातील चेतनेची आत्मानुवर्ती उत्क्रांती जास्त स्पष्टपणे जाणण्यासाठी हे समजणे आवश्यक आहे की, चेतनेच्या पाचव्या व सहाव्या भूमिकांचे मनोजगत हे मनाचे क्षेत्र आहे. मनोभूमिकेतील या मनाचे दोन कक्ष आहेत.

पहिल्या कक्षात मनाची अवस्था चौकस किंवा मननशील असते. या अवस्थेत मन विचार म्हणून कार्य करते. उच्च विचार, निकृष्ट विचार, चांगले विचार, वाईट विचार, भौतिक विचार, आध्यात्मिक विचार तसेच सर्व प्रकारचे, सर्व दर्जाचे व सर्व स्थितीतील विचार.

दुसऱ्या कक्षात मनाची अवस्था प्रभावित करणारी किंवा संवेदनशिल असते या अवस्थेमध्ये मन भावना म्हणून कार्य करते जसे, हालअपेष्टांची व भावनांची संवेदना होणे, इच्छा व लालसेची भावना, वियोगाच्या व्यथांची भावना, तसेच कित्येक प्रकारच्या, दर्जाच्या व स्थितीच्या भावना.

मनोजगताच्या मनाची ज्याअर्थी स्पष्टपणे द्वंद्वात्मक कार्ये आहेत त्या अर्थी हे अनिवार्य आहे की, मनाच्या क्षेत्रातील (म्हणजे मनोभुवनातील) अनुभव सुद्धा स्पष्टतः दोन प्रकारचे असले पाहिजेत.

अशा प्रकारचे मनोभुवनाला दोन क्षेत्रे आहेत. म्हणून चेतनेच्या पाचव्या भूमिकेचे क्षेत्र हे विचारांचे आहे व चेतनेच्या सहाव्या भूमिकेचे क्षेत्र हे भावनांचे आहे.

याचा परिणाम असा होतो की, पाचव्या भूमिकेतील मनुष्य अवस्थेतील मनःचेतन परमात्मा मनाच्या पहिल्या कक्षाशी एकरुप होतो जे मन चौकस किंवा मननशील असते म्हणून पाचव्या भूमिकेतली मनुष्य अवस्थेतील हा मनःचेतन परमात्मा विचारांचा निर्माता व स्वामी असतो. कारण तो मूर्तिमंत विचार असतो आणि त्यामुळे त्याला परमात्म्याच्या सर्व स्थूल व सूक्ष्म चेतन अवस्थेत असलेल्या सर्व मनांच्या केवळ विचारकक्षावर नियंत्रण करण्याची क्षमता असते. याचा बहुधा, असा चुकीचा अर्थ लावल्या जातो की, तो परमात्म्याच्या सर्व स्थूल व सूक्ष्मचेतन अवस्थेत असलेल्या मनांचे नियंत्रण करतो, परंतु वस्तूस्तिती ही आहे की, चेतनेच्या पाचव्या भूमिकेतील परमात्मा समग्र मनावर नियंत्रण करीत नाही तर तो फक्त मनाची ही स्थिती नियंत्रित करतो की, ज्यामध्ये फक्त विचार म्हणून कार्य केल्या जाते.

मनुष्य अवस्थेतील मनःचेतन परमात्मा चेतनेच्या पाचव्या भूमिकेत केवळ विचार प्रसृत करणाऱ्या चौकस व चिंतनशील मनाशी आपली एकरुपता करतो व तो मनाच्या  दुसऱ्या कक्षाशी आपली एकरुपता करीत नसल्यामुळे तो भावनांवर (म्हणजे भावना व इच्छा) प्रभुत्व प्रस्थापित करण्यास असमर्थ असतो.

पाचव्या भूमिकेतील मनुष्य अवस्थेतील मनःचेतन परमात्मा चेतनेच्या अधिकतर आत्मानुवर्ती उत्क्रांती बरोबर चेतनेच्या सहाव्या भूमिकेत प्रगत होतो. ज्या ठिकाणी त्याला मनोभुवनाच्या मनाच्या दुसऱ्या कक्षाची चेतना प्राप्त होते व अशाप्रकारे तो मनाच्या दुसऱ्या कक्षाशी (म्हणजेच प्रभावी किंवा संवेदना बाळगणाऱ्या मनाशी) एकरुपता करण्यास प्रवृत्त होतो.

मनुष्य अवस्थेतील मनःचेतन परमात्मा चेतनेच्या सहाव्या भूमिकेत मनोजगताचा अनुभव घेतो व हा अनुभव त्याला भावनांशी केलेल्या पूर्ण एकरुपतेव्दारा ''पाहण्याच्या'' मनोद्रिंयाने होतो व अशाप्रकारे मनुष्य अवस्थेतील परमात्मा हा स्वतः ''विचार'' नसून तो ''मूर्तिमंत' भावना असतो यामुळेच तो परमात्म्याला सतत समोरासमोर सर्व वस्तूत सर्व ठिकाणी पाहण्याच्या भवनांचा जाणीवपूर्वक अनुभव घेतो. परमात्म्याला सतत सर्वत्र पाहण्याची त्याला संवेदना (भावना) होते, परंतु स्वतःला परमात्म्यात परमात्मा म्हणून पाहाण्याची संवेदना होऊ शकत नाही. याच कारणामुळे तो परमात्म्याला पाहण्याच्या भावनांचा मेळ त्याच्या स्वतःच्या एकरुपतेशी परमात्मा म्हणून बसवू शकत नाही, कारण तो अजुनही आपली एकरुपता भावनांशी करतो. परमात्म्याशी एकरुप होण्याची त्याला तीव्र भावना, उत्कंठा व तळमळ असते ज्याला तो या स्थितीत अगदी समोरासमोर पाहाण्याच्या संवेदनेचा अनुभव घेतो.

मनाच्या दुसऱ्या कक्षाशी (भावनांशी) एकरुप होणे ही मानवी अवस्थेतील परमत्म्याची ती अवस्था आहे की, जेथे दिव्यप्रेमाचा प्रबळ पैलू जो अगदी शेवटी परमात्म्याशी एकरुप होण्यासाठी अग्रेसर होतो (म्हणजेच जाणीवपूर्वक परमात्म्याचा साक्षात्कार) तो अत्यंत शक्तीने प्रगट होतो.

यामुळे हे अगदी स्पष्ट असावयास पाहिजे की, मनोभुवनाची पाचवी भूमिका ही केवळ विचारांच्या परिपूर्ण चेतनेची अवस्था होय. या अवस्थेत केवळ विचारांच्या नियंत्रणावर व निर्मितीवर स्वामित्व प्रस्थापित होते आणि इच्छा व भवानांच्या संवेदनांवर नियंत्रण किंवा स्वामित्व येथे असत नाही. परंतु मनोभुवनाची सहावीभूमिका ही भावनांची परिपूर्ण चेतना असलेली अवस्था आहे व अशाप्रकारे भावनांच्या निर्मितीवर व नियंत्रणावर स्वामित्व प्रस्थापित होते व अशा भावनांच्या क्षेत्रात एखादा विचार देखील आत शिरण्यासाठी मुळीच वाव

राहात नाही.

सहाव्या भूमिकेची चेतना ही विचाररहित असते व ती परमात्म्याच्या सर्व स्थूल व सूक्ष्म चेतन अवस्थांच्या भावनांना संचालित करते. परमात्म्याच्या स्थूल व सूक्ष्म चेतन अवस्थातील सर्वांच्या ह्दयावर स्वामित्व असा यांचा बहुधा चुकीचा अर्थ लावला जातो. तो तथाकथित ह्दयांना नियंत्रित किंवा नियमबद्ध करीत नाही परंतु तो मनोभुवनाच्या मनाच्या दुसऱ्या कक्षाला नियंत्रीत व संचालित करतो जे भावना आणि इच्छांच्या संवेदनांना प्रसृत करते.

चेतनेच्या सहाव्या भूमिकेत परमात्म्यावर प्रेम करणे व त्याच्याशी एकरुप होण्याची उत्कंठा बाळगणे, हे परिपूर्ण अभिव्यक्त झालेले असते. जेव्हा केवळ मनोभुवनाची सहावी भूमिका पार केल्या जाते तेव्हाच संस्कारांच्या अंतीम लवलेशाच्या लोपाबरोबर मायेचा लोप होतो व सत्याचा साक्षात्कार होतो.

मनुष्य अवस्थेतील मनोचेतन परमात्मा सहाव्या भूमिकेत अजुनही व्दैताचा अनुभव घेतो. कारण परमात्मा चेतनेच्या या अवस्थेत स्वतःला परमात्मा म्हणून न मानता तो स्वतःला मनच समजतो.

जो पर्यंत चेतनेची अंतिम आत्मानुवर्ती उत्क्रांतीची सातवी भूमिका प्राप्त होत नाही तोपर्यंत हा द्वैताचा अनुभव बराच काळ रेंगाळत राहतो. चेतनेच्या आत्मानुवर्ती उत्क्रांतीच्या प्रक्रियेतील ही अंतीम व सातवी स्थिती आहे, जेव्हा मनुष्य अवस्थेतील परमात्म्याची परिपूर्ण चेतना आता पूर्णपणे अंतर्मुख झाली आहे व इतकी पूर्णपणे अंतर्मुख झाली की, ती आता त्याच्या स्वतःच्या निर्मितीच्या वस्तू ऐवजी आपल्या स्वतःमध्येच स्थिर व केन्द्रित झाली आहे.

आता परिपूर्ण चेतना ज्याअर्थी पूर्णपणे आत्मानुवर्ती उत्क्रांत झालेली आहे त्याअर्थी ''मायेची'' रुपे जी वरपांगी अस्तित्वात असल्यासारखी दिसत होती ती त्यांच्या संस्कारांसह पूर्णपणे लोप पावतात. ''काही नाही'' च्या साहचर्यामुळे निर्माण झालेले सर्व संस्कार पूर्णपणे नष्ट झाल्यानंतर मनुष्य अवस्थेतील परमात्म्याची संस्कारीत चेतना उत्स्फुर्तपणे परमात्म्याच्या संस्कारशुन्य किंवा संस्काररहीत चेतनेमध्ये रुपांतरीत होते व मानव अवस्थेतील परमात्म्याला त्याच्या अगदी निर्वात अशा मूळ स्थितीत, विलीन होण्याचा अनुभव घेण्यास भाग पाडते. हे स्वाभाविक आहे की पूर्णतया आत्मानुवर्ती उत्क्रांत परिपूर्ण चेतनेने जी आता संस्काराच्या लवलेशापासून

देखील मुक्त आहे तिने परमात्म्याच्या मूळ पूर्ण निर्वात अवस्थेच्या अनुभवाशिवाय दुसरा कोणताच अनुभव द्यायला नको, जी अवस्था (निर्वात) एकदा केव्हातरी सर्वत्र व्यापलेल्या अवस्थेत विद्यमान होती व जिचा आता जाणीवपूर्वक अनुभव घेतल्या जात आहे.

पूर्णपणे आत्मानुवर्ती उत्क्रांत झालेली ही संपूर्ण चेतना हीच सर्वश्रेष्ठ चेतना किंवा ''महाचैतन्य' होय. मूळ पूर्ण निर्वात अवस्थेतील अचेतन परमात्मा आता तो आपल्या परमात्म्याच्या मूळ 'परात्पर परब्रह्म' अवस्थेमध्ये पूर्णपणे सचेत किंवा सर्वात श्रेष्ठ चेतना असलेला असतो.

ह्या परमात्म्याच्या पूर्णपणे निर्वात असलेल्या मूळ अवस्थेत विलीन होण्याला चेतनेच्या सातव्या भूमिकेचा 'फना' प्राप्त होणे असे म्हटले जाते.

सुफी परिभाषेत फनाचा अर्थ होतो ''पूर्णपणे विलीन होणे'' फनाच्या दोन अवस्था आहेत. फनाची पहिली अवस्था म्हणजे पूर्णपणे निर्वात अवस्थेचा सचेत अनुभव घेणे ही आहे व फनाची दुसरी अवस्था किंवा 'फना फिल्लाहची' अवस्था म्हणजे ''मी परमात्मा आहे'' या अवस्थेचा सचेत अनुभव असतो. 'फना फिल्लाह' ही दुसरी अवस्था मनुष्य अवस्थेतील परमात्म्याचे लक्ष्य (Goal) आहे. ज्या अवस्थेत परमात्मा मानवीरुपात म्हणजेच मनुष्य म्हणून ''मी परमात्मा आहे'' या अवस्थेचा पूर्ण चेतनेने अनुभव घेतो. या अवस्थेला सुफींनी अंतिम मज्झुबियत ची अवस्था अशी संज्ञा दिली आहे.

फनाची प्रथम अवस्था प्राप्त होण्याच्या बरेच आधी, मनुष्य अवस्थेतील परमात्म्याला मनुष्य म्हणून मर्यादित अहंची किंवा 'मी' ची मन, प्राण शक्ति, शरीर आणि सामान्य जागृतावस्थेतील जगताची परिपूर्ण चेतना होती. कारण मनुष्य अवस्थेतील परमात्म्याची मनुष्य म्हणून पूर्ण जाणीव त्याच्या सीमित संस्काराव्दारां प्रत्यक्षपणे त्यांच्यावर (मन, शक्ति, इत्यादीवर) केंद्रित झाली होती. आणि मानवअवस्थेतील मनुष्य म्हणून परमात्म्याची चेतना आत्मानुवर्ती उत्क्रमित झाली न झाली तोच आत्मानुवर्ती उत्क्रांत चेतनेने सर्वोत्कृष्ट उपचेतनेच्या क्रमशः सहा भूमिकांचा अनुभव या सहा भूमिकांच्या प्रत्येक भूमिकेत मिळविलेल्या व खर्च केलेल्या संस्काराव्दारां घेतला ज्या वेळेस ही सर्वोत्कृष्ट उपचेतना पूर्णपणे आत्मानुवर्ती उत्क्रमित झाली म्हणजेच त्याच्या स्वतःकडे ती अंतर्मूख झाली, तेव्हा मानवावस्थेतील परमात्म्याने मानव म्हणून

संस्काररहित अशी सर्वोत्कृष्ट चेतनेची सातवी भूमिका प्राप्त केली. लक्ष्य (Goal) प्राप्त करण्याची ही अगदी शेवटची अवस्था होती.

एकाचवेळी चेतनेच्या परिपूर्ण आत्मानुवर्ती उत्क्रांतीबरोबर आणि सर्वोत्कृष्ट चेतना प्राप्त केल्यानंतर मन अगदी अंतीमतः पूर्ण नष्ट होते व एकदाचे नेहमीकरिता सर्व संस्कारासह लोप पावते, मर्यादित अहं किंवा ''मी'' मन, प्राणशक्ती, शरीर व जगत यांचे सर्व मिथ्या अनुभव नेहमीकरिता नाहिसे होतात व ते पूर्णपणे लोप पावतात. कारण हे सर्व अनुभव ''काही नाही'' तून निर्मिलेल्या संस्कारांची फलनिष्पत्ती होती ज्याचा अक्षरशः अर्थ ''काहीच नाही'' (शुन्य) असा होतो व जे नव्हतेच.

शेवटी सीमित अहं किंवा मी, मन, प्राणशक्ती, शरीर (म्हणजे सौख्याचे प्रतिक) व जगत यांच्या सुसंगत लवाजम्यासह लुप्त होण्याबरोबरच चेतनेला निरवकाश रिक्ततेच्या अवस्थेचा आपोआपच अनुभव येतो व ही चेतना एकवेळ प्राप्त केल्यानंतर ती शाश्वतरितीने टिकून राहते. मनुष्य अवस्थेतील परमात्म्याची मनुष्य म्हणून या अवस्थेतील सर्वोत्कृष्ट चेतना जी परिपूर्ण चेतना आहे, ती आता केवळ निर्वात पोकळी बाबतच सचेत असते. ती चेतना आता ''निव्वळ निर्वात पोकळीवरच'' स्थिर आणि केन्द्रित झालेली असते.

ही पूर्ण पोकळी आपल्या पूर्णतेच्या शिखरावर असते, येथे केवळ शुन्यतेचेच प्रभुत्व असते. ''काही नाही'' चा तसेच ''सर्व काही'' चा पूर्णपणे अभाव असते. म्हणून तिला ''दिव्य निर्वात पोकळी'' म्हटले जाते व ती मायेच्या भ्रमातून जन्माला आलेली नसते. परंतु ती सत्यापासून निर्माण झालेली असते.

या दिव्य पोकळीची ही अवस्था त्या क्षणी अस्तित्वात येते, जेव्हा ''काही नाही'' (म्हणजे सृष्टी) चा लोप होतो किंवा ते अदृश्य होते आणि ''मी परमात्मा आहे'' या अवस्थेच्या यथार्थतेचा जाणीवपूर्वक अनुभव देण्यासाठी ''सर्व अस्तित्वाने'' भरुन जाण्यापूर्वी तत्क्षणी (ही दिव्य पोकळी) अस्तीत्वात येते.

ही फनाची प्रथम अवस्था आहे, जेथे ''काही नाही'' चा पूर्ण पसारा पूर्णतः नाहिसा होतो आणि जेथे सर्वोत्कृष्ट चेतना केवळ निर्वात पोकळीवर केन्द्रित झालेली असते. ती पोकळी आता मूळ दिव्य महानिद्रेतील परमात्म्याच्या ''मी परमात्मा आहे.'' या मूळ अवस्थेत शाश्वतपणे पसरली असल्यामुळे

अस्तित्वात असते.

यामुळे फनाच्या पहिल्या अवस्थेत मनुष्य म्हणून मानवअवस्थेत परमात्म्याची चेतना ही ना सीमित 'स्व' किंवा अहं किंवा मी, मन, प्राणशक्ति, शरीर व जगतांची आहे ना परमात्म्याच्या चेतनेची किंवा अमर्याद ''स्व'' किंवा अहं किंवा ''मी'' विश्वात्मक मन, अनिर्बंध प्राणशक्ती, विश्वात्मक शरीर व विश्वे यांची देखील आहे, कारण फनाच्या या पहिल्या अवस्थेत केवळ निर्वात पोकळी पसरल्याची जाणीव असते. ही निर्वात पोकळी देखील दिव्य असते व ती भ्रमात्मक मायेची (illusion) नसते परंतु ती सत्याची असते. फनाच्या या प्रथम अवस्थेत मनुष्य अवस्थेतील मनुष्य म्हणून असलेल्या परमात्म्याची सर्वश्रेष्ठ चेतना ''परमेश्वर आहेच्या'' मूळ अवस्थेच्या केवळ निर्वात पोकळीत पूर्णतः विलीन केल्याचा अनुभव घेते व अशाप्रकारे ती केवळ निर्वात पोकळी बाबतच सचेत असते.

हे आधीच सांगितल्याप्रमाणे ही तिच निर्वात पोकळीची अवस्था सामान्य मनुष्याच्या दैनंदिन गाढ निद्रेच्या स्थितीत देखील प्रस्थापित झालेली असते. ज्या ठिकाणी सीमित अहं किंवा ''मी'' मन, प्राणशक्ती, शरीर आणि जगतांचा देखील लोप होतो आणि प्राप्त केलेली चेतना सुप्तावस्थेत असते.

मनुष्याच्या दररोजच्या गाढनिद्रेच्या अवस्थेतील निव्वळ निर्वात पोकळीची अवस्था व फनाच्या प्रथम अवस्थेतील निव्वळ निर्वात पोकळीचा अनुभव, या दोन्ही अवस्थेत केवळ एकच मोठा फरक आहे परंतु तो फरक खऱ्या अर्थाने जमिन–अस्मान इतका आहे. जरी फनामध्ये तीच निव्वळ निर्वात पोकळी प्रस्थापित झालेली असली तरी फनामध्ये चेतना मुळीच निद्रीत राहत नाही. या अवस्थेत ती परिपूर्ण समृद्ध परिपक्व चेतना आता प्रत्यक्षात खरोखर अगदी त्याच निव्वळ निर्वात पोकळीचा परमात्म्याची मूळ स्थिती म्हणून अनुभव घेते.

फनाच्या प्रथम स्थितीचा अनुभव हा निर्वाण अवस्थेचा अनुभव असतो.

'निर्वाण' ती अवस्था असते की, जेथे प्रत्यक्षात ''परमात्मा नाही'' हीच केवळ एक अशी स्थिती आहे की, जेथे ''परमात्मा नाही'' व ''चेतना आहे'' गौतम बुद्धाने फनाच्या या पहिल्या अवस्थेच्या या अनुभवावर विशेष जोर दिला होता. परंतु कालांतराने बुद्धाने परमात्मा नाही'' असे प्रतिपादन केले होते,

असा याचा चूकीचा अर्थ लावण्यात आला, तथापि वस्तुस्थिती अशी आहे की, ’परमात्मा आहे’ परंतु फनाच्या प्रथम स्थितीत निव्वळ निर्वात पोकळीच्या अवस्थेत केवळ चेतना असते जी निव्वळ निर्वात पोकळीचा अनुभव घेते.

जसे परमात्म्याचे अस्तित्व नाही असे कदापि घडणे शक्य नाही तसे निर्वाण अवस्थेत परमात्मा स्वतः चेतनेची भूमिका वठवितो, ज्या चेतनेला कधी कधी अतिश्रेष्ठ चेतना किंवा ’’महाचैतन्य’’ म्हटल्या जाते.

या निर्वाण अवस्थेनंतर फनाची दुसरी स्थिती येते व ’’मी परमात्मा आहे’’ या अवस्थेचा चेतनायुक्त अनुभव घेतला जातो.

तथापि केवळ काहीबाबतीत असे घडते की, फनाच्या पहिल्या अवस्थेनंतर लगेच ’’फना फिल्लाह’’ ही फनाची दुसरी अवस्था येते. ज्या ठिकाणी नष्ट झालेल्या मिथ्या मर्यादित अहं किंवा ’मी’ ची जागा यथार्थ अनंत व अमर्याद ’मी’ ने घेतली जाते ज्यावर आता सर्वश्रेष्ठ चेतना (महाचैतन्य) आपोआपच केन्द्रित होते त्याचवेळी ती निव्वळ निर्वात पोकळी अनंताच्या अनुभवाने आपोआप भरली जाते.

मनुष्य अवस्थेतील मनुष्य असलेल्या परमात्म्याची आता अमर्याद ’मी’ वर स्थिर व केन्द्रित झालेली सर्वश्रेष्ठ चेतना उत्स्फुर्तपणे मनुष्याला अनंत परमात्म्याशी एकरुप करते. याच वेळी प्रस्तुत तादात्म्यासह अनंत परमात्म्याची सर्वश्रेष्ठ चेतना ’’**मी परमात्मा आहे**’’ या अवस्थेचा अनुभव घेते. हेच आहे ’’लक्ष्य.’’ ’’निर्विकल्प समाधी* प्राप्त करणे ही ’’लक्ष्याची’’ उपलब्धी होय.

अगदी ज्या प्रमाणे मनुष्य दररोज रात्री झोपी जातो व मनुष्य अवस्थेत रोज त्याला उठलेच पाहिजे, त्याचप्रमाणे जेव्हा एखादा दैवी निद्रेत जातो तेव्हा त्याने ’दिव्यत्वात’ जागे झालेच पाहिजे. याचप्रमाणे फनाची पहिली अवस्था ही परिपूर्ण चेतनेसह गाढनिद्रेची अवस्था आहे आणि फनाची दुसरी अवस्था ’’फनाफिल्लाह’’ आहे, ती परमात्म्यात परमात्मा म्हणून जागृत होण्याची अवस्था आहे.

---

* (टीप–मुक्ती मिळविण्यासाठी आत्म्याला निर्वाण अवस्थेतून जाणे अनिवार्य असते. निर्वाण आणि निर्विकल्प या दोन्ही अवस्थेत जन्म–मृत्युच्या चक्रातून सुटका होते आणि याचमुळे निर्वाण हे लक्ष्य गृहित धरल्या जाते, परंतु वस्तुस्थिती ही आहे की, मानवयोनीतील मनुष्याचे यथार्थ लक्ष्य ’निर्विकल्प’ अवस्था प्राप्त करणे हे आहे. निर्वाण हे ’लक्ष्य’ म्हणून व ’निर्विकल्प’ जे की ’लक्ष्य’ आहे या दोहोत जमीन–अस्मानाचे अंतर आहे.)